म. ग्रं. सं. ठाणें
विषय वाङ्मय
सं. क्र. २००८

# अभंग-संकीर्तन

## ( भाग दुसरा )

ह. भ. प. शं. वा. दांडेकर,
एम्. ए.

REFBK-0014838

द्वितीयावृत्ति

१९६५ ]

[ मूल्य रुपये २–५०

१४६३
उत्थां
६४८२२
१५।३।७७
२००८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमुद्रा योजना
१९७०

# अभंग-संकीर्तन

भाग २ रा

卐

शंकर वामन दांडेकर,
एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... वि: ...
REFBK-0014838

द्वितीय आवृत्ति

मकरसंक्रांत, शके १८८६

किंमत रु. २-५०

प्रकाशक :
**मनोहर यशवंत जोशी,**
'प्रसाद' प्रकाशन
सदाशिव, पुणे २.

[ सर्व हक्क स्वाधीन ]

: मुद्रक :
**ज. ग. जोशी,**
जनार्दन प्रेस,
१३९९ सदाशिव, पुणे २.

# ग्रंथकर्त्याचें निवेदन

गेल्या वर्षाप्रमाणें यंदाहि आजच्या शुभदिनीं श्रीतुकाराममहाराजांच्या चरणीं अभंग-संकीर्तन-माला ( भाग दुसरा ) वाहण्यास आनंद वाटत आहे. या मालेंत 'प्रसाद'च्या यंदांच्या वर्षाच्या अंकांतून प्रसिद्ध झालेले नऊ अभंग व त्यांत नवीन दोन अशा अकरा अभंगांच्या अभंगकुसुमांची ही माला गुंफली आहे.

या मालेकरितां वारकरी भजनास अपरिचित असणाऱ्यांना तुकोबांच्या तत्त्वज्ञान-अध्यात्मावर प्रकाश पाडणारे पण सामान्यतः माहीत नसणारे असे रसाळ अभंग निवडले आहेत.

यांत भूपाळी, वासुदेव, आंधळा, पांगुळ, गौळण, काला, पंढरपूरचा वारकरी, व अद्वैतज्ञानाच्या बैठकीवरून होणारी उपासना व शेवटीं सत्समागम या विषयांवरील अभंग आले आहेत.

रामेश्वरभट्टांनीं म्हटल्याप्रमाणें तुकोबा जी ही 'शुद्ध अमृतवाणी वर्षले' तिच्या सेवनाकडे महाराष्ट्रीयांचें अधिक लक्ष वेधावें येवढाच या प्रकाशनाचा हेतु आहे.

आषाढ शु॥ ११
शके १८७५
पुणें शहर.

शं. वा. दांडेकर.

# दुसरी आवृत्ति

या ग्रंथाच्या प्रथमावृत्तीच्या निवेदनांत या 'अभंग-संकीर्तन मालेचे' २ चें जें वैशिष्ट्य दहा वर्षांपूर्वी सांगितलें आहे तें आजहि कायमच आहे, तुकोबांच्या वाणीचे रंग हे फुलपांखरासारखे क्षणिक नाहींत. तिचा रंग अवीट आहे. त्यांच्या काव्याचें 'अभंग' हें नांव सार्थ आहे. तें 'अक्षर' वाङ्मय आहे.

महाराष्ट्रीय वाचकवर्ग मागीलप्रमाणें याहि आवृत्तीचा स्वीकार करील अशी आशा आहे.

माघ शु. १० गुरुवार
शके १८८६
पुणे शहर.

शं. वा. दांडेकर.

# अनुक्रमणिका


१. माझें चित्त तुझे पायीं . . . . १
२. बोल बोलिले अबोले . . . . १३
३. आंधळ्यापांगळ्यांचा . . . . ३५
४. सहज मी आंधळा गा . . . . ४७
५. पांगुळ झालों देवा . . . . ६८
६. स्वयें सुखाचे झाले अनुभव . . . . ८७
७. मैं भूली घरजानी बाट . . . . ११६
८. ये दशें चरित्र केलें नारायणें . . . . १२९
९. होय होय वारकरी . . . . १४९
१०. येईन मी जन्म याजसाटीं देवा . . . . १६८
११. मागणें तें एक तुजप्रति आहे . . . . १८८

# अभंग-संकीर्तन

## माझें चित्त तुझे पायीं :

78.03.5

**: भूपाळीचा अभंग :**

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं ।
धरोनिया बाहीं । भव हा तारीं दातारा ॥१॥
चतुरा तूं शिरोमणि । गुणलावण्याची खाणी ।
मुकुट सकळां मणी । धन्य तूंचि विठोबा ॥२॥
करीं या तिमिराचा नाश । उदय होउनि प्रकाश ।
तोडीं आशापाश । करीं वास हृदयीं ॥३॥
पाहें गुंतलों नेणतां । माझी असो तुम्हां चिन्ता ।
तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥४॥

प्रस्तुतचा अभंग हा तुकाराममहाराजांचे भूपाळीचे म्हणून जे अभंग आहेत त्यांतील एक उत्कृष्ट अभंग आहे. हे अभंग पहाटेच्या वेळीं होणाऱ्या भजनांत म्हणण्यांत येत असतात.

तुकाराममहाराज या अभंगामध्यें देवाच्याजवळ फार महत्त्वाची अशी मागणी मागतात. मागणीचें स्वरूप व मागण्याची रीत ही कशी असेल हें मागणाऱ्याच्या अधिकारावर अवलंबून आहे. कांहीं मागणारे अशा रीतीनें आपली मागणी पुढें मांडतात कीं, त्यांच्या त्या मागण्याच्या पद्धतीमुळें दात्याला द्यावें अशी झालेली बुद्धीही नाहींशी होते. उलट, हुशार मागणारा असा असतो कीं, मागावयाला आला तरी कांहीं द्यावयाचें नाहीं असें ठरवून जरी दाता बसला असला तरी मागणाराचें असें कौशल्य असतें कीं, तो दात्याच्या हृदयाला पाझर फोडतो व मागावयास आलेल्यास इष्ट वस्तु देतो.

मागणाऱ्यांमध्यें हे जसे दोन प्रकार करतां येतील तसेच दुसऱ्या दृष्टीनें बघितल्यास आणखीही पुढीलप्रमाणें प्रकार करतां येतील.

कांहीं मागणाऱ्यांना आपणाला काय हवें आहे हेंच समजत नाहीं. उदा०—जसें कांहीं रोगी. त्यांना काय होतें आहे हेंच समजत नाहीं व त्यामुळें वैद्याला काय सांगावें हेंच त्यांना समजत नाहीं. त्या अडाणी रोग्याला जर वैद्यानें विचारलें, " तुझें पोट दुखतें का ? " तर तो म्हणतो, "नाहीं." " डोकें दुखतें का ? " " नाहीं." वैद्य कंटाळून विचारतों कीं, " होतें काय ? " यावर तो रोगी म्हणतो, " कसनुसं होतंय." आतां त्यावर काय इलाज सांगणार ? अशाच प्रसंगाचें वर्णन करणारा खालील श्लोक प्रसिद्धच आहे :

" यस्य कस्य तरोर्मूलं येन केनाऽपि
घर्षितं । यस्मै कस्मै प्रदातव्यं यद्वा
तद्वा भविष्यति ।।

याहून वेगळा असा एक रोग्याचा प्रकार असतो. त्याला आपल्याला काय होतें आहे हें कळतें. बरें व्हावयाचें म्हणजे काय व तें कशानें होईल हें सुद्धां कळतें. परंतु, त्या बरें होण्याकरितां आवश्यक असणाऱ्या पथ्याचरण, औषधोपचार, औषधि इत्यादि गोष्टींवर त्याचा ताबा नसतो. म्हणून तो वैद्याला सांगत असतो, " वैद्यबुवा, मला काय रोग आहे, मी कशानें बरा होईन हें मला ठाऊक आहे; पण तीं औषधें मला मिळत नाहींत व माझेकडून पथ्य पाळलें जाणार नाहीं. तेव्हां मी तुमच्या रुग्णालयांत येऊन पडतों. तुम्ही कांहीं तरी करा व मला वांचवा." तसाच हुशार मागणाऱ्यांचा वर्ग असतो. तुकाराममहाराजांच्या ह्या अभंगांतील प्रथम कडव्यावरून तुकाराममहाराज हे तसे ' हुशार ' मागणारे होते हें उघड होणार आहे. ते म्हणतात—" माझें चित्त तुझ्या चरणांच्या ठिकाणीं राहील असें करा. तुम्ही म्हणाल काय करूं तर तें मला समजत नाहीं; पण तुम्ही माझें चित्त ज्याच्या योगानें तुमच्या चरणांच्या ठिकाणीं राहील असें कांहीं तरी करा व संसारांत बुडत चाललेला जो मी, त्या मला ह्या संसारसमुद्रांतून हात धरून वरतीं काढा. मी आपल्याजवळ ही मागणी करतों याचें कारण माझ्या

स्वतःच्या बलानें हा संसार-समुद्र तरून जाईन हें अशक्य आहे. कारण तो ब्रह्मदेवादिकांना सुद्धां स्वतःच्या बलानें तरून जाणें अशक्य आहे.

करितां विचार । तो हा दृढ संसार ।
ब्रह्मादिकां पार । नुल्लंघवे सामर्थ्यें ।।

मी तर त्यांत बुडतों आहे. मी आपल्याजवळ मागणी करतों याचें कारण असें आहे कीं, आपण दाते (दातार) आहांत."

" माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं ।
धरोनिया बाहीं । भव हा तारीं दातारा ।।१।।

तुकाराममहाराज भगवंताला 'दातार' असें संबोधितात हें योग्यच आहे. ज्ञानेश्वरींत एके ठिकाणीं अर्जुनानें भगवंताच्या दातृत्वाचें वर्णन केलें आहे. सामान्यतः दाता याचकानें जेवढें मागितलें असेल तेवढेंच देतो व देतांनाही ज्याला आपण देतों तो आपला शत्रु कीं मित्र आहे याचा विचार करून देतो. भगवंताचें दातृत्व याहून वेगळेंच आहे. अर्जुन म्हणतोः—

" तुझें औदार्य जाणों स्वतंत्र । देतां न म्हणसी पात्रापात्र ।
पैं कैवल्याऐसें पवित्र । जें वैरियांहीं दिधलें ।। . . . .

तुवां सनकादिकांचेनि मानें । सायुज्यीं सौरसु दिधला पूतने । जे विषाचेनि स्तनपानें । मारूं आली ।। हा गा राजसूय-यागाच्या सभासदीं । देखतां त्रिभुवनाची मांदी । कैसा शतधा दुर्वाक्यशब्दीं । निस्तेजिलासी ।। ऐसिया अपराधिया शिशुपाळा । आपणपें ठावो दिधला गोपाळा । आणि उत्तानचरणाचिया बाळा । काइ ध्रुवपदीं चाड ।। तो वना आला याचिलागीं । जे बैसावें पितयाचिया उत्संगीं । कीं तो चंद्रसूर्यादिकां परिस जगीं । श्लाघ्यु केला ।। ऐसा वनवासिया सकळां । देतां एकचि तूं धसाळा । पुत्रा आळ वितां अजामिळा । आपणपें देसी ।। जेणें उरीं हाणितलासी पांपरा । तयाचा चरण वाहसी दातारा । अझुनि वैरियाच्या

कलेवरा । विसंबसी ना ।। ऐसा अपकरिया तुझा उपकार । तूं अपात्रींही परी उदार ।।

अ. ११-९८-१०६

तुकारामबोवा देवाला 'दातार' असें संबोधितात यांत हेतु असा कीं, देवाच्या दातृत्वाची त्याला जाणीव करून देऊन आपली मागणी स्वीकारण्यास त्याला उद्युक्त करावें.

तुकारामबोवांचें हें आपलें गुणवर्णन ऐकून भगवान् देण्यास तयार होतील; पण आपली मागणी जरा जड असल्यानें देव असें म्हणण्याचा संभव आहे कीं, माझी तुला मदत करायची इच्छा आहे; पण तूं या भवसागरांत इतका खोल बुडून गेला आहेस कीं, तुला वरतीं काढण्यासाठीं काय युक्ति करावी हें मला सुचत नाहीं. अशी अडचण पुढें येईल असें कल्पून तुकाराममहाराज पुढील कडव्यांत देवाचें पुढीलप्रमाणें वर्णन करतात :

चतुरा तूं शिरोमणी । गुणलावण्याची खाणी ।
मुकुट सकळां मणी । धन्य तूंचि विठोबा ।।२।।

" तूं चतुरांमध्यें श्रेष्ठ आहेस. गुण व लावण्याची खाण आहेस. ( फार काय !) सगळ्यांमध्यें श्रेष्ठ असा तूं आहेस. हे विठोबा, खरोखर सर्वांत तूंच धन्य आहेस."

तुकाराममहाराज देवाला चतुरांमध्यें श्रेष्ठ असें म्हणतात हें किती यथार्थ आहे याची कल्पना जो या जगाच्या इतिहासाकडे बघेल त्याला सहज येईल. पुराणांतलाच एक चांगला दाखला द्यावयाचा तर तो खालील देतां येईल

हिरण्यकशिपूनें तपश्चर्या केली. ब्रह्मदेव प्रसन्न होऊन त्याला 'वरं ब्रूहि' म्हणाले. हिरण्यकशिपूनें आपण अमर व्हावें असा वर मागितला. त्यावर ब्रह्मदेव म्हणाले, " मीच मरका असल्यानें तूं मागतोस तो वर मी कसा देऊं शकणार ? तूं दुसरें कांहीं माग." हें ऐकून हिरण्यकशिपु आपली बुद्धि चालवून भाषा वेगळी, पण मागण्याचें अंतःस्वरूप तेंच असें मागूं लागला. तो म्हणाला, " मला दिवसा मरण नको, रात्रीं मरण नको !" ब्रह्मदेव म्हणाले, 'तथास्तु.' त्यावर हिरण्यकशिपु पुढें मागूं लागला,

" मला आंत मरण येऊं नये, बाहेर येऊं नये, मला मानवांकडून मरण नसावें व मानवेतरांकडून मरण नसावें ! " ब्रह्मदेव या त्याच्या मागण्याला तथास्तुच म्हणत राहिले. कारण त्यांना ठाऊक होतें कीं, मानवानें कितीही हुशारी दाखविली तरी त्याच्याहीपेक्षां सृष्टीचे उत्पत्तिस्थितिसंहारक भगवान् किती तरी पटींनीं अधिक हुशार आहेत. शेवटीं असें दिसून येतें कीं, भगवन्तांनीं नरसिंह अवतार धारण करून हिरण्यकशिपूच्या सगळ्या मागण्यांतून वाट काढून त्याला मारलें. या कथनाचें तात्पर्य असें आहे कीं, मोठमोठ्या मानवांनीं, दानवांनीं कितीही चतुराई केली तरी देवाच्या चतुराईशीं ती पुरी पडेल असें कधींच झालें नाहीं. म्हणूनच तुकाराम-महाराज देवाला तूं चतुरांमध्यें श्रेष्ठ आहेस असें म्हणतात. हें म्हणण्यांत अर्थातच त्यांना असें सुचवायचें आहे कीं, देवानें जर मनांत आणलें तर आपण कितीही खोल बुडालेले असलों तरी देवांत इतकी हुशारी आहे कीं, देव आपणांस सहजच वरतीं काढील.

पुढच्या भागांत तुकाराममहाराज देवाला म्हणतात, तुम्ही गुणलावण्याची खाण आहांत. सर्व गुणांनीं संपन्न एक देवच आहे. देवाच्या ठिकाणीं असणाऱ्या या गुणांपैकीं ज्यांचा वारंवार उल्लेख केला जातो त्या सहा गुणांचा उल्लेख ज्ञानेश्वरमहाराजांनीं पुढील ओवींत केला आहे :

आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य
हे साही गुणवर्य । वसति जेथ ।। म्हणोनि तो भगवंत ।

अ. ६-३७

गुणांप्रमाणेंच परमात्मा हा लावण्याची खाण आहे. ज्ञानेश्वरमहाराज पुढील अभंगांत परमात्म्याचें तेज व लावण्य वर्णन करतातः—

पांडुरंगकान्ति दिव्य तेज झळकती रत्नकीळ फांकती प्रभा ।
अगणित लावण्य तेज पुंजाळलें न वर्णवे तेथींचि शोभा ।।
कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु तेणें मज लावियेला वेधु ।

तात्पर्य, तुकोबा देवाला म्हणतात, " आपण सर्वगुणसंपन्न सर्वश्रेष्ठ असे आहांत, माझ्यासारख्या बुडत असलेल्यास काढण्याचें सामर्थ्य आपल्यांत आहे.

आपण औदार्यादि गुणांनीं संपन्न आहांत. म्हणून मी आपल्या पायांपाशीं विनंति करतों कीं माझा उद्धार करा. त्याकरितां पुढील गोष्ट कराः–"

करीं या तिमिराचा नाश। उदय होऊन प्रकाश।
तोडीं आशापाश। करीं वास हृदयीं ॥३॥

"आपण आपल्या प्रकाशाचा उदय करून माझ्या आंत असणारा जो अंधार तो नाहींसा करा. माझ्या आंत असणारे जे अनन्त आशापाश आहेत ते तोडून टाका व माझ्या अशा शुद्ध निर्वासना झालेल्या हृदया-मध्यें अखंड व कायमची वस्ती करा." तुकाराममहाराजांची अंधार दूर करा ही मागणी वेदांतील प्रसिद्ध 'तमसो मा ज्योतिर्गमय' याचीच आठवण करून देईल यांत शंका नाहीं. सूर्यासमोर जसा अंधार राहात नाहीं, तसा आपण माझ्यासमोर आपल्या तेजानें प्रगट झालांत म्हणजे माझ्यांतील अज्ञानांधकार नाहींसा होईल व त्या योगानें अज्ञानामुळें निर्माण होणारीं जीं आशेचीं बंधनें तीं सर्व तुटून जातील. माणसें दुःख भोगतात याचें कारण तीं आशेनें बांधलीं गेलीं आहेत हें होय. श्रीमद्-भागवतामध्यें म्हटलें आहे–

आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम्।

शेवटच्या कडव्यांत तुकाराममहाराज देवाला म्हणतात कीं, "मी इतकें जरी आपल्याला सांगितलें तरी सुद्धां मी अजाण आहें हें आपण विसरूं नका. मला माझ्या बऱ्याकरितां काय व्हावें असें वाटतें तें मीं आपल्यासमोर निवेदन केलें; पण खरें काय पाहिजे तें तुम्ही जाणतां." तुकाराममहाराज म्हणतात :

पाहें गुन्तलों नेणतां। माझी असो तुम्हां चिन्ता।
तुका ठेवी माथा। पायीं आतां राखावें ॥ ४ ॥

आपण हें लक्षांत घ्या कीं, मी अज्ञानपणानें, या संसारांत गुंतून पडलों आहें. माझी सर्व काळजी तुम्हींच घेतली पाहिजे. मी आपल्या पायांवर मस्तक ठेवून एवढी विनंति करतों कीं, कांहींही करून माझें रक्षण करा." भावार्थ संपला.

आतां या अभंगांतील प्रथम कडव्यांतील कांहीं मुद्द्यांचा थोडासा तपशीलवार विचार करूं:—

तुकाराममहाराज देवाजवळ मुख्यतः संसारांतून आपणांस देवानें वरती काढावें अशी प्रार्थना करतात व त्याला उपाय म्हणून आपलें चित्त देवाच्या चरणीं राहील असें कांहीं तरी करा अशी देवाला विनंति करतात. या ठिकाणीं दोन-तीन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. त्यांपैकीं पहिला असा : संसार-समुद्रांतून तरून जाण्याचा व भगवन्ताच्या चरणीं चित्त राहण्याचा काय संबंध आहे? दुसरा प्रश्न असा कीं, मन भगवन्ताच्या चरणीं लागावें अशी भगवन्ताला प्रार्थना करणें अवश्य आहे का? आपण प्रयत्न केला तर ती गोष्ट साध्य होणार नाहीं का?

प्रथम आपण पहिल्या प्रश्नाचा विचार करूं:—

संसारांतून तरून जाण्याचा व मन भगवन्ताच्या ठिकाणीं राहण्याचा काय संबंध आहे? याचें थोडक्यांत उत्तर जर द्यावयाचें तर तें भगवन्ताच्या शब्दांतच देतां येईल. भगवानच पुढील श्लोकांत ही गोष्ट स्पष्टपणें सांगतात :

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।

गीता, अ. १८-५८.

तेथ सकळ दुखःधामें। भुंजीजती जियें मृत्युजन्में।
तियें दुर्गमेंचि सुगमें। होती तुज ।। ज्ञा. १२७०.

ज्या संसारांतून आपणांला आपला उद्धार करावयाचा आहे तो संसार मनावर अवलंबून आहे.

मनोमात्रमिदं द्वैतम् । -गौडपाद कारिका.

मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः। -योगवासिष्ठ

ह्या उक्ति प्रसिद्धच आहेत. ज्ञानेश्वरमहाराज एके ठिकाणीं म्हणतात कीं, ज्याप्रमाणें सरोवर आटलें कीं, आंतील प्रतिबिंब आपोआप नाहींसें होतें त्याप्रमाणें मन का नाहींसें झालें म्हणजे संसार हा आपोआप नाहींसा होतो.

जेथ हें संसारचित्र उमटे। तो मनोरूपपटु फाटे
जैसें सरोवर आटे। मग प्रतिमा नाहीं॥ -अध्याय ५-१५६

म्हणून तुकाराममहाराजांनीं सुद्धां सर्व लोकांना मन प्रसन्न करून घेण्याची प्रार्थना केली आहे. ते म्हणतात—

मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धींचें कारण।
मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छा तें॥

हें मन भगवन्ताच्या चरणीं स्थिरावलें म्हणजेच शांत होतें, नाहींसें होतें. कारण, ज्याला मन अथवा चित्त म्हणून म्हणतात तें मूळचें चिद्‌च होय.

चित्तं चिद् विजानीयात् तकाररहितम् यदा।

चित्त हें मूळचें चिद्‌च आहे. विषयाच्या ध्यासानें तें चित्तत्वाला आलेलें आहे. तो विषयाचा ध्यास सुटला व तें आपल्या मूळ स्वरूपांत येऊन मिळालें कीं मूळस्वरूपाप्रमाणेंच होणार आहे. कै. जोगमहाराज हे या संबंधांत एक उत्कृष्ट दृष्टान्त देत :

एका मूर्ख गृहस्थाचा कोळशाला हात लागून त्याचे स्वच्छ परीटघडीचे कपडे खराब झाले. तें पाहून त्याला कोळशाचा अतिशय राग आला. तो मूर्खच असल्यानें त्यानें असा निश्चय केला कीं, कोळशाचा काळेपणा संपूर्ण नाहींसा करावयाचा. पण तो काळेपणा घालविण्यासाठीं त्या मनुष्यानें कोळसा पाण्यांत बुडवून दगडावर तो घासण्यास आरंभ केला. त्या घासण्याच्या योगानें कोळशाचा काळेपणा तर गेला नाहींच; पण उलट तो अधिकच चमकूं लागला. तरीसुद्धां तो मूर्ख गृहस्थ कोळसा घाशीतच होता. त्याच्या सुदैवानें तो गृहस्थ हें कोळसा घासण्याचें काम करीत असतां त्याचा एक जाणता मित्र तेथें आला. आपला स्नेही कोळसा घासतो आहे हें पाहून तो मित्र त्याला विचारूं लागला, "अरे, कोळसा कां घासतोस? त्यानें झालेला इतिहास सांगून कोळसा घासण्याचें कारण सांगितलें व तो म्हणाला, "मला त्या कोळशाचा काळेपणा पूर्णपणें घालवावयाचा आहे." हे त्याचे शब्द ऐकून तो मित्र हंसला व म्हणाला, "कोळसा स्वच्छ करायचा हा उपाय नव्हे. मी तुला तो दाखवितों." असें म्हणून त्यानें आपल्या स्नेह्यास शेगडी पेटविण्यास

सांगितलें. शेगडींतील कोळसे फुलून लाल झाले आहेत असें पाहून तो गृहस्थ घाशीत असलेला कोळसा त्यानें चिमट्यानें उचलून त्या पेटलेल्या निखाऱ्यांत टाकून दिला व आपल्या स्नेह्यास म्हणाला, " जरा थांब. थोड्याच वेळांत त्याचा काळेपणा जाईल." कांहीं वेळानें तो काळा कोळसा इतर निखाऱ्यांप्रमाणें त्याचा काळेपणा जाऊन लाल झाला.

या गोष्टीचें तात्पर्य असें कीं, निखाऱ्यांतून कोळसा तयार झाल्यानें त्याला पूर्वींसारखें तेजःसंपन्न व्हावयाचें असेल तर आपल्या मुळाकडे गेलें पाहिजे. तसेंच विषयाच्या सान्निध्यानें संकल्पांनीं मलिन झालेलें चित्त पुनश्च चिद्रूपता येण्यासाठीं चिदाच्या जवळ जाणें अवश्य आहे. तें तिथें जाऊन पडलें म्हणजेच संसारबीजरूपसंकल्प संपूर्ण नाहींसे होतात. हीच गोष्ट ज्ञानेश्वरमहाराज पुढील ओव्यांतून सांगतात--

तैसी आपली सोय देखे । आणि आपलिया स्वभावा मुके ।
हिवलीं जैसीं आंगिकें । हिंवों नेदी निजांग ॥

.... .... .... ....

ते स्वलाभ लाभलेपणें । मन मनपणाही धरूं नेणें ।
शिवतलें जैसें लवणें । आपुलें निज ॥

तेथ कें उठिती ते भाव । जिहीं इंद्रियमार्गीं धांव ।
घेऊनि ठाकावे गांव । विषयांचे ते ॥

अध्याय १७, ओ. ५२९-३४

तात्पर्य, मग भगवंताच्या चरणीं म्हणजे स्वरूपीं राहिलें म्हणजे तें संकल्पशून्य होतें व अशा रीतीनें संकल्प नाहींसा झाल्यानें संसारही सर्व नाहींसा होतो. म्हणूनच भगवन्त स्वतः " मच्चित्तः सर्व दुर्गाणि मत्प्रसादात् तरिष्यसि " असें फल सांगून

मच्चित्त: सततं भव । गीता अ. १८-५७

असें म्हणतात. ही भगवदुक्ति डोळ्यांसमोर ठेवूनच देवाच्याजवळ तुकारामबोवा मागणें मागतात--

माझें चित्त तुझे पायीं। राहे ऐसें करीं कांहीं।
धरोनिया बाहीं। भव हा तारीं दातारा ॥ १ ॥

यानंतर दुसरा प्रश्न उत्पन्न होतो तो असा कीं, आपलें मन भगवच्चरणारविंदीं अखंड राहावें याशाठीं देवाची प्रार्थना करण्याचें काय कारण आहे? मन आपलें आहे. आपण ठेवूं त्या ठिकाणीं तें राहील. त्याच्याकरितां देवाला तसदी देण्याचें, देवाची प्रार्थना करण्याचें काय कारण? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, आपण मन जरी आपलें म्हणत असलों तरी वस्तुस्थिति अशी असते कीं, आपण मनाचे अधीन झालेले असतों. जसा व्यसनाधीन मनुष्य हा व्यसन आवरण्याला स्वतंत्र राहातच नाहीं; त्याचप्रमाणें जीवात्मा हा मनाच्या इतका अधीन झालेला असतो कीं, मन आवरून तें हवें तिथें ठेवूं असा त्याचा ताबा मनावर असत नाहीं. घोड्यावर ज्याला बसतां येत नाहीं अशा तऱ्हेचा मनुष्य मस्त घोड्यावर बसला असतां कसा असहाय होतो ह्या रूपकानें तुकाराममहाराजांनीं पुढीलप्रमाणें जिवाचा हा पांगळेपणा सांगितला आहे :--

पांगुळ झालों देवा नाहीं हात ना पाय।
बैसलों जयावरी सैराट तें जाय।
खेटितां कुंप कांटी खुंट दरडी न पाहे
आधार नाहीं कोणी मज बाप ना माये ॥१॥

मन हें अत्यंत चंचल आहे. तें रजोगुणांचें बनलेलें असल्यामुळें स्थिरता ही त्याला ठाऊकच नसते, ज्ञानेश्वरांनीं तेराव्या अध्यायांत मनाचें फार उत्कृष्ट वर्णन केलें आहे. ते म्हणतात—

जें इंद्रियां आणि बुद्धी। माझारिलिये संधीं।
रजोगुणाच्या खांदीं। तरळत असे ॥

... ... ..

तेथ चांचल्य निखळ। एकलें ठेलें निढाळ।
म्हणोनि रजाचें बळ। धरिलें तेणें ॥

अध्याय १३, १०४–१०८

तुकारामबोवा म्हणतात--

बहुत चंचल चपळ। जातां येतां न लगे वेळ ॥

असें चपळ मन आपल्या ताब्यांत राहून आपण म्हणूं तिकडे लागणें कठिण. अर्जुनासारखे, तुकोबांच्यासारखे यांनासुद्धां या मनापुढें हात टेकण्याची पाळी आली.

अर्जुन म्हणतो–

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥

गीता, अ. ६–३४

ज्ञानेश्वरमहाराजांनीं या श्लोकावर मोठें सुंदर लिहिलें आहे. त्यांतला कांहीं भाग पुढें देतों:–

म्हणोनि ऐसें कैसें घडेल। जें मर्कट समाधि येईल। कां राहा म्हणतलिया राहेल। महावातु ॥ जें बूद्धीतें सळी। निश्चयातें टाळी। धैर्येसीं हातफळी। मिळऊनि जाय ॥ जें विवेकातें भुलवी। संतोषासी चाड लावी। बैसिजे तरी हिंडवी। दाही दिशां ॥ जें निरोधिलें घे उवावो। जया संयमुचि होय सावावो। तें मन आपुला स्वभावो। सांडील काई ॥ म्हणोनि मन एक निश्चल राहेल। मग आम्हांसि साम्य येईल। हें विशेषेंही न घडेल। याचि लागीं ॥

ज्ञा. ४१३–४१७

तुकारामबोवा आपलाही अनुभव असाच सांगतात :–

काय करूं आतां या मना। न संडी विषयवासना।
प्रार्थितांही राहेना। आदरें पतना नेऊं पाहे ॥१॥
आतां धांवें धांवें गा श्रीहरी। गेलों वायां नाहीं तरी।
न दिसे कोणी आवरी। आणिक दुजा तयासी ॥२॥

न राहे ठायीं एकी घडी । चित्त तडतडां तोडी । भरलें विषय भोवंडीं । घालूं पाहे उडी भवडोहीं ।।३।।
आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला माझा यांणीं । तुका म्हणे चक्रपाणी । काय अझोनि पाहतोसी ।।४।।

बरें, हें मन चंचळ असेना, तें जर वारंवार देवाकडे जातें तर बरें होतें. पण तसें होत नाहीं. मन सर्व ठिकाणीं जाईल, पण देवाकडे जाणार नाहीं. जणूं काय त्याला ठाऊक आहे कीं, आपण देवाकडे गेलों कीं आपण आटपलोंच. जशी माशी पेढा, विष्ठा सर्वांवर बसते; पण निखाऱ्यावर बसत नाहीं. तिला ठाऊक आहे कीं, त्यावर बसलें कीं सर्व आटोपलेंच. तसेंच मन सर्वांवर बसेल; पण देवावर नाहीं. कारण तेथें गेलें कीं मनपणाचा मृत्युच ! तुकारामबोवा पुढील अभंगांत मनाच्या या सर्व गुणांचा उल्लेख करून देवाजवळ प्रार्थना करतात कीं, महाराज, मन आमच्याच्यानें आवरलें जाणार नाहीं. आपणच तें आवरा व आमचें रक्षण करा.

अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ।।१।।
काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरीनाथा ।
करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ।।२।।
भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ।।३।।
बहुत चंचल चपळ । जातां येतां न लगे वेळ ।।४।।
किती राखो दोनी काळ । निजलिया जागे वेळ ।।५।।
मज राखें आतां । तुका म्हणे पंढरीनाथा ।।६।।

मन विषयाचें चिंतन करीत असल्यामुळें तें विषयाकार झालेलें असतें. तें इंद्रियांच्या अधीन होऊन बुद्धीचा दरवाजा झांकतें. नियंत्रण करणारी बुद्धीच कमजोर झाल्यानें मनाला कोण आवरणार ?

अशा असहाय स्थितींत मनाचाही प्रेरक असणारा परमात्मा त्याची प्रार्थना करणें हाच उत्कृष्ट मार्ग राहातो. योगाभ्यास, वैराग्य इत्यादि मार्ग आहेत; पण त्यांत सुद्धां यश येण्यास भगवंताच्या कृपेचीच आवश्यकता आहे. म्हणूनच सर्व धर्मांतील साधूंनीं याकरितां ईश्वराची प्रार्थना केलेली

आढळून येते. 'अचपळ मन माझें नावरे आवरीतां। तुजविण शिण होतो धांवरे धाव आतां' सारखीं कळकळीची करुणा भाकणारीं समर्थ रामदासस्वामींचीं करुणाष्टकें प्रसिद्धच आहेत.

तात्पर्य, मन हें देवाच्या चरणीं राहावें असें आपणांस वाटलें तरी तसें मनास पटून तें मन देवाच्या चरणीं लागणें कठिण आहे. याबाबत पूर्व साधूंचा अनुभव व आपला अनुभव लक्षांत घेऊनच तुकारामबोवा देवाची याकरितां पुढीलप्रमाणें प्रार्थना करतातः—

माझें चित्त तुझे पायीं। राहे ऐसें करीं कांहीं।
धरोनियां बाहीं। भव हा तारीं दातारा ॥१॥

---

## बोल बोले अबोले : : : २ : :

### : : वासुदेव : :

बोल बोले अबोले। जागे बाहेर आंत निजेले। जैसें घरांत घरकुल केलें। नेणें अंधार ना उजाडलें गा ॥१॥ वासुदेव कारतो फेरा। वाडियांत बाहेर दारा। कोणी कांहीं तरी दान पुण्य करा। जाब न द्याल तरी जातों माघारा गा ॥२॥ हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें। गजर होतो बहु मोठ्यानें। नाहीं निवडिलीं थोर लहानें। नका निजों भिकेच्या भेणें गा ॥३॥ मी वासुदेव तत्त्वतां। कळों येईल विचारितां। आहे ठाऊका सभाग्य संतां। नाहीं दुजा आणिक मागता गा ॥४॥ काय जागाचि निजलासी। सुनें

जागवूनि दारापासीं। तुझ्या हितापाठीं करी वसवसी। भेटी न घेसी वासुदेवासी गा ॥५॥ ऐसे जागविले अवघे जन। होतें संचित तिहीं केलें दान। तुका म्हणे दुबळीं कोण कोण। गेलीं वासुदेवासी विसरून गा ॥६॥

श्रीतुकाराममहाराजांचे 'वासुदेव' म्हणून जे अभंग आहेत त्यांपैकीं हा एक अभंग आहे. तुकाराममहाराजांच्या पूर्वींही श्रीज्ञानदेव, नामदेव, एकनाथ-प्रभृति संतांनीं या रूपकाचा उपयोग करून अभंग लिहिले आहेत. हें रूपक समजण्याकरितां प्रथम वाचकांना वासुदेवाची ओळख करून देणें अवश्य आहे.

वासुदेव ही खेडेगांवांतील एक संस्थाच आहे असें म्हटलें तरी चालेल. खेडेगांवांत ज्याप्रमाणें पांगळे, आंधळे, जोगी, मलंग, सरवदे वगैरे भीक मागत फिरतात, त्याचप्रमाणें 'वासुदेव' हा सुद्धां एक भिक्षेकऱ्यांचा वर्ग आहे; पण इतर भिक्षेकरी आणि 'वासुदेव' यांत फरक आहे. आंधळे-पांगळे इत्यादि आपल्या पोटाकरितां भीक मागतात. वासुदेव हा आपल्या पोटाकरितां तर भीक मागतोच, पण तो गांवाचें एक सामाजिक काम करतो. त्याची भीक मागावयाची वेळ ही ठरलेली आहे. तो हवा त्या वेळेला भीक मागत नाहीं. तो पहांटे, उजाडायच्या सुमारास, 'पंच पंच उषः-कालीं' भीक मागावयास येतो. अंगांत लांब पायघोळ अंगरखा, डोक्याला मोराच्या पिसांची टोपी, एका हातांत चिपळ्या व दुसऱ्या हातांत वीणा, टाळ अशा थाटांत हा घराच्या बाहेर व प्रसंगविशेषीं आंत अंगणांत जाऊन गांवांतील आळोआळीं फिरतो व तोंडानें 'पंढरीच्या विठोबाला, आळंदीच्या ज्ञानोबाला, जेजुरीच्या खंडोबाला' असें म्हणत, टाळ व चिपळ्या वाजवीत तो गांवांतील रहिवाशांना जागें करून जाणवून देतो कीं, रात्रीचा शेवटचा प्रहर संपत आला; आतां तरी उठा. थोडक्यांत सांगायचें म्हणजे 'वासुदेव' म्हणजे लोकजागृति करणारी चालती-बोलती ग्रामीण संस्था आहे, असें म्हटलें तरी चालेल. वासुदेवाची ही कामगिरी, तिची उपयुक्तता व संतांच्या कामगिरीशीं तिचें दिसून येणारें साम्य लक्षांत घेऊन सर्व महाराष्ट्रीय साधु-संतांनीं लोकजागृतीचें जें कार्य संत करतात त्याचा आराखडा वासुदेवाच्या रूपकानें जगासमोर मांडला आहे.

प्रस्तुत अभंगाच्या पुढील कडव्यांतुन तुकारामबोवा वासुदेव काय कार्य करतो व त्याचें तें कार्य करण्याचें साधन कोणतें तें सांगतात—

वासुदेव करितो फेरा। वाडियांत बाहेर दारा।
कोणी कांहीं तरी दानपुण्य करा।
जाब न द्याल तरी जातों माघारा गा ॥ २ ॥
हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें।
गजर होतो बहु मोठयानें। नाहीं निवडलीं थोर लहानें।
नका निजो भिकेच्या भेणें गा ॥ ३ ॥

या कडव्यांतून वासुदेव म्हणतो, "मी वासुदेव वाड्यांत व बाहेर फेरी करीत आहें. अहो, तुम्ही कोणी तरी जागे होऊन त्यास दान देण्याचें पुण्य करा. तुम्हीं त्यास जर कांहीं उत्तर दिलें नाहींत तर हा वासुदेव माघारीं परत चालला." ॥ २ ॥ या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यांत तो वासुदेव म्हणतो, "हातांत टाळ व वीणा घेऊन मुखानें नामस्मरणयुक्त गाणें मी गात आहें व तो गजर मोठ्या अट्टाहासानें होत आहे. मीं जागें करण्यांत लहानथोर अशी निवड केली नाहीं. जागें झालें तर भीक घालावी लागेल या भीतीनें तुम्ही निजून राहूं नका." ॥ ३ ॥

हातांत टाळ, चिपळ्या, वीणा घेऊन तोंडानें देवाचें गाणें गात लोकांना जागें करणें हेंच वासुदेवाचें लोकजागृतीचें साधन. ठिकठिकाणीं तुकारामबोवांनीं या साधनाचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात—

"रामकृष्ण गीतीं गात। टाळ चिपळ्या वाजवीत।
छंदें आपुलिया नाचत। नीज घेऊनिया फिरत गा॥"
"रामकृष्ण वासुदेवा। जाणवी जनांसी वाजवी चिपुळिया।
टाळ घागऱ्या घोषें गा। रामकृष्ण वासुदेवा।"
"हरे रामकृष्णा। वासुदेव जाणवीतसे जना।
चिपळ्या टाळ हातीं विणा। मुखीं घोष नाम नारायणा गा।"

ज्ञानेश्वरमहाराजादि संतांनींही वासुदेवाच्या याच साधनाचा आपल्या वासुदेवांतून निर्देश केला आहे.

"घुळा घुळा वाजवी टाळ । झणझणा नाद रसाळ ।
उदो झाला पाहली वेळ । उठा वाचें वदा गोपाळ ॥१॥

—ज्ञानदेव अभंग

रामकृष्ण गोपाळ वाचें आठवा । जन्मजरा तुटे वाचें आठवित सांठवा ॥
चिपळचा टाळ घुळघुळा शब्दनादें । तेणें ब्रह्मानंद हृदयीं आठवण नांदे ॥

—एकनाथ अभंग

वासुदेव हा झोंपेंतून लोकांना जागें करतो, त्यांत लहानमोठे अशी निवड करीत नाहीं असें तो म्हणतो. याला पुरावा म्हणून प्रारंभीच्या कडव्यांत मोठ्यांच्या झोपेचें वर्णन केलें आहे. हे मोठे त्यांच्या बोलण्यावरून जागे आहेत असें ऐकणाऱ्यास वाटेल; पण असतात झोंपेंतच ! कांहीं माणसें झोंपेंत घोरतात, बडबडतात; कांहीं अंथरुणावरून उठून अंथरूण गुंडाळून डोक्यावर घेऊन चालूं लागतात, तरी झोंपेंतच ! एक तर झोंपाळूंचा असा प्रकार आहे कीं, ते झोंपेंतच उठतात, दुसऱ्याच्या खोलींत जातात, कपडे गोळा करतात व आपल्या खोलींतील पेटींत कोंदून भरतात, तरी झोंपेंतच ! या ठिकाणीं जाग्यासारखे बडबडणारे पण वास्तविक झोंपेंत असणारे, त्यांच्या उदाहरणाचा उपयोग करून तुकाराममहाराज शब्दज्ञानी पंडितांच्या स्थितीचें झोंपेच्या रूपकानें वर्णन करतात :

बोल बोले अबोले । जागे बाहेर आंत निजेले ।
जैसें घरांत घरकुल केलें । नेणें अंधार ना उजाडलें गा ॥१॥

"तोंडानें 'अबोले' म्हणजे अनिर्वाच्य जी परमात्म वस्तु तिच्या गोष्टी सांगतात. पण, ते बाहेर जसे सावध दिसतात तसे आंत नाहींत. काय मौज आहे– त्यांनीं घरांतच घरकुल (लहानसें घर) तयार केलें आहे ! त्यांना रात्र आहे का उजाडलें आहे हें कळत नाहीं, कारण ते झोंपेंतच असतात ॥१॥"
याचें स्पष्टीकरण भावार्थ संपल्यावर करूं. तूर्त येवढेंच सांगावयाचें कीं साधा

झोंपाळू असो अथवा पक्का झोंपाळू असो, लहान असो वा मोठा असो, वासुदेव त्यांत कांहीं भेद करीत नाहीं, सर्वांना जागें करतो.

चवथ्या कडव्यांत तो वासुदेव जे जागे झाले त्यांना काय अनुभव येईल तें सांगतो. तो म्हणतो, " मी खास वासुदेवच आहे असें जो (जागा होऊन) विचार करील त्याला कळून येईल. सभाग्य जे संत आहेत त्यांना ही गोष्ट ठाऊक आहे. माझ्याखेरीज दुसरा दान मागणारा कोणी येणार नाहीं ।।४।।"

मी वासुदेव तत्त्वतां । कळों येईल विचारितां । आहे ठाऊका सभाग्य संतां । नाहीं दुजा आणिक मागता गा ।।४।।

पांचव्या कडव्यांत बळेंच तोंडावर पांघरूण घेऊन रात्र करून निजणारे व आपली झोंपमोड करणारा कोणी पाहुणा येऊं नये म्हणून दारांत कुत्रीं बांधून निजणारे त्यांना हा वासुदेव म्हणतोः--" अरे, कुत्रीं दाराबाहेर जागीं ठेवून तूं जागा असून निजला काय आहेस ? हें कुत्रें तुझ्या हिताच्या पाठीमागें वसवसून लागतें, म्हणजे तुझें हित जागें होण्यांत आहे हें जाणून तुझें हित करण्याकारितां म्हणजे तुला जागें करण्याकारितां वासुदेव प्रयत्न करीत असतां तुझें हें कुत्रें उलट त्याच्यावरच भुंकत आहे आणि तूं तर वासुदेवाची भेटसुद्धां घेत नाहींस." (याचा परिणाम असा होईल कीं, तूं आपल्या खऱ्या हिताला आंचवशील !) ।।५।।

काय जागाचि निजलासी । सुनें जागवूनि दारापाशीं । तुझ्या हितापाठीं करी वसवसी । भेटी न घेसी वासुदेवासी गा ।५।

शेवटच्या कडव्यांत तुकाराममहाराज म्हणतात, " याप्रमाणें वासुदेव सर्व जनांना जागा करीत आहे. ज्यांचें संचित (चांगलें) होतें त्यांनीं वासुदेवाला दान (भीक) घातलें, पण जे वासुदेवाला विसरून गेले असेही कित्येक दुबळे आहेत. " ।।६।।

ऐसें जागविले अवघे जन। होतें संचित तिहीं केलें दान। तुका म्हणे दुबळीं कोणकोण। गेलीं वासुदेवासी विसरून गा ।।६।।

येथें भावार्थ संपला.

अ. सं. २-२

तुकाराममहाराजादि संतमहात्मे लोकजागृतीचें जें कार्य करतात त्याचें स्वरूप वासुदेवाच्या रूपकानें या अभंगांत सांगतात असें प्रारंभींच सांगितलें आहे. तें कशा प्रकारचें आहे याची थोडी कल्पना भावार्थावरून वाचकांना आली असेल. आतां स्पष्टीकरणामध्यें त्याचीच स्पष्टता करणें आहे.

संत, महात्मे, योगी हे ' उठा, जागे व्हा ' असें म्हणतातः—

राम राम दोनी अक्षरें । सुलभ आणि सोपीं रे ।
जागा मार्गिलिया पाहारे । शेवटीचें गोड तेंचि खरें गा ।।
जग जोगी जग जोगी । जागे जागे बोलती ।।

ज्या झोपेंतून जागे व्हा म्हणून महात्मे उपदेश करतात ती झोंप आपण सर्व घेतों ती नव्हे, हें सुज्ञ वाचकांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. ही झोंप लागणें हा प्रकृतिधर्म आहे. जीवास त्या दिवशीचें भोग देणारें प्रारब्ध संपलें कीं, तमोगुणाच्या आधिक्यामुळें अंतःकरणप्रवृत्तीला जडत्व येतें व बुद्धिवृत्ति अज्ञानांत लीन होऊन राहते. तिला कांहीं ज्ञान राहात नाहीं. अशा स्थितीस आपण झोंप म्हणतों. ही झोंप महात्मेसुद्धां घेतात.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :—

आहारातें स्वीकारी । त्यजावें तें परिहारी ।
निद्रेचिया अवसरीं । निदिजे सुखें ।। —ज्ञा. अ. ५–४३

या निद्रेचें व जीवास घातुक असणाऱ्या अज्ञानरूप निद्रेचें वेदान्तशास्त्र व साधु यांच्या दृष्टीनें साम्य आहे. म्हणून फार पुरातन कालापासून वेदान्ताचा उपदेश ' उत्तिष्ठत, जाग्रत ' या शब्दांत आपणांस केलेला आढळतो. अज्ञान कशाचें, त्यास निद्रा कां म्हणतात, त्यांतून जागें होणें कां अवश्य; हें सांगण्यापूर्वीं आपण नित्य-परिचित असलेल्या झोंपेचाच थोडा विचार करूं म्हणजे दृष्टान्त चांगला समजेल.

ज्या वेळेस आपणांस झोंप येते त्या वेळीं ती दोन कार्यें करते : एक, जागृतींतील आपल्या स्वतःच्या ज्ञानावर झांकण घालते व दुसरें, प्रसंगविशेषीं विचित्र स्वप्न दाखविते. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :—

जैसें साचा रूपाआड। घालूनि विसराचें कवाड।
मग स्वप्नाचें काबाड। वोइरी निद्रा ॥ –ज्ञा. अ. १८–५४०

यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, झोपेचा जोर असा असतो कीं, स्थूल देहाला जागृति न येतां सुखदुःखाचे भोग जीवात्म्याला ती भोगावयास लावते.

नवल आईके धनुर्धरा। कैसा वासनेचा संसारा।
देहा होऊं नेदी उजगरा। परी सुखदुःखें भोगी ॥
–ज्ञा. अ. ५–५४

कल्पना करा कीं, पुण्यांतील एखाद्या मनुष्यास काशीस जाऊन गंगेत स्नान करावें असें फार वाटतें. पण करणार काय? दरिद्री असल्यामुळें 'मातः शैलसुता' हें स्तोत्र म्हणण्यापलीकडे त्याला कांहीं करतां येईना. मानसशास्त्राचा नियम आहे कीं,

आणि जागता जंव असिजे। तंव जेणें ध्यानें भावना
भाविजे। डोळां लागत खेवों देखिजे। तेंचि स्वप्नीं ॥
–ज्ञा. अ. ८–७३

यामुळें त्या मनुष्याला गंगास्नानाचा ध्यास लागला असल्यामुळें त्याला एके रात्रीं तो निजला असतां स्वप्न पडलें कीं, आपण काशीस गेलों आहोंत व गंगेत स्नानाला उतरलों आहोंत; पण त्याला पोहतां येत नव्हतें. गंगेत पाणी तीराच्या कडेला सुद्धां फार. स्नान करतांना त्याचा पाय घसरला व तो गंगेंत बुडूं लागला. गटांगळ्या खातां खातां मानेस हिसडा बसला व तो जागा झाला. हा जो जागा झाला तो जागा झाल्याबरोबर "काढा हो मला" म्हणून आरोळ्या देत नाहीं. तसेंच स्वप्न खोटें हें खरें; पण तें जागें झाल्यावर, जोंपर्यंत आपण स्वप्नांत आहोंत तोंपर्यंत खऱ्याप्रमाणें भोग भोगावे लागतात असा झोंपेचा जोर आहे.

हां गा स्वप्न हें लटिकें म्हणों ये। परि निद्रावशें
बाणलें होये। तें आठौ कायि देत आहे। आपणपेयां ॥
–ज्ञा. अ. ७–६१

तात्पर्य, झोंप दोन गोष्टी करते : एक जागृतींतील स्वरूपज्ञानावर झांकण घालते व दुसरी नसलेलें खोटें स्वप्न दाखविते.

ही माहितीचीच असलेली नित्याची गोष्ट विस्तृत रीतीनें सांगण्याचा हेतु असा कीं, झोंपेचा हा दृष्टान्त समजला म्हणजें तिच्या दोन शक्ति समजल्या, कीं द्राष्टान्तीं अज्ञान व त्याच्या दोन शक्ति समजणें सोपें जाईल.

झोंपेप्रमाणें अज्ञानाच्या दोन शक्ति आहेत : एक आवरणशक्ति व दुसरी विक्षेपशक्ति. आवरण म्हणजे झांकणें व विक्षेप म्हणजे नसलेली विचित्र घटना दाखविणें. म्हणूनच अज्ञान अथवा माया हिचें वर्णन ' अघटित-घटना सामर्थ्यवती काचिद् ईश्वरशक्तिः ' असें केलेलें आढळतें.

अज्ञान म्हणजे स्वस्वरूपाचा विसर, म्हणजे आपण आपल्या आत्म्यास ब्रह्मरूपें करून न जाणणें. ज्ञानेश्वरमहाराज अज्ञानाची पुढीलप्रमाणें व्याख्या देतात :—

आपुला आपणपेयां । विसरू जो धनंजया ।
तेंचि रूप यया । अज्ञानासी ॥ —ज्ञा. अ. १४–७१

या अज्ञानास अविद्या, अव्यक्त, माया, प्रकृति इत्यादि नांवें आहेत. वर म्हटल्याप्रमाणें या अज्ञानाच्या दोन शक्ति आहेत : एक आवरण व दुसरी विक्षेप. आवरणशक्तीमुळें आत्मा हा आपलें जें विशेष स्वरूप चिद्, आनंद, असंग, कूटस्थ वगैरे त्याला विसरतो व विक्षेपामुळें आपल्याहून विलक्षण स्वभाववान् जो देह त्याच्याशीं तादात्म्य करतो.

कोणी म्हणेल कीं, हें अज्ञान झालें कोठें ? त्याला वेदान्ताचें उत्तर ' स्वाश्रय व स्वविषय ' असें आहे. याचा अर्थ असा आहे कीं, अज्ञान आत्म्याच्या आश्रयानें राहातें व आत्म्यासच विषय करतें, म्हणजे झांकतें, ज्ञानावर पांघरूण घालतें. जसा घरांतील अंधार हा घराच्याच आश्रयानें राहतो व घरांतील वस्तूचें ज्ञान होऊं देत नाहीं, तसेंच आत्म्याच्या आश्रयानें अज्ञान राहून आत्म्यासच विषय करतें. 'स्वाश्रय व स्वविषय' म्हटल्यानें 'अज्ञान' कोठें झालें याचें उत्तर पुरें मिळत नाहीं. तें आत्म्याच्या आश्रयानें असतें येवढेंच कळतें; पण जर आत्मवस्तूवांचून दुसरी वस्तूच नाहीं, तर अज्ञानाचें 'मूळ' तरी दुसरें काय असणार ? म्हणून ज्ञानेश्वर-

महाराज ‘ त्रिभिर्गुणमयैर्भावैः’ या गीता, अध्याय ७ यांतील १३ व्या श्लोकावर लिहितांना पुढील दृष्टान्त देऊन अज्ञानाची सिद्धि व त्याचें आवरणकार्य हें फारच उत्तम रीतीनें विशद करतात. ते म्हणतात —

परि उदकीं जाली बाबुळी । उदकातें जैसी झांकोळी । कां वायांचि आभाळीं । आकाश लोपे ।। हां गा स्वप्न हें लटिकें म्हणों ये । परि निद्रावशें बाणलें होये । तैं आठौ कायि देत आहे। आपणपेयां ।। हें असो डोळ्यांचें । डोळाचि पडळ रचे। तेणें देखणेंपण डोळयांचें । न गिळिजे काई ।। तैसी माझीच हे बिबली । त्रिगुणात्मक साउली । कीं मजचि आड वोडवली । जवनिका जैसी ।।

— ज्ञानेश्वरी, अ. ७, ६०–६३

पाण्यांत गोंडाळ वाढतें. तें कांहीं बाहेरून आणून पाण्यांत टाकलेलें नसतें. पाण्यांतच तयार होतें व पाण्यासच झांकतें. अथवा आकाशांतच ढग निर्माण होतात व आकाशासच झांकतात. यापेक्षांही पुढील दोन दृष्टान्त सरस आहेत. आपण जागे असतांना आपल्याला झोंप येते ती कांहीं कोणी बाहेरून आंत घालीत नाहीं. शिवाय झोंपेची मौज अशी आहे कीं, ती जागृतीच्या अगदीं विरुद्ध धर्माची आहे. जागृतींत अंतःकरणवृत्ति इंद्रियद्वारा बाहेर जाऊन विषयाचें प्रकाशन करते. त्याच वृत्तींत तमोगुण वाढला कीं ज्ञानाला झांकणारी झोंप तयार होते. ती झोंप वर म्हटल्याप्रमाणें आपल्या जागृतींतील स्वरूपज्ञानाचा विसर पाडते, एवढेंच नव्हे तर, नसलेलें विचित्र स्वप्न दाखवते व स्थूल शरीराशीं संबंध न येतां सुखदुःखाचे भोग भोगावयास लावते. हा दृष्टान्त आवरण व विक्षेप या दोन्ही शक्ति दाखवण्यास उपयोगाचा आहे. डोळ्यांची दृष्टि मंद करणारा पडदा डोळ्यांतच तयार होतो व डोळ्यांचीच दृष्टि मंद करतो. त्याचप्रमाणें अज्ञान हें आत्म्यांतच निर्माण होऊन आत्म्याच्याच स्वरूपास म्हणजे विशेष ज्ञानास झांकतें. आत्म्याचें सत्, चित्, आनंद, असंग, कूटस्थ, ब्रह्म असें स्वरूपलक्षण आहे. अज्ञान वाढलें कीं ‘सत्’खेरीजकरून बाकीच्या सर्व अंशांचा विसर पडतो व

विक्षेपशक्तीमुळें आपल्याहून विलक्षण असलेला देह अज्ञानानें कल्पून आत्माच त्याच्याशीं तादात्म्य करतो. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—

तें अज्ञान एक रूढे। तेणें कोहं विकल्पाचे मांडें। मग विवरूनि कीजे फुडें। देहो मी ऐसें॥ —ज्ञा. अ. १५—३४२

संधिप्रकाश दोन स्वरूपाचा असतो. एक प्रातःकालचा व दुसरा सायंकालचा. प्रातःकालच्या संधिप्रकाशामागें दिवसाचा जोर असल्यानें जसजसा काळ जाईल तसतसा अंधार नाहींसा होऊन वस्तूंच्या यथार्थस्वरूपाचें ज्ञान होतें. संध्याकाळच्या संधिप्रकाशाच्या मागें रात्रीचा जोर असल्यानें काळ जसजसा जातो तसतसा अंधःकार वाढत जातो व वस्तु अधिक अधिक दिसेनाशा होतात. ज्या वेळेला आत्मस्वरूपीं अज्ञान रुजतें त्या वेळीं त्याच्या पाठीमागें वाढता तम असल्यानें 'मी कोण आहे' या डोलत्या संशययुक्त ज्ञानावरून तें ज्ञान घसरत 'मी देह आहे' या विपरीत ज्ञानापर्यंत येऊन पोंचतें. मी देह आहे या समजुतीस विपरीत ज्ञान म्हणण्याचें कारण, देह व स्वस्वरूपाच्या विसरास वश होऊन देह मी समजणारा आत्मा यांत कांहींच सामान्य धर्म नाहींत; उलट दोहोंच्या लक्षणांत विरोधच फार.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

तरी परमात्मा म्हणिपे। तो ऐसा जाण स्वरूपें। जळीं जळें न लिपे समुद्र जैसा।..................तया देहा म्हणती भेटी। हे सपायीं निर्जीव गोठी। वारिया वाळुवे गांठी। कें ही आहे। आगी आणी कापुसा। दोरा सुवावा कैसा। केउता सांदा आकाशा। पाषाणेंसी॥ एक निगे पूर्वे-कडे। एक तें पश्चिमेकडे। तिये भेटीचेनि पाडें। संबंधु हा॥ उजिवडा आणि आंधारेया। जो पाडु मृता उभेया। तोचि गा आत्मया। देहा जाण॥ रात्री आणि दिवसा। कनका आणि कापुसा। अपाडु कां जैसा॥ तैसाचि याशीं॥ देह तंव पांचांचें जालें। हें कर्माचां गुणीं गुंथलें। भंवतसें चाकीं सूदलें।

जन्ममृत्यूचां ।। हें काळानळाचां कुंडीं । घातली लोणीयाची उंडी। मासी पांखु पाखडी ।। तंव सरे हें। हें विपायें आगीं पडे। तरी भस्म होऊनि उडे। जालें श्वाना वरिपडें। तरी ते विष्ठा।। यया चुके दोहीं काजां। तरी होय कृमींचा पुंजा। हा परिणामु कपिध्वजा। कश्मलु गा ।। यया देहाची हे दशा। आणि आत्मा तो एथ ऐसा। पैं सिद्ध नित्य अपैसा। अनादिपणें ।। —ज्ञा. १०९५–११०६

आत्म्यानें असें आपल्याला मर्यादित करून घेणें, आपला संकोच करणें हीच जीवदशा व हा अज्ञानाचा परिणाम.

शंकराचार्यंही खालील श्लोकांतून अज्ञानाच्या दोन शक्ति व त्यांचें स्वरूप सांगतात व तेथें झोंपेचाच दृष्टान्त देतात—

आत्मोपाधेरविद्याया अस्ति शक्तिद्वयं महत्।
विक्षेप आवृतिश्चेति याभ्यां संसार आत्मनः।।
आवृतिस्तमसः शक्तिरतद्ध्यावरणकारणम् ।
मूलाविद्येति सा प्रोक्ता यथा संमोहितं जगत् ।।

विवेकवानप्यतियौक्तिकोऽपि श्रुतात्मतत्त्वोऽपि च पंडितोऽपि
शक्त्या यथा संवृतबोधदृष्टिरात्मानमात्मस्थमिमं न वेद ।।
विक्षेपनाम्नी रजसस्तु शक्तिः प्रवृत्तिहेतुः पुरुषस्य नित्यम् ।
स्थूलादिर्लिगान्तमशेषमेतद् यया सदात्मन्यसदेव सूयते ।।
निद्रा यथा पुरुषमप्रमत्तं समावृणोतीयमपि प्रतीचम् ।
तथावृणोत्यावृतिशक्तिरंतर्विक्षेपशक्तिं परिजृंभयन्ती ।।

—सर्ववेदान्तसिद्धान्तसारसंग्रह ४८८–४९२

प्रस्तुतच्या संकीर्तनाच्या अभंगाच्या प्रथम कडव्यांत तुकाराममहाराजांनीं आत्मा आपला संकोच कसा करतो हें सांगण्याकरितां फारच उत्कृष्ट दृष्टान्त दिला आहे. ते म्हणतात, अनंत आत्म्यानें आपला संकोच करून आपणास देह समजणें म्हणजे ‘ घरांत घरकुल करणें ’ आहे. दृष्टान्त

समजण्याकरितां हा दृष्टान्तही थोडासा स्पष्ट करून सांगणें आवश्यक आहे. कल्पना करा, एका राज्यामध्यें गादीचा वारसा मुलीकडून जात होता. राज्यावर बसणारी मुलगी ही लहान असतांनाच तिला राज्याभिषेक करून तक्तावर बसविली. आतां गादीवर बसली तरी ती वयानें लहान. यामुळें तिचे लहानपणचे खेळ चालूच. तिनें काय करावें, कीं राजवाड्यांतल्या एका दालनांत खेळ मांडावा व खेळाकरितां दोन पाट आणून दालनाच्या एका कोपऱ्याला ते आडोशाला लावून आपलें खेळांतलें लहान घर ( घरकुल ) तयार करावें; व खेळ सुरू झाला कीं, ज्या मैत्रिणी खेळायला आलेल्या त्यांना म्हणावें, " या कीं आमच्या घरांत. तें पलीकडचें आमच्या मैत्रिणीचें घर आहे. हें माझें आहे. इकडे या !" यांत मौज अशी आहे कीं, तिची सत्ता नुसत्या घरकुलावर नव्हे, दालनावर नव्हे, राजवाड्यावर नव्हे, संपूर्ण राज्यावर आहे; पण तिनें त्या सत्तेचा संकोच केला व ती सत्ता घरकुलापर्यंत आणून ठेवली. तसें आपण स्वस्वरूपविषयक विसराला विषय होऊन आपला येवढा संकोच करून घेतला आहे कीं, आपण अनंत स्वरूप असतांना आपण आपल्याला ' देह ' येवढेंच समजतों.

परी देहाहंमानभुली । जयाची बुद्धि देहींच आतली ।। जया आत्मविषीं जाली । मध्यरात्री ।। जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा । देहचि केलें परम सीमा ।। . . . . .

— ज्ञा. अ. १८–३८०।८१

आपण सर्व आपल्याला देहच समजतों. देहाचा जन्म झाला त्या वेळीं आपला जन्म झाला असेंच समजतों. देह काळागोरा, लठ्ठ-बारीक जसा असेल तसे आपण आपल्याला समजतों. देहाचें नांव तें आपलें नांव असेंच मानतों. हें तादात्म्य इतकें असतें कीं, आपण झोंपेंत असतांना आपल्या नांवानें कोणी हाक मारली तर आपण लगेच जागे होतों. कल्पना करा कीं माझ्यासारख्यांना रस्त्यांतील अनोळख्या मनुष्यानें प्रश्न केला कीं, तुम्ही कोण ? व मीं जर त्याला उत्तर दिलें, " मी ना, सच्चिदानंद ब्रह्म." हें उत्तर ऐकून माझी अशी खात्री आहे कीं, तो माझ्या तोंडाकडे पाहातच राहील व त्याला वाटेल कीं हा वेड्याच्या इस्पितळांतून बाहेर पडून भटक-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम ७४८८८ वि: काव्य
क्रमांक २०७९५ नोंद दि: २५।३।८७



णारा प्राणी तर नसावा! नाथमहाराज म्हणतात, "काय गंमत आहे कीं, एखाद्याला शास्त्रानें सांगितलें कीं, तूं सुतकी आहेस तर पटतें; पण त्याच शास्त्रानें तूं ब्रह्म आहेस असें सांगितलें तर तें त्याला पटत नाहीं. तो म्हणतो मी कसा ब्रह्म होईन?"

आपणचि ब्रह्म आहाती । परी ब्रह्म म्हणतां भीती ।
बाप विकल्पाची ख्याति । संशयो जाती अधःपाता ।।

या सर्व सांगण्याचें तात्पर्य असें आहे कीं, आत्म्यानें आपलें अनंतत्व विसरून संकोच करणें हेंच जीवदशेचें स्वरूप व या संकोचाला कारण अज्ञान. आत्म्यानें आपला असा संकोच केला कीं त्याला दृश्य जगत् दिसतें. शास्त्रकार यालाच स्वप्न म्हणतात व म्हणूनच अज्ञानाला झोंपेची उपमा देतात. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :—

तरी अविद्येचिया निदा । विश्वस्वप्नाचा हा धांदा ।
भोगीत होता प्रबुद्धा । अनादि जो ।।

— ज्ञा. अ. १८–४०३

ज्ञान्याचें वर्णन झोंपेंतून जागे झालेल्याच्या रूपकानें करणारा पुढील श्लोक प्रसिद्धच आहे :—

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।।

— गी.२ श्लो. ६९

ह्यावर ज्ञानेश्वरमहाराज लिहितात :—

देखैं भूतजात निदैलें । तेथेंचि जया पाहलें ।
आणि जीव जेथ चेइले । तेथ निद्रितु जो ।।

— ज्ञा. ओ. ३५५

स्वप्नांत मनुष्यास जसें सुखदुःख भोगावें लागतें तसें स्वस्वरूपाला विसरून देहाशीं तादात्म्य केल्यानें आत्मस्वरूपीं जन्ममृत्यु, सुखदुःख वगैरे नसतांना जीवात्म्याला हें सर्व भोगावें लागतें. म्हणून अज्ञानास झोंप म्हणण्याचा प्रघात पडला आहे.

आतां झोंप घेणाऱ्यांत दोन वर्ग करतां येतात : एक झोंपेंत बडबडणाऱ्यांचा व दुसरा न बडबडणाऱ्यांचा. एखादा मनुष्य झोंपेंत बडबडतो, अर्थातच त्याचा त्याला कांहीं एक अर्थ कळत नाहीं. तसेंच आत्मविषयक निद्रा ज्यांना लागली व देहतादात्म्य घेऊन जगद्व्यवहाराचा खेळ खेळणारा जो हा निद्रिस्तांचा वर्ग यामध्येंही दोन प्रकार आहेत : एक शास्त्रसंस्कारशून्य मनुष्यांचा व दुसरा शास्त्रसंस्कारयुक्तांचा. बहुधा असें आढळून येतें कीं, या दोघांच्या बोलण्यांत मात्र फरक; बाकी आंतील समजूत एकच ! शास्त्रसंस्कारशून्य मनुष्य हा आपण देहच आहोंत असें समजतो व तसेंच बोलतो व तसाच व्यवहार करतो. शास्त्रसंस्कारयुक्त मनुष्य आपणास देहच समजतो व तसाच व्यवहार करतो; पण पुराण सांगतांना वा कथाकीर्तन करीत असतांना अथवा गप्पा मारतांना 'नित्यशुद्धमुक्त ब्रह्म मी' असें कांहीं बोलतो; पण आंत समजूत मी देह अशीच असते. गाढ झोंपेंतच, पण बडबडतो एवढेंच. तुकारामबोवा याच शब्दज्ञानी पंडितांच्या स्थितीचें या अभंगाच्या प्रथम कडव्यांत वर्णन करतात :—

बोल बोले अबोले । जागे बाहेर आंत निजेले ।

हे लोक तोंडानें अबोले म्हणजे बोलण्यांत न येणारी वस्तु म्हणजे 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' अशा आत्मस्वरूपाचें व्याख्यान करतात. अज्ञाणी मनुष्यास त्यांचें हें व्याख्यान ऐकून असें वाटावयाचें कीं, यांची बोलण्याप्रमाणेंच आंत समजूत असली पाहिजे; पण वस्तुस्थिति अगदीं वेगळीच असते. हे जागे बाहेर म्हणजे तोंडांत, शब्दांत; आंत म्हणजे समजुतीच्या बाबतींत निजलेले, म्हणजे समजुतींत कांहीं फरक नाहीं. हें कशावरून ? तर त्यांनीं 'घरांत घरकुल केलें.' त्यांनीं आपला संकोच करून आत्मसत्तेवर भासणारें जें परिच्छिन्न शरीर तेवढीच आपली व्याप्ति मानली. तुकारामबोवा म्हणतात, यांची स्थिति चमत्कारिक आहे. कारण तोंडानें प्रज्ञावाद बोलतात; पण समजूत व कृति यांत अज्ञानी दिसतात. तेव्हां यांना ज्ञानही समजत नाहीं व अज्ञानही समजत नाहीं असें दिसतें. उजाडलें आहे, का अंधार आहे हेंही कळत नाहीं.

नेणें अंधार ना उजडलें गा ॥ १ ॥

ते तोंडानें बोलतात मग त्यांना अर्थ समजत नाहीं असें कसें होईल, असें कोणास वाटेल. तर हें शक्य आहे हें समजण्याकरतां तुकारामबोवा दुसऱ्या एका अभंगांत या लोकांचें वर्णन दृष्टान्त देऊन करतात--

**पढविलें तैसें पढों जाणें पुंसा। परि नाहीं दशा साच अंगीं॥**

यावर 'यांत काय संशय' वगैरे गोष्टी प्रसिद्ध आहेत; पण येथें ज्ञानेश्वरीला धरूनच एक गोष्ट सांगतों. एकदां एका मनुष्यानें एक राघू विकत घेतला. तो मनुष्य दयाळू पण मूर्ख होता. त्यानें विचार केला कीं, आपण या पोपटाला विकत घेतलें व आपण याला पिंजऱ्यांत ठेवलें तरी एखाद वेळीं पिंजऱ्याचा दरवाजा उघडा राहणार व पोपट उडणार. तो उडाला कीं पारधी जें नलिकायंत्र तयार करून ठेवतात त्यावर हा बसणार व पारध्याच्या हातांत तो सांपडला जाणार. तेव्हां आपण या पोपटास असें शिकवावें कीं, जरी हा सांपडला तरी याला सुटकेचा मार्ग जवळ असावा. अशा कारुणिकतेनें त्या मनुष्यानें पोपटास पढविलें, 'राघवा, नलिकेवर बसूं नये, बसलेंच तर आपण तिला धरलें आहे, तिनें आपल्याला धरलें नाहीं. सोडलें कीं मोकळेच्या मोकळे.' योग असा कीं, हा धडा पाठ व्हायला व पिंजऱ्याचा दरवाजा मोकळा राहाण्यास एकच गांठ पडली. राघोबांनीं जी भरारी मारली ती झाडावर. त्याच्या दुर्दैवानें त्या झाडाच्या समोरच एका पारध्यानें 'नलिकायंत्र' तयार केलें होतें. राघोबा झाडाच्या फांदीवरून जे उडाले ते नलिकेवर बसले व ते बसल्याबरोबर त्या पोपटाच्या भारानें ती नळी फिरली त्याबरोबर राघोबाही फिरले व त्याचें खालीं डोकें व वरतीं नलिकेला घट्ट धरलेले पाय असें शीर्षासनासारखें रूप तयार झालें. याचा परिणाम असा झाला कीं, राघोबाला आपल्या खालीं खोल आकाश दिसूं लागलें, व त्याला वाटूं लागलें कीं जर कां आपण पाय सोडले कीं आपण खोल पडणार, आपटणार व आपले तुकडे होणार! या समजुतीनें तो नळीचे पाय घट्ट धरून बसला! पण तो पढलेला, बोलका राघू असल्यानें 'राघवा, नलिकेवर बसूं नये, बसलेंच तर आपण तिला धरलें आहे, तिनें आपल्याला धरलें नाहीं. सोडलें कीं मोकळेच्या मोकळे!' असें तोंडानें म्हणे व पायांनीं नलिका अधिक घट्ट धरी. तात्पर्य, पोपटाची जशी ती 'पोपटपंची' तसेंच या बोलक्या वेदान्त्यांची, शब्दज्ञान्यांची. 'मी नित्यशुद्धमुक्त ब्रह्म आहे' ही

पोपटपंचीच ! कारण समजुतीनें ते आपण देह असेंच दृढ समजत असतात. कै. जोगमहाराज या शास्त्रसंस्कारशून्य व शास्त्रसंस्कारयुक्त झोंपाळूंचा भेद दाखविण्याकरितां शंखाचा उत्कृष्ट दृष्टान्त देत. शंखांत दोन प्रकार : एक आवाज न करणारा व दुसरा आवाज करणारा; पण दोन्हीही शंखच. तसेंच दोघेही अज्ञानीच; पण एक चावटी करीत नाहीं व दुसरे करतात येवढाच फरक.

या लोकांचें वर्णन नाथमहाराजांनीं भागवतांत एक सुंदर दृष्टान्त देऊन केलें आहे. ते म्हणतात, जसा उंसाचा चरक असतो तसे हे शब्दज्ञानी पंडित. चरकांत उंसाचीं कांडीं घातलीं कीं त्यांतील रस खालीं ठेवलेल्या भांड्यांत पडतो. चरकाच्या तोंडांत फक्त 'करर्' असा ध्वनि राहतो एवढेंच. तसेंच हे पंडित कथानिरूपण करतात तेव्हां यांच्या तोंडांतून निघणाऱ्या वेदान्तांतील उक्तींतील रस पुढें बसणाऱ्या श्रोतृवर्गांतील जे सात्त्विक असतात त्यांच्यांत सांठवला जातो; पण यांच्या तोंडांत फक्त शब्दांचीं सोपटेंच रहातात ! यांचा भ्रम कायमच !

कैसें निरूपिती शब्दब्रह्म। ऐकोनि सात्त्विकां येतसे प्रेम। परी निजहृदयींचा भ्रम। निरसे तें वर्म नेणतीच ।। जेवीं गूळ उंसाचा घाणा। तोंडींचा रस भरें मांदणा। शब्दसोपटें भरोनि वदना। करी परिभ्रमणा करकरीतु ।।

—भागवत अ. ३, ओ. २८०–८१

नाथांच्याप्रमाणेंच शंकराचार्यांनीं वीणावादनाचा दृष्टान्त देऊन पंडितांचें व्याख्यान दुसऱ्यास उपयोगी, यांना नाहीं, हें दाखविलें आहे.

वीणाया रूपसौंदर्यं तंत्रीवादनसौष्ठवम् ।
प्रजारंजनमात्रं तन्न साम्राज्याय कल्पते ।
वाग्वैखरी शब्दझरी शास्त्रव्याख्यानकौशलम् ।।
वैदुष्यं विदुषां तद्वत् भुक्तये न तु मुक्तये ।।

— विवेकचूडामणि, श्लो. ५९–६०

तात्पर्य, तोंडानें ब्रह्मज्ञान सांगितलें तरी आंत समजूत मी देह आहे अशीच. अर्थात् ज्यांची अविद्या निद्रा गेली नाहीं, पण तोंडानें कोरड्या ब्रह्मज्ञानाच्या गप्पा मारतात त्यांनाही तुकारामबोवारूपी वासुदेव जागें करून म्हणतो— जागे व्हा, म्हणजे अविद्या अथवा अज्ञानरूपी निद्रा टाका व आत्म-स्वरूपीं जागे व्हा.

साधु हे जागे व्हा असा उपदेश करतात. कारण झोंपेंत पडलेल्या स्वप्नांतील दुःखाचा नायनाट एक जागृतीच करूं शकते.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :—

म्हणोनि स्वप्नींचेया घाया। वोखद चेवोचि धनंजया।
तेवीं अज्ञानमूळा यया। ज्ञानचि खड्ग ।।

—ज्ञा. अ. १५, ओ. २५४

मनुष्य स्वप्नांत भयप्रद गोष्ट पाहून जर घाबरला तर त्याला जागें करणें हाच उपाय; अथवा अंधःकारांत जर भीति वाटली म्हणून तो दूर करावयाचा असला तर एकच उपाय—तद्विरोधी प्रकाश आणणें. तेथें मंत्रतंत्र यांचा कांहीं उपयोग नाहीं. तसेंच आत्मविषयक अज्ञानामुळें उत्पन्न झालेली संसार-भीति नाहींशी करण्याचा उपाय आत्मजागृति.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :—

आपुलिया अज्ञानासाठीं। नव्हता थांबला किरीटी।
तरि आतां आत्मज्ञानाचिया लोटीं। खांडेनि गा ।।

—ज्ञा. अ. १५, ओ. २४८

अज्ञानाची निद्रा आत्मजागृतीच घालवील; म्हणून संत आत्मानुभव प्राप्त करून घ्या हेंच ' जागे व्हा ' या शब्दानें सांगतात. तुकाराममहाराज म्हणतातः—

तुका करी जागा। नको वासिपूं वाउगा।
आहेसी तूं अंगा। अंगीं डोळे उघडी ।।

हाच विचार या अभंगाच्या पहिल्या व दुसऱ्या कडव्यांत सांगतातः—

बोल बोले अबोले । जागे बाहेर आंत निजेले ।
जैसें घरांत घरकुल केलें । नेणें अंधार ना उजडलें
गा ॥१॥ वासुदेव करितो फेरा । वाडियांत बाहेर
दारा । कोणी कांहीं तरी दानपुण्य करा । जाब न
द्याल तरी जातों माघारा गा ॥२॥

नलिकेवर भ्रमानें अडकून पडलेल्या पोपटास त्याच्या भाषेत तो जें बोलतो त्याचा अर्थ सांगणारा जसा भेटावा, तसें चवथ्या कडव्यांत तुकारामबोवा सांगतात कीं, झोंप टाकून जागा होऊन बघ तर खरा, तुला असा अनुभव येईल, कीं, आपण 'वासुदेव'च आहांत. तुकाराम-महाराज हे अद्वैती असल्यानें 'जीवो ब्रह्मैव नापरः' या सिद्धांताचाच ते ठिकठिकाणीं उपदेश करतात.

देवचि देवचि बरें । तुका म्हणे खरे तुम्ही ॥

× × ×

तुका म्हणे कैंची कींव । कोठें जीव निराळा ॥

× × ×

तुका म्हणे हा तो स्वयें परब्रह्म । मूर्ख नेणें वर्म संतचरण ॥

वासुदेवाच्या या गजरानें जो शब्दज्ञानी राघू जागा होतो त्याची स्थिति पुढीलप्रमाणें होतेः—

नळिकेवरूनि उठिला । जैसा शुकु शाखे बेसला ।
तैसा मूळ अहंतें वेठला । मी म्हणौनि ॥

—ज्ञा. अ. १४-३०२

आपण परमात्मावासुदेवरूप आहांत हें भाग्यवान् जे संत त्यांना ठाऊक आहे आणि म्हणून तेच तुम्हांला जागे व्हा, वासुदेवाला दान द्या, असा उपदेश करतील; दुसरे कोणी करणार नाहींत. इतर सर्व स्वतःच निजलेले ते दुसऱ्यांना काय जागे करणार? परमात्मस्वरूपीं जागा विरळा! एक मदालसा माउली होऊन गेली कीं, जिनें आपल्या मुलांना पाळण्यांत झोंके देतांना उपदेश केला.

'पयें दे मदलसा सोहं जो जो रे बाळा ।
निजध्यानीं निजपां रे लक्ष लागों दे डोळां ।
निज तें तूं विसरलासी होसी वरपडा काळा ॥'

मदालसा साधूच होती म्हणून असा उपदेश करी. तात्पर्य, एक वासुदेव म्हणजे साधूच, परमात्मीं लक्ष ठेवा असें सांगतात. यालाच तुकारामबोवा येथें वासुदेव दान मागतो म्हणतात. वासुदेव जें दान मागतो म्हणजे संत जें 'द्या' म्हणून म्हणतात तें दुसरें नसून 'लक्ष लावूनि रहा गोविंदीं गा' येवढेंच. जीवानें देहादि संसारावरची आसक्ति सोडून स्वरूपीं भरून जावें हेंच त्यांचें सांगणें आहे. त्याकरितां ते म्हणतात, तुम्ही आपलें 'लक्ष' वासुदेवाला द्या. चिपळ्या, टाळ वाजवीत रामकृष्ण म्हणा. कारण त्यानें आपल्या आंत वासुदेवाची आठवण राहील.

'चिपळ्या टाळ घुळघुळा शब्द नादें ।
तेणें ब्रह्मानंद हृदयीं आठवण नांदे ॥

ही श्रीनाथांची उक्ति मागें दिलीच आहे.

माणसें देवाकडे लक्ष न देतांना विकारांना जवळ करून आयुष्य विषयोपभोगांत खर्च करतात. मग ते पुष्ट झालेले विकारच याला त्याच्या खऱ्या हिताकडे जाऊं देत नाहींत. कामक्रोधादि विकारांना कुत्रीं असें ठिकठिकाणीं म्हटलें आहे.

कामक्रोधलोभशूनीं पाठीं लागलीं ओढाळ ॥ –ज्ञानदेव अभंग

तुकारामबोवा म्हणूनच या अभंगांत विकारांचें कोडकौतुक करणाऱ्या अज्ञान जीवांना पांचव्या कडव्यांत म्हणतात, "अरे, तूं आपल्याकडे येणाऱ्या माणसांच्या अंगावर भुंकण्याकरितां हीं विकाररूपी कुत्रीं ठेवलींस तीं तुझ्या हिताच्याच पाठीं लागतात. म्हणजे तुझें कल्याण तुला सांगायला येतील त्यांच्यावर उलट तूंच रागावतोस. कारण तुला विषयोपभोग बरा वाटतो. ती विषयवासना तुला साधूची निंदा करायला लावते; पण यांत अनहित कोणाचें होणार? तुझेंच. तेव्हां तूं जागा हो, म्हणजे आपण कोण? ही झोंप बरी का, याचा विचार कर व हीं कुत्रीं आंवर."

शेवटच्या कडव्यांत आपल्या कामगिरीचा आढावा तुकारामबोवा घेतात कीं, वासुदेवानें सर्वांना जागवण्याचें आपलें कार्य केलें. पण जागें होण्यास आणखीही एक कारण लागतें. निजणाऱ्याचें प्रारब्ध; तें जर न्यून भोगाचें असेल तर त्याला हांक ऐकूं येऊन उठावेंसें वाटेल; व तेंच जर अधिक भोगाचें असेल तर तो हांक ऐकूं येऊन डोक्यावर पांघरूण घेऊन निजेल व हांका मारणाऱ्यासच उलट शिव्या देईल.

बहुतेक कीर्तनकारांचा अनुभव असा कीं, त्यांच्या बोलण्याचा कांहींवर परिणाम होतो व कांहींवर होत नाहीं. उलट ते बोवालाच हा जुन्या शतकांतला आहे, मूर्ख आहे अशीं नांवें ठेवतात. याचें कारण सर्व श्रोत्यांचा मनोविकास सारखा नसतो. ज्याचें प्रारब्ध चांगलें त्याला सांगितलेला हिताचा उपदेश पटतो; इतरांस तो रुचत नाहीं.

तुकारामबोवांचा हाच अनुभव ते शेवटच्या कडव्यांत व्यक्त करतात. ते म्हणतात, ' वर सांगितल्याप्रमाणें सर्व जनांना जाग आणण्याचा मीं प्रयत्न केला; पण सर्वच जागे झाले नाहींत. कोणी जागे होऊन वासुदेवास दान घातलें. दुबळे म्हणजे हीन प्रारब्धाच्या आधीन असणारे जे होते ते निजले व वासुदेवाला विसरले.'

'ऐसे जागविले अवघे जन ।
होतें संचित तिहीं केलें दान ।।
तुका म्हणे दुबळीं कोण कोण ।
गेलीं वासुदेवासी विसरून गा ।।

ज्यांनीं वासुदेवाला दान घातलें नाहीं त्यांना तुकारामबोवा दुबळे म्हणतात याचें कारण हे सर्व लोक त्यांचें जें अनिष्ट प्रारब्ध त्याच्या ताब्यांत आहेत. त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे—

दुर्बळ हे अवघे जन । नारायणीं विन्मुख ।।१।।
झाडोनियां हात जाती । पात्र होती दंडासी ।।२।।
शिदोरी ते पापपुण्य । सवें शीण भिकेचा ।।३।।

बरोबर आणलेली जी पापपुण्यात्मक शिदोरी म्हणजे शिळें अन्न त्यावरच हे राहतात. यांना मनुष्यजन्माला येऊन शुद्ध पुण्याची कमाई करण्याची सवड असतांना हे करत नाहींत, म्हणून त्यांना प्रारब्धापलीकडे जाण्याची शक्ति नाहीं; नवीन उत्कृष्ट क्रियमाण करण्याचा पराक्रम नाहीं म्हणून त्यांना दुबळे म्हणतात.

मनुष्यदेह हा आत्मजागृतीवर येण्याचें ठिकाण आहे. इतर जन्मांत हें ज्ञान होऊं शकत नाहीं. तुकारामबोवा म्हणतात--

येचि जन्मीं घडे देवाचें भजन। आणिक हें ज्ञान नाहीं कोठें।
पशुकाय पापपुण्य जाणती। उत्तम मध्यम भोग भोगिती।

उलट

नरदेहनिधान लागलें हातीं। उत्तम सार उत्तम गति।
देवचि होईन म्हणती ते होती। तरी कां चित्तीं न धरावें।

उपनिषदांतही

यथादर्शे तथाऽत्मनि यथाप्सुपरीव ददृशे।
तथा गंधर्वलोके छायातपयोरिव ब्रह्मलोके॥ -कठ. ३-५०

असा आत्मजागृतीस सर्वथा उपयोगी पडणारा मनुष्यजन्म अनेक जन्मांच्या शेवटीं मिळतो. भागवतकार म्हणतात--

लब्ध्वा सुदुर्लभमिदं बहुसंभवान्ते मानुष्यमर्थदमनित्यमपीह धीरः॥ तूर्णम् यतेत न पतेत् अनुमृत्ययावन् निःश्रेयसाय विषयः खलु सर्वतः स्यात्॥ -एकादशस्कंध, अ. ९, श्लो. २९

हीच गोष्ट रूपकानें साधु सांगतात. बाबा, आत्मविषयक अज्ञानरूपी रात्रींतील मनुष्यजन्म हा शेवटचा प्रहर सुरू झाला आहे, म्हणजे तू उजाडायच्या जवळ आला आहेस. आतां तरी डोळे उघड. शेवटीं क होईना जागा झालास कीं मागच सर्व ठीक होईल.

रामराम दोन्हीं अक्षरें। सुलभ आणि सोपारें।
जागा मागिले पाहारें। शेवटिचें गोड तेंचि खरें गा॥
अ. सं. २-३

गले टळले पहार तीन । काय निदसुरा निजसी अज्ञून ।
जागे होउनि कांहीं करा दान । नका झांकूं ऐकोनि लोचन गा ।
—कान्होबा

वासुदेव पहांटेस फेरा करीत असल्यानें या कडव्यांचें रूपक उत्तम जमतें.

तात्पर्य, सर्व संतमहात्मे जीवांना अज्ञाननिद्रा टाकून आत्मज्ञानरूपी जागृति प्राप्त करून घेण्याचा मोठा कळकळीचा उपदेश करतात. ते म्हणतात, 'अशी तुम्हांला जागृति करणारा दुसरा मिळणार नाहीं.' ( 'नाहीं दुजा आणीक मागता गा.' ) बाकी सर्व झोपेला मदत करणारेच भेटतील.

तुम्ही आतां जागे झालां नाहींत तर ही मनुष्यजन्माची खेप फुकट जाऊन ' घोर नरकाला जावें लागेल.'

तुकाराममहाराजांचे बंधु कान्होबा म्हणतात—

आतां मागुता येइल फेरा। हें तों न घडे या नगरा । म्हणे तुकयाबधु राम धरा । ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ।।

वासुदेवाला (देवाला) जास्त कांहीं लागत नाहीं. त्याला जें लागतें तें सांगून हें संकीर्तन पुरें करतों—

जें ठाकेल कोणा कांहीं । फलपुष्प अथवा तोयी । द्या परी मीस घेऊं नका भाई । पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ।।
देवाकारणें भाव तस्मात् । द्यावें नलगे फारसें वित्त । झालें एकचित्त तरी बहुत । एवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा ।।
—कान्होबा

आईप्रमाणें साधु आपल्यास हात जोडून सांगतात——

विनवितों सकळां जनां। कर जोडोनि थोरां लहानां।
दान इतुलें द्या मज दीना। म्हणे तुकयाबंधु राम म्हणा गा ।।

तात्पर्य, सर्व साधुसंतांचा सर्व जीवांना कळकळीचा एकच उपदेश आहे कीं, अज्ञाननिद्रा टाकून स्वरूपीं जागे व्हा. देवाला आठवा. त्यानें ब्रह्मानंद आपणांस उपभोगावयास मिळेल.

## : आंधळा व पांगळा :

आंधळयापांगळयांचा । एक विठोबा दाता । प्रसवला विश्व तोचि । सर्व होय जाणता । घडी मोडी हेळामात्रें । पापपुण्यसंचिता । भवदुःख कोण वारी । तुजवांचूनि चिंता ॥१॥

धर्म गा जागो तुझा । तूंचि कृपाळु राजा । जाणसी जिवींचे गा । न सांगतां सहजा ॥ २ ॥

घातली लोळणी गा । पुंडलीकें वाळवंटीं । पंढरी पुण्यठाव । नीरे भीवरे तटीं । न देखें दुसरें गा । झाली अदृश्य दृष्टि । बोळला प्रेमदाता । केली अमृतवृष्टि ॥३॥

आणीक उपमन्यु । एक बाळ धाकुटें । न देखे न चालवे । जना चालते वाटे । घातली लोळणी गा ॥ हरिनाम बोभाटें । पावला त्या कारणें । धांव घातली नेटें ॥४॥

बैसोनी खोळीं शुक । राहे गर्भी आंधळा । शीणला येरझारीं । दुःख आठवी वेळा । मागील सोसिलें तें । ना भी म्हणे गोपाळा । पावला त्या कारणें । लाज राखिली कळा ॥५॥

न देखे जो या जना । तया दावी आपणा । वेगळा सुखदुःखा । मोहो नाठवी धना । आपपर तेंही नाहीं । बंधुवर्ग सज्जना । तुकया तेचि परी । जाली पावे नारायणा ॥६॥

हा अभंग सहा कडव्यांचा आहे व प्रत्येक कडवेंही मोठें आहे. वाचकांना प्रस्तुतच्या अभंगांतील विषयाचें स्वरूप चटकन् लक्षांत यावें म्हणून थोडक्यांत या अभंगाची मांडणी काय स्वरूपाची आहे तें सांगून या अभंगाचा भावार्थ सांगतों.

या अभंगाच्या प्रथम कडव्यांत ज्या पांडुरंगाजवळ मागणी करावयाची त्याचें स्वरूप वर्णन करतात. अभिप्राय असा आहे कीं, तो पांडुरंग सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् व कृपाळू आहे. त्याच्यावांचून या आंधळ्यांपांगळ्यांची मागणी पुरवणारा त्रैलोक्यांत दुसरा कोणी नाहीं. दुसऱ्या कडव्यांत त्याची धर्मबुद्धि जागृत राहावी अशी त्याची प्रार्थना करतात. पुढच्या तीन (३ ते ५) कडव्यांतून या अभंगांत अभिप्रेत असलेले जे आंधळेपांगळे अशांपैकीं पूर्वीं ज्यांचा मागणी या देवानें पुरवली आहे त्यांपैकीं तीन—पुंडलिक, उपमन्यु व शुक—या आंधळ्यापांगळ्यांचा दाखला देतात व शेवटच्या सहाव्या कडव्यात आंधळ्यापांगळ्यांचे दाते तुम्ही आहांत असें सांगून मीही असाच आंधळा-पांगळा झालों आहे, माझा उद्धार करा, अशी प्रार्थना करून या अभंगाचा शेवट करतात.

देवाजवळ भक्तानें मागणें मागण्याचा हा एक काव्यमय असा सुंदर प्रकार आहे. पण, या अभंगात प्रारंभींच पांडुरंगाचें जें वर्णन केलें आहे त्यावरून थोडा गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून, त्याचा खुलासा करणें अवश्य आहे. या अभंगांत ज्या आंधळ्यापांगळ्यांचा दाता पांडुरंग आहे म्हणून म्हटलें आहे ते आंधळेपांगळे म्हणजे शारीरिक व्यंग असल्यामुळें असहाय स्थितींत जे आंधळे व पांगळे दृष्टोत्पत्तीस येतात ते नव्हेत. पहिल्या कडव्याचा असा अर्थ नव्हे, कीं ज्यांना शारीरिक व्यंगें आहेत, ज्यांच्या डोळ्यांच्या खांचा झाल्या आहेत, पायांवरून ज्यांच्या वारें गेलें आहे, ज्यांना जगांत कोणी त्राता राहिला नाहीं असे दीनदुबळे यांचा दाता भगवान् आहे व त्यांनीं देवाजवळ करुणा भाकावी; पण जे निर्व्यंग, सुदृढ आहेत त्याना देवाजवळ करुणा भाकणेची गरज नाहीं. त्यांनीं स्वतःच्या हिमतीवर हवें तसें वागावें. देवाचा व त्यांचा कांहीं संबंध नाहीं. देवाच्या सत्तेला न जुमानतां ते वाटेल तें मिळवू शकतात. या अभंगांतील आंधळा व पांगळा हा याहून अगदीं वेगळ्या स्वरूपाचा आहे. तो म्हणजे परमार्थ-सोपानाच्या पुष्कळच पायऱ्या चढून गेलेला उत्कृष्ट साधक आहे.

येथवर सांगितलेल्या माहितीवरून अभंगाची सामान्य कल्पना वाचकांना आली असेल. आतां भावार्थाकडे वळूं.

आंधळे व पांगळे यांची मागणी पुरवणारा दाता एक विठोबा आहे. दुसरा कोणीही त्यांची मागणी पुरवूं शकणार नाहीं. त्याच्यापासून हें जग निर्माण झालें यामुळें तो सर्व जाणता आहे. त्याची अकुंठित सत्ता आहे म्हणजे तो कर्तु अकर्तु अन्यथा कर्तुं शक्तीनें संपन्न आहे. कारण, तो जीवांच्या पापपुण्य-संचितांची घडामोड एका क्षणांत करूं शकतो. हे पांडुरंगा, भवदुःख दूर करून आमची चिंता निवारण करणारा तुझ्यावांचून दुसरा कोण आहे ! ॥ १ ॥ तुझ्या ठिकाणीं धर्माची बुद्धि जागती राहूं दे. तूंच सर्व कृपाळूंचा राजा म्हणजे श्रेष्ठ आहेस. आम्ही न सांगतां सुद्धां आमच्या जीवाच्या आंतील गोष्ट तुला सहजच कळते ॥२॥

तुकारामबोवा हीच गोष्ट दुसऱ्या ठिकाणींही सांगतातः—

न सांगतां तुम्हां कळों येतें अंतर । विश्वीं विश्वंभर परिहारचि नलगे ॥

कोणी म्हणेल, असें जर आहे तर मग सांगतां कां ? त्याला 'आवड' हेंच उत्तर तुकोबा देतात. बोलल्याशिवाय राहवत नाहीं. त्याच अभंगांत ते पुढें म्हणतात :--

परि हे अनावर आवरितां आवडी। अवसान ते घडी पुरों देत नाहीं ॥

व्यवहारांत सुद्धां मनुष्य म्हणतो कीं, तुम्हांला ठाऊकच आहे; पण सांगतों, सांगितल्याविना राहवत नाहीं म्हणून.

देवा, तुम्हीं पूर्वीं आंधळ्यांपांगळ्यांची मागणी पुरवली आहे. उदाहरणार्थ, पाहिला पुंडलीक. कालदृष्ट्या पुंडलीक शुकउपमन्यूंपेक्षां जुना म्हणून तुकाराममहाराज त्याचा प्रथम उल्लेख करतात असें नव्हे, तर पांडुरंग हें दैवत पंढरपूरला प्रकट झालें तें पुंडलिकाकरितांच म्हणून. प्रल्हादाकरितां जसा नरसिंहअवतार, तसा पुंडलिकाकरितां पांडुरंगावतार असें म्हणण्यास हरकत नाहीं. वारकऱ्यांचा 'पुंडलीकवरदा हरि विठ्ठल' हा घोष प्रसिद्धच आहे. या बाबतींत पांडुरंगाची माहिती देणाऱ्या संतमहात्म्यांच्या शेंकडों उक्ति प्रसिद्ध आहेत. त्यांतल्या महत्त्वाच्या तीनचार येथें उद्धृत करतों.

(१) महायोगपीठे तटे भीमरथ्यां वरं पुंडरीकाय दातुं मुनींद्रैः ।। समागत्य तिष्ठन्तमानंदकंदं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ।। —शंकराचार्य

(२) युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिका भेटी परब्रह्म आलें गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ।। —नामदेवकृत आरती

(३) पुंडलीकें भक्तें रे तारिलें विश्वजना । वैकुंठीची मूर्ती आणिली पंढरपूरपाटणा ।। —ज्ञानदेव अभंग

(४) पुंडलिक भक्तराज । तेणें साधियेलें काज । वैकुंठीचें निज । परब्रह्म आणिलें ।। —तुकोबा

नीरा-भीमा संगमानंतर वाहणाऱ्या भीमेच्या तटकावरच्या पवित्रक्षेत्रीं—पंढरपुरीं भीमेच्या वाळवंटांत पुंडलिकानें तुम्हांसाठीं लोळण घेतली. तो तुमच्या दर्शनाकरितां इतका उत्सुक झाला कीं, त्याला तुमच्यावांचून दुसरें दिसेना; सर्व दृश्य त्याला दिसेनासें झालें. त्या एकतानतेचा परिणाम असा झाला कीं, प्रेम देणारे तुम्ही त्याच्याकडे वळलांत व त्यावर कृपारूपी अमृतवृष्टि केलीत ।। ३ ।।

आणखी एक उदाहरण द्यावयाचें तर व्याघ्रपादऋषीचा मुलगा उपमन्यु. वयानें लहान, पण त्यानें देवाकरितां हट्ट घेतला. त्याला लोक दिसेनासे झाले व लोक ज्या वाटेनें जात होते त्या वाटेनें त्याला चालवेना, म्हणजे चालावेसें वाटेना. त्यानें हरिनामाची गर्जना करून देवाच्या समोर लोटांगण घातलें. त्याकरितां तुम्ही आवेशानें धांवलांत व त्याची मागणी पुरी केलीत ।। ४ ।।

तिसरें उदाहरण द्यावयाचें म्हणजे शुकाचार्यांचें. हा आंधळा विलक्षणच! हा मुळीं जग दिसेल व आपण फसूं येवढ्याकरितां मातेच्या गर्भांतच जगाला न बघतां असा आंधळा राहिला. तेथें बसून जन्ममरणाच्या खेपा करतांना मागें त्यानें सोसलेलें दुःख तो वारंवार आठवीत होता व पुन्हा

जगाचा छंद लागून आपणांवर तें भोगण्याची पुन्हा पाळी येईल म्हणून आईच्या उदराच्या बाहेर येण्याचा विचारच त्यानें सोडून दिला ! दुःखानें होरपळलेला तो देवाची प्रार्थना करीत होता कीं, हे गोपाळा, अभयदान दे. त्याच्या त्या कळकळीच्या प्रार्थनेला तुम्ही पावलांत व त्याची लज्जा व तेज ( इभ्रत ) रक्षण केलीत ।। ५ ।।

तात्पर्य, या उदाहरणांवरून असें दिसतें कीं, जो या जनाकडे पाहात नाहीं, जो सुखदुःख व मोह यावेगळा होऊन धनाचा आठव करीत नाहीं, ज्याला आपलें व परकें हेंही उरलें नाहीं अशा सज्जनांना तूं आपलें दर्शन देतोस. तुकोबा म्हणतात, माझाही असाच प्रकार झाला आहे. याकरितां नारायणा, आतां तूं मजवर कृपा कर व (दर्शन दे.) ।।६।।

भावार्थ संपला.

आंधळ्याच्या रूपकानें तुकाराममहाराजांनीं वेगवेगळ्या प्रसंगीं वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या आहेत. एके ठिकाणीं ज्यांना देव दिसत नाहीं, देवाला जे ओळखत नाहींत त्यांना तुकारामबोवा आंधळे म्हणतात--

आंधळीं तीं तुका म्हणे संसारीं। जिहीं नाहीं हरि ओळखिला ।।

याच रूपकाचा उपयोग करून याच्या अगदीं उलट म्हणजे स्वरूप-समरसता ज्यांना प्राप्त झाली आहे व म्हणून ज्यांच्या वृत्तीवरच जगत् नाहीं अशा ज्ञानी अनुभवीयांचें वर्णन पुढील अभंगांत याच रूपकानें करतात--

सहज मी आंधळा गा। निज निराकार पंथें। वृत्ति हे निवृत्त झाली। जन न दिसे तेथें। मी माझें हरपलें। ठायीं जे थिच्या तेथें। अदृश्य तेंचि झालें। कांहीं दृश्य जें होतें ।।१।।

या अभंगांतील आंधळा हा या दोहोंहूनही वेगळ्या प्रकारचा आहे. या अभंगांत आणखी एक लक्षांत ठेवण्यास हवें कीं, येथील आंधळा व पांगळा या दोन भिन्न व्यक्ति नाहींत. जो आंधळा तोच पांगळा. या अभंगांत आंधळ्याच्या रूपकानें भगवद्दर्शनाची तीव्र लालसा ज्याच्यांत उत्पन्न झाली आहे व त्यामुळें ज्याला देवावांचून दुसरें दिसत नाहीं अशा भक्ताचें वर्णन तुकोबा करीत आहेत. डोळ्यांना दिसत नाहीं व पायांवरून वारें गेलें म्हणून झालेला आंधळापांगळा हा या अभंगांतील आंधळापांगळा नव्हे.

हा डोळे असून आंधळा व पायानें चालतां येत असून पांगळा! 'डोळे असून आंधळे' येवढेंच वर्णन केलें तर गैरसमज होण्याचा संभव आहे म्हणून त्याचें अधिक स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. पैशाची मस्ती आल्यानें नातेवाईक, इष्टमित्र यांना न जुमानणाऱ्याचेंही 'डोळे असून आंधळा' हें वर्णन होईल. मनुष्य म्हणतो, 'अहो, त्यांच्या डोळ्यांवर पैशाची धुंदी आली आहे. त्यांना आतां गरीब नातेवाईक कोठून दिसणार?'

स्त्रीपुत्रादिमेळें। संपत्ति जंवजंव फळे। तंवतंव तेणें रजें डोळे। जाती जयांचे॥

तात्पर्य, हा वर्गही या अभंगांत अपेक्षित नाहीं.

येथला आंधळा हा देवाच्या भेटीकरिता डोळे असून जगाकडे न बघणारा, ज्याला व्यवहार करण्यास आवश्यक असणारी बुद्धि असून जगाच्या व्यवहाराबरोबर न चालणारा, असा एकांती अनन्यभक्त आहे. साधकांत दोन वर्ग आहेत: एक मंद व एक तीव्र. देवदर्शनाची मंद जिज्ञासा पुष्कळ लोकांत आढळून येते; पण परमार्थदर्शनाच्या दृष्टीनें तिचा फारसा उपयोग होत नाहीं. कारण, अशा लोकांना देव हवा आहे; पण तो सुट्टीच्या दिवशीं आला तर! त्यांचे रोजचे इतर व्यवसाय सर्व झाले, दुसरें फारसें करण्यासारखें नाहीं, म्हणजे चला देवदर्शनाला, अगर घ्या देवाचें नांव, असें म्हणणारा हा वर्ग आहे. एक परमार्थी, याला 'मोडींतला' परमार्थ म्हणत. जुन्या बाजारांत जशी वापरलेली वस्तु विकावयास येते तशी प्रपंच करून थकलीभागली मनबुद्धि परमार्थाकडे हे लोक लावतात. 'अकरणात् मन्दकरणमपिश्रेयः' या न्यायानें हें बरें; पण प्रत्यक्ष देवाचा साक्षात्कार होण्याच्या दृष्टीनें याचा फारसा उपयोग होत नाहीं.

सत्समागमानें व सत्शास्त्रश्रवणानें परमात्मा भेटावा अशी माणसांत प्रथम आवड उत्पन्न होते. कारण, या योगानेंच त्याला संतासंताचा आत्मानात्म्याचा विचार ऐकावयास मिळतो. त्याला त्यामुळें कळते कीं,

भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयाः।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे॥

आपले सर्व संशय दूर होऊन आपली वासनाग्रंथी तुटून, आपलें कर्म संपून आपण जन्ममरणाच्या या अखंड चक्राच्या बाहेर तेव्हांच पडूं कीं, जेव्हां आपणांस आत्मदर्शन होईल.

असे विचार श्रवण करणारे लोकही पुष्कळ आहेत; पण यापैकीं फारच थोड्या लोकांच्या ठिकाणीं खरी जिज्ञासा, देवदर्शनाची खरी तळमळ निर्माण होते. श्रीएकनाथ म्हणतातः--

हरिकथा अवघेचि ऐकती। परि माझी श्रद्धा नुपजे चित्तीं॥
कवणी एकाची अभिनव गती। श्रद्धाउत्पत्ति श्रवणीं होय॥

पुष्कळ लोक ऐकतात, पण ऐकलेलें तेथेंच सोडतात. ऐकलेल्याचें मनन अथवा चिंतन करीत नाहींत. यामुळें त्यांची परमार्थांत प्रगति होत नाहीं. कै. जोगमहाराज म्हणत, कीं पुष्कळ लोकांचें श्रवण परमार्थाचें, चिंतन संसाराचें व साक्षात्कार दुःखाचा !

ज्यांना पूर्वसंचिताची चांगली जोड आहे व ज्यांना चांगली संगति आहे ते ऐकलेल्याचें मनन करतात व त्याचा परिणाम त्यांची देवदर्शनाची आवड तीव्र होण्यांत होतो. मग देवाची गोष्ट कोणी सांगूं लागला कीं पूर्वी उठून जाणारा मनुष्यच ती ऐकण्याकरितां इतर सर्व लाभांचा त्याग करण्यास तयार होतो. त्याला देवदर्शनाविना करमत नाहीं असें होतें. त्याला बाकीचे सर्व व्यवहार नकोसे होतात. त्यांना तो विटतो. या अवस्थेचें तुकाराम-बोवांनीं पुढील कडव्यांतून सुंदर वर्णन केलें आहे :--

लोकमान देहसुख। संपत्ति उपभोग अनेक।
विटंबना दुःख। तुझिये भेटीवांचून॥१॥

लोकांनीं त्याला मान दिला अथवा त्याच्या शरीराला चंदनादि उपचार केले अथवा इतर सुखशय्येसारखे सुखोपचार अर्पण केले, तरी त्याला ते गोड तर लागत नाहींतच, पण त्यानें उलट त्याचें सर्वांग पोळतें तुकारामबोवा म्हणतात :--

देहउपचारें पोळतसे अंग। विषतुल्य चांग मिष्टान्न तें॥

त्याला या योगें आपली विटंबना होते असें वाटतें. कारण, त्याला खरें ठाऊक असतें कीं, आपणांस देवदर्शन झालें नाहीं व लोक उगीच मान देत आहेत. तें ढोंग त्यास खपत नाहीं. त्यामुळें तो अधिकाधिक तळमळूं लागतो. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात :—

सर्व विशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडूं एक ।।

असा साधक देवाची प्रार्थना करतो:— देवा, मला भेट दे.

तरी मज ये भेट ये भेट । काय ठाकलासी नीट । थोर पुण्यें वीट । तुज दैवेंचि लाधली ।। २ ।।

× × ×

भेटीलागीं पंढरीनाथा । जीवीं लागली तळमळ व्यथा ।।१।।
कैं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ।।२।।
सिणलें माझें मन । वाट पाहतां लोचन ।।३।।
तुका म्हणे भूक । तुझें पहावया मुख ।।४।।

तुकोबांच्या गाथ्यांतून देवदर्शनाकरितां अशी तळमळ लागलेली दाखविणारे कित्येक उतारे देतां येतील. स्थलसंकोचास्तव आणखी एकदोन देतों.

भेटीची आवडी उताविळ मन । लागलेंसें ध्यान जीवीं जीवा ।।१।। आतां आवडीचा पुरवावा सोहळा । येउनि गोपाळा क्षेम देईं ।।२।। नेत्र उन्मळित राहिले तटस्त । गंगा अश्रुपात वहावली ।।३।। तुका म्हण तुम्ही करा साचपण । मुळींच्या वचना आपुलिया ।।४।।

× × ×

कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ।।१।।
तैसें जालें माझ्या जीवा । केव्हां भेटसी केशवा ।।२।।
चुकलिया माये । बाळ हुरूहुरू पाहे ।।३।।
जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ।।४।।

भक्तीचें अंतरंग सांगतांना नारदांनीं त्याचें प्रमुख स्वरूप म्हणून भक्त हे ' अनन्य ' असतात असें वर्णन केलें आहे व या अनन्यतेची व्याख्या ते आपल्या भक्तिसूत्रांत पुढीलप्रमाणें देतात :-

अन्याश्रयाणां त्यागो अनन्यता ।

बाकीचीं सर्व आलंबनें सोडून भक्त हा एक इष्टदेवताच्याच ठिकाणीं दृढ असतो. यालाच एकांतिकपणा, अनन्यता म्हणतात. ही अनन्यता अशी असते कीं, बाकीच्या गोष्टी त्याच्या वृत्तीवर येतच नाहींत. दैवानें पुढें आणून ठेवल्या तरी त्याचा भोग घ्यावा असें त्यास वाटत नाहीं. अशी जी भक्तांची स्थिति तिचेंच रूपकानें भक्त हा या भोगाविषयीं आंधळा, सुखोपभोग मिळविण्याविषयीं पंगु, असें वर्णन करण्यांत येतें. ज्ञानेश्वरींतसुद्धां गीता अ. ९ मधील 'यान्ति मद्याजिनोऽपि माम् ॥' या २५ व्या श्लोकांवर लिहितांना ज्ञानोबाराय लिहितात :--

जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि प्रेमें सप्रेम ।
जे माझिया भुली सभ्रम । नेणती लोक ॥३६३॥

भक्तीच्या आरंभीं भक्त हा देव व जगत्, परमार्थ व प्रपंच या दोन्ही गोष्टी साधाव्या म्हणून प्रयत्न करतो. पण, हें साधत नाहीं असें दिसलें व त्याच्यांत देवदर्शनाची लालसा तीव्र झाली कीं तो जगाच्या रीतीनें चालावयाचें सोडून देतो. लोक कांहीं म्हणोत-तो त्याची पर्वा करीत नाहीं.

जग चले उस घाट कौन जाय। नहीं समजत फिरफिर
गोते खाय॥१॥

उपर स्वार बैठे तृष्णापीठ । नहिं बाचे कोई जावे लूट ॥३॥

' सुखें निदोत हे जन । न करीं तयाशीं वचन ॥

अशी त्याची वृत्ति होते. अशी ज्याची वृत्ति झाली तोच पांगळा. त्याची वृत्ति एकाकार झाल्यानें त्याला जग हें दिसेनासें होतें म्हणून तोच आंधळा. ज्यांना ज्यांना देवदर्शन झालें ते सर्व या अवस्थांतून गेलेले आपल्याला आढळून येतील.

ज्ञानेश्वरमहाराजांचा याविषयीं एक उत्कृष्ट अभंग आहे. ते आपली अवस्था पुढीलप्रमाणें वर्णन करतात :—

चंदनाची चोळी । माझें सर्व अंग पोळी ।
कान्हो वनमाळी । वेगीं भेटवा का ॥१॥

तुकाराममहाराज गोकुळनिवासी गौळणींच्या वर्णनाच्या निमित्तानें भक्ताच्या या अवस्थेचें फारच सुंदर वर्णन करतात. एक गौळण आपली हकीगत सांगते——

नका कांहीं उपचार माझ्या शरीरा। करूं न साहावें मज बहु होतो उबारा। मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा। लवकरी आणा नंदाचिया कुमारा ॥ १ ॥ .........

स्वाद शीण देहभान निद्रा खंडन। पाहिले ताटस्थ उन्मळित लोचन। अवघे वोसाऊन उरले ते चरण। तुका म्हणे दर्शनापें आलें जीवन वो ॥ ४ ॥

'देवाचा छंद असा लागला कीं, विषयांची गोडी नाहींशी झाली. या बाबतींत श्रम वाटेनासा झाला. देहाचा आठव गेला. झोंप नाहींशी झाली. डोळ्याचें पातें डोळ्याला लागेना. फक्त देवाची मूर्ति डोळ्यासमोरून जाईना. तेवढी सारखी समोर ! इतर सर्व संपलें. इतर बाबतींत मेल्यासारखीच म्हणा ना ! याचा परिणाम असा झाला कीं, माझें जीवन जो नंदकुमार तो दर्शन देण्यास आला.'

तुकारामबोवा पुढील कडव्यांत गौळणींचें असेंच वर्णन करतात :—

एक विषय तो सकळांचा हरि। त्याच्या आवडीनें आवडी इतरीं। अंध बहिर हे प्रेत लोकाचारीं। त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरीं वो ॥

"त्या सर्व गौळणींच्या वृत्तींचा एकच विषय व तो म्हणजे श्रीहरि. इतरांवर त्यांचें प्रेम हें त्या त्या विषयाकरितां नसून ते श्रीहरीचे म्हणून.

जगाच्या व्यवहाराच्या बाबतींत त्या आंधळ्या, बहिऱ्या; खरें सांगावयाचें म्हणजे मृतवत्च ! पण लोकव्यवहारांत अशा दिसल्या तरी आपण त्यांना हलक्या समजूं नका. व्यासादिकांनीं पुराणांतून त्यांची स्तुतिस्तोत्रें गायिलीं आहेत."

तात्पर्य, देवाची अशी ओढ लागली कीं, तींत जग दिसेनासें झालें व जगाच्या रहाटीबरोबर चालणें अशक्य झालें, अशा अवस्थेला पावलेला जो भक्त त्याचें 'आंधळा व पांगळा' म्हणून वर्णन केलें आहे. तुकारामबोवा या अभंगाच्या प्रथम कडव्यांत म्हणतात, अशा आंधळ्या-पांगळ्यांना जें हवें आहे तें देण्याचें सामर्थ्य एक श्रीपांडुरंगाच्याच ठिकाणीं आहे. त्यांना देव हवा आहे व तो देवावांचून कोण देणार ! म्हणून ते म्हणतात--

आंधळ्या पांगळ्यांचा एक विठोबा दाता ।

आम्ही सामान्य प्रापंचिक जीव अशा आर्त भक्तांचें कोड कसें पुरवणार ? त्याच्यापेक्षां आपण अधिकच देवापासून दूर ! त्यानें आमच्याकडे, फार काय, राजसत्ता हातीं असणाऱ्याकडे, याकरितां जाणें म्हणजे ज्यास एका वस्तूच्या दोन वस्तु दिसतात अशा दूषित नेत्राच्या माणसानें ज्यास एका वस्तूच्या तीन वस्तु दिसतात त्याच्याकडे जाण्यासारखें आहे. श्रुति म्हणते, याची जो प्रार्थना करतो त्याला तो आपलें खरें स्वरूप दाखवतो.

यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम् ॥

तुकोबा येवढ्याकारतां म्हणतात :--

आंधळ्या पांगळ्यांचा एक विठोबा दाता ॥ .....

पुढील उदाहरणें सर्वश्रुत अशींच आहेत. त्यांचें जास्त व्याख्यान करण्याचें कारण नाहीं.

शेवटच्या कडव्यांत तुकोबा म्हणतात, 'देवा, माझी वरील आंधळ्या-पांगळ्यासारखी स्थिति झाली आहे.' त्यांनीं इतरत्रही या आपल्या अवस्थेचें वर्णन केलें आहे. ते म्हणतात : --

भगवंता तुजकारणें। मेलों जिताचि कैसी। निष्काम बुद्धि ठेली। चळण नाहीं तयासी। न चलती हातपाय। दृष्टि फिरली कैसी। जाणतां न देखों गा। क्षर आणि अक्षरासी ॥ १ ॥

याच अभंगाच्या शेवटीं ते म्हणतात :—

नाठवे आपपर। आतां काय बा करूं। सारिखा दोहींसवा। हारपला विचारु। घातला योगक्षेम। तुज आपुला भारु। तुकया शरणांगता। देईं अभयकरू ॥ ५ ॥

अशीच आपली अवस्था झाली. आपणांवर कृपा करा व दर्शन द्या असें तुकोबा देवाजवळ मागतात :—

न देखे जो या जना। तया दावी आपणा। वेगळा सुख-दु:खा। मोहो नाठवी घना। आपपर तेंही नाहीं। बंधुवर्ग सज्जना। तुकया तेची परी। जाली पावे नारायणा ॥६॥

अशी अवस्था झाल्यावर दर्शन द्यावयाला का देव दूर आहे? देव अशांना दर्शन देतो. तुकोबा म्हणतात:—

जाणे जीवींचें सकळ नारायण। असे व्यापूनी तो न दिसे लपून॥ राधा संबोखिली प्रीति आलिंगून। तुका म्हणे येथें भावचि कारण वो ॥

# सहज मी आंधळा गा : :: ४ ::

: आंधळा :

सहज मी आंधळा गा। निज निराकार पंथें।
वृत्ति हे निवृत्ति झाली। जन न दिसे तेथें।
मी माझें हारपलें। ठायीं जेथींच्या तेथें।
अदृश्य तेंचि झालें। कांहीं दृश्य जें होतें॥ १॥
सुखें मी निजलों गा। शून्य सारोनि तेथें।
त्रिकूटशिखरीं गा। दान मिळे आयीतें॥ २॥
टाकिली पात्र झोळी। धर्म अधर्म आशा।
कोल्हाळ चुकविला। त्रिगुणांचा वोळसा॥
न मागें भीक आतां। हाचि झाला भरंवसा।
वोळली सत्रावी गा। तिणें पुरविली इच्छा॥ ३॥
ऊर्ध्वमुखें आळविला। सोहं शब्दाचा नाद।
अरूप जागविला। दाता घेऊनि छंद॥
घेऊनि आला दान। निजतत्त्व निजबोध।
स्वरूपीं मेळविलें। नांव ठेविलें भेद॥ ४॥
शब्द हा बहुसार। उपकाराची राशी।
म्हणोनि चालविला। मागें येतील त्यांसी॥
मागोनि आली वाट। सिद्ध ओळीची तैसी।
तरले तरती गा। आणिकहि विश्वासी॥ ५॥
वर्म तें एक आहे। दृढ धरावा भाव।
जाणीव नागवण। लागों नेदी तो ठाव॥
म्हणउनि संग टाकीं। सेवीं अद्वैतभाव।
तुका म्हणे हाचि संतीं। मागें केला उपाव॥६॥

मागील संकीर्तनाचा अभंग 'आंधळा-पांगळा' असल्यानें त्यांत 'आंधळा कोण' याची चर्चा येऊन गेली असतां पुनः 'आंधळा' संकीर्तनाकरितां कां निवडला हें ज्या वाचकांनीं मागचें संकीर्तन वाचलें आहे त्यांना ठाऊकच आहे. तेथें सांगितलेंच आहे कीं, तुकाराममहाराजांनीं आंधळ्याच्या रूपकानें निरनिराळ्या गोष्टी निरनिराळ्या प्रसंगांनीं सांगितल्या आहेत. मागच्या अभंगाचा विषय भगवद्दर्शनाची तीव्र इच्छा करणारा उपासक होता, तर या अभंगाचा विषय भगवंताच्या निर्गुण स्वरूपाचा साक्षात्कार झालेला महानुभाव आहे.

एका महानुभावाचा थोर अनुभव सांगणारा म्हणून या अभंगाला महत्त्व आहेच; पण या अभंगाला दुसऱ्याही एका दृष्टीनें फार महत्त्व आहे. परमार्थ करणाऱ्या पुष्कळ लोकांना भक्ति, ज्ञान, योग इत्यादि मार्गांतील ऐक्य व भेद कोठें आहेत हें कळत नाहीं. मोठे अधिकारी पुरुष प्रसंगवशात् आपणांकडे येणाऱ्या जिज्ञासूंच्या अधिकाराप्रमाणें कोणा एका मार्गावर कमीअधिक जोर देऊन त्या मार्गाची स्तुति करतात. त्याचप्रमाणें सर्वसाधारण लोकांच्याकरितां सांगतांनाही त्यांना जें जमेल, करतां येईल तें पाहून ते बोलतात. त्यांना ठाऊक आहे कीं, एकदम अवघड साधन सांगितलें तर कोणी साधन तर करणार नाहींच; पण परमार्थही टाकून देतील!

तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात—

> अवघड कोणी न करी सांगतां ।
> सुलभ बहुतां गोड वाटे ॥

यामुळें साधु कठिण साधनांतील दोष दाखवून सोप्या साधनांची स्तुति करतांना आढळून येतात. ते खोटें बोलतात असें नव्हे. दीनदुर्बलांचाही उत्साहभंग होऊं नये, त्यांच्याकडूनही परमार्थ व्हावा येवढ्याकरितां सोप्या साधनांची ते स्तुति करतात. हें वर्म लक्षांत न आल्यानें अडाणी मनुष्य अवघड साधनांची निंदाच करूं लागतो व तें सर्वस्वीं त्याज्य आहे असें समजतो. उदाहरणार्थ, ज्ञानदेवांनीं भगवद्‌गीतेंतील बाराव्या अध्यायांतील 'क्लेशोऽधिकतरस्तेषाम्' या पाचव्या श्लोकावर लिहितांना योगमार्गाचें काठिण्य दाखविलें आहे व हरिपाठांतील पाचव्या अभंगांत 'योगयागविधि

येणें नव्हे सिद्धि । ' असें म्हटलें आहे. येवढ्यावरून किती तरी भक्तिमार्गी-वारकरी अवारकरी-योगमार्गाची हेटाळणी करतात व ज्ञानोबारायांचा पुरावा पुढें करतात; पण त्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, योगांतील काठिण्य दाखविणारेच ज्ञानोबाराय साधन सांगतांना ज्ञानेश्वरींत पुढील-प्रमाणें सांगतातः–

परि संतांसवें वसतां । योगज्ञानीं पैसतां ।
गुरुचरण उपासितां । वैराग्येंसी ॥
येणेंचि सत्कर्में । अशेषही अज्ञान विरमे ॥
जयांचें अहं विश्रामे । आत्मरूपीं ॥

–ज्ञा. अ. १५, ४२२–२३

आतां आत्मलाभाविखीं । ज्ञानयोगामाजीं एकीं ।
जे आपुलिया ठाकीं । हांवें भरे ।

–ज्ञा. अ. १६–८१

"दैवी ह्येषा गुणमयी" (गीता, अ. ७–१४) या श्लोकावर लिहीत असतांना ज्ञानराज कर्मादिमार्गांची मायानदी तरून जाण्याबाबतींतील विफलता दाखवतात; पण योगाविषयीं मात्र ते लिहितातः–

वरि कांहीं तरों ये योगें । तरी विपाय तो ॥

–ज्ञा. अ. ७, ओ. ९१

इतकें विस्तारानें हें सांगण्याचा हेतु असा कीं, भक्तिमार्गी अथवा योग-मार्गी म्हणविणाऱ्यांना योग आाण भक्ति यांचें अंतःस्वरूप पुरें न कळल्या-मुळें एक दुसऱ्याचा अधिक्षेप करूं लागतो. वास्तविक योग व भक्ति हे व्यापक अर्थानें जाणल्यास असें आढळून येईल कीं, योगाला भक्तीची व भक्तीला योगाची गरज आहे. भक्तीलासुद्धां आसनस्थैर्याची, ध्यानाची आवश्यकता आहे. खुद्द तुकारामबोवा म्हणतातः–

ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडीं अनंत आळवावा ॥

× × ×

नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥१॥
ऐसें धरोनिया ध्यान । मनें करावें चिंतन ॥२॥

तसेंच योगालाही भक्तीची गरज आहे. भक्तीविना म्हणजे ईश्वर-प्राप्तीच्या तळमळीविना योगसाधन तरी साधकाकडून कसें होणार?

प्रस्तुत लेखकाचा हेतु भक्ति व योग यांत मुळींच भेद नाहीं असा दाखविण्याचा नाहीं. प्रत्येकाचें वैशिष्ट्य आहेच हें कबूलच आहे. त्यास एवढेंच सांगावयाचें आहे कीं, सामान्य माणसें समजतात तसा त्यांत विरोध नाहीं. परमात्मप्राप्तीचींच हीं दोन्ही साधनें असल्यानें दोहोंत कांहीं साम्य आहे व एका मार्गाचेंही सम्यक् अनुष्ठान केल्यास दुसऱ्या मार्गांतीलही कांहीं अनुभव साधकास येऊं शकतात.

महाराष्ट्राचें असें भाग्य आहे कीं, त्यांतील श्रीज्ञानोबा-तुकाराम-प्रभृति संतांनीं स्वानुभवानें हा समन्वय आपल्यासमोर मांडून ठेवला आहे.

गेल्या शतकाच्या शेवटीं बंगाल्यांत होऊन गेलेले श्रीरामकृष्ण परमहंस यांची थोरवी सांगतांनाही अशाच सांगतात कीं, त्यांनीं वेगवेगळ्या धर्मां-तील साधना करून पाहिली व त्या अनुभवाच्या बळावरच सर्व धर्म अंतरंग दृष्ट्या सारखेच आहेत असें ते प्रतिपादीत. साधन शिकवितांना त्यांनीं तंत्रमार्ग आपल्या शिष्यगणांस शिकविला नाहीं. कर्मउपासनाज्ञान हा जो मार्ग तोच शिकविला. आमच्या भागवतधर्मीय संतांनीं असाच ज्ञानभक्तियोग याचा समन्वय अनुभवून सर्वांना यथाधिकार कर्मउपासनाज्ञानाचा उपदेश केला.

ज्ञानराज भक्तही होते व योगीही होते. 'एक निघे पूर्वेकडे, एक निघे पश्चिमेकडे' याप्रमाणें दोहोंत अंतर असतें तर श्रीज्ञानराजांच्या ठिकाणीं हा संगम संभवता ना. तुकाराम बोवांच्याही ठिकाणीं असाच या दोहोंचा संगम होतो. तेही भक्त व योगी होते. अधिष्ठान व साधन भक्तीचें व अनुभव दोहोंचा. ते म्हणतात:—

कोणी कांहीं तरी केलीं आचरणें । मज या कीर्तनेंवीण नाहीं॥

× × ×

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७०८८२ वि: का०५४
२००६ ग्रं. क्र. ७५१३१५



लक्षूनियां योगी पाहती आभास । तें दिसे आम्हांस दृष्टीपुढें ॥ कर दोनी कटीं राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांति ॥

×       ×

रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सूदलें डोळां ॥१॥ तेणें अंजनगुणें दिव्यदृष्टि झाली । कल्पना निमाली द्वैताद्वैत ॥२॥

७८८३०

प्रस्तुतच्या कीर्तनाच्या अभंगांत भक्तिमार्गाचें साधन करणारे तुकाराम-महाराज निर्विकल्पसमाधीचा अनुभव आपणांस कसा आला तें सांगतात. सामान्यतः भक्तिमार्ग हा 'सगुणा'वरच थांबतो व योगी हा सगुणाला पुसतच नाहीं, अशी बहुतेकांची कल्पना असल्यानें प्रास्ताविक इतकें लांबविलें.

या अभंगांतील दोनचार महत्त्वाचे शब्द वाचकांच्यासमोर ठेवून हें प्रास्ताविक संपवितों. या शब्दयोजनेवरून वर सांगितलेल्या प्रास्ताविक लिखाणाचें प्रयोजकत्व वाचकांच्या लक्षांत येईल.

(१) वृत्ति हे **निवृत्ति** झाली जन न दिसे तेथें ।
(२) सुखें मी निजलों गा **शून्य** सारोनि तेथें ।
**त्रिकूटशिखरीं** गा दान मिळे आयीतें ॥
(३) ऊर्ध्वमुखें आळवितां **सोहं** शब्दाचा नाद ।
(४) वोळली **सत्रावी गा** । सिद्ध तेणें पुरविली इच्छा ।
(५) मागोनि आली वाट । **सिद्ध** ओळीची कैसी ॥

वरील उताऱ्यांतील जाड शब्दयोजना ही योगांतील आहे हें त्या शास्त्राशीं परिचित असलेल्यांना सांगावयास पाहिजे असें नाहीं.

अशासारखाच योगप्रधानशब्दरचना असणारा त्यांचा एक अभंग देऊन प्रस्तुतच्या अभंगाच्या भावार्थाकडे वळूं.

पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद ॥१॥ जीवाशिवा शेज रचिली आनंदें । औटावियें पदीं आरोहण ॥२॥ निजीं निजरूपीं निजविला तुका । अनुहताचा बाळका हल्लरू गाती ॥३॥

यांतील 'निजरूपीं निजविला', 'औटावियेपदीं', 'अनुहताचा हल्लरु गाती' इत्यादि शब्द योगांतील आहेत हें प्रसिद्धच आहे.

भावार्थः—तुकारामबोवा म्हणतात, मी स्वभावतः आंधळा आहे, केलेला नव्हे अथवा झालेलाही नव्हे. पुष्कळ लोकांना प्रथम दृष्टि असते; पण देवी वगैरे रोगांनीं ती जाते. तशी कांहीं कारणामुळें दृष्टि जाऊन अंधत्व प्राप्त झालेला आंधळा मी नव्हे अथवा मला कोणीं डोळे फोडून आंधळा केला आहे असें नव्हे. आपण ज्याला 'जन्मांध' म्हणतों तोही हा प्रकार नव्हे. जन्मांध याचा अर्थ येवढाच कीं, आईच्या गर्भांत असतांना कांहीं कारणानें आंधळा झाला व मग आईच्या उदराच्या बाहेर आला. तसा मी जन्मांधही नाहीं. मग आंधळे कसे ? त्याचें स्पष्टीकरण त्याच चरणाच्या पुढच्या भागांत करतातः—

निजनिराकार पंथें ॥

निराकार जें निज म्हणजे आपलें आत्मस्वरूप त्या पंथें म्हणजे मार्गानें म्हणजे दृष्टीनें. याचा थोडक्यांत अर्थ असा कीं, मी निराकार आत्मस्वरूप-दृष्टीनें आंधळा आहे.

तुकाराममहाराजच या कडव्याच्या पुढील भागांत या निराकार, वृत्तिरहित आत्मस्वरूपाला पोंचलेला कोणत्या दृष्टीनें आंधळा तें सकारण सांगतात.

वृत्ति हे निवृत्ति झाली । जन न दिसे तेथें ।
मी माझें हरपलें । ठायीं जेथिच्या तेथें ।
अदृश्य तेंचि झालें । कांहीं दृश्य जें होतें ॥१॥

आपण 'आंधळा' त्याला म्हणतों कीं, ज्याला समोरचें दिसत नाहीं. तुकारामबोवा तसेंच सांगतात कीं, बाहेर धांवणारी वृत्ति निवृत्त झाल्यानें जन म्हणजे दृश्य विश्व दिसेनासें झालें व मी, माझें हा अभिमान

ठिकाणच्या ठिकाणीं नाहींसा झाला. याचा परिणाम असा झाला कीं, कांहीं दृश्य होतें तें सर्व अदृश्य झालें. मग पाहण्यास कांहींच उरलें नाहीं. म्हणून आंधळा झालों! याचें विशेष स्पष्टीकरण भावार्थ संपल्यावर करूं.

पण श्रोता असें विचारील कीं, असें आंधळे झाल्यानें तुम्हांला दुःख भोगावें लागत असेल. कारण आंधळे होणें हें कांहीं सुखास कारणीभूत होत नाहीं. मग तुम्ही हा आंधळेपणा घालविण्याकरितां प्रयत्न करीत असाल?

तुकारामबोवा त्याला उलटच सांगतात–

सुखें मी निजलों गा। शून्य सारोनि तेथें।
त्रिकूटशिखरीं गा। दान मिळे आयीतें॥२॥

शून्याला बाजूला सारून मी सुखानें त्या ठिकाणीं निजलों. शून्य म्हणजे काय, त्याला पलीकडे सारलें असतां काय राहातें, तेथें निजणें म्हणजे काय याचें पुढें स्पष्टीकरण करूं.

आपण तेथें सुखानें निजलों त्याचें कारण तुकाराममहाराज सांगतात कीं, त्रिकूटशिखरावर (त्रिकूटशिखर हें नांव इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन नाड्यांचें जेथें ऐक्य होतें त्या अग्निचक्रास आहे.) म्हणजे शून्याच्या पलीकडे आयतें दान मिळतें. भीक मागावी लागत नाहीं.

अशी भीक न मागतां पोट भरण्याची उत्तम सोय झाल्याचें तुकाराम महाराज पुढें सांगतातः—

टाकिली पात्र झोळी। धर्म अधर्म आशा।
कोल्हाळ चुकविला। त्रिगुणाचा वोळसा।
न मागें भीक आतां। हाचि झाला भरंवसा।
वोळली सतरावी गा। तिणें पुरविली इच्छा॥

भीक मागण्याची झोळी मीं फेकून दिली. मनुष्य अधर्म करून वा धर्म करून आपला आशा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. तुकाराममहाराज म्हणतात, मीं धर्माधर्माची आशारूपी पात्र हीच कोणी झोळी ती फेकून

दिली. म्हणजे मी धर्माधर्मातीत झालों. "त्यज धर्ममधर्मं च" असा महाभारतांत उपदेश केलेला आहे. आत्मस्वरूपीं प्राप्त होणारें जें सुख त्या दृष्टीनें अधर्माइतकाच धर्म (कामिक धर्माचें आचरणही) त्याज्य आहे. त्यानें उच्च गति पण संसारांतीलच मिळते. याबावत ज्ञानेश्वरीमध्यें ज्ञानराजांनीं फारच कडक शब्दांत लिहिलें आहे--

मज येतां पैं सुभटा। या द्विविधा गा अव्हांटा।
स्वर्ग नरकु या वाटा। चोरांचिया ॥
स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजे। पापात्मकें पापें नरका
जाइजे। मग मातें जेणें पाविजे। तें शुद्ध पुण्य ॥

—अ. ९, ३१५–१६

आतां त्रिगुणांचा भोंवरा व खळखळाट मीं चुकविला. मी गुणातीत झालों. माझी आतां पुरी खात्री झाली कीं, आतां आपणांला इतःपर भीक मागावी लागणार नाहीं. कारण सतरावी (व्योमचक्रांतील चंद्रामृतरूपी) जीवनकला हिनें आपला अमृताचा ओघ मजकडे वळविला व माझी सर्व इच्छा पूर्ण केली.

आपणांस ही जी आयतें दान मिळण्याची सोय होऊन कृतकृत्यता प्राप्त झाली ती कोणत्या साधनानें आपण मिळविली तिची स्पष्टता महाराज पुढील चरणांत करतातः—

ऊर्ध्वमुखें आळविला। सोहं शब्दाचा नाद।
अरूप जागविला। दाता घेऊनि छंद।
घेऊनि आला दान। निजतत्त्व निजबोध
स्वरूपीं मेळविलें। नांव ठेविला भेद ॥४॥

वरती मुख करून मी सोहं 'तो मी आहे' या शब्दांच्या स्वरानें त्याचा छंद घेऊन ज्याला रूप नाहीं. असा जो दाता (परमेश्वर) त्याला जागवला, झोंप येऊं दिली नाहीं. याचा परिणाम असा कीं, तो आपल्या स्वरूपाचा बोध हेंच कोणी दान घेऊन मजकडे आला व मला आपल्या

स्वरूपांत मिळवून घेतलें; पण नांवांत मात्र तो देव व मी भक्त असा भेद ठेवला.

आपणांस प्राप्त झालेला हा अनुभव अक्षरांत गुंफून अभंगरूपानें कां व्यक्त केला याचें कारण पुढील कडव्यांत सांगतात:—

शब्द हा बहुसार। उपकाराची राशी।
म्हणोनि चालविला। मागें येतील त्यांसी
मागोनि आली वाट। सिद्ध ओळीची तैसी।
तरले तरती गा। आणिकहि विश्वासी ॥५॥

तुकाराममहाराजादि हे संत स्वार्थी नव्हत. आपणांस प्राप्त झालेला अनुभव व तो मिळविण्याची वाट याची माहिती जितक्या लोकांना करून देतां येईल तितकी करून देण्याची यांनीं कोशीस केली. कारण आपणांस प्राप्त झालेला आनंद सर्व जगाला—वर्तमान व आपल्या मागाहून येणाऱ्या सर्व लोकांना मिळावा अशी त्यांची उदार बुद्धि होती. ज्ञानेश्वरमहाराज अनुभवामृताच्या दहाव्या प्रकरणाच्या प्रारंभीं म्हणतात कीं, 'हे निवृत्तिराया, परमेश्वरानें सूर्यांत प्रकाश ठेवला तो काय त्याच्याचकरितां! नव्हे. सर्व जगाला तो देण्याकरितां. चंद्राच्या ठिकाणीं अमृत ठेवलें तें काय त्याच्याचपुरतें भारीच होतें! त्याचप्रमाणें मला जें ज्ञान दिलेंत तें काय माझ्याचकरितां! हें जाणूनच मीं तें जगास दिलें.' तुकाराममहाराजही म्हणतात:—

आपें तरे त्याकी कोण बराई। औरनकुं भलो नाम घराई।
काहे भूमि इतना भार राखे। दुभत धेनु नहि दूध चाखे ॥२॥

× × ×

कहे तुका उपकारहि काज। सब कर कर रहिया रघुराज।६।

तुकारामबोवा आपण कवित्व कां केलें याबाबत एके ठिकाणीं म्हणतात:—

हितावरी यावें। कोणी बोलिलों या भावें ॥१॥
नव्हे विनोद उत्तर। केलें रंजावया चार ॥२॥
केली आटाआटी। अक्षरांची देवासाठीं ॥३॥

तुकारामबोवा या पांचव्या कडव्यांत शब्दाची स्तुति करतात. शब्द हा सारभूत व फार उपकार करणारा असा आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनींही अनुभवामृताच्या सहाव्या प्रकरणाच्या प्रारंभीं शब्दाचें माहात्म्य गायिलें आहे. ते म्हणतातः—

बाप उपेगी वस्तु शब्दु। स्मरणदानीं प्रसिद्धु।
अमूर्ताचा विशदु। आरिसा नव्हे ॥

शब्द हा मोठा उपकार करतो. अमूर्त, अव्यवहार्य जी वस्तु तिला व्यवहारांत आणून ठेवतो व संवादद्वारां तिचा भोग घडवितो. ज्ञानेश्वर-महाराज म्हणतात:—

आणि संवादाचेनि मिषें। जे अव्यवहारी वस्तु असे।
तेचि भोगिजे कीं जैसें। आरिसा रूप ॥

—ज्ञा. अ. १८-८१

तात्पर्य, शब्दाची ही शक्ति जाणून तुकाराममहाराज म्हणतात, मी माझा अनुभव शब्दांत ग्रथित केला व माझ्या मागून येणारे जे आहेत त्यांच्याकरितां राखून ठेविला. या शब्दानें व्यक्त केलेली वाट पूर्वीपासून चालत आलेली आहे व या वाटेनें पुष्कळ सिद्धांची ओळ गेलेली आहे व त्याचप्रमाणें या मार्गावर विश्वास ठेवणारे पूर्वीं तरून गेले आहेत व पुढेंही तरंतील.

शेवटच्या कडव्यांत तुकाराममहाराज म्हणतात कीं, या वाटेचें देवावर बळकट भाव ठेवावा हें मुख्य वर्म आहे. जाणतेपणानें (ज्ञानाच्या अभिमानानें) मनुष्याची फसवणूक होते व तो जाणतेपणा मनुष्यास देवाचें ठिकाण हातीं लागूं देत नाहीं. तेव्हां सर्व संग टाकून एक भाव धरावा. हाच उपाय पूर्वींच्या संतांनीं केला.

भावार्थ संपला. आतां थोडेसें तपशिलाच्या चर्चेकडे वळूं—

या अभंगाच्या आरंभींच तुकाराममहाराज म्हणतात, मी 'सहज आंधळा' आहे. याचा स्थूल अर्थ वरतीं दिला आहे. आतां याचा थोडा अधिक स्पष्टार्थ पाहूं.

हा सहज आंधळा समजण्याकरितां व्यवहारांत ज्याला पाहाणारा, बघणारा अथवा द्रष्टा म्हणतात त्याचा विचार करणें अवश्य आहे. कारण आंधळ्याची व्याख्या करण्याचा प्रसंग आला तर ती 'बघणारा नाहीं तो' अशीच निषेधात्मक करावी लागेल. आपण बघणाऱ्याच्या स्वरूपाचा विचार करूं लागलों तर आपणांस असें आढळून येईल कीं, 'बघणाऱ्या' अशा कांहीं वस्तु नाहींत. प्रसंगानें आपण जीवास बघणारा असें म्हणतों. याचा अर्थ असा आहे कीं, माणसाला—प्राण्याला—सापेक्षतेनें बघणारा असें म्हणतों. प्राणी स्वभावतः बघणारा नाहीं. उदाहरणार्थ, समोर आरसा धरला म्हणजे ज्याच्यासमोर आरसा धरला असेल त्याच्या मुखाला 'बिंब' अशी संज्ञा, त्याचें आरशांत जें पडलेलें 'प्रतिबिंब' असतें तत्सापेक्ष येतें. आपल्या खोलींत कोणी आपला स्नेही आला तर आपण त्याला या 'बिंब' असें म्हणत नाहीं. म्हटलेंच तर तो रागावेल. येऱ्हवीं आरसा समोर धरला म्हणजे तो बिंब होतो ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. तात्पर्य, मुखावर 'बिंबत्व' ही कल्पना आपण करतों व ती प्रतिबिंबाच्या सापेक्ष असते हें सहजच पटेल.

आरिसेनि प्रतिमुख दाविलें। तें आरिसाचें आरिसेनि नेलें।
पाहतया ऐसें नाहीं जालें। कटकटा गेलें मुख माझें ।।
आरिसा येतां मुख नाहीं आलें। तो जातां मुख नाहीं गेलें।
आरिसा पूर्वीं जें आपलें। असें संचलें मुखीं मुख ।।

—हस्तामलक १९७–९८

अशींच आणखीही उदाहरणें देतां येतील. मुलाच्या सापेक्ष वडिलांस वडीलपणा, पत्नीच्या सापेक्ष पतीस पतित्व. जर मुलगा मेला तर एकटा मरत नाहीं; त्याच्या पित्याचें पितृत्व आपणाबरोबर घेऊन मरतो. बाई एकटी मरत नाहीं; तिच्या पतिराजांचा 'पतिपणा' घेऊन मरते. प्रतिबिंब एकटें नाहींसें होत नाहीं; मुखाच्या ठिकाणीं आलेलें बिंबत्व घेऊन मरतें. तसेंच बघण्याचा विषय संपला कीं तो एकटा नाहींसा होत नाहीं. बघणाऱ्याचा 'बघणारेपणा' नाहींसा होतो व मग 'बघणेपणाविना' मुखच राहतें. मुलगाच नाहीं मग वडील कोणाचा म्हणावा? पत्नीच नाहीं मग

पति कोणाचा ? प्रतिबिंबच नाहीं मग बिंब कशाचें ? तसेंच दृश्यच नाहीं मग द्रष्टा कोणाचा ?

हाच विचार ज्ञानोबांनीं चांगदेवपासष्टींत मांडला आहे. ते म्हणतात–

दृश्याचा जो उभारा । तेंचि दृष्टत्व होय संसारा ।
या दोही माजिला अंतरा । दृष्टि पंगु होय ॥२२॥
दृश्य जेधवां नाहीं । तेधवां दृष्टि घेऊनि असे कांई ।
आणि दृश्येवीण काई । दृष्टत्व असे ॥२३॥
म्हणोनि दृश्याचे जालेपणें । दृष्टि दृष्टत्व होणें ।
पुढती तें गेलिया जाणें । तैसेंचि दोन्ही ॥२४॥

तात्पर्य, बिंब-प्रतिबिंब या सापेक्ष कल्पना गेल्या तरी मुख मुखाच्या ठिकाणीं आहे. तसेंच दृश्यसापेक्ष आत्म्यावर द्रष्टेपणा आला तो दृश्या-बरोबर गेला; पण तो आपल्या स्वरूपानें ज्ञानरूप आहे तसा आहेच. ज्ञानेश्वरमहाराजांनीं या वस्तूचें वर्णन

ज्ञातृज्ञेयाविहीन । नुसधेंचि जें ज्ञान ।

–ज्ञा. अ. १५–७७

असें केलें आहे. या ठिकाणीं ज्ञेय अथवा दृश्य नसल्यानें ज्ञाताही नाहीं– म्हणून त्या ज्ञानघनस्थितीला 'आंधळा' असें म्हटलें आहे. दृश्यच नाहीं म्हणून द्रष्टा नाहीं. तात्पर्य, तो 'ज्ञानघन' आहे म्हणून आंधळा आहे.

आपुलिया बुबुळा । दृष्टि असोनि आखम डोळा ।
तैसा आत्मज्ञानी दुबळा । ज्ञानरूप जो ॥३१॥

अद्वैतवेदान्त हा आत्म्यास 'द्रष्टा' अथवा 'ज्ञाता' मानीत नाहीं, कारण त्या योगानें द्वैतापत्ति येते. तुकाराममहाराज हे अद्वैती असल्यानें ते आत्मा 'ज्ञान' स्वरूपच मानतात. म्हणूनच तुकारामबोवा आपल्या वृत्ति-रहित निर्विकल्प आत्मस्थितीचें वर्णन

'सहज मी आंधळा गा । निजनिराकार पंथें'।

असें करतात.

वरतीं जो आरशाचा दृष्टान्त दिला आहे तो जर समजला तर या कडव्याचा भाग सहज समजेल.

पुढील भागांत ज्या दृश्याच्या नाहींसें होण्यांत द्रष्टेपणा जातो व 'अंधत्व' प्रतीत होतें तें दृश्य कसें नाहींसें होतें तें सांगतातः—

**वृत्ति हे निवृत्ति झाली । जन न दिसे तेथें ।**

येथेंसुद्धां दृश्य म्हणजे काय व तें आपणास कसें भासतें, म्हणजे दृश्याचें ज्ञान कसें होतें याचाही विचार करणें अवश्य आहे. जीवास दृश्याचें ज्ञान अंतःकरणवृत्तिद्वारा होतें. येथें जी 'वृत्ति' म्हणून म्हटली आहे ती अंतःकरणाची वृत्ति आहे. आपणांस जें बाह्य जगाचें ज्ञान होतें तें या वृत्तिद्वारा. वृत्ति हें साधन आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. वृत्ति आहे तर जगत्, वृत्तिच नसली कीं आपल्यापुरतें जग संपलेंच. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाची आई वारली आहे पण त्याला ही बातमी ठाऊक नाहीं तर त्याच्यापुरती आई जिवंतच आहे; अथवा उलट त्याची आई घरांत आहे; पण त्याला विश्वास पटेल अशा पद्धतीनें सांगितलें कीं, त्याची आई बाहेर गेली आहे तर तें लहान मूल रडूं लागतें. कारण त्याच्या वृत्तींतील आई बाहेर गेली. अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. माणसाजवळ फुलें आहेत; पण यांचा वास घ्यावा अशी वृत्ति त्याच्याजवळ नसेल तर तीं फुलें त्याच्यापुरतीं नसल्यांतच जमा. उलट माणसाच्या वृत्तींत विषय असला तर दुसऱ्या विषयाचाही तसा उपयोग करण्याचा प्रयत्न करतो. तात्पर्य, 'वृत्ति' असली तर विषय अथवा जगत्. वृत्ति नाहीं तर जगत् नाहीं. आपण आपल्या अनुभवाकडे साकल्यानें बघितलें तर असें आढळून येईल कीं, अन्यथाज्ञानरूपी दोन अवस्थांत— म्हणजे जागृति व स्वप्न या दोन वृत्तींत—जगताची प्रतीति आहे. सुषुप्तींत जगत् भासत नाहीं.

जीव या वृत्तीचें प्रकाशन करतो व तद्द्वारां जगाचें प्रकाशन करतो. जशी वृत्ति बरीवाईट तसें जगाचें स्वरूप त्याला भासतें.

श्रीएकनाथमहाराज हीच गोष्ट पुढील ओवींत सांगतातः—

**जीव आपुल्या स्वभावता । जाला वृत्तीतें प्रकाशता ।**
**वृत्ति जीवासी नानावस्था । निज स्वभावता देतसे ॥**

जगांत जें आपणांस वैचित्र्य दिसतें तें प्रकाशक आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं नाहीं; वृत्तीच्या ठिकाणीं आहे. नाथमहाराज हीच गोष्ट सांगतातः—

आरिसां दिसे वर्तुळ वदन । शस्त्रीं भासे सलंबपण ।
तेंचि जळीं कंपायमान । हें त्रिविध लक्षण मुखीं नाहीं ।।
ओ. १७८

गोल आरशांत तोंड वाटोळें दिसतें. तलवारीच्या पात्यांत पाहिलें तर लांबट दिसतें. हलणाऱ्या पाण्यांत पाहिलें तर हालतांना दिसतें. मूळ तोंडाशीं यांचा संबंध नाहीं. डोळ्यास लावण्याच्या चष्म्याचें भिंग जसें असेल तसें दृश्य भासतें तसाच हा प्रकार आहे.

सुषुप्तिअवस्थेमध्यें ही अन्यथाज्ञानरूपवृत्ति नाहींशी झाली कीं स्थूलसूक्ष्म जगत् संपलें.

वृत्ति हे निवृत्ति झाली जन न दिसे तेथें ।

पण ज्या स्थितीला 'सहज आंधळा' म्हणतात ती ही सुषुप्ति नव्हे. कारण येथें स्थूलसूक्ष्मज्ञेय नाहीं म्हणून जन दिसत नाहीं असें वाटतें; पण खोल विचार केला तर असें आढळून येईल कीं, येथें ज्ञेयाचा अत्यंत अभाव झाला असें नव्हे. मेणांत सोन्याचांदीचे कण सांठविलेले असतात; पण ते जसे वरतून बघणाऱ्याला दिसत नाहींत तसेच वासनासंस्कार झोंपेंत अज्ञानांत लीन होऊन राहातात. पण तो जागा झाला कीं ते पुन: डोकें वर काढतात. 'निद्रिताचे अंगेसी । साप तैसी उर्वशी ।' याचा अर्थ तेथें ज्ञानच नाहीं असें नव्हे. मनुष्य झोंपेंतून ज्या वेळेस जागा होतो त्या वेळीं तो म्हणतो, 'मी सुखानें निजलों होतों. कांहीं जाणत नव्हतों.' स्मृति ही अनुभवाची असते. ज्या अर्थीं तो वरीलप्रमाणें सांगतो याचा अर्थ तो तेथें सुखाचा व अज्ञानाचा अनुभव घेत असतो. तात्पर्य, 'सुषुप्तींत वृत्ति' निवृत्ति झाली तरी तेथें सूक्ष्मपणानें मी व माझें राहतें.

असें पहा कीं, मनुष्य गाढ झोंपेंत आहे व आपण त्याला हाक मारली कीं तो 'ओ' देतो. विचार करण्यासारखा प्रश्न असा आहे कीं, तो आपली हांक ऐकून जागा होतो व ओ देतो, कीं जागा असतो म्हणून

ऐकतो व ओ देतो? याचें उत्तर एकच देतां येईल कीं, तो आंत सूक्ष्मपणानें जागा असतो. तो जर असा जागा नसता, त्याचा 'मीपणा सूक्ष्मपणानें जागा नसता तर लोकांनीं त्याची वेगळ्याच रीतीनें विल्हेवाट लावली असती व मुख्यतः त्याचेंच नांव घेतल्याबरोबर तो ओ न देता! माणसाच्या ठिकाणीं 'माझें' कसें सूक्ष्मपणानें शिल्लक राहतें याचेंही उदाहरण देतां येईल. स्टाउट या प्रसिद्ध मानसशास्त्रांतील पंडितानें Manual of Psychology म्हणून मानसशास्त्रावर पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यानें कॅटेलच्या पुस्तकांतील पुढील गोष्ट उद्धृत केली आहे. कॅटेल म्हणतो–प्रयोगानें असें सिद्ध झालें आहे कीं, एखादा हाडाचा चिक्कू मनुष्य जर हांक मारून जागा होत नाहीं असा गाढ झोंपीं गेला असला तर त्याला जागें करतां येतें. यास उपाय म्हणजे त्याच्या उघड्या अंगाला दिडकीचा स्पर्श करावा. पैशाच्या ठिकाणीं चिक्कू माणसाची केवढी जागृति! झोंपेंतही जागाच! मनुष्य झोंपेंत असल्यामुळें 'मी व माझें' गेलेलें दिसतें. वास्तविक तें सूक्ष्मपणानें असतेंच; जर तें जातें तर परमार्थाकरितां वेगळा प्रयत्न करण्याचें कारणच नव्हतें. सुषुप्तीलाच समाधि म्हटली असती.

ज्ञानोबा म्हणतातः––

साचाच पुढती वीरा। जरी न यंतां स्वप्न जागरां।
तरी ब्रह्मभावो साचोकारा। म्हणों येतां॥

–ज्ञा. अ. १५–५१८

सुषुप्तींत अज्ञानाचें आवरण आहे व पुनश्च जागृति येते म्हणून तिला समाधि म्हणतां येत नाहीं. तेव्हां 'वृत्ति हो निवृत्ति झाली' म्हणजे गाढ झोंप नव्हे हें कळण्याकरितां तुकाराममहाराज पुढें सांगतात:—

मी माझें हारपलें। ठायीं जेथिच्या तेथें॥

'मी माझें' सुषुप्तींत लीन झालें नव्हे. ती झोप. जेथून 'मी माझें' स्फुरतें त्या स्वरूपाच्या ठिकाणीं हेंही सकारण नाहींसें झालें. तात्पर्य, जेवढें दृश्य म्हणून होतें तें सर्वच संपलें. या सर्व चर्चेंत दृश्याची व्याप्ति केवढी वाढली गेली याची कल्पना येण्याकरितां ज्ञानेश्वरींतील दृश्याची व्याप्ति सांगणारी एक ओवी देतों म्हणजे कल्पना येईल––

तिन्ही अवस्थांचेनि द्वारें। उपाध्युपहिताकारें।
भावाभावरूप स्फुरे। दृश्य जें हें ।। -अ. १८-११८६

जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था; त्यांचे (भावाभावरूप) विषय; येवढेंच नव्हे तर या तीन अवस्थांचे अभिमानी विश्वतैजस प्राज्ञ-हें सर्वच दृश्य. हें सर्व त्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं वृत्तीच नसल्यामुळें नाहीं. आतां काय बघणारा म्हणावें? ज्ञातृज्ञेयविहीन ज्ञानरूप तोच राहिला. म्हणून तो सहजच आंधळा.

अदृश्य तेंचि झालें। कांहीं दृश्य जें होतें ।।१।।

ज्ञानघनआत्मस्थितीस 'सहज' आंधळा म्हणण्याचें कारण असें आहे कीं, हा आंधळेपणा क्रियेनें आणलेला नव्हे. म्हणून एका दृष्टीनें या स्थितीला 'नैष्कर्म्य' असें म्हणतात; नैष्कर्म्य याचा अर्थ कर्म करून नैष्कर्म्य स्थितीला प्राप्त झाला असा नव्हे. दाढीचे अथवा डोक्याचे केंस काढून जशी रोमशुन्यि त्या स्थळांची प्राप्त होते तशी तळहाताची स्थिति नाहीं. माणसाची गोष्ट सोडून द्या; पण सर्व अंगभर केंस असतात असें जें अस्वल त्याच्या तळहातावरही केंस नसतात. काढले म्हणून नव्हेत. मुळांतच, स्वभावतःच नाहींत. आत्म्याची नैष्कर्म्य स्थिति तशीच आहे.

तेथ स्वभावें धनंजया। नाहीं कोणीचि क्रिया।
म्हणौनि प्रवादु तया। नैष्कर्म्यु ऐसा ।।

-ज्ञा. अ. १८-९७८

हाच विचार या ओंवीच्यावर दोन ओंव्यांतून आरशाचा दृष्टान्त देऊन सांगतात. त्या देतों म्हणजे त्या वस्तूस 'सहज आंधळा' कां म्हणतात हें चटकन् लक्षांत येईल.

मुखाभासेंसी आरिसा। परौता नेलिया वीरेशा।
पाहातेपणेंवीण जैसा। पाहाता ठाके।
तैसें नेणणें जें गेलें। तेणें जाणणेंही नेलें।
मग निष्क्रिय उरलें। चिन्मात्रचि ।। -ओ. ९७६-७७.

'पाहातेपणेंवीण पाहाता', 'निष्क्रिय चिन्मात्रचि' हाच सहज आंधळा.

अशाच प्रकारच्या आंधळ्याचें वर्णन बृहदारण्यकोपनिषदांत एके ठिकाणीं आलें आहे--

"यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं जिघ्रति तदितर इतरं पश्यति तदितर इतरं शृणोति तदितर इतरमभिवदति तदितर इतरं मनुते तदितर इतरं विजानाति यत्र वा अस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं जिघ्रेत्तत्केन कं पश्येत्तत्केन कं शृणुयात्तत्केन कमभिवदेत्तत्केन कं मन्वीत तत्केन कं विजानीयात् ।,...."

—बृहदारण्यकोपनिषद् २–४–१३

अभंगाच्या दुसऱ्या कडव्यांत तुकाराममहाराज म्हणतात कीं, या स्वरूपाच्या ठिकाणीं मी सुखानें निजलों.

सुखें मी निजलों गा । शून्य सारोनि तेथें ।
त्रिकूटशिखरीं गा । दान मिळे आयीतें ।।२।।

आपण वृत्तिशून्य होऊन त्या वस्तुशीं समरस झालों ही गोष्ट 'निजणें' या रूपकानें सांगतात. आपण 'जागा' त्याला म्हणतों कीं ज्याला स्वतःचें व जगाचें भान आहे. ही भान ठेवणारी वृत्ति अज्ञानांत लीन झाली कीं सुषुप्ति— गाढ झोंप व हीच आत्मज्ञानाच्या योगानें सकारण नाहींशी झाली कीं समाधि. देहादि कार्यकारण संघाताचें तादात्म्य घेणारी वृत्ति व तद्द्वारां जगताचें स्वप्न पाहणारी वृत्ति आत्मज्ञानाच्या उदयाबरोबर स्वरूपाच्या ठिकाणीं नाहींशी झाली कीं तेथें कशाचेंच भान नाहीं. म्हणून त्या अवस्थेला 'निजलों' असें म्हणतात ; पण ही सामान्य झोंप नव्हे. येवढेंच नव्हे तर वृत्तिनिरासाचा अभ्यास करीत असतां एक झोंपेसारखी वृत्तिशून्य अवस्था प्राप्त होते ती ही नव्हे हें दाखविण्याकरितां 'शून्य सारून' असें म्हटलें आहे. हीच समाधि समजून येथेंच थांबणारा एक पंथ आहे. त्याला इंग्रजींत Quietism म्हणतात. आम्ही त्याला शून्यवाद म्हणतों. यास समाधि अथवा आत्मा म्हणणें आनंदमयकोशासच आत्मा म्हणणें होईल; पण त्या अवस्थेंतून पुनः उत्थान

होतें तेव्हां ती खरी समाधि अथवा आत्मास्थिति नव्हे. हेंच सांगण्याकरितां ज्ञानेश्वरमहाराज या स्थितीचें वर्णन चांगदेवपासष्टींत पुढीलप्रमाणें करतातः--

निदेपरौते निदेजणें । जागृति गिळोनि जागणें ।।

झोंपेच्या पलीकडची झोंप, पण अज्ञानानें आवृत नव्हे; ती जागण्याच्या पलीकडची जागृति आहे.

हें स्वरूप असें आहे कीं, जिचें 'आनंद' हें स्वरूप आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीं त्या आत्मवस्तूचें

ज्ञातृज्ञेयाविहीन । नुसतेंचि जें ज्ञान ।

असें वर्णन करून पुढें म्हटलें आहे.--

सुखा भरलें गगन । गाळीव जें ।। -अ. १५-७७

म्हणजे जी वस्तु आकाशांतून गाळलेली म्हणजे आकाशापेक्षां सूक्ष्म असून तीं सुखानें भरलेली आहे. 'सुखानें भरलेलीं' असें वर्णन ऐकल्यावर मनुष्याची कल्पना होईल कीं, एखाद्या मनुष्याचें तो धनदारादि वैभवानें संपन्न असला म्हणजे त्याचें सुखी असें जसें आपण वर्णन करतों तशीच ही वस्तूही खूप सुख भोगणारी असेल म्हणून 'सुखानें भरलेली' असें वर्णन केलें आहे. अशी कल्पना होऊं नये म्हणून ते म्हणतात :--

जो आंगाथिला आनंदु । सुरतेंविण ।।

-अ. १५-७४

ती वस्तु म्हणजे मैथुनादि साधनाशिवाय असलेला मूर्तिमंत आनंद होय. जशी ती 'ज्ञातृज्ञेयविहीन' ज्ञानघन आहे तशीच 'भोक्ताभोग्य'विहीन आनंदरूपच आहे. आनंदाचा भोक्ता नव्हे.

अर्थांतच त्याचा आनंद खरा भोगायचा तर तो आपण इतर वस्तूंचा आनंद जसा भोगतों तसा नव्हे. आपणांस 'रस' विषयाचा आनंद हवा असला तर अन्नादिकांच्या चर्वणाची क्रिया करणें अवश्य. तेथें कर्ता, कर्म,

कार्य ह्या त्रिपुटीची आवश्यकता आहे. रस विषयाकरितां भातादि पदार्थांकडे जावें लागतें. म्हणूनच वै. गु. जोगमहाराज म्हणत, श्रीमंत, वैभवसंपन्न राजा का असेना तो भिकारीच ! शब्दस्पर्शरूपरसगंध या पंच विषयांच्या घरीं दान म्हणजे भीक मागितल्याशिवाय श्रीमंतालाही आनंद नाहीं. या दृष्टीनें वस्तुस्वरूप होऊन राहिलेले 'साधु' सोडून सर्वच भिकारी !

वस्तूचा आनंद हा त्रिपुटीच्या योगानें द्वैतांत प्राप्त होणारा नव्हे. आंब्याच्या झाडाच्या फांदीवर बसून आंब्याच्या फळास राघू जसा चोंच मारतो तसा या स्वरूपानंदाचा भोग घेतां येत नाहीं. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :–

परी तें वेगळेपणें भोगिजे । जैसें पक्षियें फळ चुंबिजे ।
तैसें नव्हे तेथ विसरिजे । भोगितेपणही ।।
भोगीं अवस्था एकी उठी । ते अहंकाराचा अंचळु लोटी ।
मग सुखेंसि घे आठीं । गाढेपणें ।।
तिये आलिंगनमेळीं । होय आपेंआप कवळी ।
.....................................

ज्ञा. अ. ५, ओ. १३१–३३

ते भोगिजे अनन्य । तेणेंसी सदा ।। –अनुभवामृत, अ. ५

असा हा त्रिपुटीविरहित येथील आनंदाचा भोग घडण्याचा प्रकार असल्यानें तुकाराममहाराज त्याचें वर्णन योगांतील परिभाषा वापरून करतात :–

त्रिकूट शिखरीं गा । दान मिळे आयीतें ।।

आनंदाचें 'दान' मागावें लागत नाहीं. आनंदरूपच आपण होतों असें सुचवावयाचें आहे.

हा अभंग येवढा मोठा आहे कीं, यांतील सर्व कल्पनांची पूर्ण चर्चा करावयाची म्हटली तर तो एक ग्रंथच होईल. या अभंगांतील मुख्य कल्पना

'सहज आंधळेपणा' असल्यानें त्याची विस्तृत चर्चा येथवर केली. पुढील भागांत या अभंगांतील एकदोन मुद्द्यांचें विवरण करून हें अभंग-संकीर्तन संपवूं.

या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यांत तुकाराममहाराज या अनुभवानें आपण धर्माधर्मातीत, गुणातीत, आशारहित झालों, कृतकृत्य झालों असें सांगतात.

तिसऱ्या कडव्यांत कोणत्या मार्गानें गेलों व त्या योगानें कशी फलप्राप्ति झाली हें सांगतात. त्यांत 'ऊर्ध्वमुखें आळविला। सोहं शब्दाचा नाद' हा विचार करण्यासारखा भाग आहे. भावार्थांत म्हटल्याप्रमाणें भजन करणारें तोंड आकाशाकडे करून जोराजोरानें भजन केलें असा याचा अर्थ नव्हे. या लोकांच्या बोलण्याचे कांहीं संकेत आहेत ते जर समजले तरच अर्थ कळतो; नाहीं तर अंतःकरणांत संशय राहातो. उदाहरणार्थ— कीर्तनकार अथवा पुराणिकबोवा यांच्या तोंडून "उफाराच्या नामासाठीं वाल्मीक तरला" असें आपण ऐकतों व बोवा मोठें घोळघोळून सांगतात, "त्या वाल्या कोळ्याला 'राम' म्हणतां येईना. म्हणून नारदांनीं त्याला 'मरा मरा' म्हण म्हणून सांगितलें व मग त्यांतून 'राम राम' निर्माण झालें." न विचार करणारे जे श्रोते त्यांची गोष्ट वेगळी; पण जर श्रोता विचारी असला तर त्याच्या मनांत येईल कीं, वाल्या कोळी नारदाशीं सर्व बोलत होता; बायकामुलें, इतर लोक यांच्याशीं तो सर्व बोलत असे; मग राम एवढेंच त्याला कसें म्हणतां येत नसेल? वस्तुस्थिति अशी आहे, ही सांकेतिक भाषा आहे. प्राणाच्या गतीबरोबर रामनाम उच्चारण्याचा तो एक प्रकार आहे.

तसेंच याहि ठिकाणीं आहे. 'ऊर्ध्वमुखें' म्हणजे अंतर्मुखवृत्तीनें, प्राणाच्या गतीबरोबर लक्ष्यब्रह्मस्वरूपाकडे नजर ठेवून 'सोहं' चिंतन केलें, तो आळविला, म्हणजे मोठ्या कळवळ्यानें त्याचें चिंतन केलें, प्रार्थना केली. याचा परिणाम असा झाला कीं, तो वृत्तीचा प्रकाशक अरूप परमात्मा आपल्या स्वरूपाच्या ज्ञानाचें दान घेऊन आला व मला आपल्या स्वरूपांत त्यानें सामावून घेतलें. हीच गोष्ट त्यांनीं ज्या दुसऱ्या अभंगांत सांगितली तो भावार्थांत दिलाच आहे. त्यांतील एक कडवें पुनः देतों.

निजीं निजरूपीं निजविला तुका ।
अनुहताचा बाळका हल्लरु गाती ।।

या अद्वैत अनुभवाला जरी प्राप्त झालों तरी 'मीच' देव म्हणून लोकांना सांगून माझीच पूजा करा असें मी सांगत हिंडत नाहीं. हाच अभिप्राय तुकाराममहाराज पुढीलप्रमाणें व्यक्त करतात. ते म्हणतात— 'देवांनीं मला आपल्यांत सामावून घेतलें; पण 'नांव ठेवला भेद.' अद्वैत अनुभवास आणून देव-भक्त भेद राखला.'

शेवटच्या कडव्यांत तुकारामबोवा सांगतात, या परमार्थसाधनांत मुख्य गोष्ट 'दृढभाव' हवा. त्यांनीं दुसऱ्या एका ठिकाणीं म्हटलें आहे–

निष्ठावंत भाव भक्ताचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ।।

चालायला लागल्याबरोबर मुक्कामास पोंचत नाहीं. साधनास आरंभ केल्याबरोबर लगेच फळ मिळत नाहीं. येवढ्याकरितां देवावर विश्वास ठेवावा. आपल्या शहाणपणाचा अभिमान काय उपयोगी? उलट मनुष्य त्यानें फसेल. कारण ती स्थिति वृत्तिरहित आहे. देवानें आपल्यांत सामावून घ्यावयाची कृपा केली तरच 'वृत्ति' नाहींशी होईल. येऱ्हवीं अधिक अधिक जाणीव ठेवीत राहिला तर दुरावतच जाणार. देवावरच भार ठेवावा. एक अनन्यभाव भगवंताच्या ठिकाणीं ठेवून साधन करीत राहाणें हाच मार्ग आहे. पूर्वीच्या साधुसंतांनीं याच मार्गाचें अवलंबन करून मुक्काम गाठला. सर्व साधकांनीं तसेंच करावें अशी तुकाराममहाराजांची शिकवणूक आहे.

वरील संकीर्तन वाचल्यानंतर या आंधळ्याचें वर्णन कै. ह. भ. प. बंकटस्वामी करीत असत तें सर्वांना पटेल. ते म्हणत, "याचें नांव आंधळा. पण हा डोळसांतला डोळस आहे!"

---

## पांगुळ झालों देवा-: ::५::

### :: पांगुळ ::

पांगुळ झालों देवा । नाहीं हात ना पाय ।
बैसलों जयावरी । सैराट तें जाय ।
खेटितां कुप कांटीं । खुंट दरडी न पाहे ।
आधार नाहीं कोणी । मज बाप ना माये ॥१
दाते हो दान करा । जाते पंढरपुरा ।
न्या मज तेथवरी । अखमाचा सोयरा ॥२॥
हिंडता गव्हानें गा । शिणलों येरझारीं ।
न मिळेचि दाता कोणी । जन्मदुःख निवारी ।
कीर्ति हे संतांमुखीं । तोचि दाखवा हरी ।
पांगुळा पाय देतो । नांदे पंढरपुरीं ॥३॥
या पोटाकारणें गा । झालों पांगिला जना ।
न सरेचि मायबाप । भिके नाहीं खंडणा ।
पुढारा म्हणती एक । तया नाहीं करुणा ।
श्वान लागे पाठीं । आशा बहु दारुणा ॥४॥
काय मी चूकलों गा । मागें नेणवेचि कायी ।
न कळेचि पापपुण्य । मज आठव नाहीं ।
मी माजी भुललों गा । दीप पतंगा सोई ।
द्या मज जीवदान । संत महानुभाव कांहीं ॥५॥

दुरोनि आलों मी गा। दुःख झालें दारुण।
यावया येथवरी। होतें हेंचि कारण।
दुर्लभ भेटी तुम्हां। पायीं झालें दरुषण।
विनवितो तुका संतां। दोन्ही कर जोडून ॥६॥

' आंधळा व पांगळा यावर संकीर्तन झालें असतां ज्या कारणाकारितां मागच्या संकीर्तनाला एक आंधळा घेतला त्याच कारणाकारितां या संकीर्तनाला एक ' पांगुळ ' घेतला आहे. यांतही ' आंधळा-पांगळा 'पेक्षां कांहीं वेगळी छटा आहे.

तुकाराममहाराज या अभंगांत संतमहात्म्यांची करुणा भाकतात. ते म्हणतात--

" अहो संतदेवा, ( येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, तुकाराम-महाराज आरंभाला ' अहो देवा ! ' असें म्हणत असले तरी ते जगच्चालक परमात्म्याला हांक मारीत नाहींत. ते संतांना येथें 'देव' म्हणून संबोधतात, हें पुढील कडव्यावरून स्पष्ट होईल. ) मी पांगळा झालों. मला हातही नाहींत व पायही नाहींत. "

पांगुळ झालों देवा। नाहीं हात ना पाय।

यावर संत म्हणतील कीं, " अरे, तुझे हातपाय कोणी तोडले ? ते कसे तुटले गेले ? का तूं थोटा व पांगळाच जन्माला आलास ? याला उत्तर तुकोबाच पुढें देतात--

बैसलों जयावरी। सैराट तें जाय।

" मी जन्मतः पांगळा नव्हे. मी पांगळा झालों व त्याला कारण मी ज्या वाहनावर बसलों ते भलतीकडेच स्वैर धांवत सुटलें आहे व त्याला आवरण्याची मला ताकद नसल्यानें माझे हात व पाय असून नसल्यासारखेच झाले आहेत." तुकोबा कोणत्या वाहनावर बसले, कां बसले, तें इतकें चपळ व समर्थ कसें, कीं वर बसणाऱ्या स्वारालाही आवरत नाहीं, हा सर्व विचार भावार्थ संपल्यावर सांगूं.

तुकोबा म्हणतात कीं, तें असें स्वैर धांवतें कीं, त्याची त्यालाहीं काळजी नाहीं.

खेटितां कुप कांटीं । खुंट दरडी न पाहे ।

कुंपण, कांट्या, झाडाचे खुंट, नद्यांचे कांठ कांहीं बघत नाहीं. त्यांना खुशाल घासून जातें. बरें, याला आवरून याच्या तावडींतून माझी कोणी सुटका करील म्हणून त्यास शरण जावें तर तसा ( तुमच्याविना ) दुसरा आधार दिसत नाहीं.

आधार नाहीं कोणी । मज बाप ना माये ॥१॥

मला आई-बाप वगैरे कोणाचाही आधार नाहीं. यामुळें अहो संतदेवा ! तुमची करुणा भाकल्याविना गत्यंतर नाहीं. अहो दात्यांनो ! तुम्ही पंढरपुरास जाणारे, मला एवढें दान द्या कीं, जेथें अखमा (दीन-दुबळ्यां )चा सोबती ( त्यांचें दुःख दूर करणारा ) पांडुरंग आहे त्या पंढरपुरास तुमच्याबरोबर मला घेऊन चलाः—

दाते हो दान करा । जाते पंढरपुरा ।
न्या मज तेथवरी । अखमाचा सोयरा ॥२॥

संत असें म्हणतील कीं, पंढरपुरासच कां न्या म्हणतां ? इतर ठिकाणीं हिंडून कांहीं चौकशी केली का ? तुकोबा म्हणतातः—

हिंडतां गव्हानें गा । शिणलों येरझारीं ।
न मिळेचि दाता कोणी । जन्मदुःख निवारी ॥
कीर्ति हे संतांमुखीं । तोचि दाखवा हरी ।
पांगुळां पाय देतो । नांदे पंढरपुरीं ॥३॥

पुष्कळ गांवीं हिंडलों. त्यामुळें शीण मात्र फार झाला; पण जन्माचें दुःख निवारण करील असला दाता मला कोणीच भेटला नाहीं. मी संतांच्या मुखांतून अशी कीर्ति ऐकिली आहे कीं, ज्यांचे पाय गेले आहेत त्यांना पाय आणून देणारा समर्थ हरि पंढरपुरास राहतो. म्हणून विनंति कीं, मला पंढरपुराला आपल्याबरोबर न्या.

ज्या वाहनावर मी बसून भटकत आहे तें सारखें फिरत असल्यामुळें मला निवांतता नाहीं. पोटभर खावयास मिळण्याची पंचाईत. तेव्हां पोट भरेल या आशेनें या जनांचा मी अंकित गुलाम झालों. प्रत्येकाच्या पुढें जाऊन, तुम्ही माझे आई-बाप आहांत, मला कांहीं खावयास द्या, असें मी सारखें म्हणत आलों; परंतु पोटभर कोणी खावयाला घालीत नाहीं. तेव्हां दिसेल त्याला आई-बाप म्हणून त्याची कीव-काकळूत करण्याचें सुटत नाहीं. अशा रीतीनें माझ्या पाठीमागचें भीक मागण्याचें कधींच संपलें नाहीं. कित्येक तर असे भेटले कीं, त्यांनीं म्हटलें, "आमच्याकडून कांहीं मिळणार नाहीं. पुढें हो!" काय सांगूं? त्यांना दया म्हणून कशी ती नाहीं; पण माझें भीक मागणें सुटत नाहीं कीं पळणें सुटत नाहीं. कारण, आशारूपी भयंकर कुत्रें माझ्या पाठीस लागलें आहे. (याचा मथितार्थ असा आहे कीं, यांनीं भीक घातली नाहीं तरी पुढें आणखी कोणी घालील या आशेनें मी पुढें पुढें भीक मागतच राहिलों आहे.)

या पोटाकारणें गा। झालों पांगिला जना।
न सरेचि मायबाप। भिके नाहीं खंडणा।
पुढारा म्हणवी एक। तया नाहीं करुणा।
श्वान हें लागे पाठीं। आशा बहु दारुणा।।

अहो संतहो! माझी अशी स्थिति कां व्हावी, याचा मी विचार करूं लागलों तर माझें मागें काय चुकलें तें मला कळत नाहीं. कोणतें पाप-पुण्य केलें याची या जन्मीं आठवण नाहीं. येवढें मात्र खरें कीं, पतंग हा दिव्यावर त्याच्या प्रकाशानें दिपून झेंप घालतो त्याप्रमाणें मी व माझें यांत फसून गेलों आहे. (पतंग जसा मरतो तसें मी 'देह व देहसंबंधीं माझें' या मोहांत मीं मरण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे.) तेव्हां विनंति कीं, अहो श्रेष्ठ संतमहाराज! मला जीवदान द्या, मला वांचवा.

काय मी चुकलों गा। मागें नेणवेचि कांहीं।
न कळेचि पापपुण्य। मज आठव नाहीं।

मी माजीं भुललों गा । दीप पतंगा सोई ।
द्या मज जीवदान । संत महानुभाव कांहीं ॥५॥

शेवटच्या कडव्यांत तुकोबा म्हणतात, "महाराज, आपल्या दर्शनाकरितां, आपल्या दर्शनाची आशा ठेवून, मी फार दुरून येथें (मनुष्यजन्मास) आलों; प्रवासांत मोठें भयंकर दुःख झालें. पण मी तें सर्व सहन करून येथें येण्याचें एकच कारण, आपलें दर्शन व्हावें म्हणून. आपली गांठ फार दुर्लभ आहे. पण माझें सुदैव, आपलें दर्शन झालें. मी येवढ्याकरितां दोन्ही हात जोडून तुम्हां संतांची विनवणी दुसऱ्या कडव्यांत सांगितल्याप्रमाणें करीत आहे.

दुरोनि आलों मी गा । दुःख झालें दारुण ।
यावया येथवरी । होतें हेंचि कारण ।
दुर्लभ भेटी तुम्हां । पायीं झालें दरुषण ।
विनवितों तुका संतां । दोन्ही कर जोडून ॥६॥

भावार्थ संपला. आतां थोडें तपशिलांत शिरूं—.

तुकारामबोवा, पांगळा झालों व त्यामुळें जी दुर्दशा झाली तींतून सोडवणारा जो पंढरीश त्याकडे तुम्ही मला घेऊन चला, अशी पंढरीस जाणाऱ्या वारकरी संतांची प्रार्थना करतात असा या सर्व अभंगाचा सारांश आहे.

भावार्थात असें सांगितलें आहे कीं, तुकारामबोवा आपण मुळांत पांगळे नव्हे तर वाहनावर बसल्यामुळें पांगळे झालों, असें म्हणतात. तेव्हां पांगळा कोण झाला ? तो कोणत्या वाहनावर बसल्यानें त्याचे हातपाय असून नसल्यासारखें झाले ? हा जो पांगळा झाला हा वाहनावर बसावयाच्या भानगडींत पडला कां ? हें वाहन इतकें दांडगें कसें ? या वाहनाच्या त्रासांतून सुटण्याकरितां पंढरीशास शरण जाणें कां अवश्य ? त्याच्याकडे जाण्यालाही संतांनींच न्यावयास कशास हवें ? इत्यादि प्रश्न उत्पन्न होतात, त्याचा यथावकाश विचार करूं.

प्रथम पांगळा कोण झाला व तो वाहनावर कशाकरितां बसला हें पाहूं. या प्रश्नांना जीं उत्तरें येतील त्यांवर पुढचें सर्व अवलंबून आहे. 'पांगुळा झालों' हें रूपक आहे हें येथवर वाचीत आलेल्या सुज्ञ वाचकांना सांगावयास पाहिजे असें नव्हे. तुकाराममहाराज या पांगळ्याच्या रूपकानें देशकालपरिच्छेदशून्य, सुखरूप असणारा आत्मा जीवदशेस प्राप्त होऊन सुखाच्या तुकड्याकरितां शब्दस्पर्शादि विषयांच्याकडे भीक मागण्यास गेला व त्याच्या पाठीमागची भीक देवच कसा दूर करतो, हें सांगतात.

जोंपर्यंत आत्माराम आपल्या स्वरूपस्थितींत होता तोंपर्यंत त्याची 'आंगाथिला आनंद। सुरतेंविण।' अशी ज्ञानदेवांनीं वर्णन केल्याप्रमाणें स्थिति होती. तो अंगानेंच सुखरूप होता. म्हणुन सुखाकरितां दुसरीकडे जाण्याचें त्यास कारण नव्हतें. त्याचप्रमाणें तो देशकालवस्तुपरिच्छेदशून्य व सजातीय-विजातीय स्वगतभेदशून्य असा अनंत असल्यानें त्यास प्रवास करणेंही शक्य नव्हतें. आकाश अमक्या ठिकाणीं नसावें म्हणजे त्यानें दुसरीकडून तेथें यावें; पण आकाश परिच्छेदशून्य म्हणजे सर्व देशांत असल्यानें आकाशाला येणें-जाणें नाहीं :—

आकाशें जेथें जेथूनि। जाइजे तेथ असे भरोनि।
म्हणौनि ठेलें कोंदूनि। आपेआप॥

आत्मा तर आकाशाचेंही पांघरूण, आकाशालाही व्यापून असणारा; मग त्याच्या ठिकाणीं गमनागमनात्मकादि क्रिया कोठून संभवणार? तात्पर्य, या स्वरूपस्थितींत आत्म्यास कामना उत्पन्न होऊन सुखाकरितां भीक मागावयाची अथवा वाहनावर बसून अथवा तसाच प्रवास करण्याची शक्यताच नसल्यानें त्या काळीं या दोनही गोष्टींचा स्वभावतः अभाव होता.

परंतु आत्मा ज्या वेळेस स्वतःच्या स्वरूपविषयक अज्ञानाला वश होऊन स्वतःस परिच्छिन्न समजूं लागतो म्हणजे जीवदशेस प्राप्त होतो तेव्हां हें सर्व पालटतें. त्याच्याहून भिन्न असे विषय त्याला भासूं लागतात व मग ते मिळावेत अशी इच्छा त्यास होऊं लागते. ज्ञानेश्वरमहाराज हीच गोष्ट एका रूपकानें सांगतात—

तरि तेचि आतां थोडीसी। गोठी सांगिजेल परियेसीं। जैं अहंकारा तनूंसी। वालभ पडिलें।। तेथ इच्छा हे कुमारी जाली। मग ते कामाचिया तारुण्या आली। तेथ द्वेषेंसी मांडिली। वराडिक।। —ज्ञा. ७. १६५-६६

येथें गोष्टीच्या रूपकानें जीवाच्या ठिकाणीं कामादि विकार कसे उत्पन्न होतात तेंच सांगितलें आहे. भगवान् अर्जुनाला म्हणतात कीं, तुला एक लहान गोष्ट सांगतों—एक होता अहंकार. त्याचें व तनूचें लागलें लग्न व त्या जोडप्यास प्रथम इच्छा ही मुलगी झाली. ती कामरूपी तारुण्यांत आली व मग तिचें द्वेषाशीं लग्न लावलें. याचा अभिप्राय असा कीं, आत्मा ज्या वेळीं देहाएवढा आपणांस समजून त्याचा अभिमान घेतो त्या वेळीं त्याला विषय दिसूं लागतात. मग ते त्याला हवेसे वाटूं लागतात.

इंद्रियां विषयांचिये भेटी।—सरसीच जे गा उठी।।
कामाची बाहुटी। धरूनियां।। —ज्ञा. १३. १२३

जीवत्वदशेस आत्मा प्राप्त झाला म्हणजे त्याला विषय दिसूं लागून ते स्वभावतः आकर्षक असल्यानें त्याचें मन वेधलें जातें व ते हवेत असें त्यास वाटूं लागतें. पण आत्म्याला त्यांच्याकडे जाण्याकरितां मनाची, वृत्तीची आवश्यकता असते. त्याविना त्याला विषयांच्याकडे जातां येत नाहीं व त्याविना त्याला त्यांचा भोगही घडत नाहीं.

जीव हा देहेंद्रियांचा मालक, शरीररूपी राजवाड्यांतला राजा. त्याला विषयाकडे जाण्यास रथ लागतो. रथ म्हणजे मन असें ज्ञानेश्वरींत रूपक केलें आहे. त्या रथांत बसून आत्मा विषयाकडे जातो. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

तैसा आपुलिया विस्मृति। आत्मा आपणचि प्रकृती—।
सारिखा गमोनि पुढती। तियेसीच भजे।।
मनाच्या रथीं वळगे। श्रवणाच्या द्वारें निघे।
मग शब्दाचिया रिघे। रानामाजीं।।

तोचि प्रकृतीचा वागोरा । करी त्वचेचिया मोहरा ।
आणि स्पर्शाचिया घोरा । वना जाय ॥
कोणे एके अवसरीं । रिघोनि नेत्राच्या द्वारीं ।
मग रूपाच्या डोंगरीं । सैरा हिंडे ॥
कां रसनेचिया वाटा । निघोनि गा सुभटा ।
रसाचा दरकुटा । भरोंचि लागे ।
ना तरि येणेंचि घ्राणें । जैं मंदशु करी निघणें ।
मग गंधाचीं दारुणें । आडवें लंघी ॥
ऐसेनि देहेंद्रियनायकें । धरूनि मन जवळिकें ।
भोगीजती शब्दादिकें । विषय भरणें ॥

( ज्ञा. १५-३५४-६० )

यांतील शेवटची ओवी फार महत्त्वाची आहे. जीव हा देहेंद्रियांचा स्वामी; पण तो मनाला जवळ करून शब्दादि विषयांचा भोग घेतो. नुसत्या आत्म्यास भोग नाहीं. मन असेल तरच विषयांचा भोग. जीवानें आपणांस सुख व्हावें म्हणून मनास जवळ केलें; पण एखाद्या राजानें आपल्यास कारभारांत मदत म्हणून एखाद्या प्रधानास जवळ करावें व शेवटीं त्याच्याच स्वाधीन व्हावें, त्याविना पाऊलच टाकतां येऊं नये अशी त्याची स्थिति त्या प्रधानानें करावी, तसें या जीवाचें झालें. भोगाकरितां मन जवळ केलें; पण मन असें हिकमती कीं, त्यानें या जीवरूपी स्वामीस आपल्या अंकित केलें. त्याविना त्याचें कांहींच चालत नाहीं. अशी जी जीवाची स्थिति ती 'पांगुळ' या रूपकानें सांगितली आहे. ज्ञानेश्वरमहाराजही क्षरपुरुषाचें म्हणजेच जीवाचें वर्णन करतांना म्हणतात, 'एक आंधळा. वेडा पंगु ।...' असा आहे

ज्ञानेश्वरमहाराज जीवास आंधळा म्हणतात, कारण तो ज्ञानदृष्टिहीन म्हणून; वेडा म्हणतात, कारण तो स्वतःच्या खऱ्या स्वरूपास विसरून स्थूल-सूक्ष्म उपाधींशीं तादात्म्य करतो म्हणून; व पांगळा म्हणतात, त्याला मनाविना कांहीं करतां येत नाहीं म्हणून.

तात्पर्य, जीवात्म्यास विषयोपभोग करणें झाल्यास मनाचें साहाय्य घेतल्याशिवाय तो करतांच येत नाहीं. कल्पना करा, एखाद्या मनुष्यानें जवळच असणाऱ्या आपल्या स्नेह्यास हांक मारली. पण त्याचें मन जर ठिकाणावर नसेल व तो जर कांहीं विचारांत गर्क असेल तर जवळ असून सुद्धां त्याला हांक ऐकूं येत नाहीं. तो म्हणतो सुद्धां, " काय करावें ! तुम्हीं हांक मारलीत, पण मी कोठें ठिकाणावर होतों ? " याचा अर्थ ऐकणारें जें बाह्येंद्रिय कान त्याला मन चिकटलें तरच ऐकूं येतें व शब्द ऐकून होणारें सुखदुःख अनुभवास येतें. जसें ऐकण्याचें तसेंच पहाणें, स्पर्श करणें, वगैरे क्रियांचें आहे. ज्ञान व सुखदुःखादि भोग मनाला होतात. तुकाराममहाराज एके ठिकाणीं म्हणतात–

. . . . चित्ता सुखदुःखें कळों येतें ।।

तात्पर्य, मनाविना जीवात्म्यास कांहींच करतां येत नाहीं, कांहीं भोगतां येत नाहीं.

मौज अशी आहे कीं, आत्मा हा मनाचा प्रकाशक. पण आपलें हें स्वरूप विसरून तो मनाच्या इतका अधीन होतो कीं, मनाचें कर्तृत्व, सुखदुःखादि भोग सर्व आपल्या ठिकाणीं मानून घेतो. म्हणून ज्ञानेश्वरमहाराज एके ठिकाणीं म्हणतात—

'वायां मन हें नांव । एऱ्हवीं कल्पनाचि सावेव ।
जयाचेनि संगें जीव–। दशा वस्तु ।।

–ज्ञा. अ. १३ ओ. ११०

आम्हीं वरती जो प्रधानाचा दृष्टान्त देऊन जीवात्म्याचें पंगुत्व दाखवलें तोच दृष्टान्त देऊन नाथमहाराजांनींही हा सर्व विचार सांगितला आहे. ते म्हणतात—

" मुळीं जीव मनाचा नियंता । तोचि मनाच्या एकात्मता । मनाचिया सुखदुःखव्यथा । आपुले माथां नाथिल्या सोशी ।। जेवीं अतिआप्तता प्रधान । रायासि लावी निजबंधन ।। मग राजा तो होय दीन । तो भोगवी तें आपण

सुखदु:ख भोगी ।। ते दशा झाली जीवासी । मनें संसारी केलें तयासी ।। मग नाना जन्ममरण सोशी । अहर्निशीं सुखदु:खें ।। —ए. भा. अ. २३, ओ. ६३०-३२

तात्पर्य, आत्मा हा स्वतंत्र व मन, इंद्रियें इत्यादिकांचा प्रकाशक असतांना तो मनाच्या स्वाधीन होऊन बसला व त्याच्या बुद्धीला जरी कांहीं पटत नसलें तरी मनाला जें आवडलें असेल तें केल्याविना त्याच्याच्यानें राहावत नाहीं म्हणूनच आत्म्याच्या या दीन, गुलामी वृत्तीचें 'पांगळा' म्हणून वर्णन करण्यांत येतें.

येथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, जें पांगळ्याचें रूपक आहे तें 'हातपाय तोडून' पांगळा केल्याचें नव्हे. तर वाहनावर बसून पांगळा झाल्याचें आहे. कारण ज्याचे हातपाय तोडले त्याचे ते कायमचे नाहींसे होतात, पुनः ते येण्याची शक्यता नसते. जो वाहनावर बसून दीन झाला त्याला हातपाय असतात. येवढेंच झालेलें असतें कीं, वर बसणाऱ्या स्वारापेक्षां वाहन अधिक बलवान् असल्यानें त्या स्वाराचे हातपाय असून नसल्यासारखे होतात. जर हातापायांत शक्ति आली तर तो त्यांचा उपयोग करून वाहनास आवरून आपणांस हव्या त्या स्थानाकडे घेऊन जाऊं शकतो. जीवात्म्याच्या बाबतींतला 'पांगळेपणा' हा वाहनावर बसून येणाऱ्या पांगळेपणाप्रमाणें आहे. कारण, तो कांहीं काळ जरी मनाच्या स्वाधीन झालेला दिसत असला तरी पुनः ईशप्रसादानें सामर्थ्यसंपन्न होऊन मनास आवरूं शकतो असा अनुभव आहे. म्हणूनच नाथमहाराज जीवात्म्याच्या दीनतेचें— मनाच्या अधीनतेचें वर्णन करतांना असेंच पण आंधळा झालों असें म्हणतात.

असोनि हातपाय डोळे जाहलों मी आंधळा ।..

मुख्य मुद्दा 'हातपाय डोळे असून' आंधळा झालों असें म्हणतात हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

तुकाराममहाराजही तसेंच म्हणतातः—

पांगुळा झालों देवा नाहीं हात ना पाय ।
बैसलों जयावरी सैराट तें जाय ।।

येथपर्यंत पांगळा कोण झाला व तो कोणत्या वाहनावर बसल्यामुळें पांगळा झाला तें सांगितलें. आत्मा हा पांगळा झाला व तो मनावर आरूढ झाल्यानें मनाच्या अधीन झाला व पांगळा झाला असा इत्यर्थ आहे.

आतां हा आत्मा या मनरूपी वाहनावर बसण्याच्या भानगडींत कां पडला हें पाहूं. हा प्रश्न म्हणजे 'जीवदशेस' आत्मा कां प्राप्त झाला असाच आहे; व त्याचें उत्तर देणें फारच काठण आहे. त्याचें उत्तर म्हणून प्रथम एक गोष्ट सांगतों :

फार पूर्वीं– म्हणजे माणसांना घोड्यावर बसणें ठाऊक नव्हतें त्या काळीं– एकदां असें झालें कीं, एका घोड्याचें व एका हरिणाचें वांकडें आलें. हरिणाला गाठून त्याचा नाश करावा म्हणून घोड्यानें त्याला गाठण्याचा प्रयत्न केला. पण हरिण हें चपळ जनावर असल्यानें घोड्याच्या तावडींत तें सांपडलें नाहीं. तेव्हां घोड्यानें विचार केला कीं, आपण माणसाचें साहाय्य घेऊं. तो तीर मारतो तो लांब जातो. तेव्हां आपण माणसाची विनंति करूं कीं, तूं माझ्या पाठीवर बैस, मी पळतों व हरिणा-जवळ आलों कीं तीर मार व त्याला ठार कर. त्याप्रमाणें घोडा माणसाच्या जवळ गेला व आपली हकीगत सांगून आपल्या पाठीवर बसण्याची विनंती करूं लागला. माणूस पहिल्यांदां कबूल होईना. पण आपणावर कसें बसावें, लगाम तोंडांत कसा द्यावा वगैरे घोड्यानें समजून सांगितल्यावर माणूस कबूल झाला व घोड्यावर बसला. ठरल्याप्रमाणें घोडा पळूं लागला व माणसानेंही हरिण त्याच्या माराच्या टप्प्यांत आल्यावर बाण सोडून हरिणास मारलें. त्यानंतर घोडा म्हणूं लागला कीं, 'आतां पाठीवरून उतर.' माणूस म्हणाला, तें आतां होणार नाहीं. आजपर्यंत तुझा उपयोग माहीत नव्हता व तुला ताब्यांत कसा ठेवायचा हें ठाऊक नव्हतें, म्हणन मीं तुझ्यावर स्वारी केली नाहीं. आतां नाहीं उतरणार. असें सांगतात कीं, ही गोष्ट घडली तेव्हांपासून माणूस घोड्यावर बसूं लागला.

ही इसापनीतींतील कथा येवढयाकरितां सांगितली कीं, त्या घोड्यांच्या मनांत माणसाची प्रार्थना करण्याचें कां आलें हें सांगणें जसें कठिण आहे. तसेंच आत्म्याच्या मनांत मनास जवळ करण्याचें जीवत्वदशेस येण्याचें का आलें हें सांगणें कठिण आहे. असें झालें आहे असें दिसतें येवढें खरें.

म्हणून वेदान्तशास्त्रांत ज्या गोष्टी अनादि म्हणून गृहीत धरलेल्या आहेत त्यांपैकीं जीवदशा आहे. तुकाराममहाराज हीच गोष्ट एके ठिकाणीं 'प्रवाशा 'च्या रूपकानें सांगतात—

देश वेष नव्हे माझा । सहज फिरत आलों ।
करूं सत्ता कवणावरी । कोठें स्थिर राहिलों ।
पाय डोळे म्हणतां माझे । तिहीं कैसा मोकलिलों ।
परदेशीं नाहीं कोणी । अंध पांगुळ झालों ॥१॥

तुकाराममहाराज म्हणतात, आत्मा हा कौतुकानें आपल्या घरा-स्वरूपा-बाहेर पडला व या कार्यकारण उपाधींत अडकून पडला— तिच्या अधीन झाला —पांगळा झाला.

तात्पर्य, आत्मा जीवदशेस आला याला कारण त्याचीच 'हौस.' यापरतें दुसरें नाहीं. तो एकटाच असल्यानें त्याच्याजवळ दुसरें कोण होतें कीं, जें त्याच्यावर जोर करून त्याला कांहीं करावयास लावील ?

'तद्धैक्षत एकोऽहं बहुस्याम्'

'आपलीच आवडी धरूनि खेळिया ।
आप आपणांसी व्यालें रे '

एवढेंच त्याचें उत्तर आहे.

हौसेनें एकदां मनावर स्वार झाल्यावर या आत्मारामरूपी स्वाराची स्थिति मात्र वर सांगितलेल्या इसापनीतींतील घोड्याप्रमाणें झाली. हा दिसायला मनावर स्वार, पण खरें मन याच्यावर स्वार. हें सिद्ध करण्याचें कारण नाहीं. कांहीं पराक्रमी यतात्मे सोडून दिले तर बहुतेक सर्वांचा हा अनुभव आहे. उदाहरणार्थ, वैद्य रोग्यास सांगतो कीं तुला खोकला झाला आहे, तूं तेलकट, आंबट खाऊं नकोस, सिगारेट ओढूं नकोस, म्हणजे लवकर बरा होशील. रोगी बरें म्हणतो व दवाखान्याच्या बाहेर आल्यावर सिगारेट शिलगावतो. याचें कारण त्याचें मन त्याच्या ताब्यांत नाहीं. बुद्धीला पटलें तरी मनाच्या आवडीप्रमाणें जीवात्मा करतो. हा एक अगदीं साध्या गोष्टीचा दृष्टान्त झाला. अर्थातच अशीच कथा बहुतेक सर्व

जीवनाची आहे. मनुष्य हा बुद्धिमान् प्राणी ही जी व्याख्या आहे त्याचा अर्थ असा नव्हे कीं, मनुष्याच्या सर्व क्रिया बुद्धीस अनुसरून होतात. त्याचा अर्थ एवढाच आहे कीं, त्याला बुद्धि आहे व तिचा तो उपयोग करूं शकतो. सदाच करतो असा नव्हे. मनुष्याचे बहुतेक सर्व व्यापार बुद्धीच्या मार्गदर्शनावर अवलंबून नसतात, ते मनाच्या आवडी-निवडीवर अवलंबून असतात. जीवात्मा हा 'मनाचा दास' आहे.

असा 'दास' होण्याचें कारण मन अत्यंत चंचल व प्रमाथी असें आहे. जीवाचें चालूं देत नाहीं. मन असें असण्याचें कारण ज्ञानेश्वर-महाराजांनीं पुढील ओव्यांतून सविस्तर दिलें आहे:—

...परिस आतां फुडेपणें। मन तें ऐसें॥ जें इंद्रियां आणि बुद्धी। माझारिलिये संधीं। रजोगुणांच्या खांदीं। तरळत असे॥ नीलिमा अंबरीं। कां मृगतृष्णालहरी। तैसे वायांचि फरारी। वावो जाहलें॥ आणि शुक्रशोणिताचा सांधा। मिळतां पांचांचा बांधा। वायु तत्त्व दशधा। एकचि जाहले॥ मग तिहीं दाही भागीं। देहधर्माच्या खैवंगीं। अधिष्ठिले आंगीं। आपुलाल्या॥ तेथ चांचल्य निखळ। एकलें ठेलें निढाळ। म्हणोनि रजाचें बळ। धरिलें तेणें॥ तें बुद्धीसी बाहेरी। अहंकाराच्या उरावरी। ऐसा ठायीं माझारीं। बळियावलें॥ वायां मन हें नांव। येऱ्हवी कल्पनाचि सावेव। जयाचेनि संगें जीव-। दशा वस्तु॥

—ज्ञा. अ. १३, १०३–११०

'मन हें इंद्रियें आणि बुद्धि यांच्यामधील जागेंत रजोगुणाच्या खांद्यावर म्हणजे आश्रयावर चंचलपणानें राहातें. पंचमहाभूतांचा देह तयार झाला कीं त्यांत असलेलें वायुतत्त्व स्थानभेदानें पंचप्राण व पंचउपप्राण या रूपानें दहा प्रकारचें होतें. ह्या दहा प्राणांनीं शरीरांतील वेगवेगळ्या जागा अड-वल्या. मग जें केवळ चांचल्य उरलें त्या चांचल्यानें रजोगुणाचा आश्रय केला. व रजोगुणाचें आश्रय धरून राहिलेलें चांचल्य म्हणजेच मन. तें बुद्धीच्या

बाहेर व अहंकाराच्या उरावर असें ठाण मांडून बसलें व यामुळें तें बळकट होऊन राहिलें. या मूर्तिमंत रजोगुणास— चांचल्यासच मन म्हणतात. '

असें हें मन रजोगुणांचें बनलेलें असल्यामुळें वायूपेक्षांही चंचल आहे व विकारी आहे. गीतेंत एके ठिकाणीं अर्जुनानें याबाबत देवाला जणुं काय आमच्या सर्वांच्या वतीनें दिलेला परिहार प्रसिद्धच आहे. अर्जुन म्हणतो—

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।।

गी. ६–३४

यावर ज्ञानेश्वरमहाराज लिहितात:—

तंव अर्जुन म्हणे देवा । तुम्ही सांगा कीर आमुचिया कणवा । परि न पुरों जी स्वभावा । मनाचिया ।। हें मन कैसें केवढें । ऐसें पाहों म्हणों तरी न सांपडे । एऱ्हवीं राहाटावया थोडें । त्रैलोक्य यया ।। म्हणोनि ऐसें कैसें घडेल । जें मर्कट समाधि येईल । कां राहा म्हणतलिया राहेल । महावात ।। –ज्ञा. ४११–१३

असें वाऱ्यापेक्षां चंचल असणारें मन रजोगुणांचें असल्यानें तें बुद्धि सत्त्वाची खरी पण तिला सहसा दाद देत नाहीं व म्हणून त्याला आवरणें कठिण जातें. हीच गोष्ट ज्ञानेश्वरमहाराज पुढीलप्रमाणें सांगतातः——

जें बुद्धीतें सळी । निश्चयातें टाळी । धैर्येंसी हातफळी । मिळऊनि जाय ।। जें विवेकातें भुलवी । संतोषासी चाड लावी । बैसिजे तरी हिंडवी । दाही दिशा ।। जें निरोधिलें घे उवावो । जया संयमुचि होय सावावो । तें मन आपुला स्वभावो । सांडील काई ।। ४१४–१६

एखाद्या खोडकर व दणगट मुलाप्रमाणें मन आहे. त्या मुलाला आवरायाचा प्रयत्न केला तर तो मुलगा अधिकच खोड्या करतो. तसें मनाच

आहे. त्याचा निग्रह करण्याचा प्रयत्न करावा तर त्याच विषयाच्या कल्पना तें अधिक करतें !

हें मन रजोगुणाचें बनलेलें असल्यानें चंचल खरें, पण तें देवाचें चिंतन करीत नाहीं. तें विषयाचें करतें व यामुळेंच जीवास दुःख भोगावें लागतें.

तें मन इंद्रियें आणि बुद्धि यांच्यामध्यें असल्यानें बुद्धीवर झांकण घालून इंद्रियांना आपणांस हवें त्या विषयांत ढकलतें.

ज्ञानेश्वरमहाराज या त्याच्या दांडगटपणाचें वर्णन पुढील ओव्यांतून मोठें सुंदर करतात :

जें प्रवृत्तीसी मूळ । कामा जयाचें बळ । जें अखंड सुये छळ । अहंकारासी ।। जें इच्छेतें वाढवी । आशेतें चढवी । जें पाठी पुरवी । भयासि गा ।। द्वैत जेथ उठी । अविद्या जेणें लाठी । जें इंद्रियातें लोटी । विषयांमाजीं ।। संकल्पें सृष्टी घडी । सवेंचि विकल्पूनि मोडी । मनोरथांच्या उतरंडी । उतरी रची ।। जें भुलीचें कुहर । वायुतत्त्वाचें अंतर । बुद्धीचें द्वार । झांकविलें जेणें ।। तें गा किरिटी मन ।....
—ज्ञा. अ. १३ ओ. १११–१६

मन संकल्पानें सृष्टि कशी तयार करतें व जीवात्मा त्यांत कसा नाहींसा होतो हें सांगणारी शेखमहंमदाची गोष्ट प्रसिद्ध आहे. तशीच श्रीएकनाथांनीं आपल्या भागवतांत एका मजुराची सुंदर गोष्ट सांगितली आहे ती येथें देतों :

एका गृहस्थास त्याच्या घरीं कांहीं कार्य असल्यानें बरेंच तूप विकत घ्यावयाचें होतें. तो खेडेगांवांत राहात असे म्हणून तुप खरेदी करण्याकरितां जवळच्या शहरांत आला. त्यानें तूप खरेदी करून एक मोठी पंचवीस-तीस शेरांची बरणी विकत घेऊन त्यांत त्यानें तें घातलें. फुटूं नये म्हणून त्यानें एक मजूर केला व त्याच्या डोक्यावर बरणी देऊन मजूर पुढें व हा गृहस्थ मागें असे त्या रस्त्यानें चालूं लागले. असे चालत असतां मजुराचे दोन्ही हात डोक्यावर बरणीस धरून गुंतलेले होते. पण त्याच्या डोक्यांत विचार येऊं लागला कीं, आपण इतके दिवस मोलमजूरी करतों, पण शेवटीं

आपल्या हाताला कांहीं लागत नाहीं. मजुराचें धन । विळा दोरीच जतन ॥ तेव्हां आतां यांत बदल केला पाहिजे. आपण आतां हें तूप नेण्याचें काम करीत आहोंत. याचे येणारे पैसे पोटाकरितां खर्च करावयाचे नाहींत. पोटा॰ करितां पुनः रात्रीचें काम करावयाचे. असें आपण वर्ष-सहा महिने करीत गेलों कीं आपल्याजवळ कांहीं भांडवल सांठेल. मग आपण त्या भांडवलावर कोंबड्या खरेदी करूं. मजुरी व जोडीस अंडी-कोंबड्या विकावयाचा धंदा करूं. असे कांहीं महिने गेले व त्या धंद्यांत किफायत झाली कीं मजुरी सोडून देऊं व दुसरा जोडधंदा करूं. मग कांहीं दिवसांनीं कंत्राटें करावयास लागूं. मग शर्यतीकरितां घोड्यांची पैदास करूं. अशा रीतीनें पैसा पुष्कळ झाल्यावर या लहान शहरांत कोण राहतो ? मग राजधानीचें मोठें शहर पाहून तेथें घर बांधून राहूं. ( हे सर्व विचार डोक्यावर तुपाची घागर व त्याला दोन्ही गुंतलेले हात अशा स्थितींत पायानें चालतांनाच चालले आहेत हें विसरतां कामा नये. ) मग अशी स्थिति येईपर्यंत आपला मुलगा वीस-बावीस वर्षांचा होईल व आपला रुबाब पाहून त्या राजधानीचा जो राजा त्याच्या प्रधानाची मुलगी त्याला सांगून येईल व आपणांस व मुलास घरीं नेण्याकरितां तो प्रधान आपले दोन उत्कृष्ट घोडे धाडील. एकावर आपला मुलगा बसेल व एकावर आपण बसूं. घोडा उत्तम अरबी जातीचा असल्यानें तो जोरांत चालण्यास निघेल व तो का तुफान होतो आहे असें दिसलें कीं आपण त्यास हातानें लगाम खेचून आवरूं. हा विचार त्याच्या डोक्यांत इतक्या जोरानें आला कीं, आपण पायानें चाललों आहोंत, डोक्यावर दुसऱ्याची तुपाची घागर व ती पडूं नये म्हणून त्याला हात धरले आहेत हें तो सर्व विसरला; व घोड्यावर खरोखरच आपण बसलों आहोंत व घोडा तुफान होतो आहे असें त्यास भासल्यामुळें त्यानें घागरीवरचे हात एकदम काढले, मान मागें केली व पुढें हात करून लगाम खेचूं लागला. हात सुटले, मान वाकली, यामुळें तुपाची घागर रस्त्यावर पडली, फुटली व तूप रस्त्यावर पसरलें. मालक मागें चालला होता. त्यानें हें पाहिल्याबरोबर हातांतील काठी त्या मजुराच्या पायावर मारून त्याला विचारलें, “ अरे हें काय रे ? ” तो मजूर म्हणाला, “ महाराज, मी काय करूं ? घोडा तुफान झाला होता त्याला आवरत होतों. ”

मजुर राउळीचें घृत नेतां । तो तुरंगीं चढे मनोरथा । मन नाचऊं लागे उल्हासता । स्वकल्पिता कल्पना ।। सबळ वारुवाचें उड्डाण । म्हणूनि उडूं जातां आपण । पडोनि घृत-कुंभ होय भग्न । पुसती जन काय झालें ।। म्हणे बळें उडाला माझा घोडा। परी स्मरेना तो फुटला घडा । बंदीं पडिला रोकडा । नेणें बापुडा मनोरथें ।।

ए. भा., अ. २२, ओ. ४५२–५४

या दृष्टान्तानें येवढेंच दाखवावयाचें आहे कीं, मन हें सृष्टि कशी निर्माण करूं शकतें व जीव त्यांत कसा अडकला जातो.

मनाचें हें चांचल्य, विषयलोलुपत्व व मोठमोठ्या ज्ञात्या पुरुषांनाही अंकित करण्याचें त्याचें बल यांचें तुकोबांनीं ठिकठिकाणीं वर्णन केलें आहे.

काय करूं आतां या मना । न संडी विषयवासना । प्रार्थितांही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ।। १ ।। आतां धावे धावे गा श्रीहरी । गेलों वायां नाहीं तरी । न दिसे कोणी आवरी । आणिक दुजा तयासी ।। २ ।। न राहे एके ठायीं एकी घडी । चित्त तडतडां तोडी । भरलें विषय-भोवंडीं । घालूं पाहे उडी भवडोहीं ।। ३ ।। आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात माझा मांडला यांणीं । तुका म्हणे चक्रपाणी । काय अझोनि पहातोसी ।। ४ ।।

अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ।।१।। काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरीनाथा । करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ।। २ ।। भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ।। ३ ।। बहुत चंचळ चपळ । जातां येतां नलगे वेळ ।। ४ ।। किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ ।। ५ ।। मज राखे आतां । तुका म्हणे पंढरीनाथा ।। ६ ।।

अशा तऱ्हेचे उतारे अनेक संतांच्या वाङ्मयांतून देतां येतील.

मग हें अनावर होऊन जीवास विषयाच्या भोगाकडे ओढून घेऊन जातें, म्हणून आत्मा 'पांगळा' झाला असें त्याचें रूपकानें वर्णन करतात.

एकदां मनाला विषयाची चटक लागली व जीव त्याच्या अधीन झाला म्हणजे हिरवळ– गवत दिसलें कीं जनावर तें शेत आपल्या मालकाचें आहे का दुसऱ्याचें आहे याचा विचार न करतां जसें त्यांत चरतच जातें, तसा जीव हा चटावला कीं हा विषय भोग्य आहे किंवा नाहीं, विहित आहे का अविहित आहे याचा विचार न करतां त्याचा भोग घेण्यास प्रवृत्त होतो. त्याला भोगांत उघड उघड पतन दिसत असून सुद्धां तो त्याज्य, निंद्य विषय भोगतच रहातो. म्हणून खालीलप्रमाणें तुकोबा वर्णन करतात :——

पांगुळ झालों देवा नाहीं हात ना पाय। बैसलों जयावरी सैराट तें जाय। खेटितां कुपकांटीं। खुंट दरडी न पाहे।....

अशा असहाय स्थितींत मनाला मागें परतवण्याचें बळ नसल्यानें, साधक कांहीं काळ मनाला हितोपदेश करून त्याला चुचकारून ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करतो. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात :——

मना एक करीं। म्हणे मी जाईन पंढरी। उभा विटेवरी। तो पाहेन सांवळा ।। १ ।। करीन सांगसी तें काम। जरी जपसी हें नाम। नित्य वाचें राम। हरी कृष्ण गोविंद ।।२।

पण अशा प्रार्थनेनें ऐकणारें मन नव्हे. त्याच्या संवयी अनंत जन्मींच्या संस्कारानें तयार झालेल्या असल्यानें त्याला त्या सोडणें कठिण जातें. अशा स्थितींत त्याच्या या खोडी सुटाव्यात, मन विषयाचा ध्यास सोडून भगवंताकडे लागावें याला एकच उपाय–व तो म्हणजे मनाचा प्रेरक जो परमात्मा हृषीकेश त्याची प्रार्थना करणें. सर्व साधुसंतांनीं त्याकरितां देवाची प्रार्थना केलेली आढळून येईल. वरती दिल्याप्रमाणें तुकारामबोवाही देवाची प्रार्थना करतात——

'आतां धांवे धांवे गा श्रीहरी। ...........'

परंतु देवाची प्रार्थना केली असतां मन आवरलें जातें हें ज्यांच्या योगानें कळतें, व ज्याची प्रार्थना केली असतां मन तो आवरतो त्या देवाच्या स्वरूपाची व सामर्थ्याची ओळख जे करून देतात, व आपली गरिबाची दाद त्याच्याकडे लागावी येवढ्याकरितां आपल्याकरितां जे शब्द खर्च करतील व ज्यांचा शब्द मान्य केला जाईल असे संत-महात्मे असतात हें जाणून तुकाराममहाराज संतांची या अभंगांत आपली स्थिति सांगून प्रार्थना करतात :

'दाते हो दान करा। जाते पंढरपुरा।
न्या मज तेथवरी अखमाचा सोयरा॥ २॥

'अहो संतमहाराज, मला दीनांचा सोयरा जो पांडुरंग त्याच्यापर्यंत घेऊन चला.'

## गौळण

स्वयें सुखाचे झाले अनुभव ।
एक एकीपाशीं सांगतील भाव ।
अवघ्या अवघा हा कैसा नवलाव ।
सर्वसाक्षी तेथेंचि त्यांचा जीव वो ।। १ ।।
आपआपणांशीं करिती नवल ।
परि वादावाद न संडिती बोल ।।
एका मेघश्यामें जळधर वोल ।।
रसीं उताविळ हृदय सखोल वो।। २ ।।
एक विषय तो सकळांचा हरी ।
त्याच्या आवडीनें आवडी इतरीं ।।
अंध बहिर हे प्रेत लोकाचारीं ।
त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरीं वो ।। ३ ।।
स्तुति पराविया मुखें रुचिकर ।
प्रीतिपात्राच्या गौरवीं आदर ।।
परस्परें हें सादरासादर ।
योग सज्जनांच्या सुखा नाहीं पार वो ।। ४ ।।
भक्तिवालभ न तुटे चराचरीं ।
आप्त-अनाप्त हे ऐशी ठेवी उरी ।।
दुरी जवळी संचिता ऐसें धरी ।
रंगा रंगा ऐसें होणें लागे हरी वो ।।५।।

तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन ।
आला बाहेरी प्रेमें वोसंडून ॥
पडिलें कानीं त्या जीवाचें जतन ।
धरियेलें एकाभावें हृदयीं चरण वो ॥६

प्रस्तुतच्या संकीर्तनाचा अभंग हा तुकोबांचे 'गौळणीचे' म्हणून जे अभंग प्रसिद्ध आहेत त्यांपैकीं एक आहे. श्रीज्ञानदेवांच्यापासून तों तुकोबा-निळोबा यांच्यापर्यंत सर्व साधुसंतांनीं भगवान् श्रीकृष्णाचें बालचरित्र गायिलें आहे. त्याचे बालक्रीडा, गौळणी, काला असे विभाग करून ते गाथ्यांतून देण्यांत येत असतात. वारकरीसंप्रदायामध्यें असा दंडक आहे कीं, कोणत्याही सप्ताहाचा शेवट काला अगर गौळणी यांतील अभंग निरुपणास घेऊन श्रीकृष्णाचें बालचरित्र गाऊनच करावा. त्याला काल्याचें कीर्तन असें म्हणतात.

उत्सवांतील काल्याचें कीर्तन सोडून इतर दिवशीं कीर्तनाकरितां कर्म–उपासना–ज्ञान यांची चर्चा करणारा श्रोता–वक्ता यांचा अधिकारानुरूप कोणताही अभंग कीर्तनाकरितां निवडण्याची सवलत असते. ही सवलत काल्याच्या दिवशींच्या कीर्तनप्रसंगीं नाहीं. त्या वेळीं कृष्णचरित्रच सांगावें लागतें. एवढेंच नव्हे तर श्रीकृष्णाचें 'बालचरित्र' च गावें लागतें. तुकोबा म्हणतात—

चरित्र तें उच्चारावें । देवें केलें गोकुळीं ॥

कारण हें चरित्र उच्चनीच, लहानथोर सर्वांना 'भवसागराचें तारूं' आहे. श्रीकृष्णचरित्र हें इतकें पवित्र व थोर आहे कीं, शुकाचार्यासारख्या विरक्त निष्काम आत्मारामांनींही तें गायिलें आहे.

येऱ्हवीं विषय जिणोनि जन्मले । जे शुकादिक दादुले ॥
ते विषयची वानिता जाहले । भाट ययाचे ॥

—ज्ञानेश्वरी, ११. १७३

वारकरी संप्रदाय हा श्रीपंढरीश पांडुरंगाचा उपासक असल्यानें त्यांतील साधुसंतांनीं श्रीकृष्णचरित्र गावें हें साहजिकच आहे. कारण त्याची अशी निष्ठा आहे कीं, श्रीकृष्णच पुण्डलिकाकरितां पांडुरंग झाले.

द्वारकेचें केणें आलें याचि ठायां। पुढें भक्तराया चोजवीत ।।

× × ×

गीता जेणें उपदेशिली। ते हे विटेवरी माउली ।।

——तुकोबा

भगवान् श्रीकृष्णाचें जीवन म्हणजे अथपासून इतिपर्यंत 'चरित्रमय' आहे.

तुकारामबोवा म्हणतात——

ये दशें चरित्र केलें नारायणें।
रांगतां गोधनें राखिताहे ।।१।।
हें सोंग सारिलें या रूपें अनंतें।
पुढेंहि बहुत करणें आहे ।।२।।

चरित्र याचा अर्थ लक्षांत ठेवणें अवश्य आहे. चरित्र म्हणजे मनुष्याच्या बुद्धीस आकलन करण्यास कठिण अशा घटना. कित्येकांच्या जीवनांत 'चरित्र' असें नसतेंच. या लोकांचें जीवन कथन करावयाचें म्हणजे दैनंदिनीचें एक पान लिहिलें कीं पुरे! दुसऱ्या दिवशीं तेंच! उठले, न्याहारी केली, फिरले, जेवले, कामधंदा केला, जेवले, निजले—संपलें. त्यांत 'चरित्र' असें नाहींच. दुसऱ्या कित्येकांच्या फक्त पूर्वआयुष्यांत चारित्र म्हणण्यासारख्या घटना घडतात. पुढें उत्तर आयुष्यांत ते मालवलेले दिसतात. कित्येकांच्या आयुष्यांतील उत्तर भागांत चरित्र म्हणण्यासारखा कांहीं भाग आढळतो. पण पूर्व आयुष्यांत ते कधींच चमकलेले नसतात. कांहीं थोडे मात्र असे असतात कीं, पूर्व व उत्तर या दोन्ही आयुष्याच्या विभागांत त्यांनीं अलौकिक कामगिरी केलेली असते.

हें वर्गीकरण समजण्याकरितां अगदीं रोजच्या व्यवहारांतला दृष्टान्त द्यावयाचा तर तो विद्यार्थ्यांचा देतां येईल कांहीं विद्यार्थी प्राथमिक व माध्यमिक शाळेंतून चमकतात, पण पुढें महाविद्यालयांत का त्यांनीं पाय ठेवला कीं ते अस्तंगत होतात. कांहीं मुलें शाळांतून चमकत नाहींत, पण विश्वविद्यालयाच्या परीक्षेंत चमकतात. फारच थोडे विद्यार्थी असे असतात

कीं, प्राथमिक शाळेंतील परीक्षांपासून तों महाविद्यालय व विश्वविद्यालय यांतील सर्व परीक्षांतूनसुद्धां सारखा पहिला उच्च अनुक्रम त्यांनीं मिळविलेला असतो. थोरा-मोठ्या लोकांच्या, फार काय आपण ज्यांस देवादिक म्हणतों त्यांच्यासुद्धां जीवनांत असे फरक आढळून येतात. भगवान् श्रीकृष्णाचें जीवन तिसऱ्या प्रकारांत मोडतें. वर उद्‌धृत केलेल्या कडव्यांत तुकारामबोवा म्हणतात कीं, श्रीकृष्णानें ' रांगण्याच्या ' अवस्थेंत व थोडा मोठ्या झाल्यावर गाई राखावयास गाईच्या मागें हिंडत असतांना ' चरित्र ' केलें.

ये दशें चरित्र केलें नारायणें ।
रांगतां गोधनें राखिताहे ॥

पुढील कडव्यांत ते सांगतात कीं, रांगण्याच्या अवस्थेपासून जो चरित्रास आरंभ झाला तो गाईराखेपर्यंतच चालू राहिला असें नव्हे, तर पुढेंही चालूच राहिला. मथुरेंत जन्मल्यापासून तों व्याधाचा बाण लागून प्रभासक्षेत्रीं वैकुंठास गमन करीपर्यंत सर्व चरित्रच ! गोकुळ सोडल्यावर कंसास मारून उग्रसेनास राज्यावर स्थापलें हें सुद्धां चरित्रच आहे. दुसऱ्याचें लुबाडून घेतलेलें राज्य परत करणें जीवावर येतें. भगवंतांनीं तर स्वतः कंसास मारून राज्य कमावलें, पण स्वतः गादीवर बसण्याचा मोह ठेवला नाहीं; उग्रसेनास गादीवर बसविलें. केवढा त्याग ! हें चरित्रच आहे. गीतेसारखा जगन्मान्य उपदेश केला, उद्धवास उपदेश केला, कित्येक राक्षसांना मारिलें, गुलाम मुक्त केले. शेवटीं आपल्या यादवकुलाचाही संहार झालेला पाहून प्रयाण केलें. हें सर्व चरित्रच आहे. पण वारकरीसंप्रदायपद्धतीप्रमाणें काल्याच्या कीर्तनप्रसंगीं गोकुळांत भगवान् आल्यापासून तों गोकुळ सोडून जाईपर्यंतचें चरित्र सांगावें लागतें असा नियम आहे. इतकें महत्त्व या चरित्रास वारकरीपंथांत देण्यांत आलें आहे.

त्याचें एक कारण असें सांगतां येण्यासारखें आहे कीं, पांडुरंग हें श्रीकृष्णाचें बालस्वरूप आहे अशी या पंथांतील साधूंची निष्ठा आहे. तुकाराममहाराज म्हणतात, वारकरी संप्रदायाचें उपास्यदैवत पांडुरंग हें श्रीकृष्णाचें बालस्वरूप आहे.

नागर गोडें बाळरूप । तें स्वरूप काळीचें ।।१।।
गाई-गोपाळांच्या संगें । आलें लागें पुंडलिका ।।२।।

पण यापेक्षां सुद्धां अधिक महत्त्वाचें कारण त्यांचा श्रीकृष्णाच्या बालचरित्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन होय. भक्तिसंप्रदायांतील आचार्य नारद यांच्यापासून सर्व भक्तमंडळी गोपी, गोपाळ यांना भगवान् श्रीकृष्णाचे नुसते सवंगडे समजत नसत; तर ही सर्व मंडळी भगवंताची भक्त होती असें समजत. यामुळें भगवंताचें बालचरित्र गाण्यांत सगुण भक्तींतील 'रसाचा' त्यांना आलेल्या अनुभवाचा आस्वाद कथन करण्याच्या निमित्तानें स्वतः घेतां येत होता व दुसऱ्यांना तो देतां येत होता.

नामदेव-तुकोबादिक ही मंडळी ज्ञानी खरी. पण हे सर्व मोठे 'भक्त'ही होते. मागील एका संकीर्तनांत सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रीय संतांत 'भक्ति', 'परेशानुभव' व 'विरक्ति' यांचा मोठा उत्कृष्ट समन्वय झालेला दिसतो. या संतांनीं योग्यांच्या उन्मनीचा, ज्ञान्यांच्या कर्माचरणांत राहणाऱ्या अखंड हरीच्या समाधीचा, तसाच भक्ताच्या सगुणदर्शनाचा आनंद उपभोगला. हे अनुभव त्यांच्याकडून

अंतरीचे धांवे स्वभावें बाहेरी । धरितांहि परी आवरेना ।।

या न्यायास अनुसरून कांहीं ठिकाणीं सांगितले गेले आहेत. पण भक्त हा 'अमानित्वा'च्या वृत्तीनें अलंकृत असल्यानें त्याच्या ठिकाणीं, "मी अमुका ऐसी नोहावीसेचि लोकां" अशी स्थिति असते व आपले अनुभव जगास सांगितले तर नको तो मोठेपणा आपल्या अंगाला येईल म्हणून, शेतकरी पेरलेलें जसें झाकतो तसें आपला अनुभव जगापासून झांकून ठेवण्याकडेच त्यांची प्रवृत्ति असते. अशा स्थितींत गौळणीसारख्या भक्तांचें चरित्र गाण्याचा प्रसंग आला कीं, त्यांचें चरित्र गातांना मुक्तकंठानें हे भक्त त्यांच्या द्वारां आपले अनुभवही कथन करूं शकतात. असे आपले अनुभव सांगणें शक्य होतें. कारण, भक्तांचे अनुभव भक्त कोठल्या कालांत अथवा देशांत असोत एकच असतात. एका दृष्टीनें हा प्रसंग 'ऐतिहासिक कादंबरी' अथवा दुसऱ्याच्या नांवानें 'आत्मचरित्र' लिहिण्यासारखा आहे.

हें सांगण्याचा मथितार्थ असा कीं, श्रीकृष्णचरित्र सांगतांना या साधु-संतांनीं तें 'जिवंत' करून त्यांतील भक्तीचा आनंद स्वतः लुटून सांगितलें. यामुळें त्यांत, श्रीकृष्णजीवनाची कथा आहे, तत्त्वज्ञानांतील सिद्धान्त आहेत व भक्तांना आजही मिळणारे प्रतिभादर्शनादि अनुभव आहेत. यामुळें हें लिखाण मोठें अपूर्व असें झालें आहे. सगुण चरित्र भक्तिरसानें ओथंबलेलें असल्यानें कोरड्या शुष्क वेदान्तचर्चेहून यांत वेगळाच रस निर्माण झालेला आहे. यांत एक विलक्षण प्रकारचा जिवंत-पणा आहे.

दुर्दैवानें वाईट येवढेंच आहे कीं, गौळणीच्या या अभंगांत वेगवेगळे भक्तीचे भाव सांगितले असल्यानें वरवर पाहिलें असतांना ते प्रापंचिक भावांच्या अनुभवसदृश वाटतात; व भाव सांगण्याकरितां 'भाषा' ही त्याला योग्य अशीच वापरावी लागल्यानें व 'भक्तिभावा'चें स्वरूप न कळल्यानें पुष्कळ वाचक अभंगाचा उत्तान अर्थ घेऊन, 'श्रीकृष्ण व गौळणी' रंगेल होत्या असाच अर्थ करून घेऊन, भक्तिरसाऐवजीं विषयरंगाचा आस्वाद घेतांना दिसतात.

एरवीं या साधुसंतांनीं हे अनुभव सांगतांना, आपण सांगतों तो विषया-नंद नव्हे, हा 'परमानंद' अथवा 'नित्यानंद' आहे असें कळावें अशा खुणा त्यांत लिहून ठेवल्या आहेत. पण हेंहि विषयानंद भोगण्याच्या वृत्तीमुळें त्यांना दिसतच नाहीं.

हें सर्व सांगण्याचा हेतु असा आहे कीं, 'गौळणी'कडे सामान्य लोक जसे बघतात तसें न बघतां हीं 'भक्तचरित्रें' व तीं 'भक्तांनीं' लिहिलीं आहेत या दृष्टीनें बघावें तरच त्या अभंगांची आपणांस लज्जत कळून येईल.

आणखी एकच गोष्ट सांगावयाची ती ही कीं, तुकारामबोवांच्या या अभंगांतील मर्म समजण्यास 'भक्तिरसायना'सारखे संस्कृतांतील ग्रंथ व बंगालमध्यें होऊन गेलेले प्रसिद्ध भक्त श्रीचैतन्य यांचें चरित्र, भक्तिविषया-संबंधीं त्यांच्या संप्रदायांतील रूपस्वामी–गोस्वामीप्रभृतींनीं लिहिलेले ग्रंथ

व अगदीं अर्वाचीन काळांत झालेले बंगालमधीलच प्रसिद्ध भगवद्‌भक्त श्रीरामकृष्णपरमहंस यांचें चरित्र इत्यादि ग्रंथांचा पुष्कळच उपयोग होण्यासारखा आहे. भक्त हें एक कुटुंबच आहे, असें जें म्हटलें जातें त्याचा हा एक अप्रत्यक्ष पुरावाच आहे. 'श्रीरामकृष्ण' अथवा 'श्रीगौरांगप्रभु' यांच्या चरित्रांत जे 'भाव' आपणांस आढळून येतात तसेच या गौळणींच्या अभंगांतून तुकोबांनीं सांगितले आहेत. आजच्या संकीर्तनाच्या गौळणीचा आरंभच

स्वयें सुखाचे झाले अनुभव ।
एक एकीपाशीं सांगतील भाव ।

असा आहे. तेव्हां आपण आतां त्या अभंगाच्या भावार्थाकडे वळूं--

या अभंगाच्या प्रथम कडव्यांत तुकाराममहाराज म्हणतात, स्वयें म्हणजे स्वतःला सुखाची जी अनुभूति झाली, जे सुखाचे अनुभव प्राप्त झाले ते अनुभव गौळणी एकत्र जमल्या असतां एकमेकींना सांगतात. हें सांगतांना त्या वेगवेगळे 'भाव' प्रकट करतात व आश्चर्य हें कीं, एकच श्रीकृष्णपरमात्मा हा या सगळ्या गौळणींना त्यांच्या त्यांच्या भावाप्रमाणें अनुभवास आला.

अवघ्या अवघा हा कैसा नवलाव ।

वात्सल्यभावानें प्रेरित झालेल्या गौळणींस श्रीकृष्ण 'बाळ' दिसला तर सख्यभावानें भरलेल्या गोपाळांना 'सखा' दिसला. माधुरीभावानें प्रेरित झालेलीला तोच 'प्रियकर' दिसला! केवढें आश्चर्य कीं, सर्वांच्या वेगवेगळ्या भावना तो एकटाच पुऱ्या करीत होता.

आपण 'भाव' शब्द वापरला यामुळें ज्याच्यासंबंधीं त्या गौळणी वेगवेगळे भाव व्यक्त करीत होत्या त्यासंबंधीं गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव असल्यानें तुकाराममहाराज याच कडव्याच्या पुढील भागांत तो कोण हें सांगतात--

सर्वसाक्षी तेथेंचि त्यांचा जीव वो ॥१॥

ज्याच्यासंबंधीं वात्सल्यादि आपले भाव त्या गोपी व्यक्त करीत होत्या तो जरी बाल, सखा इत्यादि मानव–दृश्य–रूपांत प्रतीत होत होता तरी तो खरा सर्वांचा प्रकाशक द्रष्टा ‘ देव ’ होता. व त्या सर्व गौळणींचा जीव त्या परमात्म्यावर होता व त्या त्याच्याच गोष्टी करीत होत्या. तेथें विपरीत वैषयिक भाव मनांत आणण्याचें कारण नाहीं, असा हें सांगण्यांत मुख्य हेतु आहे.

त्या गौळणी प्राप्त झालेला जो लोकविलक्षण आश्चर्यकारक अनुभव त्याचा आपल्या मनाशींच कौतुकानें ‘ काय हें आश्चर्य ’ असा विचार करीत होत्या. गीतेंत भगवन्ताच्या ‘ अनुभवाचें ’ असेंच वर्णन आहे—

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः।
चाश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।

——गीता अ. २–२९

पण मौज अशी होती कीं, त्या गौळणी प्राप्त झालेल्या अलौकिक अनुभवाबद्दल आपल्या ठिकाणीं आश्चर्य करीत होत्या येवढेंच नव्हे, तर त्या एकमेकींस भेटल्या म्हणजे एकमेकींशीं त्याबद्दल ‘ वादविवाद ’ अथवा चर्चा करीत होत्या. अनुभव प्राप्त झाल्यानंतरही त्यांनीं चर्चा टाकली नव्हती. त्या चर्चा करीतच होत्या.

आपआपणाशीं करिती नवल।
परि वादवाद न संडिती बोल।

कारण, मेघश्याम म्हणजे ढगासारखा निळा रंग असणारा जो एक भगवान् श्रीकृष्ण हाच कोणी जलधर म्हणजे मेघ, त्याच्यांतून मिळणारें जीवन हेंच ज्या सर्वांचें जीवन होतें अशा त्या गौळणींचीं अंतःकरणें तो रस सेवन करावयाला फार उतावीळ झालेलीं होतीं व त्याचप्रमाणें तो रस सांठवण्याला त्यांचीं हृदयें खूप खोलही होतीं. यामुळेंच त्या वादविवाद करीत.

एका मेघश्यामें जलधर बोल।
रसीं उतावीळ हृदय सखोल वो ॥२॥

त्या गौळणींची मेघश्याम श्रीहरीवर केवढी प्रीति होती हें सांगून या प्रेमी जनांच्या संवादाचें आपण कौतुक करून कां वर्णन करतों हें पुढच्या कडव्यांत सांगतात—

एक विषय तो सकळांचा हरी ।
त्याच्या आवडीनें आवडी इतरीं ।
अंध बहिर हे प्रेत लोकाचारीं ।
त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरीं वो ॥३॥

त्या सर्व गौळणींच्या प्रेमाचा विषय एक हरि हा होता. त्यांचे पति, दीर, भाऊ, आईबाप वगैरेवर जें प्रेम होतें तें देवाच्याकरितां. जसें स्त्री आपल्या दिरावर प्रेम करते, कारण तो आपल्या पतीचा भाऊ म्हणून; सासऱ्यावर प्रेम करते आपल्या पतीचे वडील म्हणून. तसेंच या गौळणींचें सर्वांवर प्रेम होतें तें हीं देवाचीं रूपें म्हणून. मांसमय दृष्टि त्यांची शिल्लकच नव्हती. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात—

गोविंद भ्रतार गोविंद मूळहारी ।
नामें भेद परी एकचि तो ॥

त्यांचें देवावर इतकें प्रेम होतें कीं, त्या देवाला सोडून इतर बाबतींत आंधळ्या अथवा बहिऱ्या; फार काय लोकव्यवहाराच्या बाबतींत त्या मृतवत् झाल्या होत्या. यावर कोणी म्हणेल, अशा देवपिशांचें काय वर्णन करतां ? त्यावर तुकारामबोवा म्हणतात—

त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरीं वो ॥३॥

मी त्यांचें वर्णन करीत आहे यांत काय नवल आहे ! विशालबुद्धि व्यासांच्यासारखे पुराणें लिहिणारे, त्यांनींही त्यांची पुराणांतून कीर्ति गाइली आहे.

तुकाराममहाराज या पुढील कडव्यांत या गौळणी स्वतः भगवत्-सुखानुभूति करणाऱ्या असतांना चर्चा कां करतात, याचें एक मोठें उत्तम कारण देतात—

स्तुति पराविया मुखें रुचिकर
प्रीतिपात्राच्या गौरवीं आदर।
परस्परें हें सादरासादर।
योग सज्जनांच्या सुखा नाहीं पार वो ॥४॥

मनुष्यस्वभाव असा आहे कीं, आपणांस प्रिय असणाऱ्या वस्तूचा भोग आपण घेत असतां अथवा तिचें स्वतः वर्णन करीत असतांना जो आनंद होतो. त्यापेक्षां दुसऱ्याच्या तोंडून तिची स्तुति ऐकली म्हणजे अधिक आनंद होतो. कल्पना करा, आपल्या मुलाला आपण कांहीं शिकवलें; त्यानें तें पाठ म्हणून दाखविलें कीं आपणांस आनंद होतो. पण आपले स्नेही कोणी आले व त्यांना मुलानें पाठ केलेलें म्हणून दाखविलें व त्यांनी शाबासकी दिली कीं अधिक आनंद होतो. म्हणूनच पाहुणा घरीं आला कीं त्याला पोरांच्याकडून पाठ केलेलें म्हणून दाखविण्याचा प्रसंग कित्येक वेळां घडून येतो. हा मनुष्यस्वभाव व्यक्त करणारा पुढील मौजेचा प्रसंग पुष्कळांच्या अनुभवांत असेलच. कित्येक वेळां असें घडतें कीं, आपण दुपारीं गप्पा मारण्याकरितां म्हणून एखाद्या आपल्या नातेवाईक स्त्रीकडे जावें व उठतां उठतां आपण सहज म्हणावें कीं, "माई, तुमचा मुलगा किती चांगला आहे. गांवांत खंडीभर मुलें आहेत, पण काय करायचीं! तुमचा बाळू असा सालस आहे कीं, त्याला कोणती गोष्ट कर म्हणून सांगितली आणि तो टाकून गेला असें होतच नाहीं. फारच चांगला मुलगा आहे. येतों बरं!" असें म्हणून आपण जावयाला निघालों कीं माई म्हणतीलच "थांबा, जाऊं नका. चहा ठेवतें, बसा!" या गोष्टींत दिसून येणारा मनुष्यस्वभावच तुकारामबोवा त्या गौळणी देवाची कां चर्चा करतात त्याचें कारण आहे, असें सांगतात.

स्तुति पराविया मुखें रुचिकर।
प्रीतिपात्राच्वा गौरवीं आदर।

दुसऱ्याच्या तोंडून (आपल्या प्रिय वस्तूची) आलेला स्तुति गोड लागते. आपल्या प्रीतीच्या विषयाचा गौरव व्हावा, याविषयीं आपणांस कळकळ असते. तात्पर्य, वरतीं सांगितलेंच आहे कीं, त्यांच्या आवडीचा श्रीहरि एकमेव विषय होऊन बसला होता. आतां त्यांचे श्रीहरीला सोडून इतर

वस्तूवर जें प्रेम दिसत होतें तें श्रीहरिकरितां म्हणून. असें एकवटलेलें प्रेम देवाविषयक असल्यानें त्या एकमेकींशीं देवाच्या गोष्टी बोलत. हेतु असा कीं, आपणांस प्रिय जो श्रीहरि त्याची स्तुति दुसरीच्या तोंडानें का ऐकली कीं आपलें सुप्त प्रेम अधिक उचंबळून यावें. संवादाचा हा मोठा उपयोग आहे. प्रेमळ संवादिया भेटला कीं त्याच्याशीं संवाद करण्यानें आपलें प्रेम दुणावतें. म्हणूनच गौळणी देवाच्या प्रेमानें भरलेल्या, देवाच्या सुखाचा अनुभव घेणाऱ्या पण एकमेकींशीं देवविषयक चर्चा करीत होत्या.

अशा या आदरयुक्त चर्चेंत सांगणारा व ऐकणारा या दोघांना होणारा आनंद कोठवर वर्णन करावा ! सज्जनांचा योग झाला व आवडीचा विषय निघाला म्हणजे त्या संवादापासून मिळणाऱ्या आनंदाला शेवटच नाहीं. अपार आनंद प्राप्त होतो.

परस्परें हें सादरासादर ।
योग सज्जनांच्या सुखा नाहीं पार वो ।।४।।

भगवद्गीतेंतही दहाव्या अध्यायांत अशाच प्रसंगाचें फार उत्कृष्ट वर्णन केलें आहे; व ज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यावर फारच बहारीची टीका केली आहे.

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् । (१०–९)
चित्तें मीचि जाहाले । मियांचि प्राणें धाले ।। जीवों मरों विसरले । बोधाचिया भुली ।। मग तया बोधाचेनि माजें । नाचती संवादसुखाचीं भोजें । आतां एकमेकां घेपे दीजे ।। बोधचि वरी ।। जैसीं जवळिकेचीं सरोवरें ।। उचंबळलियां कालवतीं परस्परें । मग तरंगासी धवळारें ।। तरंगचि होती ।।

ज्ञा. १०. ११९–१२१.

वरील १२१ व्या ओवींत ज्ञानेश्वरमहाराजांनीं या संवादाचें स्वरूप लक्षांत येण्याकरितां फारच उत्कृष्ट असा दृष्टान्त दिला आहे. तुल्य बोधाचे

महात्मे एकमेकांस भेटले असतां त्यांमध्यें होणारी चर्चा कशी असते हें सांगण्याकरितां हा दृष्टान्त आहे. यांत मर्म असें आहे कीं, या घटनेंत दोहों-पैकीं कोणीच अपुरा अथवा रिकामा नाहीं. सामान्यतः वक्ता हा विषयाच्या ज्ञानानें भरलेला व श्रोता हा ग्रहण करण्यास रिकामा असा प्रसंग असतो. पण येथें तसें नव्हे. दोघेही भगवंताच्या ज्ञानानें व प्रेमानें भरलेले. मग कोणीं कोणाला भरून काढावें ? दोघेही परिपूर्णच ! अशा स्थितींत जो संवाद होतो व त्यांतून जो आनंद निर्माण होतो त्याची कांहीं कल्पना यावी म्हणून ज्ञानेश्वरमहाराज वरील ओंवींतील दृष्टान्तांत म्हणतात, "कल्पना करा कीं, फक्त बारीक भिंत मध्यें आहे अशीं एकास एक लागलेलीं सरोवरें आहेत व तीं पाण्यानें तुडुंब भरलेलीं आहेत. वारा सुटला अथवा पाणी झऱ्यांतून उचंबळून वर येऊं लागलें, तर एका सरोवरांतलें पाणी दुसऱ्या सरोवरांत जाऊन तें भरून निघावयाचें असा एकांतही अवकाश नाहीं. मग काय होतें ? तीं दोन्ही सरोवरें पाण्यानें उचंबळून निघतात व एकमेकांवर एकमेकांच्या लाटा आदळतात व वर आकाशांत उंच कल्लोळ उसळी घेतात व लाटांना लाटाच घरें होतात. असाच प्रसंग या संवादांत आहे."

जर त्या सर्व गौळणी भक्तच आहेत मग त्यांचे वेगवेगळे 'भाव' कां ? त्यांच्या वेगवेगळ्या अवस्था कां ? असा प्रश्न उत्पन्न होईल. त्याचें उत्तर तुकाराममहाराज पुढील कडव्यांत देतात—

> भक्तिवालभ न तुटे चराचरीं ।
> आप्त अनाप्त हे ऐशी ठेवी उरी ।
> दुरीं जवळीं संचिता ऐसें धरी ।
> रंगा रंगा ऐसें होणें लागे हरी वो ।। ५ ।।

भक्तिप्रेम हें कधींच तुटत नाहीं. हें जरी खरें असलें तरी देव सर्वांना सारखें प्रेम देतांना दिसत नाहीं. तो आप्त म्हणजे जवळचा व अनाप्त म्हणजे दूरचा असा भेद राखतांना दिसतो. देव असा भेद प्रेम देण्यांत राखतो म्हणूनच भक्तांत वेगवेगळे भाव व त्याच्या उच्चनीच अवस्था दिसतात. असा फरक देव कां राखतो याचें उत्तर तुकारामबोवा पुढीलप्रमाणें देतात—

दुरीं जवळीं संचिता ऐसें घरी ।
रंगा रंगा ऐसें होणें लागे हरी वो ।। ५ ।।

देव हा हवें त्याला हवें तें देईल अशी अनियमित व्यवस्था देवाच्या राज्यांत नाहीं. देव देतो; पण तें ज्याची जशी क्रिया असेल तीप्रमाणें देतो. तो कांहींना जवळ करून आपलें प्रेम अधिक देतांना दिसतो याचें कारण त्याच्यांत भेदभाव आहे अथवा विषमता आहे म्हणून नव्हे, तर ज्याला द्यावयाचें त्याचें पूर्वसंचित तसें आहे म्हणून. देवाजवळ न्याय आहे. भक्तांचीं पूर्वसंचितें भिन्न भिन्न असल्यानें देव त्या संचितास अनुसरून भक्तांस दूर अथवा जवळ करतो. सगळे भक्त खरेच. पण कित्येकांना उच्च भावाचा आनंद मिळालेला दिसतो, तर कित्येकांना खालच्या भावाचा. याचें कारण त्यांचें संचित म्हणजे पूर्वकर्म. तुकाराममहाराज म्हणतात, यामुळेंच देवाला भक्ताच्या वेगवेगळ्या रंगांप्रमाणें म्हणजे अंतर्वृत्तीप्रमाणें वेगवेगळें व्हावें लागतें ।। ५ ।।

तुकाराममहाराज आपणांस त्या गौळणींचा थोडासा संवाद ऐकण्याचें भाग्य लाभलें त्याचा परिणाम शेवटच्या कडव्यांत सांगतात—

तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन ।
आला बाहेरीं प्रेमें वोसंडून ।
पडिलें कानीं त्या जीवाचें जतन ।
धरियेलें एकाभावें हृदयीं चरण वो ।। ३ ।।

तुकाराममहाराज आपणांला त्या देवपिश्या गौळणींच्या संवादाचा कांहीं भाग ऐकावयास मिळाला, हें रूपकानें सांगतात—

तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन ।

मला त्यांच्या भोजनाचें उच्छिष्ट मिळालें. मुखांतून येणारे शब्द हें उच्छिष्टच आहे. तुकारामबोवांनींच एके ठिकाणीं म्हटलें आहे—

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें ।
काय म्यां गव्हारें जाणावें हें ।।

म्हणूनच वरच्या कडव्याचा अर्थ असा आहे कीं, त्या गौळणींचा संवाद झाला त्याचा कांहीं भाग मला ऐकावयास मिळाला. त्याचा परिणाम असा झाला कीं, मी

आला बाहेरीं प्रेमें वोसंडून।

माझ्यांत भगवत्प्रेम न मावून तें उचंबळून बाहेर पडूं लागलें; असा प्रेमानें उचंबळणारा मी. माझ्या कानांवर जे त्यांचे शब्द आले ते मीं जीवाभावानें जतन करून ठेवले आहेत. तसेंच त्या शब्दांचें तात्पर्य जे भगवंताचे चरण ते मीं एकनिष्ठपणें हृदयांत धरून ठेवले आहेत :

पडिलें कानीं या जिवाचें जतन।
धरियेलें एकाभावें हृदयीं चरण वो ॥६॥

तात्पर्य, भगवत्प्रेमानें भरलेल्या गौळणींची देवविषयक चर्चा माझ्या कानांवर आल्यानें माझाही देवविषयक भाव जागृत झाला व हें जें मिळालें तें मीं मोठ्या श्रद्धेनें व काळजीनें हृदयांत राखून ठेवलें. जें राखून ठेवलें तें म्हणजे त्यांच्या चर्चेचा विषय— भगवान् श्रीकृष्णाचे चरण.

भावार्थ संपला.

वरील भावार्थावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, या अभंगांत आपण 'ऐकलेल्या' देवपिश्या गौळणींच्या संवादाची माहिती तुकाराममहाराज सांगतात. ती सांगत असतांना प्रारंभींच ते म्हणतात कीं, ज्या गौळणी भेटल्या व आपला अनुभव एकमेकींस सांगूं लागल्या त्या आपण भोगलेल्या सुखाचे अनुभव सांगत होत्या. त्या आपापले भाव एकमेकींना सांगत होत्या.

एक एकीपाशीं सांगतील भाव।

या अभंगांत त्या गौळणींनीं कोणकोणते भाव व्यक्त केले हें स्पष्ट सांगितलें नाहीं. पण तुकोबांच्या गाथ्यांत इतर जे 'गौळणींचे' व 'काल्याचे' अभंग आहेत त्यांतून दास्य, सख्य, वात्सल्य, कान्तादि अनेक भाव सांपडतात व ते पुढें सांगण्यांतही येतील. पण गौळणी म्हटल्या कीं, सामान्य लोकांच्या मनांत वेगळीच कल्पना येते; म्हणून भावांची चर्चा करण्यापूर्वीं तुकाराम-महाराजांच्या दृष्टीनें या गौळणींचा व भगवान् कृष्णाचा कशा प्रकारचा संबंध

होता हें प्रथम सांगणें अवश्य आहे. आता स्पष्ट सांगावयाचे म्हणजे गौळणी, श्रीकृष्ण व त्यांचे परस्परसंबंध यांसंबंधीं अनेक प्रकारचे प्रवाद पसरलेले आपण ऐकतों. म्हणून तुकोबासारखे संत हे या श्रीकृष्णचरित्राकडे— बाळ-क्रीडेकडे कोणत्या दृष्टीनें पाहातात हें स्पष्ट करणें अत्यंत अवश्य आहे.

पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, जारिणी व जार पुरुष यांचा जसा अनैतिक संबंध असतो तसा गौळणींचा अनैतिक संबंध होता. " डोळे मोडित राधा चाले " अशा तऱ्हेचीं शृंगारात्मक वर्णनें असलेले गौळणींचे अभंग भजनांतून अथवा इतरत्रहि म्हटलेले ऐकण्यांत येतात व श्रोतेहि या रसांत डुंबून गेलेले दिसतात. यांत दोष कोणाचा नाहीं. माणसांना जी सुखानुभूति आलेली असते तिची स्मृति जागृत करणारे शब्द कानांवर आले कीं माणसाची पूर्वस्मृति जागृत होते व त्याला आनंद होतो. विषयानंद हा सुलभ आहे. तो अनेक वेळां भोगलेला असतो. त्याचें वर्णन वा श्रवण केलें कीं त्या भुक्त आनंदाची स्मृति जागृत होते, तो आनंद ताजा झाल्या-सारखा होतो व मनुष्य आनंदांत डोलूं लागतो.

एका पाश्चात्य ग्रंथकारानें आपल्या ' श्रीकृष्ण ' या पुस्तकांत भगवंताचें वर्णन करतांना, ' हा पूर्वेकडे झाला खरा, पण तो आमच्या पंथाचा आद्य संस्थापक होय ', अशी भगवंताची स्तुति केलेली प्रस्तुत लेखकानें वाचली आहे. ती वाचून अर्थातच त्याला आनंद झाला, कीं आपल्या उपास्यदेवतेची पाश्चात्य लोकही स्तुति करीत आहेत. पण थोडें पुढें गेल्यावर तो आनंद लौकरच मावळला. कारण त्या ग्रंथकारानें पुढें असें म्हटलें आहे कीं, ' ज्या पंथाचा श्रीकृष्ण हा आद्य संस्थापक तो पंथ म्हणजे 'नग्न'पंथ (Nudist) होय ! ' चतुर वाचकांस न सांगतांही कळेल कीं, ग्रंथकार हा गोपींचीं वस्त्रें हरण करून बसलेल्या भगवंताचा या ठिकाणीं उल्लेख करीत आहे ! पाश्चात्य लोक असें वर्णन करतील यांत काय नवल आहे ! कारण, ज्या भारतांत भगवान् श्रीकृष्णाचा अवतार झाला व जेथें त्यांनीं गीता सांगि-तली त्या देशांतीलच किती तरी लोक तो स्वैर वर्तनाचा होता असें समजतात. हा समज इतका लांबवर व खोलवर पसरलेला आहे कीं, त्याचा धांडोळा घेतल्याशिवाय तुकारामबुवादि संतांच्या गौळणींचे व

काल्याचे जे अभंग आहेत त्यांची चर्चा करणें व्यर्थ आहे. या विषया-संबंधीं अगदीं सनातनी पद्धतीनें विचार करणारे आहेत त्यांच्यामध्येंही मतभेद आहेत. खुद्द भागवताच्या दशमस्कंदांत रासक्रीडेचें वर्णन आहे तिची व्यवस्था भगवंताच्या अलौकिकत्वावरून लावली आहे. तुकाराम-बुवा वेगळी व्यवस्था लावतात. ती लक्षांत येण्याकरितां त्यांची विचार-सरणी पाहूं.

भगवान् श्रीकृष्णाचें वर्णन करणारे कोण आहेत हें आपण प्रथम पाहूं; व मग त्यांनीं जें वर्णन केलें आहे तें काय आहे व त्याचा काय अर्थ करावयाचा तें पाहूं. कारण, वर्णनाची किंमत वर्णन करणाऱ्याच्या योग्यतेवर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, सासूबाई जांवयाचें वर्णन करूं लागल्या तर ऐकणारानें त्यांतलें किती मानावयाचें व किती टाकावयाचें, याचें उत्तर जर व्यावहारिक भाषेत द्यावयाचें तर नव्याण्णव टक्के बाद करावयाचें व एक टक्का खरें समजावयाचें. वर्णन करणारा हा सत्यवक्ता व ज्या विषयाचें वर्णन करणें आहे त्यांतला तज्ज्ञ असा असावा लागतो. भगवान् श्रीकृष्णाचें वर्णन कोण कोण करीत आहेत व त्यांची काय योग्यता आहे तें आपण पाहूं.

ज्यांनीं एकदां ब्रह्मचर्यव्रताची प्रतिज्ञा केली, ज्यांनीं ती प्रतिज्ञा करावयाचा प्रसंग आणला तेच ती बदलण्याचा आग्रह करीत असतां व प्रतिज्ञा मोडली तरच राज्याला वारस मिळणार, एरव्हीं पेचप्रसंग निर्माण होणार असा बाका प्रसंग प्राप्त झाला असतांही आपली प्रतिज्ञा मोडली नाहीं, असा मनावर ज्यांचा ताबा म्हणून 'भीष्म' म्हणून प्रसिद्ध असलेले जे पांडवांचे आजोबा पवित्र गंगानंदन ते श्रीकृष्णाचें पुढीलप्रमाणें वर्णन करतात:—

पवित्राणां पवित्रं यो मंगलानां च मंगलम् ।
दैवतं दैवतानां च भूतानां योऽव्ययः पिता ।।

जन्मतः संसार ज्यांनीं टाकला असे तुकोबा ज्यांचें वर्णन करतात, सर्व साधुसंतांना वंद्य असे ज्ञानेश्वरमहाराज ज्यांना 'दादुला' म्हणतात ते शुकाचार्यही भगवंताचें वर्णन करतात असें ज्ञानोबारायच म्हणतात —

एऱ्हवीं विषय जिणोनि जन्मले। जे शुकादिक दादुले।
ते विषयोचि वानितां जाहले। भाट ययाचे ।।

—ज्ञानेश्वरी, ११–१७३

शुकाचार्यांच्या तुकोबांनीं व ज्ञानेश्वरमहाराजांनीं केलेल्या वर्णनाला फार महत्त्व आहे. कारण हे हवे त्याला संत म्हणणारे नव्हते. तुकोबा तर एका प्रसंगीं देवांशीं भांडतात. ते म्हणतात—

करिसी तें देवा करी माझें सुखें।
परि मी त्यासीं मुखें न म्हणें संत ।।१।।
जया राज्य द्रव्य करणें उपार्जना ।।
वश दंभमाना इच्छे जाले ।।२।।

तात्पर्य, पवित्र असे हे साधू शुकाचार्यांचें पवित्र म्हणून वर्णन करतात व ते शुकाचार्य भगवंताला पवित्र समजतात. यावरून भगवान् श्रीकृष्ण केवढे पवित्र असले पाहिजेत याची कल्पना होईल.

पण, तुकोबा व ज्ञानेश्वरमहाराज हे काय कमी योग्यतेचे आहेत ? पैठणकर श्रीएकनाथमहाराजांचे गुरुबंधु रामाजनार्दन यांनीं केलेली ज्ञानेश्वर-महाराजांची एक उत्कृष्ट आरती प्रसिद्धच आहे. तिचें पहिलें कडवें पुढील-प्रमाणें आहे:—

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा।
सेविती साधुसंत। मनु वेधला माझा ।। १ ।।

ते म्हणतात, ज्ञानराज असे आहेत कीं, साधुसंत त्यांची सेवा करतात. यांत ज्ञानराजांचें फार मोठें वर्णन आहे. त्यांनीं जर असें म्हटलें असतें कीं राजेमहाराजे अथवा इंद्रादि देव त्यांची सेवा करतात त्यांत जितकें पावित्र्याचें व थोरवीचें वर्णन आलें असतें त्याच्या किती तरी पटीनें वरील कडव्यांत वर्णन आलें आहे. कारण, राजेमहाराजे ज्याला मानतात तो खरा मोठा व पवित्र असतोच असें नव्हे. हे भोगासक्त ‘जियेतें अळुमाळ। रूपागुणाचा चाळढाळ’ अशा एखाद्या स्त्रीच्या कृपाकटाक्षाची

वाट पहात बसणारे सांपडावयाचे ! इंद्रादिक देवही उच्चदर्जाचे, पण भोगासक्तच. ते रंभा-उर्वशी इत्यादिकींच्या कृपाकटाक्षाची अपेक्षा करणारे ! संतांची जातच वेगळी. वैभवाला, भोगाला विटाळ मानणारी ही मंडळी. पण ज्ञानराजांना ' गुरुसेवेलागीं ' शरण जातात. केवढें ज्ञानराजांचें पावित्र्य असलें पाहिजे !

असे ज्ञानराजही भगवंताचें पुढीलप्रमाणें वर्णन करतात––

तंव हृदयकमलआरामु । जो योगियांचा निष्काम कामु
तो म्हणतसे पुरुषोत्तमु । सांगेन आइक ।।

—ज्ञा. अ. ३–३९

रामेश्वरभट्ट ज्यांचें ' तुकितां तुळणेसी ब्रह्म तुकासी आलें । ' म्हणून वर्णन करतात व चाळीस दिवस अन्नपाण्याविना पडून राहिलेले निळोबा

' प्रपंचरचना सर्वहि भोगूनि त्यागिली ।

× × ×

वैराग्याची निष्ठा प्रगटुनि दाखविली ।। '

असें ज्यांचें वर्णन करतात ते तुकोबाही भगवान् श्रीकृष्णाचें पुढीलप्रमाणें वर्णन करतात—

धरियेलें रूप कृष्णनाम बुंथी ।
परब्रह्म क्षितीं उतरले ।।४।।

भगवान् श्रीकृष्णाच्या पावित्र्याचें वर्णन करणाऱ्या आणखीही श्रीएक-नाथ-नामदेवादि महाराष्ट्रीय व परप्रांतीय भगवद्भक्त मिराबाई, चैतन्य, रामकृष्ण परमहंस इत्यादि संतांची यादी देतां येईल. पण स्थलसंकोचास्तव येथेंच थांबूं.

वर जी यादी दिली ती देण्याचा हेतु असा आहे कीं, श्रीकृष्णाचें वर्णन करणारे हे कोण आहेत व काय योग्यतेचे आहेत, हें वाचकांस

कळावें म्हणून. वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, ही सर्व महान् पवित्र अशी मंडळी आहेत. मग फक्त एकच प्रश्न शिल्लक राहातो कीं, ही सर्व मंडळी सामान्य माणसास अयोग्य असें गलिच्छ वर्तन करणाऱ्या स्त्री-पुरुषांचें वर्णन करतील काय? कधींच करणार नाहींत. ही सर्व मंडळी परस्त्रीगमन, परपुरुषार्शी रत होणें याला अति निंद्य पातक समजतात. ज्ञानोबांचा एक अभंग आहे—

अंबुला केला जरी धांवे मन।
बुडती बचाळीस जाती नाक कान ।।

व्यभिचारास पातक समजणारे, अत्यंत पवित्र वर्तनाचे महात्मे श्रीकृष्णाचे वर्णन करतात याचा अर्थ त्यांचा श्रीकृष्णविषयक अनुभव वेगळा होता. ते त्यास साक्षात् परब्रह्म समजत व तसें त्याचें वर्णन करीत. हें सर्व सांगण्याचा हेतु असा कीं, त्यांच्या दृष्टीनें श्रीकृष्ण हा व्यभिचारी तर नव्हताच तर तो परम पवित्र परब्रह्म होता.

बरें, ज्या वयांत श्रीकृष्णाचा व गोपिकांचा संबंध आला त्या श्रीकृष्णाच्या वयाचा विचार केला तरीसुद्धां शरीरानें व्यभिचार घडेल अशा अवस्थेलाही तो पोंचला नव्हता असेंच आढळून येईल.

आणखी या बाबतींत एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. गीतेंत भगवान् अर्जुनाला सांगत आहेत कीं, "अर्जुना, लोकसंग्रहाकरितां म्हणजे लोकांना वळण लावण्याकरितां जे निष्काम झालेले महात्मे आहेत त्यांनीं सदाचाराचेंच वर्तन ठेवलें पाहिजे. इतरांची काय गोष्ट? खुद्द माझ्याकडेच बघ. मला मिळवायचें काय शिल्लक राहिलें आहे? माझें सामर्थ्य केवढें आहे हें तूं जाणतोस. असें असून सुद्धां मी धर्मानें वागतों." जर श्रीकृष्णाच्या पूर्व आयुष्यांत कांहीं लोक समजतात असा गडबडगुंड्याचा भाग असता तर अर्जुनानें लगेच म्हटलें असतें, 'ठाऊक आहे. करून करून भागले आणि लोकोद्धाराला लागले.' असें तर म्हणत नाहीं. उलट म्हणतो,

परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।।

गी, अ. १०-१२

'माझें चुकलें. मला तुझी ओळख झाली नाहीं. तूं सुभद्रेचा भाऊ म्हणूनच तुझ्याशीं वागत गेलों, पण तूं पवित्र परब्रह्म आहेस.' शेवटचा एक असाच महत्त्वाचा विचार मांडून हा भाग आटपूं.

नारद हे भक्तिशास्त्राचे आचार्य. त्यांचीं सूत्रें संख्येनें थोडीं पण परिणामानें फार मोठीं आहेत. अत्यंत गोड अशीं तीं सूत्रें आहेत. ज्याला थोडक्यांत भक्तिरहस्य समजावून व्यावयाचें असेल त्याला तर इतकें उत्कृष्ट दुसरें पुस्तक नाहीं असें म्हणतां येईल. इतकीं तीं चांगलीं आहेत. त्यांत नारदांनीं 'सात्वस्मिन् परमप्रेमरूपा' अशी भक्तीची व्याख्या करून तिचें विशदीकरण करीत असतांना पूर्वींच्या मोठमोठ्या गर्गादि ऋषींच्या व्याख्या देऊन नंतर आपली पुढीलप्रमाणें व्याख्या दिली आहे—

नारदस्तु तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे
परमव्याकुलता इति ।।१९।।

यावर प्रश्न असा उत्पन्न होतो, कीं देवाकरितां अशी व्याकुळता उत्पन्न झालेली तुम्हांला कोठें दिसली का ? तर त्यावर नारद उत्तर देतात—

यथा व्रजगोपिकानाम् ।।२१।।

"अशी गोकुळांतल्या गौळणींची अवस्था होती."

यावर शंका अशी उत्पन्न होते कीं, गौळणींचें कसलें उदाहरण देतां ! त्या तर व्यभिचारिणी, जारिणी होत्या. या शंकेस उत्तर म्हणून नारद फार महत्त्वाचे उद्गार काढतात--

तत्रापि न माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः ।।२२।।
तद्विहीनं जाराणामिव ।।२३।।

लोकांचा या गोकुळनिवासिनी गोपस्त्रियांच्या संबंधानें गैरसमज आहे. त्या श्रीकृष्णाला 'जार' समजत नसत. जारिणीला आपल्याकडे येणारा परपुरुष हा 'श्व' वृत्तीचा वाटत असतो; पण पोट जाळण्याकरितां अथवा इंद्रियांच्या पंगिस्तपणामुळें तिला निंद्यकर्म करावें लागतें ऐवढेंच. पण तिची अशा पुरुषासंबंधीं भावना तो उच्च आहे अशी कधींच नसते. याच्या उलट त्या गोपिकांची मनःस्थिति होती. त्या श्रीकृष्णास 'देव' समजत. तात्पर्य,

कांहीं लोक समजतात त्याप्रमाणें श्रीकृष्ण व गौळणी यांचा अनैतिक शारीरिक संबंध नव्हता असा या सर्व संतांचा समज होता; व तशाच दृष्टीनें त्यांनीं वर्णन केलें आहे.

तुकारामबोवा तर म्हणतात, व्यभिचार संभवेल कोठें ? त्या श्रीकृष्णाला पाहिलें कीं देहभानविवर्जित होत. तुकारामबोवांनीं गोकुळांतील मुलीबाळी, बाया यांची बाल श्रीकृष्णाला पाहिलें असतां काय स्थिति होत असे याचें एका अभंगांत वर्णन केलें आहे. त्यांत ते म्हणतात—

मिळोनिया याती । येती नारी कुमारी बहुती ।
नाहीं आठव त्या चित्तीं । देहभाव कांहीं ।
विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेकुरें ।।
धाक सांडोनियां येरें । तान भूक नाहीं ।।

या सर्व सांगण्याचा मथितार्थ असा आहे कीं, गौळणींनीं भगवंताशीं अनैतिक संबंध जोडला नाहीं. त्यांचा मोठेपणा याच्यांत आहे कीं, आपल्या गृहकृत्यांत कुशल असून योग्य कर्माचरण करीत असतां त्यांनीं प्रेम भगवंतावर ठेवून भक्ति साधली. त्या मोठ्या भक्त होत्या. एकदां कबिरांची एकानें भक्त म्हणून स्तुति केली. त्यावर कबीर म्हणाले, "माझी काय स्तुति करतां ? एका गौळणीच्या प्रेमाच्या पाण्यांत माझ्यासारखे कोट कबीर वाहात जातील." तुकारामबोवा स्वच्छ म्हणतात:—

व्यभिचार भावें भोगिलें अनंता
वर्तोनि असतां घराचारी ।।

म्हणून

तुका म्हणे त्यांचा धन्य व्यभिचार ।
साधिलें अपार निजसुख ।।

येथें याचसंबंधींच्या उत्पन्न होणाऱ्या आणखी एका प्रश्नाची थोडी चर्चा करून व भाव सांगून हें संकीर्तन समाप्त करूं.

गौळणी भक्त होत्या व त्यांचें देवावर नितान्त प्रेम होतें हें खरें. पण प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, तें सांगण्याकरितां 'व्यभिचाराचें' असें रूपक

कां केलें ? त्याचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, आपल्या पतांबरोबर संसार करणारी जी पतिव्रता स्त्री तिला भक्ताला ज्या विरहावस्थेंतून जावें लागतें, जो त्याग करावा लागतो तो करावा लागत नाहीं. जुन्या काळचा विधियुक्त प्रपंच असल्यानें वडीलधाऱ्या मंडळींच्या संमतीनेंच विवाह झालेला असतो. पण जारिणी स्त्रीचें तसें नसतें. तिच्या या पापकृत्यास कोणाची संमति नसते. यामुळें तिला या गोष्टी चोरून कराव्या लागतात. गुपित फुटलें तर निंदा, फजिती होण्याची भीति असते. म्हणून तुकाराम-बोवांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे—

परपुरुषाचें सुख भोगे तरी। उतरोनि करीं घ्यावें शीस ॥

भक्ताचीही कथा अशीच असते. तो भक्ति करूं लागला तर त्याला घरची प्रापंचिक मंडळी ती करूं देत नाहींत, उलट त्याच्या मार्गांत फांदे घालतात. म्हणून कोणास न कळवतां त्याला भजनपूजन करावें लागतें. शेवटीं प्रपंचावर पाणी सोडण्याचीही तयारी करावी लागते.

तुकारामबोवाच स्वतःसंबंधीं एके ठिकाणीं म्हणतात——

जाळूनि संसार बैसलों अंगणीं। तुझें नाहीं मनींमानसीं हें ॥

जारिणी व भक्त यांत असें त्यागाचें साम्य आहे. दुसरें असें कीं, जारिणीला परपुरुषाचें सतत चिंतन असतें. ती जरी घरांत असली तरी चिंतन परपुरुषाचें अशी तिची स्थिति असते. भक्ताचेंही तसेंच. त्याचें शरीर प्रपंचांत असतें, पण मन भगवंताकडे लागलेलें असतें. ‘ दळी कांडी लोकां ऐसें । ’ पण खरोखर तो तेथें नसतो. तुकारामबोवा या संकीर्तनाच्या अभंगांत म्हणतात त्याप्रमाणें ‘ सर्वसाक्षी तेथें ’ त्याचा जीव असतो.

भक्ताच्या या भगवंताच्या वेधानें होणाऱ्या अवस्था सांगण्यास भाषेनेंही मदत केली म्हणून हें रूपक करणें सोईचें झालें. परमात्मा हा प्रकृतीपलीकडे असल्यानें त्याला ‘ पर ’ पुरुष म्हणतात. जारालाही ‘ परपुरुष ’ म्हणतात. पण दोन्हींत जमीन-अस्मानाइतकें अंतर ! पण भाषेची मौज म्हणून तिचा उपयोग करून साधुमहात्मे भगवंताच्यावरील भक्तांच्या प्रेमाचें या रूपकानें वर्णन करतात.

याबाबत तुकोबांचा व ज्ञानोबामाउलीचा एक एक अभंग देतों, म्हणजे सर्व खुलासा होईल. तुकोबा म्हणतात--

आधिल्या भ्रतारें काम नोहे पुरा।
म्हणऊनि व्यभिचारा टेकलिये ।। १ ।।
रात्रंदिवस मज पाहिजे जवळीं।
क्षण त्या निराळीं न गमे घडी ।। २ ।।
नामगोष्टीमाजि सोय सांडा आतां।
रातलें अनंता तुका म्हणे ।। ३ ।।

माउली म्हणते—

पतिव्रता मी परद्वारिणी। परपुरुषेसी व्यभिचारिणी ।।

परद्वार करतें म्हणून पतिव्रता! देहतादात्म्य घेणारा जीवात्मा हा आपल्या स्वरूपास सोडून, देहाशीं तादात्म्य करतो म्हणून "व्यभिचारी"; व जो देहतादाम्य सोडून स्वस्वरूपा (प्रकृतीपलीकडील म्हणून पर) च्या ठिकाणीं रत होतो तो 'पतिव्रता.'

तात्पर्य, भक्ताच्या प्रेमाच्या अवस्था सांगण्यास हें व्यभिचाराचें रूपक सोईचें म्हणून, रूपकानें भक्तीचें वर्णन आहे, ही खूण वाचकानीं विसरूं नये. अशा रूपकाची शक्यता भक्तिमार्गातील अनुभव सांगतांनाच आहे. हठयोगांतील अनुभव सांगतांना या सोई नाहींत. त्या योगांत अंतःकरणांतील भाव व त्यांना कारण असणारा संकल्प मुळांत नाहींसा करण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. पतंजलीच्या योगसूत्रांतील दुसरेंच सूत्र--

योगश्चित्तवृत्तिनिरोधः।। २ ।।

असें आहे. ही भक्तिमार्गातील सुलभता प्रसिद्धच आहे. यांत मन, इंद्रियें कोंडावीं लागत नाहींत. कारण कोंडणाऱ्यास फारसें यश येत नाहीं. नाथमहाराज म्हणतात—

इंद्रियें कोंडिलीं न कोंडिती। विषय सांडितां न सांडिती।
पुढतपुढती बाधों येती। यालागीं हरिभक्ति द्योतिली

वेदें ।। योगी इंद्रियें जे कोंडिती । ते भक्त लाविती भगवद्भक्ति ।। .,....... —नाथ भागवत. २. २८६–८७

भक्तिमार्गांत भक्त मनाच्या वृत्तींना देवाची मोहोर लावतो, त्या डांबून नाहींशा करीत नाहीं. त्या देवाकडे लावणें सोपें. कारण त्यांना अंतर्मुख करून निरालंब स्थितींत ठेवणें म्हणजे प्रवाहाविरुद्ध पोहण्यासारखें आहे. उलट त्यांना देवाकडे लावणें म्हणजे पाणी वाहातच आहे तें कांदामुळ्या-ऐवजीं उंसाला देण्यासारखेंच आहे.

भक्त हा आपल्यांत उत्पन्न होणारे सर्व संकल्प देवाला वाहतो. ह्या आत्मसमर्पणाचें वर्णन ज्ञानेश्वरींत नवव्या अध्यायांत उत्कृष्ट केलें आहे.

जे अहंकार वाहत आंगीं । आम्ही हरीचे भूषावयालागीं ।
जे लोभिये एकचि जगीं । माझेनि लोभें ।।

जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि प्रेमें सप्रेम ।
जे माझिया भुली सभ्रम । नेणती लोक ।।

ज्ञाने. अ. ९, ओ. ३६२–६३.

× × ×

जयांचिय वाचें माझे आलाप । दृष्टी भोगी माझेंचि रूप ।
जयांचें मन संकल्प । माझाचि वाहे ।।

माझिया कीर्तीविण । जयांचें रितें नाहीं श्रवण ।
जया सर्वांगीं भूषण । माझी सेवा ।।

जयांचें ज्ञान विषो नेणें । जाणिव मज एकांतेंचि जाणे ।
जयां ऐसें लाभे तरी जिणें । एऱ्हवीं मरण ।।

ज्ञा. अ. ९, ओ. ४४५–४७.

भक्तानें असें आत्मसमर्पण केलें, कीं देव त्याच्यावर कृपा करतो व आंपलें दिव्य ( Super-Sensous ) स्वरूप दाखवितो. बुद्ध्यादिकरणांचा प्रकाश इंद्रियांचा विषय होतो असा भक्तीचा उत्कर्ष आहे.

वृत्तींना देवाचें वळण लावण्याकरितां भक्तिशास्त्रांतील अधिकारी पुरुष, मनाचा प्रेम करण्याचा जो स्वभाव आहे त्याचा फायदा घेऊन भक्ताच्या स्वभावानुरूप देवावर भाऊ म्हणून, बालक म्हणून, सखा म्हणून, 'प्रिय' म्हणून—इत्यादि वेगवेगळ्या प्रकारच्या भावनांचा आश्रय करून—देवाकडे मन लावावें असें शिकवतात. नारदांनीं आपल्या सूत्रांत पुढीलप्रमाणें अकरा भाव सांगितले आहेत :—

गुणमाहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति, दासासक्ति, सख्यासक्ति, कांतासक्ति, वात्सल्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति, तन्मयतासक्ति, परमविरहासक्तिरूपा एकधाप्येकादशधा भवति ।। ८२ ।।

भक्ति एकच, पण तिचे भावनेप्रमाणें अकरा प्रकार होतात. 'एक गहूं, प्रकार बहू' अशी म्हण आहे. तसेंच येथेंही आहे. एकाच गव्हाचे आवडीप्रमाणें पुरी, मांडा, वगैरे प्रकार करतात. तसेंच देवाकडे कधीं बाल म्हणून बघून भक्त आनंद भोगतो; कधीं तो स्वामी आपण सेवक समजून आनंद भोगतो; कधीं आपण पत्नी व देव पति म्हणून आनंद भोगतो. अशा रीतीनें भक्त हा भगवंताचा आनंद वेगवेगळ्या प्रकारानें चाखतो; व त्या भावनेप्रमाणें देव तसतसा होतो, भक्तांच्या अनुभवास येतो.

तुमच्या भावासारिखा देवो होईल । —ज्ञानेश्वर

जेणें जेणें जैसें ध्यावें । तैसें व्हावें कृपाळें ।। —तुकोबा

तुकाराममहाराजांनीं या संकीर्तनाच्या अभंगांत ज्याचा उल्लेख केला आहे तो संवाद भिन्नभावांच्या एकत्र आलेल्या गौळणींचा होता व त्या गौळणी एकमेकींना आपले भाव सांगत होत्या. त्यांतले कांहीं भाव व्यक्त करणारे अभंग पुढें देत आहों—

( १ ) वात्सल्यासक्ति आणि रूपासक्ति—

( अ ) बाळपणीं हरी । खेळे मथुरेमाझारी । पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी । मुख पाहे माता । सुख न माये चित्ता । धन्य मानवे संचिता । वोडवलें आजी ।।१।।

बाळ चांगलें वो। बाळ चांगलें वो। म्हणतां चांगलें वो। वेळ लागे तया बोलें। जीवापरीस ते वाल्हें। मज आवडतें ॥ २ ॥

(आ) काय उणें कां करितोसी चोरी। किती सांगों तुज नाइकसी हरी। परेपरता तूं पळोनि जासी दुरी। अनावर या लौकिका बाहेरी वो॥ १ ॥ माया करुणा हे करिते बहुत ॥ धृ० ॥

याच भावाचें श्रीनामदेवांचें पुढील कडवें बघण्यासारखें आहे--

(इ) बाळ सगुण गुणाचें तान्हें गे। बाळ दिसतें गोजिरवाणें गे। काय सांगतां गान्हाणें गे। गोकुळींच्या नारी ॥१॥ श्रीरंग माझा वेडा गे। याला नाहीं दुसरा जोडा गे। तुम्ही याची संगत सोडा गे। गोकुळींच्या नारी ॥२॥

(२) रूपासक्ति---

मुख डोळां पाहे। तैशीच तें उभी राहे॥

(३) सख्यासक्ति---

तुझिये संगती। जाली आमुची निश्चिंती॥ १ ॥
नाहीं देखिलें तें मिळे। भोग सुखाचे सोहळे॥ २ ॥
घरीं ताकाचें सरोवर। येथें नवनीताचे पूर॥ ३ ॥
तुका म्हणे आतां। आम्ही न वजों दवडितां॥ ४ ॥

× × ×

बहु बरा बहु बरा। या सांगातें मिळे चारा॥ १ ॥
म्हणोनि जीवेंसाठीं। घेतली कान्होबाची पाठी ॥२॥

× × ×

पुढती पुढती तुका। सोंकला सोंकवितो लोकां॥ ३ ॥

(४) परमाविरहासक्ति--

नका कांहीं उपचार माझ्या शरीरा ।
करूं न साहावे मज बहु होतो उबारा ।
मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा ।
लवकरी आणा नंदाचिया कुमरा ।। १ ।।
सखिया वेशिया तुम्ही प्राणवल्लभा ।। ध्रु० ।।

( सर्व अभंग )

(५) तन्मयतासक्ति--

(अ) कोणी एक भुलली नारी ।
विकितां गोरस म्हणे घ्या हरी ।। १ ।।
देखिला डोळा बैसला मनीं ।
तोचि वदनीं उच्चार ।। २ ।।

(आ) मैं भूली घरजानी बाट ।
गोरस बेचन आये हाट ।। १ ।।

( इ ) चिरें चोळया त्या धुतां विसरती ।
ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती ।
कोणा नाठवे कोण कुल याती ।
झालीं तटस्थ सकळ नेत्रपातीं वो ।।

( ई ) दन्तधावनाचा मुखामाजि हात ।
वाद्यें वाजती नाइके जन मात ।
करी श्रवण कृष्णवेणुगीत ।
स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो ।।

(६) कांतासक्ति--

हरि तुझी कान्ति रे सावळी-- ।

वेगवेगळ्या भावांनीं भक्ति करणाऱ्या गौळणींच्या संवादाचें नारदभक्ति-सूत्र व भागवत या ग्रंथांतही वर्णन आलेलें आहे.

कंठावरोधरोमांचाश्रुभिः परस्परं लपमानाः पावयन्ति कुलानि पृथिवीं च ।। ( नारदभक्तिसूत्र–६८ )

**अर्थ**—असे भक्त प्रेमानें कंठ दाटून येत आहेत, शरीरावर अष्ट सात्त्विकभाव उत्पन्न होत आहेत, निरंतर प्रेमाश्रूंचें स्नान घडत आहे, अशा तऱ्हेनें नारायणाच्या दिव्यकथा परस्परांस सांगत-ऐकत असतात. ते दोहींकडचीं कुळें पावन करितात.

(१) परस्परानुकथनं पावनं भगवद्यशः ।
मिथोरतिर्मिथस्तुष्टि निवृत्तिर्मिथ आत्मनः ।।

(२) स्मरन्तः स्मारयन्तश्च मिथोऽघौघहरं हरिम् ।
भक्त्या संजातया भक्त्या बिभ्रत्युत्पुलकां तनुम् ।।

भागवत अ. ३, ३०–३१

**अर्थ**—(१)–जें भगवंताचें पवित्र यश त्याचें परस्परानुकथन म्हणजे एकमेकांस कथन करावें. आणि अशा रीतीनें साधकांनीं एकत्र होऊन एकमेकांवर प्रेम करावें, संतुष्ट रहावें व प्रपंचापासून निवृत्त होऊन आध्यात्मिक शान्तीचा अनुभव घ्यावा.

(२) साधनभक्तीनें उत्पन्न झालेल्या प्रेमलक्षणभक्तीनें पापसमूहाचें हरण करणाऱ्या हरीचें स्मरण करणारे आणि परस्पर स्मरण करविणारे भक्त रोमांचित तनु धारण करतात.

तुकाराममहाराज अशाच एका संवादाचें वर्णन या अभंगांत करतात—

स्वयें सुखाचे झाले अनुभव ।
एक एकीपाशीं सांगतील भाव ।
अवघ्या अवघा हा कैसा नवलाव ।
सर्वसाक्षी तेथें त्यांचा जीव वो । ।।१।।

आपण नेहमीं संवाद ऐकतों ते दुःखाचे अनुभव एकमेकांना सांगणाऱ्यांचे अथवा सुखदुःखाच्या गोष्टी करणाऱ्यांचे. गौळणींचा संवाद हा दोन कारणांकरितां अलौकिक होय. एक तर तो अशाविषयींचा आहे कीं, ज्याचा 'वक्ता' सुदुर्लभ आहे. देवाची आवड उत्पन्न होऊन त्याकरितां प्रयत्न करणारा कोट्यवधि माणसांत एखादा. अशा प्रयत्न करणाऱ्यांत प्रयत्नास यश येऊन भगवद्दर्शन झालेला त्यांतही एखादाच! भगवान् म्हणतात--

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद् यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन् मां वेत्ति तत्त्वतः ॥१॥

गी. अ. ७-३

जेथें भगवंतासंबंधीं अनुभव घेऊन एखादा बोलणारा विरळा तेथें अनेक मिळून जर त्याच्या गोष्टी करूं लागले तर उपनिषदांतील भाषेंत सांगावयाचें तर तें 'आश्चर्य'च होय.

दुसरी गोष्ट अशी कीं, हा केवळ सुखाचा संवाद.

भगवंताच्या सुखानें सुखरूप झालेल्या महात्म्यांच्या आंत न मावल्यानें उचंबळून येणारा हा आनंद होय. तुकाराममहाराज या संवादाला केवढी किंमत देतात तें या अभंगाच्या शेवटच्या कडव्यावरून व्यक्त होणारें आहे. ते म्हणतात, मला हा संवाद थोडासा ऐकावयाला मिळाला. पण त्यानें तृप्ति व आनंद इतका मिळाला कीं, मी भगवत्प्रेमानें इतका भरून गेलों कीं, तें प्रेम माझ्या आंत न मावतां (अभंगरूपानें) बाहेर पडत आहे.

तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन ।
आला बाहेरी प्रेमें वोसंडून ।
पडिलें कानीं त्या जीवाचें जतन ।
धरियलें एका भावें हृदयीं चरण वो ॥६॥

धन्य ते श्रोते, कीं ज्यांच्या कानांवर अशा पावन संवादाचीं अक्षरें पडतील!

# गौळण

मैं भूली घरजानी वाट । गोरस बेचन आयें हाट ॥ कान्हा रे मनमोहन लाल । सबही बिसरूं देखें गोपाल ॥२॥ काहां पग डारूं देखे आनेरा । देखें तो सब वोहिने घरा ॥३॥ हुं तो थकित भई रे तुका । भागा रे सब मनका धोका ॥४॥

या संकीर्तनाचा अभंगही ‘ गौळणी ’ या प्रकारांतलाच आहे. मागील अभंगांत साधुसंतांच्या दृष्टीनें गौळणींची सामान्य भूमिका लक्षांत यावी येवढ्याकरितां तुकोबांची ती भूमिका सांगणारा अभंग घेतला, व त्याचें स्पष्टीकरण करतांना त्या गौळणींचे वेगवेगळे भाव म्हणजे भगवंताकडे बघण्याची दृष्टि दाखवणारे अभंगही दिले. प्रस्तुतच्या संकीर्तनाकरितां गौळणींना कसे अनुभव येत, याचा एक एक नमुना म्हणून हा अभंग घेतला आहे.

प्रसंग असा आहे कीं, एक गौळण तुकोबांना आदल्या दिवशीं घडलेली हकीगत सागत आहे. जी घटना घडल्याची ही गौळण सांगते ती घटना बाजारांतच झाल्यानें तिचा गवगवा गांवांत स्वाभाविकच फार झाला होता. घटना घडल्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या दिवशीं त्या गौळणीचे स्नेही तुकोबा त्यांची व तिची गांठ पडली व तुकोबांनीं तिला त्याबाबत प्रश्न केला. त्या प्रश्नावरून ती गौळण जें घडलें तें सांगत आहे. ती म्हणते—

गोरस म्हणजे गाईचें दूध, दहीं वगैरे विकण्याकरितां म्हणून मी बाजाराला आलें व माझी देहस्मृति नाहींशी झाली. मी घरीं जाण्याचा मार्गच विसरलें !

मैं भूली घरजानी वाट । गोरस बेचन आयें हाट ॥१॥

तुकोबांनीं विचारलें असावें कीं, असें काय झालें कीं, तुला इतका विसर पडावा कीं, तूं आपल्या घरचा रस्ताच विसरलीस व वेड्यासारखी बाजारांत उभी राहिलीस ?

याचें उत्तर ती पुढालप्रमाणें देते--

कान्हा रे मनमोहन लाल। सबही बिसरूं देखें गोपाल ॥२॥

" काय सांगूं तुकोबा, माझा प्रिय, मनाला मोहून टाकणारा, चित्तचोर, कान्हा, नंदनंदन गोपाल आहे ना ! त्याला मी पाहिलें आणि काय होतें कोणास ठाऊक ! सगळ्यांचा विसर पडतो. तसेंच झालें. मी आलें बाजाराला आणि तो कान्हा मला बाजारांत दिसला. झालें, मी घरची वाटच विसरलें !'

यावर तुकोबांनीं म्हटलें असावें, " अग, रस्ता विसरलीस खरें. पण कांहीं वाट चालून दोन-चार वाटांपैकीं घरची कोठची म्हणून कांहीं पहाण्याचा प्रयत्न केलास कीं नाहींस ? "

त्यावर ती म्हणते-" तुकोबा, तुम्हांला माझ्या स्थितीची कांहीं कल्पना येईल म्हणून सांगत्यें; इतरांना खरेंसुद्धां वाटणार नाहीं. अहो, माझ्या डोळ्यांना जो गोपाल दिसत होता त्याविरहित कोठें तरी पाऊल टाकून घराचा रस्ता सुधारावा म्हणून तो नाहीं अशा ठिकाणीं पाऊल टाकण्याचा मीं प्रयत्न केला. पण आश्चर्यांतलें आश्चर्य घडून आलें ! वरतीं, खालीं, उजवीकडे, डावीकडे-सगळीकडे त्यानेंच व्यापलेलें मला दिसलें ! त्याविरहित पाय ठेवायला ठिकाणच आढळेना ! "

काहां पग डारूं देखे आनेरा। देखें तो सब वोहिने घेरा ॥३॥

यावर तुकारामबोवा म्हणाले असावेत कीं, " असें हें एकदम कांहीं झाल्यानें तूं घाबरून गेली असशील ! " त्यावर ती गौळण म्हणते, " छे, मला आश्चर्य वाटलें; पण त्या आश्चर्यमय अनुभवाच्या योगानें मी घाबरून तर गेलें नाहींच, उलट माझ्या मनांतली भीति पार नाहींशी झाली. मी बेडर झालें. "

हुं तो थकित भई रे तुका। भागा रे सब मनका धोका ॥४॥

अगदीं थोडक्यामध्यें या संकीर्तनाच्याअभंगाचा भावार्थ सांगितला. आतां थोडें तपशिलांत शिरूं या.

ही गौळण जो आपला अनुभव सांगते हा कोणत्या जातीचा आहे व त्याकरितां ही गौळण कोणत्या जातीची आहे तें पाहूं. " गौळणी त्या गौळणी. त्यांत आणखी जाती कसल्या ? " असें कोणी वाचक म्हणण्याचा संभव आहे. त्यावर उत्तर असें आहे कीं, ज्या तुकोबांचा हा अभंग आहे तेच तुकोबा गौळणींच्या जाती अथवा प्रकार सांगतात. ते म्हणतात :

कोणी सुना कोणी लेकी। कोणी एकी सतंता ॥१॥

त्या गोकुळांत कांहीं सुना, कांहीं लेकी व कांहीं सतंता ( म्हणजे स्वतंत्र म्हणजे सास्वा ) होत्या. हे जे प्रकार तुकारामबोवांनीं सांगितले ते आपणांस नेहमींच आढळतात व म्हणूनच त्याचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. उलटपक्षीं,हे नेहमींचेच प्रकार असतांना तुकारामबोवा मुद्दाम कां सांगतात, असेंही वाटणें शक्य आहे; व प्रस्तुत प्रसंगीं हाच महत्त्वाचा विचार आहे. एरवीं ही कांहीं मोठी आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट नव्हे. ज्या अर्थीं तुकोबा सांगतात त्या अर्थीं त्याच्या पाठीमागें थोडा विविक्षित अर्थ असला पाहिजे व तुकोबा ज्या भागवत संप्रदायाच्या परंपरेंतले होते त्याचा विचार करतां व त्यांनीं सासूकरितां जो ' सतंता ' शब्द वापरला आहे तो लक्षांत घेतां हा जो भेद त्यांनीं केला त्याला विविक्षित अर्थ आहे असें सहज लक्षांत येईल. ' सासू ' चा वाचक त्यांनीं 'सतंता' म्हणजे स्वतंत्र ह्या अर्थाचा शब्द वापरला आहे. यामध्येंच तत्कालीन हिंदु समाजाच्या कौटुंबिक परिस्थितीचें चित्र प्रतिबिंबित झालें आहे व त्यास अनुलक्षून सून व लेंक या शब्दाचे अर्थ करणें आवश्यक आहे.

आतां आपली सामाजिक परिस्थिति इतकी बदलली आहे कीं, तीनशें वर्षांपूर्वींच्या समाजस्थितीवर उभारलेलें रूपक समजणें थोडेंसें कठिण जाणार आहे. आतां मुलगे व मुली इतक्या स्वतंत्रपणें वावरतात कीं, कित्येक प्रसंगीं तीं आपापलीं लग्नें ठरवून आपल्या स्नेह्या-सोबत्यांस व आपल्या गुरुजनांना लग्नास उपस्थित राहण्याचें आमंत्रण जोडप्या नें जाऊन देतात. तथापि अजून रूपक न समजण्याइतका काळ पूर्वस्थिति व

हल्लींची स्थिति यांत गेला नाहीं. तरी पण तुकोबांच्या अभंगाचें मर्म समजण्याकरितां जुन्या काळांतील सून, लेक, सासू यांचें जीवन लक्षांत घेऊन त्या शब्दाचे अर्थ सांगणें अवश्य आहे. म्हणून त्या दृष्टीनें थोडासा विचार करूं.

आपल्याकडील कुटुंबव्यवस्थेंत सासूला मोठें स्थान आहे. ती घरांतील मालकीण. मालकीण याचा अर्थ सामान्यतः नोकरवर्गावर सत्ता चालवणारी असा केला जातो. पण पुष्कळ घरांतून जी परिस्थिति आढळून येई त्याचा विचार करतां एका दृष्टीनें ' मालकीण ' या शब्दाचा अर्थ ' मालक जिच्या ताब्यांत ती ' असा केला तरीसुद्धां चालेल इतकी स्वतंत्रता तिला असते. तिला देवदर्शनाला जावयाचें आहे अथवा मैत्रिणीकडे बसावयास जावयाचें आहे तर तिला यजमानांची परवानगी घ्यावी लागत नसे. ती स्वतंत्र होती.

त्याच्या उलट ' सूनबाई '. ही पुढें मालकीण होईल तेव्हां होवो. पण ज्या अवस्थेंत ती ' सूनबाई ' म्हणून ओळखली जाते त्या अवस्थेंत ती पारतंत्र्याची मूर्तीच समजली जाई, इतकी परतंत्र होती. पति, सासू, सासरा, नणंदा, वगैरे घरांतील माणसें उठण्याच्या आंत तिनें सकाळीं उठावयाचें, व रात्रीं सर्व मंडळी निजावयास गेली, घरांतील झाकपाक झाली म्हणजे शेवटीं तिनें निजावयास जावयाचें. मध्यंतरींसुद्धां बहुतेक कामें हिलाच करावयास लागावयाचीं. सासूबाईनीं जेवणानंतर अंग टाकलें व हिचें काम संपलें असलें तरच हिला दुपारीं थोडें अंग टाकावयास मिळावयाचें. नाहीं तर डाळतांदूळ निवडणें वगैरे कामें आहेतच. बरें, इतकें सर्व करूनही त्या कामाचें चीज सासरचीं माणसें करतीलच असा नियम नाहीं. त्यांत लवंगी मिरचीसारखी घरांत लहान नणंद असली मग तर विचारूंच नका ! तिच्या कागाळ्या आणि तिचा कड घेऊन बोलणाऱ्या सासूबाईचे वाग्बाण, हे सर्व तिला सहन करावे लागत. बरें, इतकें होऊनही बाहेर घर सोडून जावयाचें म्हटलें तर सासूबाईच्या परवानगीवांचून अशक्यच ! सर्व काळ ती परतंत्रच.

घरांत जी लेक म्हणून नांदत असे तिचा थाट वेगळाच. ती कांहीं स्वतंत्र, कांहीं परतंत्र अशी असे. तिला सर्वांच्या आधीं उठण्याचें प्रयोजन

नाहीं. उलट जर सासरहून आली असली व तिचा धाकटा भाऊ तिला लवकर उठवीत असला तर आईच स्वयंपाकघरांतून ओरडे, " निजूं दे तिला. दमली आहे सासरीं काम करून." बरें, तिला मैत्रिणीकडे जावयाचें असलें तर आईच्या परवानगीची आवश्यकता नाहीं. नुसतें, ' 'आई, मी जातें ग." एवढें बोलून गेली म्हणजे झालें. इतकी ती स्वतंत्र आहे. पण तिलाही थोडें पारतंत्र्य आहेच. घरांतून बाहेर जावयाचें म्हटलें कीं तिला आईला, " अमकीकडे जाते " म्हणून कळवूनच जावें लागे. तात्पर्य, सासूबाई स्वतंत्र, सूनबाई परतंत्र, व लेक कांहीं स्वतंत्र व कांहीं परतंत्र. तुकारामबोवा ' गौळणीं'त " कोणी सुना कोणी लेकी। कोणी एकी सतंता ॥" असे तीन प्रकार होते म्हणून जे सांगतात ते याच तत्त्वावर केलेले आहेत.

सुज्ञ वाचकांस सांगावयास नको कीं, हेंही एक प्रकारचें रूपक आहे, व तद्द्वारा भक्ताच्या स्वातंत्र्याचें व पारतंत्र्याचें ते वर्णन करीत आहेत. आम्ही भक्ताच्या स्वतंत्रेचें व पारतंत्र्याचें हें रूपकानें वर्णन आहे असें म्हटलें कीं या विषयास अनभिज्ञ अशा वाचकांस वाटेल कीं, भक्ताच्या बाबतींत हा प्रश्न कसला ? तर त्याचें उत्तर असें आहे कीं, भक्त हा देवाच्या प्राप्तीकरितां प्रयत्न करीत असतो, व म्हणून त्याच्यापुढें हा प्रश्न उत्पन्न होतो. वास्तविक सर्वांना विधि म्हणजे शास्त्राज्ञा हिचें पारतंत्र्य आहे, म्हणजे तिची आज्ञा सर्वांनीं पालन केलीच पाहिजे, असा वैदिक शास्त्रीय पद्धतीप्रमाणें तुकारामबोवांचाही दण्डक आहे. ते म्हणतात—

> शिखासूत्र तुझा गुंतला जमान। तोंवरी तूं जाण श्रुतिदास। त्याची तुज कांहीं चुकतां हे नीत। होशील पतित नरकवासी ॥

या भक्ताची शास्त्रावर श्रद्धा असते. आरंभीं, शास्त्र व साधु देव आहे असें सांगतात म्हणूनच तो देव मानीत असतो. अर्थात्, अशा शास्त्राच्या आज्ञा त्याला पाळणें आवश्यकच वाटतें व तें आवश्यक असतेंही. पण साधक हा भक्तींत जसजसा नाहींसा होतो तसतशी त्याची वृत्ति

कर्मावरून उठून अंतर्मुख होते, व मग त्याला विधि-किंकरतेविषयी विचार पडतो कीं, ही शास्त्राज्ञा किती पाळावी व मनांत उत्पन्न झालेल्या भगवत्प्रेमास अनुकूल किती वागावें. तात्पर्य, परमार्थांत 'पारतंत्र्य' विधीचें आहे.

ही विधिकिंकरता सर्वांना जरी असली तरी भक्तिशास्त्रानें या बाबतींत कांहींजणांना मोकळीक ठेवली आहे. प्रत्येकानें शास्त्राज्ञा मानून आपलें विहित कार्य करावें हें आवश्यक, पण हा शास्त्राज्ञेचा जोरा जो कर्माचा अधिकारी आहे त्याच्यावर जितका आहे तितका जो ती अवस्था उल्लंघून भक्तीच्या क्षेत्रांत आला त्याच्यावर नाहीं. देहतादात्म्य घेऊन अहंकारपूर्वक कर्म करणारा जो आहे त्यानें शास्त्रानें त्याला आवश्यक म्हणून सांगितलेलें कर्म करणेंच आवश्यक आहे. नाहीं केलें तर त्याला शास्त्रानें वर सांगितल्या-प्रमाणें शिक्षा सांगितली आहे. नामदेव ज्ञानदेवांच्या 'आदींत' ज्ञानदेवांच्या तोंडीं खालील महत्वाचे उद्गार घालतात–

अविधि आचरण परम दूषण । वेदोनारायण बोलियेला ।।
प्रत्यवाय आहे अशास्त्री चालतां । पावन अवस्था जरी झाली ।।

तुकोबाही सांगतात—

तुका म्हणे मन उन्मन जंव होय ।
तंववरी हे सोय विधि पाळी ।।

पण भक्त जर देवाचें ध्यान करीत बसला आणि त्याची कर्माची वेळ टळली तर त्याबद्दल त्याला शिक्षा भोगावी लागणार नाहीं. एकनाथी भागवतांत भगवान् म्हणतात–

श्रवण मनन करितां । कर्मासि झालिया विगुणता ।
बाधक नव्हे माझ्या भक्ता । कर्मकिंकरता त्या नाहीं ।।

ए. भा., अ. १०–१०१

पण येथें सुद्धां लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, भक्त खरा, पण ध्यानांत, पूजनांत गुंतला नसतांना जर त्याचें कर्म चुकलें तर त्याला 'अकुर्वन्' म्हणून शिक्षा भोगावीच लागेल !

ज्याच्या ठिकाणचें अज्ञान नाहींसें झालें आहे, जो मी परमात्मा आहे अशा अपरोक्ष दृढ अनुभवावर आला आहे त्याला मात्र विधिकिंकरता नाहीं. त्याला आपली गुलामगिरी नाहीं असें वेदच सांगतो. 'वेदा अवेदा भवन्ति' हें वचन प्रसिद्धच आहे. नाथांनीं ह्या गोष्टीचें व्याख्यान करतांना एक मोठा उत्कृष्ट दृष्टान्त दिला आहे. समजा, आंब्याची बाग आहे. मोहर लागून कैरी धरूं लागली कीं मालक त्या बागेवर रक्षक ठेवतो. पण आंबा पाडास लागला, उतरला व घरीं आणून आढींत घातला कीं मग ज्याप्रमाणें मालक तेथें राखण ठेवीत नाहीं; उलट तो ठेवलेलें राखण काढून घेतो. त्याप्रमाणें जोंपर्यंत अज्ञान आहे तोंपर्यंत विधिकिंकरता आहे. अविद्या नाहींशी झाली कीं त्याच्या मागची ही गुलामगिरी सुटली.

आंबा सफळीत जंव असे । तंव नेटेंपाटें राखण बैसे ।
फळ हातां आल्या आपैसें । राखण वायसे राहवेना ॥
तेवीं अविद्येचें जंव बंधन । तंव वेदाचें वेदविधान ।
अविद्या नाशिलिया जाण । विधीनें तें स्थान सोडिलें ॥

ए. भा., अ. १३, ओ. ४७४–७५

तात्पर्य, विधीच्या दास्यामध्येंसुद्धां अधिकारपरत्वानें तीन प्रकार आहेत ते असे:——

(१) कर्मांचा अधिकारी हा विधीचा पुरा दास —ही सून;
(२) भक्तीचा अधिकारी हा कांहीं परतंत्र व कांहीं स्वतंत्र——ही लेक व
(३) ज्ञानी हा विधीच्या आज्ञेच्या पलीकडे गेलेला म्हणून स्वतंत्र ;
——ही सासू.

तात्पर्य, तुकारामबोवांना गोकुळांत सुना, लेकी, व सास्वा अशा तीन प्रकारच्या म्हणजे तीन अधिकारांच्या गौळणी होत्या असें सांगावयाचें आहे.

तुकारामबोवा अशी अधिकारपरत्वानें निवड करतात यालाही एकनाथी भागवतांत आधार आहे. मागील संकीर्तनांत श्रीकृष्ण व गौळणी यांच्या संबंधाची चर्चा करीत असतांना संत श्रीकृष्णास काय समजत होते तें त्यांच्या उक्ति देऊन सांगण्यांत आलें आहे. या प्रसंगानें ते गौळणींना काय समजतात तें देतों, म्हणजे मागें मांडलेल्या सिद्धान्तासही अधिक पुष्टि येईल. नाथमहाराज म्हणतात :--

त्या जाण वेदगर्भींच्या श्रुती । श्रुतिरूपें नव्हेचि मत्प्राप्ती ।
तैं परतल्या म्हणौनि नेति नेति । माझी सुखसंगति न पवेचि ।।
विषयबुद्धी तें मुख्य अज्ञान । तें असतां मी न भेटे जाण ।
असता वेदोक्त जाणपण । तेणेंही संपूर्ण न भेटे मी ।।
जाणीव नेणीव गेलिया निःशेष । माझें पाविजे निजात्मसुख ।
श्रुति जाणोनि हें निष्टंक । गोकुळीं त्या देख सुखार्थ आल्या ।।
त्याचि जाण समस्त श्रुती । गोपिकारूपें गोकुळां येति ।। . .

--ए भा. अ. १२, ओ. १६३-६६

गोकुळांतील गौळणी या श्रुतीच झाल्या होत्या असा या ओव्यांचा अर्थ आहे; व श्रुति कर्मउपासनाज्ञान अशी त्रिकाण्डात्मक आहे हें प्रसिद्धच आहे. म्हणूनच गोकुळांतल्या गौळणींत सुना, लेकी व सास्वा असे तीनच प्रकार होते. कर्मपर गौळणी झाल्या सुना ; उपासनापर झाल्या लेकी व ज्ञानपर झाल्या सास्वा

इतकें विवरण केल्यावर सांगावयास नको कीं त्या गौळणी म्हणजे भगवत्प्रेमाचा आनंद सेवन करावयास मिळावा म्हणून जन्म घेतलेल्या तीन अधिकारांच्या भक्त होत्या. पण तुकारामबोवा म्हणतात, भगवंताच्या वेडामुळें त्या सर्वांची कमीअधिक प्रमाणांत सारखीच गति होई.

अवघियांची जग निंद । झाली धिंद सारखी ।।

व असें होणें हें स्वाभाविक आहे. भगवंतावरील प्रेम जसें कमीअधिक असेल त्याप्रमाणें भगवंताच्या दर्शनांत अथवा स्मरणांत त्यांचा देहभाव नाहींसा होई व त्यांच्या क्रियेंत विस्कळितपणा येई. लौकिक दृष्ट्या

चमत्कारिक वर्तन झाल्यानें होणाऱ्या अशा फजितीचाच एक प्रकार येथें सांगितला आहे. या अभंगांतील गौळण म्हणते -

मैं भूली घरजानी वाट। गोरस बेचन आयें हाट॥१॥

ही गौळण कोणत्या अधिकाराची होती हें कळण्याकरितां सूनबाई व लेक या भूमिकांवरच्या गौळणींच्या स्थितीचें वर्णनपर संतांचे उद्गार देतों. सूनबाई या सदरांत असणाऱ्या एका गौळणीचें वर्णन तुकोबा पुढील अभंगांत करतात-

भरिला उलंडुनि रिता करी घट। मीस पाणियाचें गोविंदाची चट। चाले झडझडां उसंतूनि वाट। पाहे पाळतूनि उभा तोचि नीट वो॥

श्रीकृष्ण यमुनेवर गेलेले. एका गाळणीला तर त्यांना पाहण्याची तीव्र इच्छा झालेली, पण जायचें कसें? ही पडली सूनबाई! कृष्णाला बघायला जातें म्हटलें तर परवानगी मिळणार नाहीं. मग त्या गौळणीनें सासूबाईची परवानगी मिळेल अशी क्लृप्ति योजली. सासूबाई होत्या दुपारच्या प्रहरीं माडीवर निजलेल्या. त्यांना काय कळणार खालीं काय झालें तें? या सूनबाईनें आपल्या हातानें पाण्यानें भरलेला हंडा ओतून दिला व खालून सासूबाईला सांगू लागली 'आइकलं का? बाळ काय व्रात्य झाला आहे, माझा डोळा चुकवून त्यानें पाण्याचा हंडा उलथून टाकला. आतां घरांत डोळ्याला लावायला सुद्धा पाणी नाहीं!' तिला ठाऊक होतें कीं सासूबाई कांहीं नदीवर जाणार नाहींत व पाण्याविना घरांत चालणार नाहीं. आपल्यालाच जा म्हणून त्यांना सांगावें लागणार! तिच्या अपक्षेप्रमाणें सासूबाई पडल्या पडल्याच म्हणाल्या, "जा! लवकर पाणी घेऊन ये." झालें, तिला हवी ती आज्ञा मिळाली व तिचें कार्य झालें.

येथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, या गौळणीला श्रीकृष्णदर्शनास जाण्याची इच्छा होती खरी; पण परवानगीविना जातां येईना अशी ती परतंत्र होती. पण देवाकरिता इतकी वेडीही झालेली नव्हती कीं, आज्ञा मिळो वा न मिळो, मनांत संकल्प उठला कीं चाललीच! ती परवानगी मिळेपर्यंत थांबू शकत होती. हीच सूनबाई.

आपण आतां याच्या पुढच्या अधिकाराच्या गौळणीचें स्वरूप पाहूं. भगवंतांनीं यमुनेच्या कांठांवर गुरें सोडून दिलीं व आपण वृंदावनांत मुरली वाजवूं लागले. तिचा ध्वनि एका गौळ्याच्या घरांतील लेकीला ऐकूं आला. त्याबरोबर तिला वृंदावनांत जावें असें वाटूं लागलें. त्याबरोबर ती आपल्या आईला विचारूं लागली—

वृंदावनीं वेणु कवणाचा माये वाजे। वेणुनादं गोवर्धनु गाजे ॥ पुच्छ पसरूनि मयोर विराजे। मज पहातां भासती यादवराजे ॥ —भानुदास अभंग

पूनबाईची असें म्हणायची त्या दिवसांत काय ताकद होती! लेकीला कांहीं मोकळीक असल्यामुळें ती उघड विचारूं शकत होती. हिच्यांतही प्रेम आहे. ऐकल्याबरोबर वेध लागला ही गोष्ट खरी. पण अजूनही प्रेमाचा पारा कमीच!

आपण पुढचीं उदाहरणें पाहूं म्हणजे प्रेमाची उत्कटता असली म्हणजे काय स्थिति होते याची कल्पना येईल. पहिलें उदाहरण श्रीएकनाथांनीं सांगितलेलें एका कर्मठ ब्राह्मणाच्या स्त्रीचें——

आपल्या मैत्रिणी भगवंताकडे जात आहेत असें पाहून एका ब्राह्मण स्त्रीला श्रीकृष्णाकडे जाण्याची इच्छा झाली व तिनें ती नवऱ्याजवळ व्यक्त केली. पण नवरा पडला कर्मठ. तो म्हणाला, "मी तुला जाऊं देणार नाहीं; व तुला माझ्या परवानगीशिवाय जातांही येणार नाहीं. कारण, तुझ्या वडिलांनीं तुला मला दिली आहे. तुझ्या शरीराची मालकी माझी आहे." हें ऐकल्याबरोबर श्रीकृष्णप्रेमानें ओथंबलेली ती स्त्री आपल्या पतीला म्हणाली, "ठीक बोललांत! माझ्या देहाचे मालक तुम्ही ना! हा घ्या देह. माझ्या जिवाची मालकीण मी आहे. मीं तो श्रीकृष्णाला दिला आहे." असें म्हणून तिनें आपला देह सोडून दिला व जीवानें श्रीकृष्णचरणीं विलीन झाली. पतीच्या पायांजवळ पत्नीचें मढें राहिलें! केवढें देवावर प्रेम!

एक ब्राह्मण अतिशास्त्रबळें। पत्नीसि येवूं नेदी मजजवळें।
तुम्ही वेदशास्त्रांही वेगळे। गुराखी गोंवळे केवी पूजा ॥
येरी समस्तां जातां देखोन। तिचें मजलागीं तळमळी मन।
अति कर्मठ तो ब्राह्मण कठिण। अवरोधून राखिली।

पित्यानें लाविलीस माझ्या हातीं । तेव्हांच मी तुझ्या देहाचा पती । मज सांडून केउती । गोंवळाप्रती जातेसी ।। येरी म्हणे तूं या देहाचा पती । तो देह ठेऊनियां तयाप्रती । जोवें मीनली मजप्रती । सायुज्यमुक्ती पावली ।।

—एकनाथी भागवत अ. १२, ओ. ९९–१०२

दुसरा प्रकार पहा. ह्या गौळणींत इतकें प्रेम सांठवलेलें कीं, तिला देवाचें नुसतें दर्शन पुरें कीं ती देहभावविवर्जित होई.

कोणी एकी भुलली नारी । विकिता गोरस घ्या म्हणे हरी । देखिला डोळां बैसला मनीं । तोचि वदनीं उच्चार ।।२।।

या बाईच्या भूमिकेची कल्पना येण्याकरतां ज्ञानोबांनीं गी. २ श्लो. २९ यावर लिहिलेल्या भाष्याची आठवण करून देणें अवश्य आहे. तो श्लोक असा–

आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः । आश्चर्यवच्चैनमन्यः श्रुणोति श्रुत्वाप्यनं वेद न चैव कश्चित् ।।

या श्लोकावर ज्ञानोबाराय लिहितात––

एक अंतरीं निश्चळ। जें निहाळितां केवळ । विसरले सकळ । संसारजात ।। एका गुणानुवाद करतां । उपरति होऊनि चित्ता । निरवधि तल्लीनता । निरंतर ।। एक ऐकतांचि निवाले। ते देहभावीं सांडिले। एक अनुभवें पातले। तद्रूपता।।

ज्ञा. अ. २ ओ. ७२–७४

पहिल्या ओवींत सांगितलेल्या उच्च प्रकारच्या भक्तांत इतकें देवाचें प्रेम असतें कीं, त्यांना नुसतें देवदर्शन होण्याचा अवकाश कीं ते देहभानविवर्जित होतात. यांना देवदर्शन म्हणजे अलीकडच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे क्लोरोफॉर्मच. आजच्या संकीर्तनाच्या अभंगांत ज्या गौळणीच्या जीवनातील एक घटना सांगितली आहे तीही अशाच थोर अधिकाराची गौळण आहे. ती म्हणते––

कान्हा रे मनमोहन लाल। सबही बिसरूं देखें गोपाल ।।

पुढच्या दोन कडव्यांतील तिनें केलेले आपल्या स्थितीचें वर्णन व अर्जुनाचा विश्वरूपदर्शनानंतरचा अनुभव यांची तुलना केली असतां ही स्त्री केवळ्या उच्च अनुभवास पोंचली होती याची कल्पना येईल. विश्वरूप-दर्शनानंतर अर्जुन म्हणतात--

(१) तुजवीण एकादियाकडे। परमाणुही एकला कोडें।
अवकाशु पाहातसे परि न सांपडे। ऐसें व्यापिलें तुवां ।।
अ. ११-२७२

ही गौळण म्हणते--

कहां पग डारूं देखें आनेरा। देखें तो सब वोहिने घेरा ।।३।।

आनेरा म्हणजे भिन्न. गोपाळाहून कांहीं भिन्न इतर पाय ठेवण्या-करितां म्हणून पाहूं लागलें तर सर्व त्यानेंच घेरलेलें म्हणजे व्यापलेलें अनुभवास आलें.

(२) संजय अर्जुनाच्या अनुभवाचें 'सर्वाश्चर्यमयं देवम्'
गी. ११-११

असें वर्णन करतो. त्यावर ज्ञानेश्वरमहाराज लिहितात--

कैसें अनुभवाचें करणें। पार्थाचें पाहणें आणि न पाहणें।
तयाही सकट नारायणें। व्यापूनि घेतलें ।।
म्हणौनि आश्चर्याच्या पुरीं एकीं। पडिला ठाव थडीं ठाकीं ।।
तंव चमत्काराचिया आणिकी। महार्णवीं पडे ।।
अ. ११-२३०-३१

ही गौळण म्हणते--

हुं तो थकित भई रे तुका। भागा रे सब मनका धोका ।।४।।

वरील चर्चेवरून वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं, 'मैं भूली घरजानी वाट' म्हणणाऱ्या गौळणीचे आध्यात्मिक अनुभव फार उच्च दर्जाचे होत.

यासंबंधानें येवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ज्या योगानें अशी स्थिति प्राप्त होते तें प्रेम देवाचें देणें आहे. तुकोबा म्हणतात—

प्रेम देवाचें देणें । देहभाव जाय जेणें ।
न धरावी मनें । शुद्धी देशकाळाची ।।

या संकीर्तनाच्या अभंगांतील गौळणींप्रमाणें उच्च भूमिकेवर प्राप्त झालेल्या भक्त गौळणींचें तुकोबांच्या अभंगांत ठिकठिकाणीं वर्णन आहे. आणखी एक नमुना म्हणून देतों--

मुख डोळां पाहे। तैशीच ते उभी राहे ।।१।।
केल्याविण नव्हे हातीं। धरोनि आरती परती ।।२।।
न धरिती मनीं। कांहीं संकोच दाटणी ।।३।।
तुका म्हणे देवें। ओस केल्या देहभावें ।।४।।

गौळणी देहभानविवर्जित झाल्या कीं त्यांच्या क्रियांत विस्कळितपणा यायचा. प्रसंगविशेषीं त्या श्रीकृष्णाला पहातांना जेथें ज्या स्थितींत असतील तशाच घटका न् घटका रहावयाच्या. त्यांच्या इंद्रियांचे सर्व व्यवहार थांबून पुतळ्यासारख्या त्या बनावयाच्या. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात--

महापुरुषाचें चित्त । जालिया वस्तुगत ।
ठाके व्यवहारजात । जियापरी ।।

--ज्ञा. अ. १३-७९१

ह्या अनुभवाची कल्पना नसल्यानें लोकांनीं त्यांची निंदा करणें ही अगदीं साहजिकच घडून येणारी गोष्ट आहे. म्हणून तुकोबा या गौळणींचें वर्णन करतांना सर्वांना एक इशारा देतात तो देऊन हें संकीर्तन समाप्त करूं. ते म्हणतात, या बाबतींत, लोकनिंदेला काय भितां? जीव जायचा प्रसंग आला तरी देवावर प्रेम करायचें, त्याची सेवा करायची ह्या गोष्टी सोडूं नका.

तुका म्हणे करा सेवा। आलें जीवावरि तरी ।।

# काला

ये दशों चरित्र केलें नारायणें । रांगतां गोधनें राखिताहे ॥१॥
हें सोंग सारिलें या रूपें अनंतें । पुढेंही बहुत करणें आहे ॥२॥
आहे तुका म्हणे धर्मसंस्थापनें । केला नारायणें अवतार ॥३॥

वारकरी पंथांतील कोणत्याही उत्सवाचा शेवट काल्याच्या कीर्तनानें होतो व त्या कीर्तनास श्रीकृष्णाचें बालचरित्रच गावें लागतें, हा विचार गौळणींच्या अभंगांवरील संकीर्तनाच्या प्रसंगीं सांगण्यांत आलाच आहे. आजच्या संकीर्तनद्वारां 'काला' म्हणजे काय तें सांगण्याचा विचार आहे.

संकीर्तनाच्या या अभंगामध्यें तुकारामबोवा श्रीकृष्णांनीं कोणत्या अवस्थेंत चरित्र केलें त्या अवस्थांचा उल्लेख करतात.

ते म्हणतात—

ये दशों चरित्र केलें नारायणें ।

या अवस्थेंत नारायण म्हणजे भगवान् श्रीकृष्ण परमात्मा यानें चरित्र म्हणजे अगम्य अशी लीला केली.

ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथमहाराज, तुकाराममहाराजप्रभृति सर्व संत मंडळी चरित्र हा शब्द अगम्य लीला या अर्थानें वापरतात. ही गोष्ट मागें सांगितलीच आहे. येथें एक-दोन प्रमाणें फक्त देतों—

(१) श्रीमद्भगवद्गीतेंत अर्जुन म्हणतो—

तेवींचि देवा चरित्र तुझें । आपण काय जाणिजे ॥

ज्ञा. अ. ४–३९

(२) नाथमहाराज म्हणतात—

बहुत अवतारीं अवतरला देवो ।
परी या अवतारीचा नवलाओ ।
देवा न कळे अभिप्रावो ।
अगम्य पहा हो हरिलीला ।।

नाथभागवत १–१८७

श्रीकृष्णानें अगम्य लीला कोणत्या अवस्थेंत केल्या, तर त्याचें उत्तर या अभंगांतील प्रथम कडव्याच्या उत्तरार्धांत देतातः—

रांगतां गोधनें राखताहे ।।

रांगत असतांना व गाई राखत असतांना.

श्रीकृष्णाच्या जन्मापासून कंसाला मारण्याकरितां मथुरेंत जाईपर्यंतचें गोकुळांत जें आयुष्य गेलें त्याचे दोन विभाग पडतात. एक रांगत असण्याची अवस्था व दुसरी थोडे मोठे झाल्यावर, गोकुळाजवळील यमुनेच्या कांठीं गुरें राखण्याची अवस्था. या दोन्ही अवस्थेंत श्रीकृष्णांनीं चरित्र केलें. तें काय याचें स्पष्टीकरण पुढें करूं.

दुसऱ्या कडव्यांत तुकारामबुवा म्हणतात, "श्रीकृष्णचरित्र येथेंच संपलें नाहीं. संपूर्ण श्रीकृष्णजीवन हें चरित्रच आहे."

हें सोंग सारिलें या रूपें अनंतें। पुढेंहि बहुत करणें आहे ।।२।।

गोकुळांतील कार्यभाग हा बालवेष घेऊन भगवंतांनीं उरकला. भगवंतांच्या मथुरा-गोकुळांतील बाळपणाच्या रूपाचें वर्णन तुकारामबोवा पुढील गौळणींत फारच उत्कृष्ट रीतीनें करतात :—

बाळपणीं हरी । खेळे मथुरेमाझारीं ।
पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी ।
मुख पाहे माता । सुख न माये चित्ता ।
धन्य मानवे संचिता । वोडवलें आजी ।।१।।

गोधनें राखीत असतांच्या रूपाचें वर्णन पुढीलप्रमाणें करतात :—

जाळी घेऊनि कांबळी काठी । गाई वळी वेणू पाठीं ।।

तुकारामबोवांनीं गोकुळांतील कारभार आटोपला हें सांगण्याकरितां जी शब्दयोजना केली आहे ती फार महत्त्वाची आहे. ते म्हणतात :--

हें सोंग सारिलें या रूपें अनंतें ।।

या कडव्यामध्यें सोंग हा शब्द वापरला आहे तो मोठा महत्त्वाचा आहे. कांहीं शब्दांना अर्वाचीन मराठीमध्यें वाईट अर्थ प्राप्त झाले आहेत त्यांपैकीं 'सोंग' हा शब्द आहे. 'काय सोंग आहे!' असा वाक्प्रचार आपण ऐकतों. या कडव्यांतील 'सोंग' हा शब्द तशा कुत्सित अर्थानें उपयोजिलेला नव्हे. तो शब्द वापरण्यांत तुकोबांना श्रीकृष्णचारित्रांतल्या एक-दोन फार महत्त्वाच्या गोष्टी सांगावयाच्या आहेत. बहुरूपी हा वेगवेगळीं सोंगें घेतो. कल्पना करा, एका बहुरूप्यानें एका राजाचें सोंग घेतलें व दुसऱ्यानें राणीचें घेतलें. सोंग घेऊन दोघे सोंगाडे प्रेक्षकांसमोर आले म्हणजे जी भूमिका ज्यानें पत्करलेली असते त्याप्रमाणें तो बोलतो, क्रिया करतो. जो राजा झालेला असतो तो राणी झालेल्या बहुरूप्याशीं बोलतांना त्याला 'प्रिये!' म्हणून संबोधतो व जो राणी झालेला असतो तो जो राजा झालेला असतो त्याला 'नाथ' म्हणून म्हणतो. असें दोघेजण जरी म्हणत असले तरी दोघे निःसंशय जाणतात कीं आपण दोघे पुरुष आहोंत. राजा व राणी कोणीच नाहीं असें जाणत असल्यानें ते तोंडानें राजाराणीसारखे बोलले व राजा-राणी या भूमिकांना योग्य-अशा क्रिया त्यांनीं केलेल्या जरी दिसल्या तरी त्यांच्या आंत आपण राजा अथवा राणी आहोंत ही समजूत नसल्यानें त्यांचें मन विकारी होत नाहीं व मनांत विकार उत्पन्न न झाल्यामुळें त्यांच्या क्रियांपासून उत्पन्न होणारीं सुखदुःखादि फळें त्यांना भोगावीं लागत नाहींत.

ज्ञानोबा पुढील ओंवींत हीच गोष्ट सांगतात :--

जैसी बहुरूपीयांची रावोराणी। स्त्री-पुरुष भावो नाहीं मनीं।
परी लोकसंपादणी। तैसेंचि करिती ।। अ. ३-१७६

श्रीकृष्णानें बाल म्हणून वागणें, चोरी करणें, विविध प्रकारचे खेळ खेळणें, राक्षसांना मारणें, गोवर्धन पर्वत करांगुलीवर धारण करणें वगैरे

लीला केल्या. पण भगवंताचे आपल्या विग्रहाशीं म्हणजे शरिराशीं तादात्म्य नसल्यानें ह्या सर्व क्रिया करूनही भगवान् मुक्तच. भगवानच एके ठिकाणीं म्हणतात--

माझें अजत्वें जन्मणें। अक्रियताचि कर्म करणें।
हे अविकार जो जाणे। तो परम मुक्त ।।

ज्ञा. अ. ४-५८

तुकारामबोवांना ' सोंग ' या शब्दानें भगवान् सर्व क्रिया यथायोग्य रीतीनें करून कसे मुक्त होते हें दाखवावयाचें आहे.

तुकारामबोवा म्हणतात, ' अकर्तृत्वबोधानें ' समोर आलेलें या अवस्थेंतलें कर्तव्य भगवंतांनीं करून संपवलें.

हें सोंग सारिलें या रूपें अनंतें ।।

पण येवढ्यावर चरित्र संपलें नाहीं.

पुढेंही बहुत करणें आहे ।।२।।

या दोन अवस्था ओलांडून गेल्यानंतर सुद्धां भगवंताच्या लोकोत्तर कर्तृत्वांत खंड पडला नाहीं. निजधामाला जाईपर्यंत पुढें भगवंतांनीं अलौकिक पराक्रम केले. जगाला विस्मय वाटेल अशा अचाट गोष्टी केल्या. उदाहरणार्थ, मथुरेचें राज्य बळकावून बसलेला जो कंस त्याला ठार मारून आपण राज्यावर न बसतां उग्रसेनाला पुन्हा राज्यावर बसविलें. केवढा त्याग ! चाणुरादि मल्लांना मारलें; द्वारकेस राज्य स्थापलें; युद्धांत पांडवांना साहाय्य केलें; गीतेसारखा जगन्मान्य बोध अर्जुनाच्या निमित्तानें निर्माण करून जगाचें संसाराचें ओझें दूर केलें; उद्धवाला उपदेश केला; व शेवटीं यादवांचें सर्व कुळ नाहींसें करून आपण निजधामाला गेले ! तुकारामबोवा म्हणतात, या सर्व गोष्टी पुढें देवाला करावयाच्या होत्या व पुढें देवानें त्या केल्या.

पुढेंहि बहुत करणें आहे ।।२।।

शेवटच्या कडव्यांत तुकारामबोवा श्रीकृष्णाच्या या वेगवेगळ्या बाल, तरुण, मध्यम अवस्थेंतील लीलांचें वर्म समजण्याकरितां, ' सूत्रें माणिगण

इव ' या न्यायानें त्या सर्व क्रियांना एका ओळींत बसविणारे श्रीकृष्णाच्या क्रियेंतील वर्म सांगतात--

आहे तुका म्हणे धर्मसंस्थापने । केला नारायणें अवतार ।।

श्रीकृष्णाची बाळपणची क्रिया असो वा तरुणपणची असो, तिचें रहस्य समजण्याकरितां तुकारामबोवा म्हणतात, ही वर्माची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, श्रीकृष्णाचा अवतार धर्मरक्षण करण्याकरितां आहे. याच दृष्टीनें त्याच्या क्रियांचा अर्थ लावणें जरूर आहे. धर्मरक्षण हाच निकष आहे.

तुकारामबोवा हा निकष कां सांगतात हें मागील गौळणींच्या दोन अभंगांवरील संकीर्तनें ज्यांनीं वाचलीं आहेत त्यांना स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. श्रीकृष्णाच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींना अधर्म्य, निंद्य असें रूप देऊन देवाची थोरवी कांहीं लोक गातांना त्यांना आढळलें म्हणून त्यांना सांगणें भाग पडलें.

येथें भावार्थ संपला.

नेहमींप्रमाणें आपण आतां थोडें तपशिलांत शिरूं या--

तुकारामबोवा या अभंगांत श्रीकृष्णानें ज्या अवस्थेंत चरित्र केलें त्या अवस्थांचा उल्लेख करतात, पुढेंही पुष्कळ लीला केल्या असें ध्वनित करतात व त्या सर्व क्रियांचा उलगडा होईल असें शेवटच्या कडव्यांत धर्मरक्षण हें मर्म सांगतात. पण चरित्र काय केलें हें यांत सांगत नाहींत. येवढ्याकरितां त्याचा विचार करणें अवश्य. आपण संतवाङ्मय पाहूं व रांगत असतांना व गोधनें राखत असतांना काय चरित्र केलें तें पाहूं.

याबाबत श्रीज्ञानदेवांचा, रांगत असतां श्रीकृष्णांनीं काय केलें हें सांगणारा पुढील प्रसिद्ध अभंग आहे--

रांगत रंगणीं । चोरींत लोणी ।
धांवोनि धरिति गवळणी । बांधिति चरणीं ।
देति गाऱ्हाणीं । येश्वदे साजणी ।
दधिघृत भक्षुनी । तमालनीळें नवल केलें साजणी ।। १ ।।
कृष्ण आळवा आळवा । परतुनी मातें दावा ।।२।।

नामदेव म्हणतात--

परब्रह्म निष्काम तो हा गौळियां घरीं ।
वांक्या वाळे अंदु कृष्ण नवनीत चोरी ।। १ ।।

× × ×

तळवे तळहात टेकित । डाव्या गुडघ्यानें रांगत ।
रंगणीं रगनाथ । तो म्यां देखिला सये ।।१।।
गवळण जसवंती पैं सांगे । आलें या कृष्णाचेनि मागें ।
येणें येणें वो श्रीरंगें । नवनीत भक्षिलें माझें ।।२।।

या कडव्यांतून रांगत असतांना श्रीकृष्ण चोरी व तीही लोण्याची करीत होते असें या संतांनीं सांगितलें आहे. मागील संकीर्तनें ज्यांनीं वाचलीं आहेत त्यांना चोरीच्या रूपकानें या संतांना कांहीं एक वेगळीच गोष्ट सांगावयाची आहे हें सांगावयास नको. मागच्या संकीर्तनांत याबाबतचें पुष्कळसें विवेचन येऊन गेलें आहे, म्हणून तें पुन्हा विस्तारानें सांगण्याची गरज नाहीं. एवढेंच सांगणें पुरें कीं, ही चोरी नारायणाची आहे व वर्णन करणारे असे पवित्र महात्मे आहेत कीं, ते कंठरवानें जगाला उपदेश करतात.

द्रव्य देऊनिया धाडावे तीर्थासी । नेदावी चोरासी चंद्रबळ ।।

( तु. अभंग )

ज्योतिषावर विश्वास ठेवणारीं माणसें लग्नादि क्रिया करतांना ग्रहबळ पाहात असतात. विशेषतः गुरु चंद्र यांचें बळ पाहतात. आतां या ग्रहांचें ते अनुकूल असल्यानें मिळणारें बळ म्हणजे साहाय्य तें प्रत्यक्ष व्यवहारांत कितीसें उपयोगी पडणार ? आपण कल्पना करूं या कीं, एका गृहस्थाला ज्योतिषाला पत्रिका दाखविण्याचा फार नाद होता. त्यानें आपल्या मुलाची पत्रिका तो मुलगा जवळ बसला असतांना ज्योतिष्यास दाखविली. पत्रिका पाहून ज्योतिषी सांगूं लागले, " अहो, यंदां तुमच्या मुलाला ग्रह फारच चांगले आहेत. गुरु अकरावा आहे, शनि तुळेस आहे, वगैरे वगैरे. तो जें कोणतें काम हातीं घेईल त्यांत यश ठेवलेलेंच." ज्योतिषीबोवा अथवा वडील यांपैकीं कोणालाच या बोलण्याचा मुलाच्या मनावर काय परिणाम

होईल याची कल्पनाच आली नाहीं. मुलानें ग्रह उत्तम आहेत हें ऐकल्या-बरोबर अभ्यास करावयाचें कमीच केलें. कांहीं महिन्यांनीं ही गोष्ट वडिलांच्या लक्षांत आली तेव्हां वडिलांनीं विचारलें, “ अरे, तूं अभ्यास करतांना दिसत नाहींत. परीक्षा पास कशी होणार ? ” त्यावर तो मुलगा म्हणाला, “ करायचा काय अभ्यास ? अहो, तुम्हांला मागें ज्योतिषी-बोवांनीं नाहीं सांगितलें, कीं यंदा मला ग्रह उच्चीचे आहेत ? मी हातीं घेईन तें काम यशस्वी होईल. मी यंदा परीक्षा उत्तीर्ण होणारच. ग्रहच तसे आहेत. मग अभ्यास कशाला ? ” यावर वडिलांनीं काय सांगितलें असेल तें वाचक सहज समजतीलच. ताराबळ अथवा चंद्रबळ किती थोडें असणार ? नाहींतच जमा. पाठीवर चंद्र घेऊन कुस्ती करणारास यश येतें असें एक शास्त्र सांगतें. पण जर जोर काढलेच नाहींत, बैठका मारल्याच नाहींत, घरच्या आखाड्यांत रोज कुस्ती केलीच नाहीं तर पाठीवरच्या चंद्राचा काय उपयोग ?

दृष्टान्त देऊन हें सांगण्याचा हेतु असा कीं, वाचकांच्या लक्षांत तुकाराम-बोवांच्या ‘ नेदावी चोरासी चंद्रबळ ।’ या कडव्याचा अर्थ यावा. चोरी स्वतः तर करूंच नये पण अनुकूल चंद्र असतांना जें कांहीं अल्प साहाय्य मिळतें तितकें साहाय्यसुद्धां चोरी करणाऱ्यास करूं नये असें तुकारामबोवा सांगतात. याचा अर्थ असा कीं, तुकारामबोवा चोरी पाप आहे हें चांगलें जाणत होते. इतर संतमहात्मेही चोरी पाप आहे हें जाणत नाहींत असें भारीच आहे ? तेव्हां ज्या अर्थीं चोरी पाप हें जाणणारे संतमहात्मे श्रीकृष्णाच्या चोरीचें वर्णन करतात त्या अर्थीं ही व्यवहारांत ज्याला चोरी म्हणतात ती नसावी हें निश्चित होतें. माणसाला अयोग्य जी गोष्ट ती आपण ज्यांना परमपूज्य मानतों त्या देवतेला हे साधु कसे लावतील ? लावणारच नाहींत. तेव्हां श्रीकृष्ण गोकुळांत लोण्याची चोरी करीत होते हें रूपक आहे.

श्रीकृष्णानें चोरलें, पण लोणी नव्हे, तर गोकुळनिवासी गोपगोपी इत्यादि सर्वांचें चित्त. चित्त हेंच लोणी अशा अर्थाचीं वचनें संतांच्या वाङ्मयांत किती तरी सांपडतील. संकीर्तनाचा अभंग हा तुकारामबोवांचा असल्यानें त्यांच्याच गाथ्यांतील एकदोन कडवीं देतों.

मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ।।

× × ×

.....निर्मळ चित्तें जालीं नवनीतें । पाषाणा पाझर फुटती रे ।।

ज्या चित्ताची चोरी श्रीकृष्ण करीत तें चित्त म्हणजे नवविध प्रकारच्या भक्तीनें ज्यांतील रजतमात्मक दोष नाहींसे होऊन जें शुद्ध सत्त्वात्मक बनलें आहे तें.

घर पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचें ।

तुकारामबोवा एका कडव्यांत स्पष्ट सांगतात--

चित्त चोरिलें नंदाच्या नंदनें । तुका म्हणे येणें गरुडध्वजें ।।

ही लोण्याची चोरी नव्हे, हें रूपक आहे असें वाचकांच्या लक्षांत यावें म्हणून पुढीलप्रमाणें ठिकठिकाणीं वर्णन केलें आहे.

माजी शिरोनिया नवनीत खाये । कवाड तें आहे जैसें तैसें ।।
जैसा तैसा असे अंतर्बाह्यात्कारीं । म्हणऊनि चोरी न संपडे ।।

चोर जर बाहेरून येता तर तो सांपडण्याचा संभव होता, पण हा चोर आंतच. यामुळें कवाड जसें लावलेलें तसेंच. मग चोरी कशी सांपडणार! चित्त चोरणारा देव सर्वांच्या हृदयांत आहेच म्हणूनच त्यानें केलेली चोरी सांपडत नाहीं !

यशोदा कृष्णाला म्हणते--

काय उणें कां करितोसी चोरी ।
किती सांगों तुज नाइकसी हरी ।
परेपरता तूं पळोनि जासी दुरी ।
अनावर या लौकिका बाहेरी वो ।।

वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं, जी चोरी बाळकृष्ण रांगत असतांना करीत होते ती चोरी आपण खातों त्या

लोण्याची नव्हे, तर चित्ताची; व या चोरीचा अर्थ असा आहे कीं, श्रीकृष्णानें गोकुळनिवासी लहान-मोठ्या सर्व नागरिकांचीं मनें वेधून घेतलीं.

तुका म्हणे छंदें । मनें मोहिलीं गोविंदें ।।

गोकुळांतले लोक मोठे भक्त होते, असे कीं, त्यांचें प्रपंचांतलें चित्त उठून देवावर जडलें होतें, त्यांना देवाचें वेड लागलें होतें व त्यांतच त्यांचे व्यवहार होत असत, असा चोरीच्या रूपकानें सांगण्याचा या संतांचा हेतु आहे.

त्यावर कोणी म्हणेल कीं, हें सांगण्याकरतां 'चोरी'सारखें वाईट रूपक कशाला? असल्या रूपकानें नसत्या शंका उपस्थित व्हावयाच्या. अज्ञ मनुष्याच्या ठिकाणीं अशा वर्णनाचा विपरीत परिणाम होण्याचा थोडा संभव खरा, पण घूस वीळ करील म्हणून घर बांधावयाचें कोणीं सोडीत नाहीं. त्याप्रमाणें कांहींना कळणार नाहीं म्हणून उत्कृष्ट रसानें ओथंबलेलें साहित्य निर्माण करावयाचें सोडावें काय?

भक्ताचें मन आणि देव यांचा संबंध सांगण्यास चोरीचें रूपक चांगलें आहे. आपलें चित्त विषयांत इतकें गुंतलेलें आहे व त्याला विषयोपभोगाची इतकी चटक लागली आहे कीं, बळें बळें प्रयासानें तें देवाकडे लावलें तरी लागत नाहीं. हाही विचार एका मागील संकीर्तनांत येऊन गेल्यानें त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. मन देवाकडे जात नाहीं हें सर्वविश्रुत आहे. मनाचा असा स्वभाव असतांना या भक्तांचें काय थोर पुण्य कीं त्यांचें त्यांनाही कळलें नाहीं कीं, आपणांस देवाचा वेध लागला कसा व आपण त्याच्या प्रेमांत अडकले गेलों कसे. खरें सांगावयाचें तर देवानें कृपा केली, आपणाकडे ओढून घेतलें तरच मन देवाच्या ठिकाणीं स्थिर होईल. योगासारखीं कष्टप्रद साधनें न करतां या गोकुळनिवासी गोपगोपींचीं मनें पूर्वजन्मींच्या सेवेनें प्रसन्न होऊन देवांनीं घेतलीं. म्हणून रूपकानें देवानें त्यांच्या घरांत लोण्याची चोरी केली असें वर्णन साधुसंतांनीं केलें आहे.

येथपर्यंत रांगत असतांना जी लीला भगवंतांनीं केली तिचें वर्णन झालें. आतां 'गोधनें राखिताहे' या अवस्थेंत काय केलें तें सांगतों.

पण तत्पूर्वी गोकुळांत जें आणखी घडलें म्हणून हे संत सांगतात तें सांगणें अवश्य. त्यामुळें श्रीकृष्णाला गोकुळाबाहेर यमुनेकांठीं कां जावें लागलें याचा उलगडा होईल.

तुकारामबोवा म्हणतात, " श्रीकृष्णानें दह्यादुधाची चोरी करून गोकुळांतल्या स्त्रियांना फार त्रास दिला. पाटलाचा पोर म्हणून कांहीं दिवस त्यांनीं सहन केलें, पण या सहनशीलतेला तरी मर्यादा आहेच. शेवटीं त्या गौळणी एकत्र जमल्या व खेडेगांवांतले न्यायालय म्हणजे पाटलीणबाई त्यांच्याकडे दाद मागण्याकरितां श्रीकृष्णाविरुद्ध त्यांनीं अर्ज गुदरला ! "

मिळोनी गौळणी देतीं यशोदे गाऱ्हाणीं ।
दहीं दूध तूप लोणी शिकां नुरे कांहीं ।
मेळवूनि पोरें तेथें रिघे एकसरें ।
वेगीं आणोनि सामोरें तेथें लोणी खाय ॥१॥
हरि सोंकला वो, हरि सोंकला वो ।
सोंकळ तो वारीं तुज लाज नाहीं तरी ।
आम्ही सांपडतां उरी तुज मज नाहीं ॥२॥

" श्रीकृष्ण दहीं-दूध-तूप सर्वांचाच चट्टामट्टा करतो. बरें, एकटा येत नाहीं, तर बरोबर संवगडी घेऊन येतो. त्याला कोण पुरे पडणार ! शिवाय आपण सर्व खाऊन दुधाण्या पालथ्या घालून ठेवतो.

पाहती गौळणी । तंव तीं पालथीं दुधाणीं ॥ "

घरीं श्रीकृष्ण अत्यंत सरळ वागत. त्यामुळें आपला मुलगा बाहेर खोड्या करीत असेल याची कल्पना यशोदेला नव्हती. हीं गाऱ्हाणीं ऐकल्यावर यशोदेला प्रथम असें वाटलें कीं, आपला मुलगा चांगला; या गौळणीच त्याच्यावर कुभांड रचतात. शिवाय असें वाटणें हेंच स्वाभाविक. मुलाविरुद्ध पहिली तक्रार आली व ती आईला खरी वाटली तर ती सावत्र आई असली पाहिजे, असें अनुमान करावयास हरकत नाहीं.

यशोदा गाऱ्हाणीं घेऊन आलेल्या गौळणींनाच म्हणूं लागली :--

"बाळ सगुण गुणाचें तान्हें गे । बाळ दिसतें गोजिरवाणें गे ।
काय सांगतां गाऱ्हाणें गे । गोकुळीच्या नारी ॥१॥
श्रीरंग माझा वेडा गे । याला नाहीं दुसरा जोडा गे ।
तुम्ही याची संगत सोडा गे । गोकुळीच्या नारी ॥२॥

(नामदेव अभंग)

असें कांहीं प्रसंग झाल्यावर देवांनींच विचार केला, आपलें येथलें कार्य संपलें. आतां गोकुळाबाहेर यमुनेच्या कांठीं जाणें अवश्य; म्हणून घरांतच खोड्या करण्यास आरंभ केला. यशोदा दही घुसळूं लागली असतां तें घुसळूं न देणें, डेऱ्यांत शिरणें, चतुर्थीचें व्रत केलें असतां ज्या गणपतीची ती पूजा करीत असे तोच उचलून तोंडांत टाकणें, वगैरे खोड्या तुकाराम-बोवांनीं गाइलेल्या त्यांच्याच शब्दांत देतों, म्हणजे तुकारामबोवांच्या बुद्धीची व श्रीकृष्णचरित्राची मौज वाचकांना कळेल.

आशाबद्ध देव असोनि जवळीं । नेणती ते काळीं स्वार्थामुळें ॥ मुळें याच देव नकळे तयांसी । चित्त आशापाशीं गोंवियलें ॥ लेंकरूं आमचें म्हणे दसवंती । नंदाचिये चित्तीं तोचि भाव ॥ भाव दावावया चरित्र दाखवी । घुसळितां रवी डेरियांत ॥ डेरियांत लोणी खादलें रिघोनी । पाहे तों जननी हातीं लागे ॥ हातीं धरूनियां काढला बाहेरी । देखोनियां करी चोज त्यासी ॥ शिकवी विचार नेणें त्याची गति । होता कोण रीतीं डेरियांत ॥ यांसी पुत्रलोभें न कळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यांसी ॥

× × ×

भक्तीसाठीं केली यशोदेसी आळी । थिंकोनियां चोळी डोळे देव ॥ देव गिळूनियां धरिलें मोहन । माये म्हणे कोण येथें दुजें ॥ दुजें येथें कोणी नाहीं कृष्णाविण । निरुतें

जाणोन पुसे देवा ॥ देवापासीं पुसे देव काय झाला । हांसें आलें बोला याचें हरी ॥ यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरें ॥

× × ×

सांग म्हणे माय येरू वासी तोंड । तंव तें ब्रह्मांड देखे माजीं ॥ माजीं जया चंद्रसूर्य तारांगणें । तो भक्तांकारणें बाळलीला ॥ लीला कोण जाणे याचें महिमान । जगाचें जीवन देवादिदेव ॥

यशोदेलाही जेव्हां पटलें कीं, हाच खोडया करतो, तेव्हां देवाला शिक्षा करण्याचें ठरलें. उखळाला बांधून ठेवा म्हणजे हा घराबाहेर जाणार नाहीं अशी कल्पना निघाली व श्रीकृष्णाला उखळाला बांधून ठेवावयाचें ठरलें. परंतु त्याला बांधण्याकरितां जें एक दावें आणलें तें त्याला पुरेचना. चमत्कार असा झाला कीं, गोकुळांतील सर्व दावीं आणलीं तरी चार बोटें कमीच !

या वर्णनांतील रहस्य थोडें सांगणें अवश्य आहे. कारण हें वर्णन वाचून कोणाही वाचकाला वाटेल कीं, ही फारच अतिशयोक्ति आहे. पण संतमहात्म्यांना या वर्णनाच्याद्वारां एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची आहे व ती ही कीं, भगवंताचा विग्रह व आपण सामान्य जीव यांचे विग्रह म्हणजे शरीरें यांत फार फरक आहे. मलिन, अविद्यात्मक आपलीं शरीरें असल्यानें आपली भक्ति, ज्ञान, सामर्थ्य हीं सर्व त्या आवरणानें झांकलीं गेलीं आहेत. यामुळें आपणांस आपल्या शरिरांत कांहीं फरक करतां येत नाहीं. आपलें शरीर जड आहे; भगवंताचें तसे नव्हे. भगवंताचें शरीर शुद्धसत्त्वात्मक मायेचें बनलेलें असल्यानें भगवंताचें ज्ञान अप्रतिहत आहे व शरीरही शुद्धसत्वात्मक मायेचें असल्यामुळें जड नव्हे. ज्ञानोबाराय भगवंताच्या विग्रहाचें घोंगडीच्या रूपकानें पुढील वर्णन करतात :—

कान्होबा तुझी घोंगडी चांगली ।
आम्हांसी कां दिली वांगली ॥

स्वगत सच्चिदानंदें मिळोनि शुद्ध सत्त्वगुण विणली रे।
षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुंदरा शोभली रे ।।१।।

भगवंताचें शरीर असें शुद्ध सत्त्वाचें बनलेलें असल्यामुळें तें लहान-मोठें करणें त्यास शक्य होतें. योगाभ्यास करणाऱ्या जीवास अंगाचा संकोचविकास करून लहानमोठें होतां येतें असें योगसूत्रकार सांगतात. मग भगवंताला काय अशक्य ! आपण कोण आहोंत याची गोकुळांतील लोकांना जाणीव व्हावी म्हणून दाखविलेला हा चमत्कार !

अशा या भगवंताच्या करण्यानें कांहीं वेळ मोहाचा पडदा फाटावा, श्रीकृष्ण देवाधिदेव वाटावेत, पण पुनः मोहाचें पटल येऊन हा आपला पुत्र असें वाटून तदनुकूल व्यवहार सुरू व्हावा हीच देवाची माया !

ज्ञानदेव म्हणतात—

हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाही नयेचि आया ।।

घरांत व बाहेर असा त्रास सुरू झाल्यावर मुलाला जसें आई शाळेंत घालते त्याप्रमाणें यशोदामातेनें त्या वेळची शाळा म्हणजे गुरें राखणें, त्यांना पाणी पाजून आणणें, या शाळेंत भगवंताला घातलें. भगवान् हे निर्मोह. गोकुळ सुटलें. यमुनाकांठावर आले. तेथलें कर्म सुरू. तेथें गाई चरायला सोडून द्याव्यात व संवगड्यांसह वेगवेगळे खेळ खेळावेत. साधुसंतांनीं लगोऱ्या, विटीदांडू, हमामा वगैरे खेळांच्या रूपकानें उत्कृष्ट अध्यात्म मराठींत ओतलें आहे. स्थलाच्या संकोचास्तव तीं सर्व रूपकें न सांगतां खेळाचें हें सुद्धा रूपकच आहे हें सांगणारे एक-दोन उतारे देऊन व खेळाचें मर्म सांगून हा भाग आटोपूं.

ज्ञानेश्वरमहाराज हा गाई राखणारा कोण त्याचें पुढीलप्रमाणें वर्णन करतात :

ब्रह्मविद्येचा पुतळा । गाई राखितो गोवळा ।
श्रुति नेणवे लीळा । वेदां सनकादिकां ।।१।।

तुकारामबोवा खेळाचें वर्णन करतात :—

गाईगोपाळ यमुनेचे तटीं।
येतीं पाणिया मिळोनि जगजेठी।
चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं।
चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो ॥१॥

तुम्ही आम्ही सर्व सत्त्वरजतम या तीन गुणांचा खेळ खेळतों यापलीकडे जाऊन खेळणें हें एक देव अगर त्याच्या समबोधाचें महात्मेंच करूं शकतात. तुकारामबोवा म्हणतात, देव व त्याचे गडी वाळवंटांत चार गुणांचा खेळ खेळतात. ज्ञानेश्वरमहाराजांनींही महात्म्याचें असेंच वर्णन केलें आहे :

ऐसेनि जे निजज्ञानी। खेळत सुखें त्रिभुवनीं।
जगद्रूपा मनीं। सांठऊनि मातें॥

ज्ञा. अ. १०–११७.

हा गुणातीताचा खेळ आहे. आपण गुणात्मक शरीराशीं तादात्म्य करून त्रिगुणांत खेळत असल्यानें या खेळांत डाव आपल्या अंगावर येतो, म्हणजे आपणांस जन्ममरण भोगावे लागतात. देव व तत्समबोधाचे महात्मे हा प्रपंचाचा डाव खेळतांना गुणात्मक शरीराहून आपण वेगळे आहोंत या बोधांत राहून गुणाचा–प्रपंचाचा खेळ खेळत असल्यानें डाव त्यांच्या अंगावर येत नाहीं. नामदेवराय, तुकारामबोवा हेंच सांगतात कीं, खेळ खेळावा पण डाव अंगावर येणार नाहीं असा खेळावा. असा खेळ खेळेल तोच खेळिया शहाणा.

'खेळ खेळे पण डायीं न सांपडे। तो एक खेळिया शाहणा रे॥

या खेळाचें अंतरंगस्वरूप लक्षांत येण्याकरितां नामदेवरायांचा 'खेळिया' देतों. मोठा खरा पण फारच उत्कृष्ट आहे म्हणून संपूर्ण देत आहे.

नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया। नाहीं तेंचि दिसूं लागलें रे। अरूप होतें ते रूपासि आलें। जीव शिव नाम पावलें रे ॥१॥ आपलिच आवडी धरून खेळिया। आप–

आपणातें व्यालें रे । जोपनाकारणें केली बायको । तिनें एवढें वाढविलें रे । ॥ २ ॥ ऐक खेळिया तुज सांगितलें ऐसें जाणुनि खेळ खेळे रे ॥ धृ० ॥ ब्राह्मणाचें पोर एक खेळासि भ्यालें । तें बारा वर्षें लपालें रे । कांपत कांपत बाहेर आलें । तें नागवेंचि पळून गेलें रे ॥३॥ साहा तोंडचा एक संभूचें बाळ । त्यानें बहुतचि बळ आथियेलें रे । खेळ खेळतां दगदगीं व्यालें । ते कपाट फोडुनि गेलें रे ॥४॥ चहूं तोंडचाचा पोर एक नारयाहि जाण । तो खेळियांमाजीं आगळा रे । कुचालि करुनी पोरें भांडवी । आपण राहे वेगळा रे ॥५॥ गंगा, गौरी दोघी भांडवी । संभ्यासी धाडिलें राना रे । खेळ खेळ परि डायीं न सांपडे । तो एक खेळिया शहाणा रे ॥६॥ खेळियांमाजीं हनुम्या शहाणा । न पडे काम्यव्यसनीं रे । कामचि नाहीं तेथें क्रोधचि कैसा । तेथें कैचें भांडण रे । रामा गडचाची आवडी मोठी । म्हणुनि लंके पेण रे ॥७॥ यादवांचा पोर एक गोप्या भला । तो बहुतचि खेळ खेळला रे । लहान थोर अवघे मारिलीं । खेळचि मोडुनि गेला रे ॥८॥ ऐसे खेळिये कोटचानकोटी । गणित नाहीं त्याला रे। विष्णुदास नामा म्हणे वडील हो । पहा देहीं शोधुनी रे ॥९॥

यांत लक्षांत ठेवण्यासारखी विशेष गोष्ट अशी आहे कीं, नामदेवांनीं शुकाचार्यांनाही प्रपंचरूप खेळ खेळण्यास भ्याले म्हणून ‘ पोर ’ ठरवलें. तरी या संतांना कांहीं लोक संन्यासमार्गी म्हणतातच !

तुकारामबोवाही असेंच म्हणतात :—

एके घाई खेळतां न पडसीं डाई ।
दुचाळयानें ठकसलि भाई रे ।

त्रिगुणांचे फेरी थोर कष्टी होसी।
या चौघांची तरी धरीं सोई रे ॥१॥
खेळ खेळोनियां निराळाचि राही।
सांडी या विषयाची घाई रे।
तेणेंचि खेळें बसवंत होसी।
ऐसें सत्य जाणें माझ्या भाई रे ॥२॥

याचें तात्पर्य असें आहे कीं, परमेश्वरांनीं ही सृष्टि उत्पन्न करून जी गुणातीत लीळा आरंभिली आहे त्यांतलें वर्म जाणून तसेच गुणातीत होऊन आपण खेळ खेळलों तर डाव अंगावर येणार नाहीं. प्रपंच टाकून कोठें जाणार! द्रष्टा होऊन खेळ खेळण्यांत आनंद आहे.

'फावल्या त्या करूं चेष्टा। निश्चळ द्रष्टा बैसोनि ॥'

असा खेळ खेळावा. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात, आम्हीं मुक्तीशीं लग्न लावलें; आतां राहिलेले चार दिवस खेळीमेळींत घालवूं :

तुका म्हणे मुक्ति परिणली नोवरी।
आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥

असा खेळ खेळणें हें त्यांनाच शक्य आहे कीं, ज्यांचीं इंद्रियें त्यांच्या ताब्यांत आहेत. ज्यांचीं इंद्रियें ताब्यांत नाहींत त्यांना हा खेळ खेळतां येणार नाहीं व त्यामुळें त्यांना आनंदही नाहीं. हीच गोष्ट तुकारामबोवा रूपकानें सांगतात :--

आणिक काय थोडीं। परि तीं फार खोटीं कुडीं ॥१॥
सदा मोकळींच गुरें। होतीं फजित तीं पोरें ॥२॥
सदा घालिती हुंबरी। एक एकाचे न करी ॥३॥

× × ×

आपलीं गुरें ओढाळ आहेत व त्यामुळें खेळांत खरा आनंद प्राप्त होत नाहीं, डाव अंगावर येतो हें जाणून तीं पोरें देवाची पुढीलप्रमाणें प्रार्थना करतात :--

नको आम्हांसवें गोपाळा । येऊं ओढाळा तुझ्या गाई ॥१॥
कोण धांवे त्यांच्या लागे । मागें मागें येरझारी ॥२॥
न बैसती एके ठायीं । धांवती दाहा वाटा ॥३॥
तुका म्हणे तूं राख मनेरी । मग त्या येरी आम्ही जाणों ॥४॥

[ गाई म्हणजे इंद्रियें व मनेरी म्हणजे मन ]

वरील अभंगांत इंद्रियदमन करून थकलेला एक गोपाळ तीं आंवरलीं जात नाहींत असें पाहून, मुख्य मन तें तूं आंवर अशी देवाची प्रार्थना करतो, त्याचें रूपकानें वर्णन आहे, हें सुज्ञ वाचकांस सहज समजेल.

गाई वळून त्यांच्या पाठीमागें धांवून दमलेलीं पोरें देवाला म्हणतात :–

चला वळूं गाई । बैसों जेऊं एके ठायीं ॥१॥
बहु केली वणवण । पायपिटी जाला शीण ॥२॥
खांदीं भार पोटीं भूक । काय खेळायाचें सुख ॥३॥

देवा, डोक्यावर प्रपंचाचा भार; पोटांत तुझ्या सुखाच्या आनंदाचा घासही नाहीं; अशा स्थितींत खेळण्यांत काय मजा! आतां ह्या गाई वळण्याचा भाग सोडून प्रथम जेवणाची तयारी करूं या. कारण पोटांत जर कांहीं असेल तर खेळांत आनंद.

दुपारची वेळ झाल्यानें सर्व कामें बाजूला सारून गोपाळ आपआपल्या शिदोऱ्या घेऊन एकत्र जमा झाले–

काम सारूनि सकळ आले अवघे गोपाळ ।
जाली आतां वेळ । म्हणती आणा शिदोऱ्या ॥

श्रीकृष्णाला मध्यें उच्च आसनावर बसवून वाटोळे चक्राकार सर्व गडी बसले; व ज्यांनीं त्यांनीं आपली शिदोरी देवापुढें सोडली.

सोडियेल्या मोटा । आजिचा दहींकाला गोमटा ॥

भगवंतांनीं त्यांच्या शिदोऱ्या पाहून म्हटलें:—

माझें आहे तैसें पाहे । नाहीं तरी घरा जाये ।
चोरोनिया माये । नवनीत आणावें ॥

'काला करावयाचा ना? माझ्या शिदोरींत मिसळावयाचें ना? मग माझ्या शुद्ध शिदोरीसारखी शुद्ध शिदोरी आणा. तुमची घाण दिसते. घरीं जा व आईला चोरून ताजी शिदोरी घेऊन या.'

रूपकाचें थोडें स्पष्टीकरण करावयाचें तें असें कीं, देवाशीं समरस होण्याकरितां देव जसा शुद्ध तसें होणें अवश्य. शंभर नंबरी सोन्यांत मिसळावयाचें तर लोखंड राहून कसें चालेल? शंभर नंबरी सोनेंच होणें अवश्य.

"साडेपंधरेया मिसळावें। तें साडेपंधरेंचि होआवें॥"

आतां देवाची शुद्ध शिदोरी व आमची मलिन हा भेद कळण्याकरितां शिदोरी म्हणजे काय हें स्पष्ट झालें पाहिजे.

तुकारामबोवा शिदोरी काय तें पुढील कडव्यांत सांगतातः—

शिदोरी तें पापपुण्य। सवें शीण भीकेचा॥

आपला जन्म हा पूर्वजन्मार्जित गोळा केलेल्या पापपुण्याचा परिणाम आहे.

अगा कर्म जें उरावें। तें तिहीं सुखदुःखीं फळावें।
आणि तयातें भोगावया यावें। देहा एका॥

म्हणून त्या पापपुण्यास शिदोरी म्हणतात. ती घेऊन आपण जन्माला येतों. देवाचा जन्म का या कारणाकरितां होतो? तो मूळांतच 'अज' आहे.

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया॥

गी. अ. ४–६

मागें सांगितल्याप्रमाणें भगवंताचा विग्रह शुद्धसत्त्वात्मक मायेचा; तो जन्मल्यासारखा दिसतो. अशी भगवंतांची शुद्ध शिदोरी. आमची घाण. या दोहोंचें मिश्रण होणार कसें? म्हणून भगवान् म्हणतात :

"माझें आहे तैसें पाहे॥

'माझ्यासारखी शुद्ध शिदोरी घेऊन या. ममतारूपी आईला चोरून शुद्ध शिदोरी घेऊन या. तुमचें मन पूर्वसंस्कारजन्य ममतेनें गढूळ झालें आहे तें माझ्याशीं कसें समरस होणार! तेव्हां ममता टाका व शुद्ध मन घेऊन या.'

देव ज्या वेळेला असें म्हणाले त्या वेळेला ज्ञानदेव, नामदेव, तुकारामबोवा इत्यादि देवाचे संवगडी होतेच. ते म्हणाले, “ कोणाला घरीं जा सांगतां ? आमचें घर तुम्हीच ! ”

ज्ञानदेवा घर चिदानंदीं ॥

तुकारामबोवा म्हणतात :

“ जाळूनि संसार बैसलों अंगणीं ।”

हें तुमच्या लक्षांत नाहीं का ? आमचें सर्व तूंच.

विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता। तुका म्हणे आतां नाहीं दुसरें।

हें ऐकल्याबरोबर देव म्हणाले, ‘ तुम्हांला मी जा म्हणत नाहीं; पण इतर जे दुसरे त्यांच्याकरितां माझें बोलणें आहे.’

संत हे स्वार्थी नव्हत. ते खरे श्रीमंत. ते देवाला म्हणाले, “आमची शिदोरी मिळवून घेशील यांत काय नवल. पण जे इतर भोळे तुझ्यावर विश्वास ठेवून आले त्यांचें कोण बघणार ? त्यांचीहि शिदोरी मिसळून घेतली पाहिजे. असा जेव्हां या भक्तांनीं आग्रह धरला, तेव्हां देवाला या भक्ताग्रणींच्या भिडेकरतां सर्व जमलेल्या गड्यांच्या शिदोऱ्या आपल्या शिदोरींत मिसळून घेणें भाग पडलें. तुकारामबोवांनीं म्हटलें आहे :

एकाच्या कैवाडें । उगवें बहुतांचें कोडें ॥

एका भगीरथानें हट्ट धरला तर भागीरथी मृत्युलोकावर येऊन सर्व जगाचें कल्याण झालें. एक पुंडलीक धैर्य धरून बसला म्हणून श्रीपांडुरंग विटेवर उभे राहिले व त्यामुळें लाखों भक्तगणांचें कार्य झालें. तसेंच या भक्तश्रेष्ठांच्या आग्रहामुळें देवाला सर्व गड्यांच्या शिदोऱ्या आपणांत मिसळून घ्याव्या लागल्या. म्हणजे सर्वांच्या चित्तवृत्ति देवांनीं आपल्यांत मिसळून घेतल्या. हाच काला ! हा जिवाशिवाच्या ऐक्याचा काला !

तुकारामबोवा म्हणतात—

तुका म्हणे काला वैकुंठीं दुर्लभ ।
विशेष हा लाभ संतसंग ॥

देवाशीं चित्तवृत्ति एक झाल्यावर पूर्वीचें तिचें वैगुण्य गेलें.

कां खैर चंदन काष्ठें। हे विवंचना तंवचि घटे।
जंव न घापती एकवटें। अग्निमाजीं ॥
तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया। कां शूद्र अंत्यजादि इया।
जाती तंवचि वेगळालिया। जंव न पवती मातें ॥

ज्ञा. अ. ९ ओ. ४५९।६०

देवांनीं यमुनेच्या कांठावर काला केला व वांटला; म्हणजे भक्तांच्या चित्तवृत्ति आपल्यांत मिसळून घेऊन आपला आनंद त्यांना दिला.

तुका म्हणे घांस। मुखीं घाली ब्रह्मरस ॥

हा काला पाहावयास तुकारामबोवा म्हणतात—

आजि ओस अमरावती। काला पहावया येती।
देव विसरती। देहभाव आपुला ॥

लाह्या वाटतात हें उपलक्षण. जीवेश्वराचें ऐक्य हा काला.

ह्या काल्याचा आनंद गोकुळामध्यें आपल्या दोन्ही अवस्थांतून जात असतांना भगवंतांनीं गोकुळनिवासी सर्व प्राण्यांना दिला.

ज्ञानोबाराय म्हणतात—

गोकुळीच्या गोळिया गोपी गोधना सकळां।
हरिसुख फावले रे।

तुकारामबोवा म्हणतात, रांगत असतांना अथवा गोधनें राखीत असतांना नारायण क्रीडा करो, वा मथुरेंत गेल्यावर अथवा द्वारकाधीश झाल्यावर करो, त्याच्या कार्याचें सूत्र एकच आहे. तें म्हणजे—

आहे तुका म्हणे धर्मसंस्थापने।
केला नारायणें अवतार ॥३॥

## अभंग

होय होय वारकरी। पाहें पाहें रे पढरी ॥१॥
काय करावीं साधनें। फळ अवघेंचि तेणें ॥२॥
अभिमान नुरे। कोड अवघेचि पुरे ॥३॥
तुका म्हणे डोळां। विठो बैसला सांवळा ॥४॥

तुकाराममहाराजांनीं भगवत्प्रातीकरितां जी साधना केली तींत पंढरपूरची वारी, भजन यांना मोठें स्थान आहे. पंढरपुरची वारी त्यांच्या घराण्यांत कित्येक पिढ्या चालत आली होती. त्यांच्या अभंगांतुन हें सांगणारीं किती तरी वचनें आढळतात. त्यांतील प्रमाणाकरितां म्हणून दोनतीन देतों :—

सहज वडिलां होती सेवा। म्हणोनि पूजितों या देवा।
तुका म्हणे भावा—। साठीं झणीं घ्या कोणी ॥

× × ×

माझ्या वडिलांचीं मिराशी गा देवा।
तुझी चरणसेवा पांडुरंगा ॥

× × ×

पंढरीची वारी आहे माझे घरीं।
आणिक न करीं तीर्थव्रत ॥

पंढरपूरची वारी त्यांच्या घरांतच असल्यानें तुकाराममहाराजांना जेव्हां वैराग्य प्राप्त झालें, तेव्हां स्वाभाविकंच लहानपणीं जें वडिलांच्या बरोबर म्हणून केलें तिकडे त्यांची दृष्टि वळली. ती साधना त्यांनीं मोठ्या अट्टाहासानें

केली व श्रीपांडुरंगकृपेनें ती सिद्धीस गेली. नंतर ज्या वेळीं तुकाराम-महाराज 'पुरुषार्थसिद्धी चवथी' आपल्या हातीं घेऊन लोकांना ती वाटूं लागले त्या वेळेला त्यांनीं याच भक्तिमार्गाचा जगाला उपदेश केला हें अगदीं स्वाभाविक होय.

प्रस्तुतच्या संकीर्तनाचा जो अभंग आहे तो असाच साधनाचा उपदेश करणारा आहे. परमात्मप्राप्तीकरितां कर्म, योग, वेदाध्ययनादि वेगवेगळीं साधनें करणारा कोणी एक साधक त्याला तुकारामबोवा म्हणतात—

काय करावीं साधनें। फळ अवघेंचि तेणें ॥२॥

इतर साधनें काय करायचीं आहेत? जें फळ इतर साधनांनीं मिळावयाचें तें सर्व या साधनानें मिळेल.

असें सर्व साधनांचें फळ देणारें कोणतें साधन तें या अभंगाच्या प्रथम कडव्यांत सांगतात—

होय होय वारकरी। पाहें पाहें रे पंढरी ॥१॥

वारकरी हो, वारकरी हो व पंढरपूर पाहा.

तुकारामबोवा द्विरुक्ति करतात व वारकरी होऊन पंढरपूर पाहाण्यास सांगतात यांत थोडा अर्थ आहे. वारकरी न होतां पंढरपूरला जाणारे हौशे, गवशे, नवशे हजारों लोक आहेत. बार्शी लाइट रेल्वेच्या नोकरवर्गात पंढरपूरला रोज जावें लागणारीं माणसें आहेत. कासेगांव, वेळापूर, शेगांव इत्यादि पंढरपूरच्या पंचक्रोशींत असणाऱ्या गांवचीं माणसें रोज पंढरपूरला येतात म्हणून त्यांना पंढरपूरचें खरें माहात्म्य समजणार आहे काय? आपण ज्या तयारीनें पाहात असतों त्यावर काय दिसणार हें अवलंबून असतें. म्हणून तुकारामबोवा त्या साधकाला सांगतात कीं तुला परमार्थ घडावा असें वाटतें ना? मग पंढरपूरला जा. पण वारकरी होऊन जा. वारकरी होणें म्हणजे काय? याचा विचार पुढें करूं.

तुकाराममहाराजांनीं इतकें सांगितल्यावर तो साधक म्हणाला असावा कीं, सर्व यानें साधेल म्हणतां म्हणजे काय साधेल? तुकारामबुवा त्याचें उत्तर या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यांत देतातः—

अभिमान नुरे। कोड अवघेचि पुरे ॥३॥

वारकरी होऊन पंढरपूरला गेलें कीं अभिमान उरत नाहीं. कां उरत नाहीं व तो न उरण्यांत साधकाचा काय फायदा हा विचार पुढें सांगूं. अभिमान शिल्लक राहात नाहीं एवढेंच नव्हे तर सर्व इच्छा पूर्ण होतात.

या गोष्टी कां घडतात त्याचें कारण तुकारामबुवा शेवटच्या कडव्यांत सांगतातः—

तुका म्हणे डोळां। विठो बैसला सांवळा ॥४॥

पंढरपूरचें दैवत जो सांवळा विठोबा तो असा आहे कीं, एकदां त्याला पाहिला कीं तो डोळ्यांत येऊन बसतो. त्याचें स्वरूप असें आहे कीं, त्याला पाहिल्याबरोबर त्याचाच वेध लागतो व सर्व ठिकाणीं तोच दिसूं लागतो.

पाहिलिया वेध लावी। बैसे जीवीं जडोनि ॥

भावार्थ संपला. आतां थोडा तपशिलाचा विचार करूं.

तुकाराममहाराज साधकाला पंढरपुराला वारकरी होऊन जा म्हणजे अभिमान शिल्लक राहाणार नाहीं व मनाची सर्व आवडी पुरेल असें सांगतात. याचा विचार करतां पुढील प्रश्न उत्पन्न होतात :

(१) अभिमान न उरण्यांत साधकाचें काय कार्य होतें ?

(२) पंढरपूरला जाण्यानें अभिमान नाहींसा होतो असा अभिमानाचा व पंढरपूरचा काय संबंध आहे ?

(३) वारकरी होणें म्हणजे काय ?

आता पहिल्या प्रश्नाचा विचार करुं.

(१) अभिमान न उरण्यांत साधकाचें काय कार्य होतें ? तुकाराम महाराजांच्या दृष्टीनें फार मोठें कार्य होतें. कारण त्यांच्या दृष्टीनें जीवाचा मोठा घात करणारा शत्रु अभिमान आहे व आणखी एक त्यासंबंधानें महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, तो जवळजवळ अजिंक्य आहे !

जीविताचा असा कोणता घात अभिमान करतो याचा जर आपण विचार करूं लागलों, तर तुकोबांचें पुढील वचन डोळ्यांसमोर येतें—

अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ।।

तुकारामबोवा म्हणतात अभिमान काळतोंड्या आहे. तो प्रकाशावर आवरण घालतो. वेदान्तशास्त्रदृष्ट्या अभिमान अथवा अहंकार हा तमोगुणाचें कार्य आहे म्हणून झांकणें हा त्याचा स्वभाव आहे.

याच्यावर असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, अभिमान झांकीत असेल पण जीवाशीं त्याचा काय संबंध ? हा संबंध लक्षांत यावा, अभिमानाचें स्वरूप व कार्य लक्षांत यावें एवढ्याकरितां प्रथम थोडक्यांत एक गोष्ट सांगतों.

एका गृहस्थास एकुलती एक मुलगी होती. ती मोठी झाल्यावर तिचा विवाह करतांना त्यानें विचार केला कीं, जर मुलगी श्रीमंतास द्यावी तर ती त्याच्या घरीं राहावयास जाईल व मग ती आपणांस अंतरेल. तेव्हां जावई असा पाहावा कीं, तो आपल्या घरींच राहील. असा विचार करून त्यानें एक गरीब हुशार विद्यार्थी बघून त्यास आपली मुलगी दिली व त्याला घरजावई केलें. लग्नानंतर वर्षा दोन वर्षांत वडील वारले, त्यांची संपत्ति जावयाकडे आली. पण मुलीच्या दुर्दैवानें तो जावई वाईट लोकांच्या संगतीनें व्यसनी बनला व सासऱ्याच्या वर्षश्राद्धाच्या आंतच त्यानें सर्व संपत्ति उडवली व डोक्यावर कर्ज करून ठेवलें. थोड्याच दिवसांत अशी स्थिति आली कीं, ज्या मुलीला बाहेर टांग्याशिवाय पडणें ठाऊक नव्हतें त्या मुलीला लोकांच्याकडे जाऊन दळण-कांडण करून आपलें पोट भरून नवऱ्याच्या जेवणाखाण्याची व्यवस्था करावी लागली !

या गोष्टीचें सार असें आहे कीं, मुळांत श्रीमंत मुलगी, पण जावयानें तिचें मूळचें सुख घालवून तिला दुःखांत लोटलें. अभिमान हा अशा जावयासारखा आहे. तो जीवाची मूळची आनंदरूपता घालवून त्यास दुःखांत लोटतो. वेदांतशास्त्राचा असा सिद्धांत आहे कीं, जीव हा ब्रह्मच आहे. ब्रह्म आनंदमय आहे; म्हणून जीव मूळचा आनंदरूप आहे.

नाथमहाराज पुढील ओव्यांतून हीच गोष्ट सांगतात--

शुद्धीं अहंकार अळुमाळ । उठतां शुद्धासी करी शबल ।<br>
तेणें देहयोगें धरल्या बळ । करी तत्काळ विपरीत ।।

अहंकार खवळल्या जाण । करी आनंदाचें आवरण ।
बुडे परमात्मस्फूर्तीचें स्फुरण । देहाचें मीपण वाढवी ।।
जेवीं कूर्मीच्या पिलियां । चक्षुरमृतें तृप्ती तयां ।
तेंचि मातेसि चुकलिया । मग भुकेलिया कर्दम सेवी ।।
तेवीं खुंटलिया आनंद अभिव्यक्ती । जीवासि वाढे
विषयासक्ती । कामिनीकामा पंगिस्त होती । चिंता
चित्तीं विषयांची ।।

-ए. भा. अ. १३. ४३२-३५

नाथमहाराज म्हणतात, 'निरुपाधि' स्फुरणरहित चिन्मात्र अशा शुद्ध वस्तूच्या ठिकाणीं किंचित् 'मी ब्रह्म' असा अहंकार का उत्पन्न झाला, कीं वस्तूचा शुद्धपणा बिघडला. तो अभिमान त्या वस्तूला गढूळपणा आणतो.'

अशाणी वाचक म्हणेल, अहो, वस्तु म्हणजे ब्रह्म, मग ब्रह्माच्या ठिकाणीं मी ब्रह्म असें स्फुरलें तर त्यांत गढूळपणा कसला ? या शंकेचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, जी वस्तु अंगानें ब्रह्मरूप आहे तिच्या ठिकाणीं मी ब्रह्म आहे असें स्फुरणें हेंही गौण आहे. आपण माणूस आहोंत. असें असूनसुद्धां आपल्या ठिकाणीं मी माणूस आहे; मी माणूस आहे असें स्फुरण नाहीं. असें स्फुरण स्फुरूं लागलें तर तो एक वेडेपणाचा अथवा भ्रमाचा प्रकार होईल. म्हणून शास्त्रकार व संत या स्फुरणाला भ्रमच म्हणतात. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंसी आपुली प्रभा ।
करीतसे सोहं मा । ऐसा बंधु ।।

—अनुभवामृत, प्र. ३-२३

मी ब्रह्म ही सत्त्वगुणाची एक वृत्ति आहे. वस्तु ही गुणाच्या पलीकडे होण्यास्तव तिच्या ठिकाणीं कोणतीच वृत्ति नाहीं. नाथमहाराज हीच गोष्ट आपल्या एका अभंगांत स्पष्टपणें मांडतात—

ब्रह्मीं स्फुरे जें स्फुरण। तें शुद्ध सत्त्वाचें लक्षण।
तो तूं लक्षी लक्ष्यातीत परिपूर्ण रे॥
कान्हू सच्चिदानंद शब्द अरुता रे।
त्याही परता तूं निजानंदु रे॥

तात्पर्य, शुद्ध परमात्मवस्तूच्या ठिकाणीं गुणात्मक मी ब्रह्म हें स्फुरणें ही विकृति आहे. जर त्याच्या पाठीमागें तमोगुणाचा जोर झाला तर 'अहं ब्रह्मास्मि' हें स्फुरण 'देहोऽहम्' (मी देह आहे) या विपरीत भावनेपर्यंत येऊन बसेल.

तैं अज्ञान एक रूढे। तेणें कोहं विकल्प मांडे।
मग विवरोनि कीजे फुडे। देहोहं ऐसें॥

—ज्ञा. १५–२४२

संधिकालाच्या मागें प्रकाशाचा जोर असला तर त्या संधिकालांतून दिवस उजाडतो. जर त्याच्या पाठीमागें तमाचा जोर असला तर संधिकाळांतून रात्र निर्माण होते. तसेंच कोहं (मी कोण) याच्यामागें तमाचा जोर असला कीं 'मी देह' अशा विपरीत भावनेवर तो संकल्प येतो.

अशा विपरीत भावनेवर अथवा समजुतीवर आल्यानें जीवाची केवढी हानि झाली त्याचें वर्णन वर दिलेल्या दुसऱ्या ओवींत करतात——

अहंकार खवळल्या जाण। करी आनंदाचें आवरण।
बुडे परमात्मस्फूर्तीचें स्फुरण। देहाचें मीपण वाढवी॥

अहंकार वाढला म्हणजे तो मी परमात्मा आहे हें जें स्फुरण हें नाहींसें करून 'मी देह' हें स्फुरण वाढवतो. त्याचा परिणाम तुकारामबोवा सांगतात—

करवितो आत्महत्या। नेदी सत्य आतळों॥

जीव हा परमात्मा असतांना अभिमान तें ज्ञान पार घालवतो. म्हणून तुकारामबोवा तो 'आत्महत्या' करवतो असें म्हणतात. ब्रह्महत्या, गोहत्या हीं जरी मोठीं पातकें असलीं तरी त्यांना शास्त्रांत प्रायश्चित्तें

सांगितलीं आहेत. पण शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, आत्महत्येइतकें दुसरें मोठें पातक नाहीं. त्याला प्रायश्चित्त नाहीं व तें योग्यही आहे.

कारण ब्रह्महत्या, गोहत्या करणारे ब्रह्महत्या अथवा गोहत्या केल्याबरोबर नाहींसे होत नाहींत. प्रायश्चित्त घेणारा शिल्लक राहतो. तसें आत्महत्येचें नाहीं. आत्महत्या करून मेला मग प्रायश्चित्त घेण्यास कोण उरला ? म्हणून सर्वांत मोठें पातक आत्महत्या. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, जीवानें मी परमात्मा ही समजूत सोडून मीं देह म्हणणें म्हणजे आत्महत्या करणें होय व देहसंबंध झाल्यामुळें, मी देह या समजुतीच्या प्रत्येक क्षणाला जीवाकडून आत्महत्या होते—

जया देहसबंधा आंतु । प्रतिपदीं आत्मघातु ।
भुंजतां उसंतु । कहिंची नाहीं ।।

—ज्ञा. अ. १८–१२७६

याचा परिणाम त्याचे ठिकाणीं स्वभावतःच असणारा आनंद तो झाकला जातो. आत्मा हा ' आंगाथिला आनंद । सुरतेविण ' असा आनंद-रूप आहे. आत्मा आनंदी नव्हे, आनंद हा आत्म्याचें अंगच आहे; पण त्या आत्म्यानें आपल्या स्वरूपाला विसरून अगदीं भिन्न स्वभाववान् जो देह त्याच्याशीं का तादात्म्य केलें कीं, मी आनंदरूप आहे हें तो विसरतो. देहाशीं तादात्म्य केल्यामुळें देहाचे जे गुणधर्म ते आपलेच समजतो.

देहाचें वर्णन ज्ञानेश्वरमहाराजांनीं खालीलप्रमाणें केलें आहे :—

जे क्लेशतरूची वाडी । तापत्रयाग्नीची सगडी ।
मृत्युकाकासी कुरोंडी । सांडली आहे ।

अ. ८–१४०

अविद्या, अस्मिता, राग, द्वेष अभिनिवेष हे पंचक्लेश वाढण्याची वाडी देह आहे. आध्यामिक, आधिदैविक व आधिभौतिक दुःखें हींच कोणी विस्तव यानें पेटलेली शेगडी आहे; व अनित्य तर इतकें आहे कीं, मृत्युरूप कावळ्याला टाकलेला हें शरीर म्हणजे बळी आहे.

तुकारामबोवाही असेंच वर्णन करतात—

शरीर दुःखाचें कोठार। शरीर रोगाचें भांडार।
शरीर दुर्गंधीची थार। नाहीं अपवित्र शरीराऐसें॥

कामक्रोधादि षड्शत्रूंनीं भरलेलें, अस्ति जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते व नश्यति या षड्विकारांनीं युक्त असलेलें हें जें शरीर तें मी आहें असें समजल्यानें शरिराचें सर्व दुःख जीवाला भोगावें लागतें.

असा नियम आहे कीं जितक्या प्रमाणांत परिग्रहाशीं तादात्म्य अधिक तितक्या प्रमाणांत दुःख अधिक. भागवतांत दशम स्कंधामध्यें ( अ. ९, श्लो. २) टिटव्यांचा दृष्टान्त देऊन हीच गोष्ट उत्तम रीतीनें सांगितली आहे.

सामिषं कुररं जघ्नुर्बलिनो ये निरामिषाः।
तदामिषं परित्यज्य स सुखं समविंदत॥

टिटव्यांची एक फळी आकाशांतून चालली होती. त्यांपैकीं एकास एक मांसाचा तुकडा दिसला. त्याबरोबर त्यानें झेप घालून चोंचीनें तो उचलला. त्याच्या तोंडांत तो मांसाचा तुकडा पाहिल्याबरोबर इतर जे त्याचे सोबतीनें चालणारे टिटवे ते त्याला चोंचीनें मारूं लागले. त्यानें विचार केला, आपल्याला हे मारतात म्हणून दूर जावें. पण तो मांसाचा तुकडा घेऊन दूर गेला तर हे टिटवेही तेथें गेले व त्याला चोंचीनें टोंचूं लागले. त्या जागेवरून दुसरीकडे गेला तरी तेंच. दहापांच वेळां असें झाल्यावर तो विचार करूं लागला कीं, हे आपले स्नेही, मग हे आपणांस टोंचूं कां लागावेत? तेव्हां त्याला आढळून आलें कीं याला कारण 'मांसाचा तुकडा.' त्यानें तो टाकला व दूर जाऊन बसला. तो घेण्याकरिता इतर टिटवे धडपडतच होते. त्यांपैकीं एकाच्या तोंडाला तो लागला. झालें इतर टिटवे आतां त्याच्या मागें लागले. पहिला सुटला.

या गोष्टीचें तात्पर्य असें आहे कीं, 'आमिषा अंगीं पीडा वसे.'

तुकारामबोवांनीं हीच गोष्ट दुसरा एक उत्कृष्ट दृष्टांत देऊन सांगितली आहे. ते म्हणतात:--

करितां घायाळाचा संग। अंगें अंग माखावें।

समोरून रक्तबंबाळ होऊन मनुष्य आला त्याला दुसरा कडकडून भेटला तर त्याचेंही अंग लाल होईल.

तसाच येथेंही प्रकार आहे. जीव हा मूळचा ब्रह्मरूप. ("तुका म्हणे हा तो स्वयें परब्रह्म।") व म्हणून आनंदरूप; परंतु क्लेशतरूची वाडी जो देह त्याच्याशीं तादात्म्य करून बसल्यामुळें म्हणजे त्याचा अभिमान घेतल्यामुळें याच्याही पाठीमागें दुःख, भय लागलें. नाथमहाराज जीवाची ही दशा कशी होते हें समजण्याकरितां चांगला दृष्टांत देतात. ते म्हणतात– 'कासवीच्या पिलांची मौज आहे. त्यांना कासवीच्या स्तनांतून दूध मिळत नाहीं. कासवीची व त्यांची दृष्टादृष्ट झाली कीं त्यांना तृप्ति. पण आईची व त्यांची चुकामूक झाली य भूक लागली तर चिखल खाण्याव्यतिरिक्त त्यांना दुसरें कांहीं नाहीं.'

तसा जीवात्मा हा आत्मसम्मुख आहे तोंपर्यंत आनंदच. पण ही आत्मसम्मुखता गेली कीं त्याला आनंदाकरितां गृहदारासुत यांच्याकडे गेल्याशिवाय आनंद नाहीं; व यांच्यावर आपला आनंद ठवणें म्हणजे परावलंबी होणें. शिवाय हेच मरकें. ते आपणांस शाश्वत सुख काय देणार? पण आत्मविन्मुखता झाल्यानें मनुष्यास सुखाचा एकच आधार दिसतो व तो म्हणजे विषय. म्हणून मग मनुष्य त्यांच्या स्वाधीन होतो व दुःख पावतो.

तात्पर्य, जीव हा मूळचा सुखरूप पण त्याला दुःख भोगावयास कोणीं लावलें असेल तर देहाभिमानानें. तें दुःख जर घालवावयाचे असेल तर त्याला उपाय अभिमान नाहींसा करणें.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

हा विचारूनि अहंकार सांडिजे। मग असतीचि वस्तु होइजे।
तरी आपुली स्वस्ति सहजे। आपण केली ॥ (अ. ६–७१)

तैसा देहाहंकारु नाथिला। हा समूळ जयाचा नासला।
तोचि परमात्मा संचला। आदीचि आहे ॥ (अ. ६–८४)

स्त्रीवेष घेतलेल्या पुरुषास पुनः पुरुष होण्यास घेतलेली लुगडीं वगैरे स्त्रीवेष टाकला कीं झालें. तसेंच जीवाला ब्रह्म होण्याकरितां करावयाचें

कांहींच नसतें. त्यानें जी विपरीत कल्पना करून घेतली ती टाकली कीं तो ब्रह्म आहेच. तुकारामबोवा म्हणतात--

देह नव्हे मी हें सरे। उरला उरे विठ्ठल ।।

तात्पर्य, परमार्थांतील साधनें ब्रह्माला तयार करण्याकरितां नव्हेत. ब्रह्म आहेच. आपल्या स्वरूपज्ञानाच्या आड येणारा अहंकार तो नाहींसा करण्याकरितां तीं आहेत. तो गेला, मग इतर साधनांचें काय कारण ?

तुकारामबोवा म्हणतात--

कोणाही नलगे साधनाचा पांग।
करणें केला त्याग देहबुद्धि ।।

तुकारामबोवा हीच गोष्ट प्रस्तुत संकीर्तनाच्या अभंगांत सांगतात--

काय करावीं साधनें। फळ अवघेंचि तेणें ।।२।।

कारण--

अभिमान नुरे। कोड अवघेचि पुरे ।।३।।

पण हा अभिमान जातो कोठें !

देहाभिमान जाणें कठिणांतली कठिण गोष्ट आहे. पण तुकारामबोवा एके ठिकाणीं मोठ्या जोरदार भाषेंत प्रश्न उभारून उत्तर देऊन सांगतात--

उठाउठीं अभिमान। जाय ऐसें स्थळ कोण ।। १ ।।
ते ह्या पंढरीसी घडे। खळा पाझर रोकडे ।। २ ।।

म्हणून या अभंगाच्या प्रथम कडव्यांत सांगतातः--

होय होय वारकरी। पाहें पाहें रे पंढरी ।। ३ ।।

(२) प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, अभिमान नाहींसा होण्यांत जीवाच्या मागें लागलेल्या दुःखाचा नाश होऊन परमानंदरूप परमात्म्याचा लाभ होतो. पण तो अभिमानाचा नाश पंढरपुरांत होतो, असें पंढरपुरांत काय आहे ?

त्याचें उत्तर असें आहे कीं, पढपूरचें जें दैवत आहे तें असें आहे कीं त्याला अभिमान नाहीं व तो त्याला शरण येणारे आहेत त्यांच्यांत राहूं देत नाहीं. हेंच या पंढरीच्या दैवताचें वैशिष्ट्य.

तिळभरी जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ।।

× × ×

अभिमान नाहीं तुका म्हणे त्यासी ।
नेदी आणिकांसी घारूं देव ।।

यावरही कोणी असें म्हणण्याचा संभव आहे कीं, तुमच्या पंढरीच्या देवालाही शरीर आहे व तुम्हा-आम्हांलाही शरीर आहे. मग त्याला शरण जाण्यांत काय फायदा ? तो आमचा अभिमान काय नाहींसा करणार ?

याचें उत्तर असें आहे कीं, पांडुरंग हें भगवान् श्रीकृष्णाचें बाळरूप आहे व भगवंताच्या विग्रहासंबंधीं नाथमहाराजांनीं चतुःश्लोकी भागवतांत असाच प्रश्न करून त्याचें उत्तर दिलें आहे. ते म्हणतात--

जीवासी दृढ देहबुद्धी । भगवंतही देहसंबंधी ।
तं त्याचेनि भजनें मोक्षसिद्धि । न घडे त्रिशुद्धि जीवासी या ।।
ऐसी उठो पाहे आशंका । ते विषयींचें उत्तर आइका ।
जीवा आणि जगन्नायका । देहसमत्व देखा न घडे ।।
जाति पाहतां दोन्ही दगड । परि रत्नगार नव्हे परिपाड ।
तेवीं देवा जीवा समत्व दृढ । हें केवळ मानिती मूढ न ज्ञाते ।।
धूम्र ज्वाळा पहातां दोन्ही । जरी जन्मती एके स्थानीं ।
तम निवारी ज्वाळापासुनी । धूमा न मानी तम दाटे ।।
जीव ज्ञानस्वरूप सत्यज्ञानी । परी तो झाला देहाभिमानी ।
ज्ञ न वेंचलें विषयध्यानीं । यालागीं दृढबंधनीं तो पडला ।।
आपणयाचिसारिखा देख । हरि मानी पंच भौतिक ।
त्या परम मूर्खातें देख । आकल्प दुःख सरेना पैं ।।

भगवद्देह चैतन्यघन । तेथ वसेना देहाभिमान ।
यालागीं करितां त्याचें भजन । अज्ञान जन उद्धरती ॥

—चतुःश्लोकी भागवत ३८–४५

तात्पर्य, चैतन्यघन द्वारकाधीश परमात्मा विटेवर उभा आहे. त्याचे का दास झालांत कीं तो अभिमान आपल्या ठिकाणीं ठेवणार नाहीं.

नाथमहाराजांनीं एके ठिकाणीं आपल्या हातांत देवानें वेगवेगळीं शस्त्रें कां घेतलीं याचें वर्णन केलें आहे. त्यांत ते म्हणतात, 'चक्रें अभिमानाचा करी चेंदा.'

भगवंतांनीं गरुड व सत्यभामा यांचा गर्व नाहींसा केला याबाबत पुराणांत गोष्ट सांगितली आहे, व तुकारामहाराजांनीं आपल्या अभंगांत ती सांगितली आहे. थोडक्यांत ती अशी आहे--

रामावतारीं चिरंजीव हनुमंतास रामांनीं असें वचन दिलें होतें कीं, कृष्णावतारीं तुला भेट देईन. कृष्णावतार झाला, भगवान् आपल्या सर्व मंडळीसह द्वारकेंत राहावयास आले. त्यानंतर एके प्रसंगीं मारुतिराय फिरत फिरत द्वारकेजवळ आले व भूक लागली म्हणून बळिराम-दादाच्या बागेंतील पडलेलीं फळें खाऊं लागले. तेव्हां त्या बागेचा रक्षक मारुतिरायांना गुरकावून म्हणूं लागला, "ही बळिरामदादाची बाग आहे. न विचारतां फळें खातोस!" वगैरे. मारुतिरायांनीं बहिऱ्याचें सोंग घेतलें व त्याला जवळ येऊं दिलें. त्यांना राग आला तो 'बळिराम' या शब्दाचा. ते मनांत म्हणाले, "एक अयोध्याधीश राम; हा कोण बळराम! पाहूं या. पण हा रक्षक माळी. याला ठार करून काय उपयोग? याला उगीच चुणूक दाखवूं येवढेंच." तो जवळ आल्यावर त्याला एक हलकेंच अशी चपराक दिली कीं, तो तडफडतच निघाला. पुढें बोलायची त्याची छाती नाहीं. तो रक्षक भगवान् श्रीकृष्णाकडे रडत आला व गाऱ्हाणें सांगूं लागला--एक मोठा कपि आला आहे. तो फळें खात होता. मी बोललों तर त्यानें मला मारलें. भगवान् म्हणाले, "उगीच कां मारील?" त्यावर तो म्हणाला, "मी नुसतें एवढेंच म्हटलें कीं, बळिरामदादाची बाग आहे. पुसल्याविना काय फळें खातोस?" त्यावर देव समजले कीं,

मारुतिराय आलेले आहेत. त्यांनीं गरुड व सत्यभामा यांना झालेला गर्व हरण करण्याची ही चांगली संधि आहे असें पाहून तिचा उपयोग करण्याचें ठरविलें. गरुडाला गर्व झाला होता कीं, श्रीकृष्णाला मी पाठीवर वाहतों, अर्थात माझी शक्ति व बळ केवढे मोठें ! सत्यभामेस आपल्या रूपाचा गर्व झाला होता. श्रीकृष्णानें त्या माळ्याची हकीगत ऐकून तेथें बसलेल्या गरुडास सांगितलें कीं, "जा, त्या कपीला घेऊन ये." गरुड मनांत म्हणाला, "काय देवाला समजत नाहीं, कोणाला कोणच्या कामावर धाडावें ! तो कपि तो काय व मला काय धाडतात ! उंदरावर तोफ !" पण देवापुढें काय बोलणार ? तो निघाला.

तो गेल्यावर सत्यभामेला निरोप केला कीं, "मारुति आला आहे, मीं राम झालों आहे, तूं सीता होऊन ये !"

गरुड आपल्या ऐटींतच मारुतिरायाला दुरूनच मोठ्यांदा हाक मारून म्हणूं लागला, "ए माकडा, तुला भगवान श्रीकृष्णांनी बोलावले आहे." मारुतिराय म्हणाले, "हे बडे प्रस्थ दिसते. येऊं द्या." त्यांनीं बहिरेपणाचा आव आणून त्याला जवळ येऊं दिलें व जवळ आल्यावर अशी एक श्रीमुखांत दिली, कीं तो फडफड करीत भगवंताच्या पायाशीं जाऊन पडला. देव म्हणाले, "गरुडा, हें रे काय, तो कपि कोठें आहे ?" मोठ्यांना फार सांगावें लागत नाहीं. गरुड म्हणाला, "देवा, असेंच करायचें होतें मग येथें तुम्हींच कां नाहीं मारलेंत ?" देव म्हणाले, "अरे बाबा, कान सोनारानेंच टोंचावे लागतात."

गरुड येईपर्यंत भगवंतांनीं निरोपावर निरोप पाठवून सत्यभामेला तगादा लावला कीं सीता होऊन ये. ती कोणती वेषभूषा करावी, काय दागिने घालावेत म्हणजे सीतेसारखी दिसेन, असा विचार करीत होती तों नारद तेथें आले. सत्यभामा नारदाचा आदरसत्कार करून म्हणाली, "नारदा, मला सीता होऊन ये म्हणून निरोप आला आहे. तुम्ही रामाचे वेळींही होतां. तुम्हीं सीतेला पाहिली आहे. सांगा आतां मी सीता दिसतें का ? नारद ते नारद. ते म्हणाले, "आईसाहेब खरें सांगूं का ?" त्यावर सत्यभामा म्हणाली, 'अवश्य.' मग नारद म्हणाले, "तर खरें असें आहे

कीं, तुम्ही सीतेच्या दासी शोभणार नाहीं." सत्यभामेला काय वाटलें असेल त्याची कल्पना करणेंच बरें.

गरूडाचा गर्व उतरला असें पाहून देव त्याला म्हणूं लागले, "जा, त्या मारुतीला बोलावून आण. त्याला सांग, तुला दाशरथी राम बोलावीत आहेत." गरुड म्हणाला, "मागच्या खेपेला खरें बोललों तर हें भोगावें लागलें. आतां तर खोटेंच सांगावयास सांगतां. मग येथेंच मारा ना!" देव म्हणाले, "आतां तसें होणार नाहीं. तूं जा." गरुडानें मारुतिरायांना आणण्याची वेळ झाली तरी सत्यभामा येईना म्हणून देवांनीं रुक्मिणीला निरोप केला. निरोपाबरोबर ती आली. तुकाराममहाराजांच्या अभंगांत या गोष्टीचा उलेख आहे. म्हणूनच ही गोष्ट दिली आहे--

धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता।
तें पाचारिलें होऊनि यें वो सीता।
लाजिनली रूप न ये पालटितां।
जाली भीमकी आपण राम सीता वो॥

तात्पर्य, पंढरपूरचा देव हा अभिमान घालवतो; म्हणून जो पंढरपूरला जातो त्याचा अभिमान जातो.

अभिमान नुरे। कोड अवघेंचि पुरे॥ ३॥

अभिमान नाहींसा होतो व सर्व इच्छा पूर्ण होतात. सर्व इच्छा तृप्त होतात म्हणजे जीवाला हवा तितका आनंद मिळतो.

पण आरंभीं म्हटल्याप्रमाणें पंढरपूरला तर शेंकडों लोक जातात. त्यानें काय होणार? म्हणून तुकाराममहाराज म्हणतात--

होय होय वारकरी। पाहें पाहें रे पंढरी॥ १॥

वारकरी हो, वारकरी हो व पंढरपूरला जा,

(३) आतां वारकरी होणें म्हणजे काय हें सांगितलें पाहिजे. वारकरी याचें मूळ 'वारी कर' असें आहे. ज्ञानेश्वरींत ज्ञानोबांच्या अभंगांत 'वारी', 'वारीकर' असे शब्द येतात. वारी म्हणजे येरझारा. वारकरी होणें म्हणजे प्रतिवर्षी नियमानें श्रीपांडुरंगाचे यात्रेस जाण्याचा नियम

स्वीकारणें. व्रत धारण करणें. हा भक्तीचा म्हणजे उपासनेचा पंथ आहे. यांतील मुख्य भाग पांडुरंगाची सेवा करण्याचें व्रत घेणें, हा आहे. अर्थातच याचीं कांहीं बाह्य चिन्हे व आंतरचिन्हे आहेत.

या सेवेचे व्रत घेतलें याचें प्रमुख बाह्य चिन्ह म्हणजे गळ्यांत श्रीविष्णूला प्रिय असणारी अशी पवित्र तुळशीमाळा धारण करणें. मराठीमध्यें 'घरावर तुळशीपत्र ठेवणे ' असा वाक्प्रचार आहे व त्याचा अर्थ असा कीं, घरावरचें स्वामित्व अथवा मालकी सोडणें. तसें देहावर तुळशीपत्र ठेवणें यांत दुहेरी लाभ. आपले उपास्य दैवत, त्याची प्रिय माळा अंगावर अलंकार म्हणून धारण करणे हा एक भाग; व हे शरीर स्वभोगाकरितां नव्हे, हे देवाच्या सेवेकरितां आहे याची जाणीव राहाणें हा दुसरा.

आपणां हिंदु लोकांमध्यें तुळशीस फार पवित्र मानलेली आहे. प्रत्येक घरांत द्वारीं तुळशीवृंदावन असावें अशी जुनी रीत आहे. मनुष्य मृत झाला तर त्याच्या मुखांत तुळशी घालून त्याचे प्रेत बाहेर काढतात; इतकी किंमत आपल्यांत तुळशीला आहे. त्या तुळशीची माळ नेहमीं शरीरावर धारण करणें हे प्रमुख बाह्य चिन्ह आहे.

त्याजबरोबर गोपीचंदनाचा टिळा व मुद्रा धारण करणें हेही बाह्य लक्षण आहे.

तुकारामबोवा म्हणतात--

आम्हां अळंकार मुद्रांचे श्रृंगार।
तुळशीचे हार वाहूं कंठीं ॥ १ ॥

× × ×

गोपीचंदन मुद्रा धरणें। आम्हां लेणें वैष्णवां ॥

× × ×

गोपीचंदन उटी तुळशीच्या माळा।
हार मिरविती गळां रे।
टाळमृदंग घाई पुष्पाचा वरुषाव।
अनुपम्य सुख सोहळा रे॥

तात्पर्य, गळ्यांत तुळशीची माळा, कपाळास गोपीचंदनाचा टिळा व अंगावर मुद्रा, हातांत भगवी पताका घेऊन पंढरपूरला आषाढ शुा० ११ व कार्तिक शुा० ११ स प्रतिवर्षी नियमानें श्रीपांडुरंगसेवेस जाणारा तो वारकरी

या पंढरीच्या वारकऱ्यांचे ज्ञानोबांच्या अभंगांत मोठें सुंदर वर्णन केलें आहे.

ज्ञानोबा म्हणतात--

कुंचे पताका झळकती। टाळमृदंग वाजती।
आनंदें प्रेमें गर्जती। भद्रजातीविठ्ठलाचे ॥ १ ॥

वर उल्लेखिलेल्या दोन मुख्य वाऱ्या आहेत.

भगवान् नामदेवांना म्हणतात--

आषाढी कार्तिकी विसरूं नका मज। सांगतसे गूज पांडुरंग ॥

× × ×

तुकारामबोवा म्हणतात :--

आषाढी निकट। आला कार्तिकीचा हाट ॥ १ ॥
पुरे दोनीच बाजार। न लगे आणीक व्यापार ॥२॥

आतां थोडीं आंतर्चिन्हे सांगतों. सांगावयास नको कीं, आंतर्चिन्हांना बाह्यापेक्षां अधिक महत्त्व. ज्ञानेश्वरमहाराज एका अभंगांत वारकऱ्याचें आंतर्लक्षण पुढीलप्रमाणें सांगतात--

काया वाचा मनें जीवें सर्वस्वें उदार।
बापरखुमादेवीवरु विठ्ठलाचा वारिकर ॥ १ ॥

ज्यानें आपलें शरीर, वाणी, मन फार काय जीवही भगवंताला अर्पण केला तो वारिकर.

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥

गीता, अ. १७ श्लो. १४

शरीर भगवंताच्या सेवेस लावणें तें कसें हें गीतेंतील शारीरिक तप सांगणाऱ्या वर दिलेल्या श्लोकावरची ज्ञानोबांची टीका वाचली असतां लक्षांत येईल. त्यांतील कांहीं ओव्या देतों.

तरी शंभू कां श्रीहरि। पढियंता होय ।।
तया प्रिय देवतालया। यात्रादिकें करावया।
आठही पाहार जैसें पायां। उळिग घापे ।।
देवांगणमिरवणियां। अंगोपचार पुरवणियां।
करावया म्हणियां। शोभती हात ।।

ज्ञानेश्वरी, अ. १७ श्लो. २०१–३

वाणी भगवंताला अर्पण करणें—वाङ्मयतपाचा श्लोक :—

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ।।

गीता, अ. १७ श्लो. १५

समर्पिली वाणी। पांडुरंगीं घेते धणी ।।

× × ×

बोलणेंचि नाहीं। आतां देवावीण कांहीं ।।

मन अर्पण करणें—— मानसिक तपाचा श्लोक :——

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ।।

गीता, अ. १७–१६

संकल्प तो नाहीं दुजा। महाराजाविन तो ।। १ ।।

सरतेशेवटीं जीवही भगवंताला अर्पण करणें अवश्य.

तुका म्हणे बळी। जीव दिला पायातळीं ।।

जीव देणें याचा अर्थ मान कापून शिर ठेवणें नव्हे. हा तमाचा गुण आहे, भक्ति नव्हे. भक्त जर मेला तर सेवा कोण करणार? आपल्या जीवावर जें प्रेम आहे तें प्रेम देवावर करणें म्हणजेच जीव देणें.

तात्पर्य, आपल्याजवळची सर्व स्थूलसूक्ष्म सामुग्री देवकार्यीं अर्पण करणें हेंच "कायावाचामनें जीवें उदार होणें." तुकारामबोवा म्हणतात :—

असा जो उदार तो वारकरी.

वारकऱ्यांचीं लक्षणें सांगणारा ज्ञानोबारायांचा एक प्रसिद्ध अभंग आहे त्याचें आरंभींचें कडवें, कुंचे पताका ' वर दिलेंच आहे. पण वाचकांस एकदम कल्पना यावी म्हणून तो समग्र देतों :—

कुंचे पताका झळकती । टाळमृदंग वाजती ।
आनंदें प्रेमें गर्जती । भद्रजाती विठ्ठलाचे ।। १ ।।
आले हरीचे विनट । वीर विठ्ठलाचे सुभट ।
भेणें जाहले दिग्पट । पळती भाट दोषांचे ।। २ ।।
तुळसी माळा शोभती कंठीं । गोपीचंदनाच्या उटी ।
सहस्र विघ्नें लक्ष कोटी । बारा वाटा पळताती ।।३।।
सतत कृष्णमूर्ती सांवळी । खेळे ज्याचे हृदयकमळीं ।
शांतिक्षमा तयाजवळी । जींवेंभावें अनुसरल्या ।। ४ ।।
सहस्र नामाचें हतियेर । शंखचक्रांचे श्रृंगार ।
अति बळ वैराग्याचें थोर । केला मार षड्वर्गा ।। ५ ।।
ऐसे एकांग वीर । विठ्ठलरायाचे डिंगर ।
बापरखुमादेवीवर । तीहीं निर्धारीं जोडिला ।। ६ ।।

असा वारकरी हो व पंढरपूरला जा, असें तुकारामबुवा सांगतात—

होय होय वारकरी । पाहे पाहे रे पंढरी ।। १ ।।

पंढरीच्या वारीचा संप्रदाय असा आहे कीं, दशमीस पंढरपूरला जावें व तेथें दशमी ते पौर्णिमेपर्यंत राहून पौर्णिमेच्या दिवशीं गोपाळकाल्याची

लाही घेऊन परत गांवास जावें. निघतांना पुनः लवकर देवदर्शन व्हावें म्हणून दहींभात खाऊन निघावें.

दधि मंगल भोजन सारा। म्हणती करा मुरडीव ॥१॥
मागुता हा पाहो ठाव। पंढरीराव दरुशनें ॥ २ ॥

तेथें असतांना तेथील मुख्य कार्यक्रमः—

चंद्रभागे स्नान विधि तो हरिकथा। समाधान चित्ता सर्व काळ

तुकारामबोवा वारकरी होऊत जा म्हणतात त्यांत अर्थ आहे. आपण ज्या वृत्तीनें पाहूं त्यावर काय दिसणार हें अवलंबून आहे.

म्हणून तुकारामबोवा एके ठिकाणीं सांगतात--

विषय गुंडुनि पसारा। धांव घ्यारे पंढरपुरा ॥१ ॥
गात जागा गात जागा ॥ प्रेम मागा विठ्ठला ॥ २ ॥

भगवंतावर प्रेम करण्यास शिका व संतांच्या सहवासांत पंढपूरला जा म्हणजे तेथला आनंद कळेल.

नाचत पंढरीये जाऊं रे खेळिया। विठ्ठल रखुमाई पाहूं रे ॥

असे गेलांत कीं तेथें आनंदाला काय कमी आहे ?

आनंद तेथींचा मुकियासी वाचा। बहिरे ऐकती कानीं रे।
आंधळ्यासी डोळे पांगळासी पाय।
तुका म्हणे वृद्ध होती तरणे रे ॥

× × ×

अभिमान नुरे। कोड अवघेंचि पुरे ॥ ३ ॥

## अभंग

घेईन मी जन्म याजसाठीं देवा ।
तुझी चरणसेवा साधावया ॥ १ ॥
हरिनामकीर्तन संतांचें पूजन ।
घालीन लोटांगण महाद्वारीं ॥ २ ॥
आनंदें निर्भर असों भलते ठायीं ।
सुखदु:खा नाहीं चाड आम्हां ॥ ३ ॥
आणीक सायास न करी न धरी आस ।
होईन उदास सर्वभावें ॥ ४ ॥
मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी ।
होय सांगों तैसी तुका म्हणे ॥ ५ ॥

तुकाराममहाराज हे मोठे निष्ठावंत नामधारक. ते म्हणतात——

आम्ही नामाचे धारक । नेणों प्रकार आणीक ।
सर्वभावें एक । विठ्ठलचि प्रमाण ॥ १ ॥

असे निष्ठावंत नामधारक खरे. पण त्यांची बैठक काय उंचीची होती, कोणत्या उंच भूमिकेवरून तुकाराममहाराज श्रीपांडुरंगाची उपासना करीत होते, तिजबद्दल त्यांना केवढी आस्था होती हें स्पष्ट करणारा हा मोठा महत्त्वाचा उत्कृष्ट अभंग आहे. प्रथम आपण याचा धांवता भावार्थ पाहूं व मग या भूमिकेचा खुलासेंवार विचार करून यासंबंधीं उत्पन्न होणाऱ्या इतर प्रश्नांचा विचार करूं.

या अभंगाच्या प्रथम कडव्याच्या पूर्वार्धांत तुकाराममहाराज देवाला हांक मारून त्याच्यासमोर प्रतिज्ञा करतात कीं, 'देवा, मी जन्म घेईन.' जन्म कशाकरतां याची स्पष्टता याच कडव्याच्या उत्तरार्धांत करतात—

तुझी चरणसेवा साधावया ।। १ ।।

तुझी चरणसेवा साधण्याकरतां म्हणजे मनाजोगी करण्याकरतां. येथें 'मनाजोगी सेवा' हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. याचा विचार भावार्थानंतर करूं.

आपण कोणची चरणसेवा करण्याकरतां जन्म घेणार हें दुसऱ्या कडव्यांत सांगतात—

हरिनामकीर्तन संतांचें पूजन । घालीन लोटांगण महाद्वारीं २

चरणसेवा करण्याकरतां जन्म घेईन म्हणजे देवाच्या पुजाऱ्याच्या पोटीं असें नव्हे. कारण या कडव्यांत सांगितलेली जी त्रिविध प्रकारची सेवा आहे ती सगळ्या लोकांकडून होणारी सेवा आहे. पहिली सेवा, 'हरिनाम कीर्तन.' तुकाराममहाराज नांव घेणें याला सेवा म्हणतात—

सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेद काम सारोनियां १

× × ×

तुका म्हणे देवा । चिंतन हे तुझी सेवा ।। १ ।।

मोठ्या प्रेमानें भगवंताचें नांव घेणें ही मोठी सेवा आहे. दुसरा प्रकार संतांचें पूजन. भगवंताशीं समरस झालेले महात्मे त्यांची सेवा करणें हीही देवाची पूजा आहे.

तुका म्हणे देवा । त्यांची केल्या पावे सेवा ।। १ ।।

संतांचें पूजन करणें म्हणजे देवाचें पूजन करणें.

कारण एक,—

देव ते संत देव ते संत । निमित्त त्या प्रतिमा ।।

दुसरें,

अवघा भार वाटे देवा । संतसेवा न करता ।।

तिसरी सेवा म्हणजे अधिक प्रेमानें भरलेली एक गोष्ट.

घालीन लोटांगण महाद्वारीं ।। २ ।।

तुकारामबोवा म्हणतात—

दंडवत दंडापरी । मागें उरी नुरावी ।।

ज्ञानोबाराय म्हणतात--

लिंग का प्रतिमा दिठीं । देखत खेंवो अंगेष्टी ।
लोटिजे का काठी । पडली जैसी ।।

ज्ञा. १७-२०४

आपल्या ठिकाणींचा कोणचाही अभिमान न ठेवतां देवास लोटांगण घालणें हा सेवेचा तिसरा प्रकार.

घालीन लोटांगण महाद्वारीं ।। २ ।।

या सेवेच्या आनंदांत,

आनंदें निर्भर असो भलते ठायीं ।
सुखदुःखा नाहीं चाड आम्हां ।। ३ ।।

ही सेवा करीत असतांना जो परिपूर्ण आनंद मिळेल त्याच्या भोगांत इथ्या त्या ठिकाणीं राहून कालक्रमणा करूं. आम्हांला सुखदुःख याचा विचार करण्याची इच्छा शिल्लकच राहिली नाहीं. ‘ अनुकूलवेदनीयं सुखम् ‘ प्रतिकूलवेदनीयं दुःखम् । ’ आपल्यास अनुकूल विषयाचा भोग झाला असतां जिवास जी संवेदना होते त्याला सुख म्हणतात. प्रतिकूल विषयाचा भोग घेण्याचा प्रसंग आला असतां आंत उत्पन्न होणारी संवेदना तिला दुःख म्हणतात. तुकोबा म्हणतात—आमच्या ठिकाणीं विषय भोगांतून उत्पन्न होणारें हें सुखदुःख याचा विचार करायला वावच नाहीं. कारण आमचे मनांत तुझ्या सेवेचा महानंद असल्यामुळें मन त्यांत बुडून गेलें आहे.

कैं वाहावे जीवन । कैं पलंगीं शयन ।। १ ।।
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ।। २ ।।
कैं भोज्य नानापरी । कैं कोरडचा भाकरी ।। ३ ।।

× × ×

कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ।। ६ ।।

× × ×

तुका म्हणे जाण । सुखदु:ख तें समान ।। ८ ।।

यावर देव म्हणाले असावेत कीं, 'अरे, भजनाविना दुसरें साधन, दुसरा उद्योग करशील कां नाहीं?' तुकारामबोवा त्यावर म्हणतात—

आणीक सायास न करी न धरी आस ।
होईन उदास सर्वभावें ।। ४ ।।

मी तुझ्या भजनाहून वेगळें दुसरें साधन करणार नाहीं. येवढेंच नव्हे तर पोटाच्या उद्योगाकरतां कष्टही करणार नाहीं. इतर साधनाचें मोठें कष्ट कोण उठवतो? तुझ्यासारखा आमच्या योगक्षेमाची काळजी वाहणारा असतांना पोटाकरतां कोण खटपट करतो? 'मी इतर कष्ट करणार नाहीं. मी दुसरी आशा धरणार नाहीं. मी सर्व प्रकारें उदासीन होऊन राहीन. येथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं उदासीनता म्हणजे बायको अथवा पोर असा कोणी जवळचा नातलग वारल्यानें वगैरे मनुष्याला जी उदासीनता येते ती नव्हे. येथें उदासीन याचा अर्थ 'अलिप्त', 'कोठेंही न चिकटलेला' असा आहे.

भगवंतांनीं गी. अ. १२-१६ या श्लोकांत साधूंचीं लक्षणें सांगतांना तो 'उदासीन' असतो असें म्हटलें आहे. ज्ञानेश्वरमहाराज त्या पदाची स्पष्टता पुढील ओवींत करतात—

व्यापक आणि उदास । जैसें कां आकाश ।
तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ।।

आकाश जसें सर्वांत असून 'अलिप्त', तसा मी राहीन. यावरही देव म्हणाले असावेत, 'अरे, चवथा पुरुषार्थ मोक्ष. त्याकरतां तरी प्रयत्न करशील कीं नाहीं ?' त्यावर तुकोबा म्हणतात—

मोक्ष आम्हां घरीं । कामारी हे दासी ।
होय सांगों ऐसी । तुका म्हणे ।। ५ ।।

तुकारामबोवा म्हणतात, 'मुक्ति म्हणजे सांगितलेलें काम करणारी आमच्या घरांतील मोलकरीण आहे. आम्ही सांगूं तशी ती वागते. याचा अभिप्राय असा कीं, आम्ही तर मुक्त आहोंतच, पण आम्ही म्हणूं तिकडे मोक्षाला जावें लागतें असे मोक्षाचे अधिकारी आम्ही आहोंत.''

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडीबांधी करी ।.....
अ. १२-२२०

तुकारामबोवा म्हणतात आम्ही याच वर्गांतले.

'म्हणों तेथ राहे महाबोध.' मग आतां त्याकरतां प्रयत्न कशाला ?

भावार्थ संपला.

आतां या अभंगाची भूमिका पाहूं.

आपल्या महाराष्ट्राचें मोठें भाग्य आहे कीं, या भूमींत अनेक थोर साधू जन्मास आले; व त्या साधूंचेंही मोठें वैशिष्ट्य आहे कीं, ज्याप्रमाणें सोन्याला सुगंध प्राप्त व्हावा त्याप्रमाणें त्यांनीं परमोच्च अशी अद्वैत-ज्ञानाची प्राप्ति करून घेतल्यावरही त्यांच्या ठिकाणीं भगवंताच्या भक्तीचा सुगंध उत्कटतेनें वास करीत होता. अद्वैतस्थिति प्राप्त होणें ही आधीच दुर्लभ गोष्ट आहे. शाब्दिक अल्पज्ञान असून सर्व ठिकाणीं परमात्मा भरलेला आहे अशी पोकळ बडबड करणारे आपणाला पुष्कळ भेटतात. थोडे पाणी तेथें खळखळ फार हा न्यायच आहे. त्याप्रमाणें थोड्या ज्ञानाच्या भांडवलावर अद्वैताच्या लांब व आम्ही पूर्ण झालों, आम्हाला आतां भक्तीची काय गरज आहे, अशा गप्पा मारणारे पुष्कळ लोक असतात. परंतु महाराष्ट्रांत जे थोर साधु होऊन गेले ते अध्यात्माच्या मार्गांत पुरे

शेवटपर्यंत गेलेले होते व असें असूनसुद्धां त्यांची स्थिति गीतेंतल्या नवव्या अध्यायांतील

‘ महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ’ ।।

या तेराव्या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें भगवंतावरील नितांत प्रेमानें भरलेली होती. नदीचें पाणी वर्षकाळांत दुथड्या वाहून जातें त्याप्रमाणें ज्ञानेश्वरमहाराजांची या श्लोकांवरील टीका स्फूर्तीनें उचंबळून आलेली आहे. ज्या महात्म्यांनीं उच्च अनुभव संपादन केला, प्रत्यक्ष अनंतकोटी-ब्रह्मांडनायक जो प्रभु त्याला आपल्या पोटांत सांठविलें, त्याचें वर्णन ज्ञानदेव करतात—

जयाचे चोखटे मानसीं । मिन्चि होऊनि असें क्षेत्रसंन्यासी ।
जया निजेलियाते उपासी । वैराग्य गा ।।

ज्ञा. ९-१८८

हे महात्मे

‘ ज्ञानगंगे न्हाले । पूर्णता जेऊनि धाले । ’

असे आहेत.

ज्याप्रमाणें नळाखालील लहान धारेच्या पाण्यानें स्नान करणें वेगळें व गंगेसारख्या नदींत बुडी घेऊन सर्वांगानें न्हाऊन निघावें हें निराळें, त्याप्रमाणें यांची ज्ञानाची बैठक ‘ कैवल्यातें परौते सर म्हणती ’ अशी असूनसुद्धां परमात्म्याच्या भक्तींत ते रममाण झाले होते. अद्वैतानुभव व भक्ति यांचा सुंदर समन्वय आपणांस यांच्या ठिकाणीं दिसून येतो.

श्रीतुकाराममहाराज अशा अद्वैत ज्ञानाच्या उच्च अनुभवाला प्राप्त झाले होते व त्यांच्या ठिकाणीं भगवत्प्रेम भोगण्याची आवड अनिवार होऊन ते या अभंगांत म्हणतात—

घेईन मी जन्म याजसाठीं देवा ।
तुझी चरणसेवा साधावया ।। १ ।।

वास्तविक जन्म घेणें ही स्थिति मोक्षस्थितीच्या मानानें फारच हलकी व कमी प्रतीची आहे. श्रीतुकाराममहाराज फार मोठ्या अधिकाराचें असून 'मी जन्म घेईन' असें म्हणतात, म्हणून त्यांच्या म्हणण्याला किंमत आहे. नाहीं तर जो जन्ममृत्यूच्या पलीकडे गेलाच नाहीं त्यानें 'मी जन्म घेईन' अशी प्रतिज्ञा करण्यांत कांहीं किंमत नाहीं. ज्याच्या पायांत घालावयास जोडाही नाहीं त्यानें 'मी मोटारींत बसणार नाहीं' असें म्हटलें अथवा ज्याला खायची पंचाईत आहे त्यानें 'मी एकादशी करीन' असें सांगितलें किंवा जो विद्यार्थी नेहमीच नापास होतो त्यानें 'मी यंदा पास होणार नाहीं' असें आग्रहपूर्वक सांगितले तर या सगळ्यांचें हंसें होतें. त्यांच्या म्हणण्याला जग किंमत देत नाहीं. अंगीं योग्यता असून खालच्या भुमिकेवर मुद्दाम जर आलें तर जग मानतें. महाराष्ट्राचें मोठें भाग्य कीं, या संतांच्या ठिकाणीं अद्वैतानुभव प्राप्त होऊन भक्तीचा जिव्हाळा होता. ज्ञानेदवांनीं

'चहूं पुरुषार्थां शिरीं। भक्ति जैसी'

असा मोक्षाचा चौथा पुरुषार्थ प्राप्त झाल्यावरही भक्तीचा पंचम पुरुषार्थ सांगितला आहे. श्रीतुकाराममहाराजांचा मोक्षाच्या बाबतींत काय अधिकार होता तें या अभंगाच्या शेवटच्या कडव्यावरूच दिसून येतें.

मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी
होय सांगों ऐसी तुका म्हणे ॥

ते म्हणतात--मोक्ष आमच्या घरीं चाकराप्रमाणें आहे. आम्ही सांगूं तें काम करण्यास राबत आहे. मोक्ष म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे.

ज्ञानेश्वरमहाराज त्याचें दुर्लभत्व सांगतात--

'मोक्ष दुराध्य कीर होये।'

त्याप्रमाणें गीताही दूर्लभत्व सांगते--

'बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते।'

अ. ७-१९

अनेक जन्म नैराश्ययुक्त सत्कर्मे केल्यानंतर गुरूची गांठ पडल्यावर स्वरूपज्ञानाची प्राप्ति होते. असा हा दुर्लभ मोक्ष नोकराला सांगतों त्याप्रमाणें 'इथें रहा' असें साधुपुरुषानें जर सांगितलें तर त्याची आज्ञा पाळतो.

ज्ञानदेव सांगतात——

'तो जेऊति वास पाहे । तेउति सुखाची सृष्टि होये ।
तो म्हणे तेथें राहे । महाबोधु ।।'

किंवा तुकाराममहाराजांनीं म्हटल्याप्रमाणें——

'तुका म्हणे आलें समर्थाच्या मनां ।
तरी होय राणा रंक त्याचा ।'

त्यांच्या मनांत एखाद्याच्या अंगीकार करण्याचें आलें तर त्याचा दुःखमय असणारा संसार मोक्षमय करून टाकतील अशी मोक्षावर त्यांची सत्ता आहे. परंतु मोक्ष चाकराप्रमाणें त्यांचें स्वाधीन असूनसुद्धां ते भक्ति-प्रेमांत रंगून गेले होते व लोकांना तोच मार्ग सांगत. त्याचें वर्णन ज्ञानेश्वरमहाराज करतात——

जे पुरुषार्थ सिद्धी चौथी । घेऊनि आपुलां हातीं ।
रिगाला भक्तिपंथीं । जगा देतु ।।

तुकाराममहाराज हे स्वतः या अभंगांत शेवटच्या कडव्यांत सांगितल्या-प्रमाणें मुक्त होते. असा अधिकार त्यांच्या ठिकाणीं असून ते या अभंगांत म्हणतात——

घेईन मी जन्म याजसाठीं देवा ।
तुझी चरणसेवा साधावया ।।१।।

यावरून त्यांची उपासनेची बैठक कळते; कोणतीही प्रतिज्ञा करण्यास अंगीं अधिकार व स्वतंत्रता लागते, मग त्याला किंमत येतें हें मागें सांगितलेंच आहे. एखाद्या तुरुंगांतील कैद्यानें म्हटलें कीं, 'मी पंढपूरला जाणार नाहीं' तर त्याचें म्हणणें फोल आहे. तो तुरुंगांत परतंत्र आहे. त्याला पंढरपूरला जाण्याची स्वतंत्रता नाहीं. त्याप्रमाणें तुकाराममहाराजांची

मात्र स्थिति नव्हती. ते जन्म घेण्याला परतंत्र नव्हते. ते स्वतंत्र व मुक्त असल्यामुळें. जन्म न घेण्याची स्वतंत्रता त्यांच्या ठिकाणीं होती; म्हणून त्यांच्या ' घेईन मी जन्म याजसाठीं देवा ' या प्रतिज्ञेला किंमत आहे.

जन्म कशाकरतां घेईन हें या अभंगाच्या पहिल्या चरणाच्या उत्तरार्धात सांगतात.––

तुझी चरणसेवा साधावया ।।

आतां थोडा ' साधावया ' याचा भावार्थात म्हटल्याप्रमाणें विचार करूं. त्यायोगानेंही तुकोबांच्या सेवेच्या आवडीवर प्रकाश पडेल. साधणें म्हणजे मनाजोगती होणें. जसें, चित्रकार अथवा गाणारा आपलें चित्र अथवा गाणें मनाजोगतें झालें म्हणजे साधलें असें म्हणतो, त्याप्रमाणें तुकाराममहाराज माझ्या मनाजोगती सेवा झाली म्हणजे ती साधेल तशी साधण्यासाठीं मी जन्म घेईन असें म्हणतात. याचा अर्थ त्यांच्या हातून आजपर्यंत सेवा झालीच नाहीं; म्हणून ती यापुढें व्हावी असा नाहीं. एखाद्या प्रापंचीक माणसानें जन्मभर नोकरींत व प्रपंचाच्या नाना लटपटींत आयुष्य घालवून शेवटीं करायला शिल्लक नाहीं म्हणून जुलमानें देवळांत जाण्यास लागावें व म्हणावें ' काय करावें, मला देवाची मनाजोगती सेवा होत नाहीं ' असे पश्चात्तापाचे उद्गार तुकाराममहारजांचे नाहींत. त्यांनीं जन्माला येऊन दुसरें कांहीं केलेंच नाहीं. ते म्हणतात––

येउनि संसारीं । मी तो एक जाणे हरी ।
आणिक कांहीं नेणे धंदा । नित्य ध्यातसे गोविंदा ।।
काम क्रोध लोभ स्वार्थ । अवघा माझा पंढरीनाथ ।।

सर्व आयुष्यभर त्यांनीं दुसरें कांहीं केलेंच नाहीं. ' सततं कीर्तयन्तो मां ' या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें––

सदा नामघोष करूं हरिकथा ।
तेणें सदा चित्ता समाधान ।

× × ×

येणें बोधें आम्ही असो सर्व काळ ।
करूनि निर्मळ हरिकथा ॥

असा सर्व जन्म भगवंताच्या सेवेंत जाऊनसुद्धां ते म्हणतात, "मनपसंत अशी सेवा घडली नाहीं, ती घडावी म्हणून मी जन्म घेईन."

'तुझी चरणसेवा साधावया ॥ १ ॥'

मनपसंत सेवा म्हणजे कोणाच्या मनपसंत याचा विचार होणें अवश्य आहे. लोकांच्या मनपसंत तर खासच नव्हे; लोकरंजनार्थ त्यांनीं कधींच सेवा केली नाहीं.

'थुंकोनिया मन। दंभ करितो कीर्तन ॥'

असें तेच सांगतात. मग सेवेचा संतोष कोणाला? हा प्रश्न राहतो.

जग सोडलें म्हणजे राहिले दोन; देव व ते स्वतः. त्यांच्या सेवेनें देवाला संतोष झाला नाहीं असें तर खासच नाहीं. कारण देव त्यांच्या सेवेवर किती संतुष्ट होते तें तेच सांगतात--

निजल्यानें गातां उभा नारायण ।
बैसल्या कीर्तन करितां डोले ॥१॥

देव त्यांच्यापासून कधीं दूर जातच नव्हते.

भक्त समागमें सर्व भावें हरी ।
न सांगतां करी सर्व काम ॥

लोकरंजनाचा हेतु नाहीं, देवाचा पूर्ण संतोष तर आहे. मग चरणसेवा साधली नाहीं असें म्हणतात याचा अर्थ एवढाच कीं, माझी सेवेची आवड, जन्मभर सेवा करूनही तृप्त झाली नाहीं. इतकी उत्कट आवड सेवेबद्दल त्यांच्या ठिकाणीं होती. आवडीचें लक्षणच असें आहे कीं--

'आवडी जेथ पडे। तयाची अवसरी पुढेंपुढें।
रिगो लागे हें घडे। प्रेम ऐसें ॥'

× × ×

'पढियंते सदा तेचि । भोगी नवी नवी रुचि ।'

म्हणजे एखाद्या पदार्थाबद्दल आवड असली म्हणजे त्याचा भोग कितीही घेतला तरी वीट येत नाहीं. आपल्या मुलाला आपण रोज प्रेमानें जवळ करतों पण त्याचा कंटाळा कधीं येत नाहीं. तो 'शिळा' झाला असें कधीं वाटत नाहीं. हें झालें सामान्य विषयसुखाचें. मग सुसुखं पवित्रं इदं उत्तमम् ' असें ज्याचें वर्णन करतां येईल त्या सुखाचा वीट येईल कसा ?

'वीट नाहीं पांडुरंगीं । वाढे अंगीं आर्त हे ।'

आवडीनें भक्ति करूं लागलें कीं पांडुरंगाबद्दल आर्तता अंगांत वाढते. किती आर्तता वाढते ते सांगतात--

'घेईन मी जन्म याजसाठीं देवा ।'

घेईन मी जन्म म्हणजे एक जन्म नव्हे. एक जन्म घेईन असें म्हटलें तर खरी आवडच नाहीं. जन्म म्हणजे अनेक जन्म.

'घेईन जन्मांतरें हेंचि करावया खरें ।।

भगवंताच्या सेवेची आवड अशाप्रमाणें अंतःकरणांत उसळल्यावर महाराजांनीं या अभंगांत प्रतिज्ञेचे उद्‌गार काढले आहेत. एऱ्हवीं महाराज असे गर्वानें बोलणारे नव्हते. ते अत्यंत नम्र होते.

'रुळे तळील पायरी । संत पाय देती वरी ।'

इतकी नम्रता त्यांचे ठिकाणीं होती.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांत सांगावयाचें तर---

अखंड अगर्वता होऊन असती ।
जयांची विनय हेचि संपत्ति ।
जे जयजय मंत्रे अर्पिती ।
माझ्याचि ठायीं ।।

ज्यांच्याजवळ कांहीं योग्यता नसते त्यांच्याच ठिकाणीं फार गर्व असतो. रिकामें भांडें असलें म्हणजे 'ठण् ठण्' असा आवाज येतो, पण तेंच

भरलेलें असलें म्हणजे येत नाहीं. त्याचप्रमाणें तुकाराममहाराजांच्या ठिकाणीं गर्व धरण्याइतकी पुष्कळ योग्यता असून सुद्धां ते अत्यंत नम्र होते, परंतु अंतःकरणांतच जोराची भावना उत्पन्न झाल्यामुळें बाकीच्या भावना बाजूस सारून त्यांच्या मुखांतून उद्गार निघतात--

'घेईन मी जन्म याजसाठीं देवा ।
तुझी चरणसेवा साधावया ।। १ ।।

आपण आतां थोडें तपशिलांत शिरूं. तुकाराममहाराज मोक्षाचे अधिकारी असून जन्म घेऊन सेवा करीन असें म्हणतात. यावर प्रश्न उत्पन्न होतो कीं, मनुष्यानें आपल्या आवडीकरतां किती खालीं यावें ? कोणी म्हणेल कीं यांत खालीं येण्याचा काय प्रसंग आहे ? तर त्याचें उत्तर तुकारामबोवा जो जन्म घेईन म्हणून प्रतिज्ञा करतात त्या जन्माच्या स्वरूपाच्या विचारांत आहे. जन्माच्या स्वरूपाचा जर विचार केला तर ही त्यांची प्रतिज्ञा ' प्रतिज्ञा ' म्हणण्यालाही योग्य ठरणार नाहीं.

म्हणून प्रथम याला प्रतिज्ञा म्हणण्याची तरी योग्यता आहे का हे पाहूं. समजा, एक दुसऱ्याला म्हणूं लागला, ' तुझी माझी कुस्ती. माझें नाक वरती राहातें कीं नाहीं ? ' ही कसली प्रतिज्ञा ? त्याचप्रमाणें जन्म ही का चांगली गोष्ट आहे ? जन्मांत किती तरी अनर्थ सांगावेत ? तेच म्हणतात---

प्रथम केला गर्भी वास । काय ते सांगावे सायास ।
दुःख भोगिले नवहि मास । आलों जन्मास येथवरी ।।१।।

× × ×

मातेचिया उदरकुहरीं । पचूनी विष्टेच्या दाथरी ।
उकडूनि नवमास वरी । जन्म जन्मोनी मरती ।।

ज्ञा. ९-३३१

आपण शरीर धुतों, पुसतों म्हणून ठीक. देन्हवीं ज्या पोटांत आपण राहतों त्यांत घाण आहे.

'रक्त रेत दुर्गंधी जंतु नरक मुतानें भरली रे ।।'

ज्ञा. म. अभंग

× × ×

'हा देह नाशिवंत मळमुत्राचा बांधा ।
वरी चर्म घातलें रे कर्म कीटकांचा सांधा ।
रवरव दुर्गंधी रे अमंगळ तिचा बांधा ।
स्मरे त्या हरिहरा शरण जाई गोविंदा ।।

ज्ञा. म. अभंग

'काय सांगों गर्भींची यातना । मज भोगितां नारायणा ।
मांसमळमूत्र जाणा । तुज क्षणक्षणा ध्यातसे ।।'

अशीं कितीतरी वचनें देतां येतील. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

'तेथ सकळ दुःख धामें । भुंजिजति जियें मृत्युजन्में ।।'

ज्ञा. १८–१२७०

सर्व दुःखाचें पिकतें शेत म्हणजे जन्म. तात्पर्य, मरणासकट जो सर्व दुःखाला कारणीभूत तो जन्म घेण्यांत काय भूषण आहे? जन्मांत काय सुख आहे?

उलट प्रतिज्ञा अशी पाहिजे कीं, मी जन्ममरणांतून मुक्त होणार. पण तुकारामबोवा तर विचित्रच प्रतिज्ञा करतात. दुसरे, असली प्रतिज्ञा शहाणा मनुष्य करणार नाहीं. भगवंतांनीं ज्ञात्याचीं लक्षणें १३ व १६ या अध्यायांत सांगितलीं आहेत. त्यांत पुढील लक्षण आहे:—

'जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ।'

यावर ज्ञानेश्वरमहाराजांनीं उत्तम लिहिलें आहे. ते म्हणतात—

आणि जन्ममृत्युदुःखें । व्याधिवार्धक्यकलुषें ।।
तियें आंगा न येतां देखे दुरूनि जो ।।

साधकु विवसिया। कां उपसर्गु योगिया।
पावे उणेयापुरेया। वोथंबा जेवीं ॥
वैर जन्मांतरींचें। सर्पा मनौनि न वचे।
तेवीं अतीता जन्मांचें। उणे जो वाहे ॥
डोळां हरळ न विरे। घाई कोत न जिरे।
तैसें काळींचें न विसरे। जन्मदुःख ॥
म्हणे पूयगर्तें रिगाला। अहामूत्ररंध्रें निघाला।
कटा रे मियां चाटिला। कुचस्वेदु ॥
ऐसऐसिया परी। जन्माचा कांटाळा धरी।
म्हणे आतां तें मी न करीं। जेणें ऐसें होय ॥
हारी उमचावया। जुंवारी जैसा ये डाया
कीं वैरा बापाचेया पुत्रजचे ॥
मारिलियाचेनि रागें। पाठीचा जेवीं सूड मागे।
तेणें आक्षेपें लागे। जन्मापाठीं ॥
परि जन्मती ते लाज। न सांडी जयाचें निज।
संभाविता निस्तेज। न जिरे जेवीं।

ज्ञानेश्वरी, अ. १३, ओ. ५३६–५४४

या ओंव्यांचें तात्पर्य असें आहे कीं, मृत्यु प्राप्त होऊन पुनः जन्म येण्यापूर्वींच जन्माचें फळ जाणून तो पुनः घ्यावा लागणार नाहीं असा प्रयत्न करणारा ज्ञानी. जो हें न जाणतां जन्म घेईन म्हणून म्हणतो त्यास काय म्हणावें ?

गी. अ. १६ श्लो. २ मध्यें दैवी संपत्तीचे गुण सांगतांना 'ह्रीः' या पदावर ज्ञानेश्वरमहाराज पुढीलप्रमाणें लिहितात–

आतां पराजये राजा। जैसा कदर्थिजे लाजा।
कां मानिया निस्तेजा। निकृष्टास्तव ॥

नाना चांडाळ मंदिराशीं । अवचटें आलिया संन्यासी ।
मग लाज होय जैसी । उत्तमा तया ॥
क्षत्रियां रणीं पळोनि जाणें । तें कोण साहे लाजिरवाणें।
कां वैधव्यें पाचारणें । महासतियेतें ॥
रूपसा उदयलें कुष्ट । संभावितां कुटीचें बोट ।
तया लाजा प्राणसंकट । होय जैसें ॥
तैसें औटहातपणें । जें शव होऊनि जिणें ।
उपजों उपजों मरणें । नावानावा ॥
तियें गर्भभेदमुसें । रक्तमूत्ररसें ।
वोंतीव होऊनि असे । तें लाजिरवाणें ॥
हें बहु असो देहपणें । नामरूपासि येणें ।
नाहीं गा लाजिरवाणें । तयाहूनि ॥
ऐसैसिया अवकळा । घेपे शरीराचा कांटाळा ।
ते लाज पैं निर्मळा । निसुगा गोड ॥

ज्ञानेश्वरी, अ. १६ ओ. १७५-१८२

तात्पर्य, शहाणे लोक आपण जन्मास येणारच नाहीं अशी प्रतिज्ञा करतात व तुकारामबोवा याच्या उलट प्रतिज्ञा करतात--

'घेईम मी जन्म ।'

शिवाय जन्म घेण्याकरितां प्रतिज्ञा कशाकरतां करावयास पाहिजे ? याचें सार असें आहे कीं, नित्य, शुद्ध असा जो आत्मा त्यानें 'विटाळाचें आळें' असें शरीर होऊन राहणें यांत त्याचा कमीपणा आहे. त्यास ही लज्जा वाटणारी गोष्ट आहे. पण लाज कोणाला ? संभावितांना. कोडग्याला काय ? नेहमीं तुरुंगांतच वास्तव्य ज्याचें त्याची एकाशीं बोलाचाली झाली. त्या वेळीं तो तुरुंगांतच घर असणारा मनुष्य म्हणाला, 'अहो, मला काय सांगतां ? मी बारा वेळां तुरुंगांत जाऊन आलों. पण एकदांही कोणाचें

फट् म्हणून घेतलें नाहीं.' तात्पर्य, निर्मळांना लाज वाटते, निसुगे, कोडगे त्यांना नाहीं. प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, तुकारामबोवा निर्मळ का कोडगे?

शहाणीं माणसें उलट प्रतिज्ञा करतात—

भवस्वर्गा उबगले । मुमुक्षु योगज्ञानां वळघले ।
पुढतीं नयों इया निघाले । पैजा जेथ ।।

ज्ञा. अ. १५–२७७

भगवान् म्हणतात—

'जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।

गीता २–२७

जन्ममृत्यु अपरिहार्य गोष्ट आहे.

'उपजे ते नाशे । नाशिले पुनरपि दिसे ।
हें घटिकायंत्र जैसें । परिभ्रमे गा ।

ज्ञा. २–१५९

जसें जन्म घेण्यांत पुरुषार्थ नाहीं तर तो नायनाट करण्यांत पुरुषार्थ आहे, त्याचप्रमाणें जन्म घेण्याकरितां प्रतिज्ञा करावयास नको. तो प्राप्त होणारच. सहजच जन्म येतो.

शिवाय ज्याला मोक्ष प्राप्त झाला त्याच्या ठिकाणीं इच्छा कशा संभवणार? संभवतच नाहीं.

ज्ञानामृतेन तृप्तस्य कृतकृत्यस्य योगिनः ।
नैवास्ति किंचित् कर्तव्यमस्ति चेत् न स तत्त्ववित् ।।

'म्हणोनि ज्ञानिया पुरुखा । कृत्य करूं सरले देखा ।
ऐसा अनाथाचा सखा । बोलिला तो ।।'

हे जे प्रश्न उत्पन्न होतात त्या सर्व प्रश्नांना आतां उत्तरें देऊं.

जन्म घेण्यांत कमीपणा आहे अशी प्रतिज्ञा करण्यांत पुरुषार्थ काय अशी पहिली शंका. तिचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, तुकाराममहाराज जन्म घेणार म्हणतात, पण ते नुसते जन्म घेईन असें म्हणत नाहींत, तर—

'तुझी चरण सेवा साधावया'

तुझी चरणसेवा ज्या जन्मांत घडेल तोच जन्म मी घेईन अशी प्रतिज्ञा करतात. असा जन्म म्हणजे मनुष्यजन्म. कारण तेच म्हणतात--

'येचि जन्मीं घडे देवाचें भजन।
आणिक हें ज्ञान नाहीं कोठें॥

× × ×

'पशु काय पाप पुण्य जाणती।'....

× × ×

नरदेह निधान लागले हातीं। उत्तम सार उत्तम गति।
होईन देवचि म्हणती ते होती। तरि कां चित्तीं न धरावें॥१॥

या जन्मांत भगवद्भक्ति शक्य आहे. पण इतर जन्म घेणें जसें सोपें आहे,

तुका म्हणे घुबडा ऐसीं। जन्में सरिसी सूकराची ॥१॥

तसें मनुष्यजन्म घेणें सोपें नाहीं. तो मिळणें दुर्लभ आहे.

१ 'लब्ध्वा सुदुर्लभमिदं बहु संभवान्ते।'
भा. स्कं. ११ अ. ९

२ 'नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभम्' भागवत

३ 'नरदेह दुर्लभ जाणा' ए. अ.

खुद्द तुकोबा सांगतात,

बहुतां जन्मां अंतीं। जोडी लाधली हे हातीं ॥१॥

× × ×

'लाधलों हा देह काकतालिन्यायें।
न घडे उपायें घडो आलें॥'

मनुष्यजन्म मिळणें दुर्लभ आहे. कारण ज्या वेळेला पापपुण्य समान होतें त्या वेळेलाच तो मिळतो.

नाथमहाराज म्हणतात--

'सुकृत दुष्कृत समानसमीं। तें पाविजे कर्मभूमि।
तेचि जें पडे विषमीं। तें स्वर्गगामी कां नरक॥

ए. भा. अ. २-२१७

पापपुण्याचा कोण हिशोब ठेवतो? तेव्हां पापपुण्य समान होणें कठिणच असल्यानें मनुष्यजन्म मिळणें दुर्लभ आहे व म्हणून अशी प्रतिज्ञा करण्यांत पुरुषार्थ आहे. दुर्लभ जन्म घेईन हें म्हणण्यांतच प्रतिज्ञेला सार्थता आहे.

शंका दुसरी. तिचें उत्तर असें आहे कीं, जन्मांत त्रास, दुःख आहे हें खरें पण,

'पालखीं बैसतां मारगाची चिंता।
नाहीं उसंतिता कोसपेणी॥'

मार्गानें जाण्याचें दुःख त्याला नाहीं कीं, जो पालखींत बसून चालला आहे. तसें जन्ममरणाचें दुःख आम्हांला नाहीं.

कारण

'गर्भवासीं दुःख नाहीं येतां जातां।
हृदयीं असतां नाम तुझें॥'

दुःख त्याला भोगावें लागतें कीं, ज्याची चित्तवृत्ति देहाला चिकटली आहे.

'येऱ्हवीं तरी सहजें। सुखदुःख तेंचि सेविजे।
देहजळीं होईजे। मासोळीं जें॥' ज्ञानेश्वरी

शरिराशीं ज्याचें तादात्म्य असेल त्याला दुःख होईल, त्याच्याच चित्तावर सुखदुःखाची संवेदना होईल. ज्याची चित्तवृत्ति नामस्मरणांत रंगली त्याचें देहात्म्यच सुटतें मग त्याला दुःख कोठून असणार. म्हणून तुकाराममहाराज प्रतिज्ञा करतात--'घेईन मी जन्म--' दुसऱ्या ठिकाणीं ते म्हणतात --

'तुका म्हणे गर्भवासीं। सुखें घालावें आम्हांसी॥'

'घेईन जन्मांतरें । हेचि करावया खरें ।'

शेवटची शंका. मोक्ष प्राप्त झाला कीं इच्छाच उरत नाहीं. त्याचें उत्तर असें आहे कीं, इतर इच्छा उरत नाहीं. पण भगवंताचें सुख भोगावें ही इच्छा राहतेच. कारण श्रीहरीचें स्वरूपच असें आहे.

'आत्मारामश्च मुनयो निर्ग्रंथा ह्युरुक्रमे ।
कुर्वन्ति अहैतुकीं भक्ति इत्थंभूतगुणो हरिः ।'

तुकारामबोवा तर म्हणतात, भगवंताच्या खऱ्या भक्तीचा आरंभ मुळीं ब्रह्मानुभावापासून होतो.

'पावावया उपासना । ब्रह्मस्थानीं प्रस्थान ।

ब्रह्मज्ञानाच्या योगानें ज्याचें अंतःकरण निष्काम झालेलें आहे त्याच्याकडून खरी भक्ति होते. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ही ज्ञानोत्तरभक्ति अशी आहे—

'तृप्ती भुकेली काय करूं माये ।
जीवनीं जीवन कैसें तान्हेजत आहे ।
मन धालें परी न धाये ।
पुढत पुढतीं राजा विठ्ठलुचि पाहे ।।'

× × ×

'तत्प्राप्य तदेवावलोकयति तदेव श्रृणोति
तदेव चिन्तयति ।।'

नारदभक्तिसूत्र

'वर्षाकाळीं सरिता । चढों लागे पंडुसुता ।
तैसी नीचनवी भजतां । श्रद्धा दिसे ।।'

तात्पर्य, या उत्कट प्रेमानें (प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें अतृप्ति हें प्रेमाचें लक्षणच आहे ) आपल्याला पुनः भक्ति करतां यावी म्हणून तुकाराममहाराज प्रतिज्ञा करतात—

घेईन मी जन्म याजसाठीं देवा ।
तुझी चरणसेवा साधावया ।।१।।

या सेवेचें फळच असें आहे कीं, सेवा करणारा देहभान विसरतो.

एवं व्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः ।
हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः।।

ए. भा. २–४०

हरिनामगुणकीर्तनकीर्ती । अखंड आवडे जागृतीं ।
स्वप्नींही तेचि स्थिती । दृढ हरिभक्ती ठसावे ।।
ऐशियापरी भक्तियुक्त । दृढतर जाहलें ज्याचें व्रत ।
तंव तंव होय आर्द्रचित्त । प्रेम अद्भुत हरिनामकीर्ती ।।

ए. भा., अ. २ ओ. ५५०–५५१

जो मोलें मदिरा खाये । तो मदिरानंदें नाचे गाये ।
जेणें ब्रह्मानंद सेविला आहे । तो केवीं राहे आवरला।।

ए. भा. अ. २ ओ. २७१

तुकाराममहाराज असेंच म्हणतात––

आनंदें निर्भर असो भलते ठायीं ।
सुखदुःखा नाहीं चाड आम्हां ।।३।।

शेवटच्या कडव्यांत ते म्हणतात, मोक्षाकरतां प्रयत्न करणें ह्याची आम्हांला गरज नाहीं. तो अनुभव मी घेऊन बसलों येवढेंच नव्हे तर इतरांना तो देण्याची माझी शक्ति आहे.

मोक्ष आम्हां घरीं कामारी हे दासी ।
होय सांगो ऐसी तुका म्हणे ।।

## अभंग

मागणें तें एक तुजप्रति आहे ।
देशी तरी पाहे पांडुरंगा ॥१॥
या संतासी निरवी हेचि मज देई ।
आणिक दुजे कांहीं न मागे तुज ॥२॥
तुका म्हणे आतां उदार तूं होईं ।
मज ठेवीं पायीं संतांचिया ॥३॥

तुकाराममहाराज या अभंगांत भगवंताजवळ मागणें मागतात. हें जें त्यांनीं मागणें मागितलें त्याचें वारकऱ्यांच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. म्हणून हा अभंग प्रत्येक भजन-कीर्तनाच्या शेवटीं आरती झाल्यावर म्हणण्यांत येतो व तें योग्य आहे. कारण, जो भजन-कीर्तन करील त्यालाच मागण्याचा अधिकार प्राप्त होतो. आधीं सेवा मग मेवा. अथवा,

चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥

तुकाराममहाराज ही नीति जाणत होते व त्यांनीं देवाची सेवाही पुष्कळ केली. पण आपली सेवा जशी व जितकी व्हावयास पाहिजे तितकी झाली नाहीं असें त्यांना वाटत असावें, व म्हणून ते देवाजवळ या अभंगांत हक्कानें मागतांना दिसत नाहींत. या अभंगाच्या प्रथम कडव्याच्या उत्तरार्धात ते म्हणतात——

देशी तरी पाहे पांडुरंगा ॥

तुझ्याजवळ एक मागणें म्हणजे विनंति आहे. देशील तर पहा.

या मागण्याच्या अभंगाशीं पुढील मागण्याचे अभंग तोलून पहावेत म्हणजे वर जें म्हटलें आहे त्याची सत्यता पटेल.

हेंचि दान दे गा देवा। तुझा विसर न व्हावा ।।१।।

अहो देवा 'हेंच द्या.' याचा अर्थ इतर दिलेंत तर घेणार नाहीं.

अथवा

म्हणसी कांहीं मागा। हेंचि दे गा पांडुरंगा ।।

तुझा आग्रह आहे कांहीं मागा म्हणून मागतों. येऱ्हवीं मी निरिच्छ आहे. तुम्ही मोठे. तुमचा शब्द फार वेळां खालीं पडूं देणें बरें नव्हे. तर म्हणतों 'हेंच द्या.'

प्रस्तुतच्या संकीर्तनाचा जो अभंग आहे तो या दोन वर दिलेल्या अभंगांच्या भूमिकांपेक्षां वेगळ्या भूमिकेवरचा आहे हें वरील स्पष्टतेनंतर वेगळें सांगण्याचें कारण नाहीं.

आपण देवाजवळ काय मागतों तें तुकाराममहाराज देवाला दुसऱ्या कडव्यांत सांगतात--

या संतांसी निरवी हेंचि मज देई।
आणिक दुजे कांहीं न मागे तुज ।।२।।

हे देवा, मला या संतांच्या स्वाधीन करा. निरवी म्हणजे स्वाधीन कर. यापेक्षां दुसरें कांहीं मागत नाहीं.

मी हें तुम्हांलाच मागतों; कारण ही गोष्ट दुसरें कोणी करूं शकत नाहीं. जर तुम्हीं मला या संतांच्या स्वाधीन केलेंत तर तुमच्या मागची व माझ्या मागचीही कटकट दूर होईल.

तुम्ही आम्ही पिडो जेणें। दोन्ही वारती एकानें। ...

जर तुम्हीं असें केलेंत, तर माझेंही काम होईल व तुम्हांलाही कांहीं त्रास होणार नाहीं. मी तुम्हांला एवढी तसदी देतों कीं हें माझें मागणें देण्यापुरतें तुम्ही उदार व्हा. असें ते शेवटच्या कडव्यांत म्हणतात.

तुका म्हणे आतां उदार तूं होई।
मज ठेवीं पायीं संतांचिया ।।३।।

तुकाराममहाराजांना देवाचें उदारत्व माहीत होतें, पण आपला मागण्याचा अधिकार नाहीं असें त्यांना वाटत होतें, म्हणून ते देवाला विनंति करतात, 'तुम्ही जास्त कांहीं देऊं नका, एवढें द्या म्हणजे झालें.'

येथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, तुकोबा 'मज ठेवी पायीं संतांच्या ।' असें मागणें मागतात. 'मज बसवी गादीं संतांच्या' असें म्हणत नाहींत. कारण, संताला गादीच नसते. बापाच्या नांवाची इस्टेट मुलाच्या नांवावर चढूं शकते, पण असें संतांच्या बाबतींत थोडेंच आहे ? तुकोबाच म्हणतात–

'संतांचे ते आप्त नव्हती संत ।

म्हणून तुकाराममहाराज संतांच्या पायाची सेवा घडावी ही इच्छा मनांत बाळगून देवाजवळ ती पूर्ण करण्याकरितां मागणें मागतात कीं, संतांच्या पायाजवळ मला ठेवा.

या सगळ्या अभंगाचें थोडक्यांत तात्पर्य असें आहे कीं, तुकाराम-महाराज देवाजवळ संतसमागम मागतात. एवढें संतसमागमाचें काय माहात्म्य आहे हें कळण्याकरितां मनुष्यानें तुकाराममहाराजांचा गाथा अवश्य वाचावा.

तुकाराममहाराजांच्या ठिकाणीं सत्समागमासंबंधीं अतिशय प्रेम होतें. ते देवाजवळ वेळोवेळां सत्समागमाची मागणी करतांना आढळून येतात.

'अखंड जया तुझी प्रीति । मज दे तयाची संगति ।
मग मी कमळापति । तुज बा नाणी कांटाळा ॥१॥
पडोनि राहीन तये ठायीं । उगाच संताचिये पायीं ।
न मागे न करी कांहीं । तुझी आण गा विठोबा ॥२॥

तुकाराममहाराज म्हणतात कीं आषाढी-कार्तिकीच्या वेळींच देवाविषयीं जी प्रीति निर्माण होते तसली हिंवाळी-पावसाळी प्रीति काय उपयोगाची ! तुमच्या-आमच्यासारख्या सामान्य माणसाची देवावरची प्रीति अशीच भरती-ओहोटी असणारी असते. आमची देवावर जी प्रीति असते ती देवाकरतां नव्हेच. आपल्या मनासारखी एकादी गोष्ट झाली तरच आम्ही

देवावर प्रीति करण्याचा आव आणतों. मुलगा झाला तर करा सत्यनारायण ! नाहीं झाला तर नाहीं. हें का देवावर प्रेम म्हणावें ! तात्पर्य, आपण कारणपरत्वें भगवंताविषयीं मनामध्यें प्रीति बाळगतों.

तुकाराममहाराज देवाजवळ त्यांची संगति मागतात कीं ज्यांच्यांत देवाविषयीं अखंड प्रेम आहे, ज्यांच्या चित्तांत देव सदा वसत आहे.

देव वसे चित्तीं । त्यांची धरावी संगति ॥

ज्यांच्या चित्तामध्यें अखंड परमात्मा रहातो त्यांची संगति द्या. पण ती दोन घटका, चार घटका नव्हे, तर अखंड द्या अशी त्यांची मागणी आहे.

'हरिजनासवें भेटी । न हो अंगसंग तुटी ॥'

आणखी एके ठिकाणीं म्हणतात,

'कोण्या पुण्यें त्यांचा होईन सेवक ।
जिहीं द्वंद्वादिक दुराविले ॥ १ ॥
ऐसें वर्म मज दावी नारायणा ।
अंतरींच्या खुणा प्रकटोनि ॥ २ ॥'

तुकारामबोवांच्या या मागण्याचा विचार करणें अवश्य आहे. कारण ते कांहीं आपल्यासारखे सदा हातपसरे नव्हते. आपण चांगल्या गोष्टीसाठीं हात पसरूं यांत काय नवल ! पण आपल्यांत असे कांहीं असतात कीं, जे निकृष्ट, त्याज्य अशा निषिद्ध कामनेच्या पूर्तीसाठींही देवाला नवस करतात. देव म्हणतात, माझ्याकडे पुष्कळ येतात, पण 'आपुलाल्या हिताचेनि लोभें।'

तुकारामबोवांना तर कांहीं मागण्याचाच तिटकारा. ते म्हणतात—

'कांहीं मागणें हें आम्हां अनुचित ।
वडिलांचीं रीत जाणतसों ॥'

आम्ही भीकमागे नव्होत. ते देवाला म्हणतात, देवा, आम्हांला कांहीं मागणें अनुचित आहे. कारण आम्ही वडिलांची रीत जाणतों. येथें तुकाराम बोवा कोणाला वडील म्हणत होते हें विचार करण्यासारखें आहे. तुकारामबोवा ज्यांना वडील समजत होते ते कुळांतील आजोबा, पणजोबा नव्हेत.

ज्ञानेश्वरमहाराजादि जे संत होऊन गेले त्यांनाच ते खरे वडील समजत. हे जे संतमहात्मे होऊन गेले त्यांनीं देवाजवळ कांहीं मागितलें नाहीं, देव माग, माग म्हणून आग्रह करीत होते तरीही मागावयाची पंचाईत.

तुका म्हणे जीवभाव देवापायीं ।
ठेवूनिया कांहीं न मागती ।। १ ।।

तुकाराममहाराज ज्यांना वडील म्हणतात ते प्रल्हादासारखे भगवद्भक्त. प्रल्हादाची कथा अशी आहे कीं, देव माग म्हणत असतांना त्यांनीं नको म्हटलें.

प्रल्हादाच्या उद्धारासाठीं भगवंतांना नरसिंह अवतार धारण करावा लागला. प्रल्हादाला जेव्हां हिरण्यकशिपूनें 'तुझा नारायण या खांबांत आहे का?' असा प्रश्न केला तेव्हां प्रल्हादानें 'माझा नारायण सर्वव्यापी आहे. तो खांबांतच काय, पण अणुरेणूंत व्याप्त आहे' असें उत्तर दिलें. हिरण्यकशिपूनें रागानें खांबाला लाथ मारली, तों खांबांतून नरसिंह अवतरले! तुकारामबोवा म्हणतात,

'कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ।'

या जगांत पुष्कळ वस्तु दिसत नाहींत, पण त्या आहेत असें शास्त्रीय प्रयोगानें सिद्ध होतें. जें दिसत नाहीं तें नाहींच असें म्हणणें धाडसाचें आहे. याबद्दल एक दृष्टान्त देण्याजोगा आहे. एका शाळेंत एक चलाख विद्यार्थी होता. त्यानें एके दिवशीं फळ्यावर 'शिक्षक महामूर्ख आहेत' असें लिहिलें. शिक्षक वर्गांत शिरतांच त्यांना फळ्यावरील अक्षरें दिसलीं. पण ते थंड प्रकृतीचे होते. त्यांनीं तीं अक्षरें पुसून टाकलीं. तेव्हां जवळच्या पोरानें लिहिणाऱ्याला विचारलें, 'अरे तूं फळ्यावर लिहून काय उपयोग झाला? अक्षरें तर पुसलीं.' त्यावर तो म्हणाला, 'पुसून टाकलीं पण वाचलीं तर खरें!' कारण अक्षरें जरी पुसलीं तरी अर्थ पुसला जात नाहीं.

'अक्षरें पुसल्या न पुसे अर्थ जैसा ।।' ज्ञानेश्वरी

अर्थ दिसत नाहीं, पण तो अक्षरांत असतो. तसेंच ईश्वर जरी दिसत नसला तरी तो आहे. म्हणूनच तुकारामबोवा म्हणतात—

'कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ।।'

नरसिंह प्रकट झाले., त्यांनीं हिरण्यकशिपूला मारलें. त्या वेळचें नरसिंहाचें उग्र रूप पाहून सर्व देव घाबरले. पण प्रल्हादाला कसली भीति ! वाघिणीच्या पिलाला तिची कसली भीति ! वाघीण कितीही रागावली तरी तिचें पिलूं तिच्या अंगावर खेळतें. त्याचप्रमाणें नरसिंहाचें तें अक्राळविक्राळ स्वरूप पाहून प्रल्हादाला त्याची कसलीच भीति वाटली नाहीं. उलट भगवंताला पाहून त्यांना आनंद झाला. त्यानें भगवंताची स्तुति केली.

नाम प्र्ल्हाद उच्चारी । तया सोडवी नरहरी ।।
उचलून घेतला कडियेवरी । भक्तसुखें निवाला ।।

ज्ञा. अ.

नरसिंह प्रल्हादाचें प्रेम पाहून अत्यंत संतुष्ट झाले व प्रल्हादाला म्हणूं लागले,

'प्र्ल्हाद भद्रभद्रं ते प्रीतोऽहं ते सुरोत्तम ।
वरं वृणीष्वाभिमतं कामपूरोऽस्म्यहं नृणाम् ।।'

प्रल्हादाला ते 'वर माग' म्हणूं लागले. भगवंतांनीं जेव्हां प्रल्हादाला मागण्याचा अति आग्रह केला तेव्हां प्रल्हाद म्हणाले, 'देवा, आशेनें भजन करणें हें वाण्याच्या धंद्यासारखें आहे. मला कांहीं नको.' नाहीं तर आमच्या-सारखे पुष्कळ, कीं देवापुढें सडकी सुपारी ठेवतात व मागतात काय ? तर,

'अस्माकं सकलकुटुंबानां इह जन्मनि जन्मान्तरेषु ......'

बरें व्हावें. आम्हीं थोडीफार सेवा केली कीं मागायला तयार. आमची सेवा थोडी व मागणें फार.

सेवा निष्काम भावानें केली तर तिचें महत्त्व; नाहीं तर तो वाण्याचा धंदा होईल. तात्पर्य, तुकोबा हे जे प्रल्हादासारखे, ज्ञानोबांच्यासारखे पूर्वींचे साधु, वडील त्यांच्याकडे पाहून म्हणतात,

'कांहीं मागणें आम्हां अनुचित ।
वडिलांची रीत जाणतसों ।।'

अशा बाण्याचे तुकाराममहाराज असतांना ते या अभंगांत म्हणतात—

'मागणें तें एक तुजप्रति आहे ।
देशी तरी पाहे पांडुरंगा ।।'

येथें भावार्थ संपला. आतां थोडें तपशिलांत शिरूं.

तुकाराममहाराजांनीं देवाजवळ मागितलें व देवही द्यायला तयार झाले. पण त्यांनीं कांहीं धनदौलत, इस्टेट, शेत, राज्य मागितलें नाहीं. ते तर संतसमागम द्या एवढेंच मागतात. येथें दोन प्रश्न उत्पन्न होतात. एक, इतका का संतसमागम महत्त्वाचा आहे? दुसरा, असेल महत्त्वाचा-पण इतका का तो दुर्मिळ आहे, कीं त्याकरितां न मागणें हा ज्याचा बाणा त्यांनींही तो मोडावा आणि मागावें?

आपण प्रथम संतसमागम दुर्मिळ आहे काय या दुसऱ्या प्रश्नाचा विचार करूं. आपण संतसमागम करूं म्हटलें तरी तो मिळत नाहीं.

'म्हणविती ऐसें ऐकतों संत ।
न देखिजे होत डोळा कोणी ।।'

या जगांत स्वतःला संत म्हणवून घेणारे पुष्कळ; पण कसोटीचा प्रसंग आला म्हणजे त्यांचें संतपण टिकतांना दिसत नाहीं. संतांचीं अंतर व बाह्य अशीं दोन प्रकारचीं लक्षणें आहेत. संत म्हणविल्यानें अथवा संतांचीं बाह्य लक्षणें धारण केल्यानें संतपणा येत नाहीं.

'वाघाचा कलभूत दिसे वाघा ऐसा ।
परि नाहीं दशा साच अंगीं ।।'

तसें तर संत आडनांव असतें. पण त्याचा काय उपयोग! आडनांव वाघमारे आणि भितात मांजराला!

'येथें नाहीं वेष सरतें आडनांव ।
निवडे घाव डाव व्हावा अंगीं ।।

आडनांवाचे संत पुष्कळ, पण संतपणा कांहीं वेगळाच असतो. आतां महाराष्ट्रांत दुष्काळ आहे. पाण्याविना लोकांचे हाल होत आहेत. प्रत्येक खेड्यांपाड्यांत काय अन् शहरांत काय, शेंकडों गंगाबाई, यमुनाबाई,

सरस्वतीबाई या नांवांच्या बाया आहेत. पण काय उपयोग त्यांचा ! घागर घेऊन दोन दोन, चार चार मैल पाण्याला त्याच जातात !

पुष्कळ लोक जाडे जाडे ग्रंथ वाचतात, व्याख्यानें देतात. पण संतपणा नुसत्या वाचनानें अथवा व्याख्यानानें येत नाहीं. शब्दपरिचय व अर्थपरिचय याबरोबर अर्थरूपता ज्यानें साधली तोच संत होऊं शकतो. जो बोलतो त्याला अर्थ समजतोच असें नाहीं. एक मूर्ख मनुष्य होता. तो राघूचा शौकी. तो बाजारांत चालला असतां त्याला लोकांची गर्दी दिसली. तो तेथें जाऊन पाहातो तों त्याला एक राघूवाला दिसला. तो राघू विकीत होता. त्यानें जो राघू हातावर धरला होता तो विचारलेल्या प्रश्नांना 'यांत काय संशय !' असें योग्य उत्तर देई. प्रश्न विचारण्यांतील वर्म या मनुष्याला न कळल्यामुळें त्याला फारच नवल वाटलें व त्यानें असा बोलका राघू विकत घेण्याचें ठरविलें. त्यानें त्या राघूवाल्यास त्या राघूची किंमत विचारली. वस्तूची किंमत गिऱ्हाईक ज्या योग्यतेचें असेल त्यावर अवलंबून असते हें त्या हुशार राघूवाल्यास माहीत होतें. त्यानें ग्राहक लागतें हें पाहून हो नाहीं करतां करता १०० रुपयांला तो राघू त्यास विकला. असा बोलका राघू घेऊन तो घरीं आला व त्या राघूच्या हुशारीचें प्रदर्शन करूं लागला. पण एक त्याचा हुशार मित्र होता. तो म्हणाला, 'आतां-पर्यंत तूं या राघूस प्रश्न विचारीत होतास व राघूही नेमकीं उत्तरें देत होता. मी राघूस प्रश्न विचारूं काय ? त्या मनुष्यानें म्हटलें, 'अहो खुशाल विचारा ! उगीच १०० रुपये मोजले नाहींत !' त्याच्या मित्रानें राघूला विचारलें, 'काय राघोबा, ज्या मालकानें तुला १०० रुपये देऊन खरेदी केलें तो मूर्ख आहे कीं नाहीं ?' राघू उत्तरला, 'यांत काय संशय ?'

पढविलें तैसें पढों जाणें पुसा । परि नाहीं दशा साच अंगीं ।।

याचप्रमाणें कांहीं शब्दपंडित आपल्या शब्दपांडित्यानें ब्रह्माचें झाड उभें करतात. पण त्यांना ब्रह्म मुळींच माहीत नसतें.

'कैसे निरुपिती शब्दब्रह्म । आइकोनि सात्त्विका येतसे प्रेम ।
परि निजहृदयींचा भ्रम । निरसे तें वर्म नेणतीच ।।'

ए. भागवत

खरे संत मिळण्यास मात्र फार दुर्लभ असतात. भोंदू संत मिळण्यास फार सुलभ. कै. बंकटस्वामी ढोंगी साधु व लबाड शिष्य यांना एक उपमा देत असत. 'खवट खोबरें अन् खव्याळ गिन्हाईक.' असे संत पुष्कळ आहेत. ते आपल्या शिष्यांचा काय ताप दूर करणार? शिष्याचें वित्त हरण करणारे पुष्कळ गुरु आहेत, पण त्यांच्या चित्ताला होणारा ताप दूर करणारे थोडे आहेत. हे संत म्हणविणारे शिष्याचा पैसा लुबाडतात व स्वतः गबर होतात. त्यांच्या नादीं लागणारे शिष्यही त्यांच्याच कोटींतले! बी. ए., एम्. ए., डॉक्टर, वकील झाले म्हणून परमार्थ कळतो असें भारीच आहे? खरें सांगायचें म्हणजे पुष्कळ लोक भोग भोगण्याकरितां अशा गुरूच्या पाठीमागें लागतात व आपल्या पैशाची व अब्रूची उधळपट्टी करतात. कांहीं शिष्य गुरूवरही ताण करतात. असाच एक शिष्य होता गुरूचा खरा चेला. त्याच्या गांवांत गुरु आले कीं याचें जेवण बाहेर गुरूबरोबरच. ४–५ वर्षें सतत असें झालें. बाकीच्या शिष्यांच्या ही गोष्ट लक्षांत आली. त्यांनीं एक साल गुरूचा मुक्काम त्याच्याच घरीं ठेवला. त्याला मोठी पंचाईत पडली. पण तो होता गुरूलाही मुंडणारा शिष्य! त्यानें पक्कान्नाचें जेवण केलें. सर्व मंडळी खूष झाली. जातां जातां सर्वजण त्याची स्तुति करूं लागले. गुरुही त्याच्यावर प्रसन्न झाले. तो म्हणाला, 'हा सर्व गुरुमहाराजांच्या पायाचा प्रसाद आहे. मी बापडा काय करूं शकणार?' हें ऐकून तर गुरु फारच खूष झाले, शिष्यमंडळी घरोघरीं गेली. गुरूला जेव्हां स्टेशनवर पोंचविण्याची पाळी आली तेव्हां सर्व गुह्य प्रकट झालें. त्या बाबानें-गुरूच्या चांदीच्या खडावा विकल्या होत्या व विकून आलेल्या पैशानें हा सर्व थाट केला होता. असे गुरु अन् असे शिष्य असले म्हणजे लुटालुटीच सुरू होते. शांति, समाधान बाजूलाच राहातें. गुरूच जर लोभी, कामी, भोगी, तर ते शिष्यांचा काय लोभ दूर करणार?

खरा संत हा अंतर्लक्षणांनीं होतो व तीं अंगीं बाणणें फारच कठिण आहे म्हणून संत दुर्मिळ. संत तो, कीं जो असत् म्हणजे खोटीं, अशाश्वत, नाश पावणारी उपाधि तिचें तादात्म्य सोडून, संत म्हणजे शाश्वत अथवा सद्रूप असणारा जो आत्मा त्याच्याशीं समरस झाला. तात्पर्य, शुद्ध आत्म-

ज्ञान ज्याच्यांत आहे तो संत. तुकारामबोवा एके प्रसंगीं स्वतःचा अनुभव देऊन या बोधाचें वर्णन करतात—

मी वासुदेव तत्त्वता ।
कळों येईल विचारितां ।
आहे ठाउका सभाग्य संतां ।
नाहीं दुजा आणीक मागता गा ।। १ ।।

ज्ञानेश्वरमहाराज साधूचें अंतर् लक्षण हेंच सांगतात—

'आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझी रूपडीं ।।'

—ज्ञानेश्वरी

साधूला विमल आत्मज्ञान झालेलें असावें लागतें. केवळ संतांचीं बाह्य लक्षणें गंध, माळादि धारण करून साधु होत नाहीं. तुकाराम-महाराजांनीं संत कोण नाहींत व कोण आहेत यासंबंधीं एक मोठा सुरेख अभंग रचलेला आहे.

'नव्हती ते संत करितां कवित्व ।
संतांचे ते आप्त नव्हती संत ।।'

हा संपूर्ण अभंग पाहण्याजोगा आहे. असत् जो देह त्याचें तादात्म्य सुटून जो सद्रूप झाला तो संत. जोंपर्यंत देहतादात्म्य आहे तोंपर्यंत तो संत होऊंच शकत नाहीं.

तुका म्हणे नाहीं निरसला देह ।
तोंवरी हे अवघे संसारिक ।।'

रामदासस्वामींनीं मनाच्या श्लोकांत संताची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे :

'करी वृत्ति जो संत तो संत जाणा ।।'

तात्पर्य, खरें संतत्व आत्मज्ञानांत आहे. अल्प, संकोचित बोध जाऊन जो, तुकोबांच्या भाषेंत सांगावयाचें तर, ' थोर बोधानें ' या शरीरांत राहूं लागला तो संत.

अशी शुद्ध समजूत का आंत निर्माण झाली, कीं त्याबरोबर अविद्येचे असलेले पूर्वींचे कामादि परिणाम नाहींसे होऊन त्यांची जागा ज्ञानगुणांनीं घेतली जाते. त्यांचेंही वर्णन गीतेंत व भागवतांत ठिकठिकाणीं भगवंतांनीं केलें आहे. त्यांतील एकदोन महत्त्वाचे श्लोक देतों.

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥

गी. अ. १२-१६

निरपेक्षं मुनिं शान्तं निर्वैरं समदर्शनम् ।
अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥

भा. स्कं. ११, अ. १४, श्लो. १६

ज्ञान बदललें कीं जो बदल होतो त्याचें ठळक लक्षण म्हणजे त्या पुरुषास तृप्ति प्राप्त होते व त्यायोगें त्याची आशा साफ खुंटते. तो निराश होतो. समर्थांनीं वृत्ति संत करतो तो संत असें सांगून पुढें लगेच म्हटलें आहे.

दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा ॥

नाथमहाराज म्हणतात, ज्ञान हें साधूचे डोळे व निरपेक्षता हें नाक होय. ज्ञान नाहीं तर आंधळा.

श्रुतिस्मृति हे दोन्ही डोळे । येणेंवीण जे आंधळे ॥

व तसेंच ते म्हणतात—

परमार्थी मुख्य बीक । निरपेक्षता हे नाक ।
तेणेंवीण ते निर्नासिक । ................

निरपेक्षता नसेल तर साधु, पण नकटा.

आपल्या मुलास मुलगी करावयाची असेल तर मुलाचा बाप मुलीच्या लक्षणांत मुख्य ज्या दोन गोष्टी पाहतो त्याविषयीं आपल्यामध्यें एक म्हण

आहे, ‘ काळीसांवळी चालेल, पण नाकींडोळीं नीट असावी ’. तसेंच गुरूच्या लक्षणांत ज्ञान व निरपेक्षता हे डोळे व नाक म्हणजे मुख्य गुण आहेत. एक निरपेक्षता का प्राप्त झाली कीं इतर लक्षणें आलींच.

असो पंचलक्षण कथा । एक ‘ निरपेक्षता ’ आल्या हातां ॥
पायां लागे सायुज्यता । पूर्णब्रह्मता ठसावे ॥
निरपेक्षाचें निश्चळ मन । निरपेक्ष तो निर्वैर जाण ।
निरपेक्ष तो शांत संपूर्ण । निरपेक्षाची जाण सेवा मी करीं ॥

एकनाथी भागवत. अ. १४–१८१–८२

तात्पर्य, संतांचीं प्रमुख अंतर्लक्षणें म्हणजे ज्ञान व निरपेक्षता यांनीं युक्त तो संत.

पण हीं लक्षणें अंगीं येणें हें फार दुर्लभ आहे. ज्ञान किती दुर्लभ आहे हें भगवंतांनींच गीतेंत ‘ बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते ’ अ. ७ श्लोक १९ मध्यें सांगितलें आहे. तसेंच ‘ निरपेक्षता ’ अंगीं बाणणें किती कठिण आहे हें एकनाथांनीं निरपेक्षतेचें भागवत अ. १४ श्लोक १६ जो वर दिला आहे त्यांतील ‘ निरपेक्ष ’ या पदाचें व्याख्यान करून सांगितलें आहे. ते म्हणतात—

“ अनन्य करितां माझें भजन । माझ्या स्वरूपीं झगटलें मन । सकळ वासना गेल्या विरोन । वृत्ति शून्य अवस्था ॥ आटाटीवीण न प्रार्थितां । अयाचित अर्थ प्राप्त होतां । तोही हातीं घेवो जातां निरपेक्षिता बुडाली ॥ अर्थ देखोनि जो लविन्नला । तो जाण लोभें ओणवा केला । तोही उपेक्षूनि जो निघाला । तो म्यां वंदिला सर्वस्वें ॥ मार्गीं अर्थ पडला असतां । कोणी नाहीं माझा म्हणतां । तोही स्वयें हातीं घेतां । निरपेक्षता बुडाली ॥ वृत्ति शून्य जे अवस्था । ती जाण निरपेक्षता ॥ . . . . . . . . . . . . .

ही साधूची निरपेक्षता. ही कांय वाटेवर पडली आहे? ही फार दुर्मिळ.

तात्पर्य, प्रचीतीचें ज्ञान व निरपेक्षतादि गुण या दोन्ही गोष्टी दुर्मिळ असल्यानें व त्याविना संतत्व येतच नसल्यानें संत हे दुर्मिळांतले दुर्मिळ आहेत.

जनकराजांनीं म्हटलें आहे—

'दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभंगुरः।
तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुंठप्रियदर्शनम्'।

भा. अ. २-२९

हा नरदेह मिळण्यास फार दुर्लभ आहे. आपल्याला तो सहज मिळालेला असल्यामुळे तो दुर्लभ आहे असें वाटत नाहीं. जितकी वस्तु जवळ तितकें तिचें मूल्य कमी असा मानसशास्त्राचा सिद्धान्त आहे. पण नाथमहाराज एका अभंगांत म्हणतात—

'नरदेह दुर्लभु जाणा। शतवर्षांची गणना।
त्यामध्यें दुःखयातना। तुम्ही आठवा मधुसूदना॥'

या जगतांत तीन गोष्टी अत्यंत दुर्लभ आहेत.

'दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रहहेतुकम्।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः॥'

मनुष्यजन्म मिळणें, मुमुक्षुता अंगीं बाणणें व शेवटीं सत्समागम घडणें या तीन गोष्टी फार दुर्मिळ आहेत. या तीनही गोष्टींतून साधूची गांठ पडणें किती दुर्लभ आहे हें दृष्टान्तानें नाथमहाराज सांगतात—

चंद्रामृत सुखें सेववेल। अस्ता जातां रवि धरवेल।
बाहीं हेळा सागर तरवेल। परि त्या साधूची भेटी न होईल॥

ए. म.

उन्हाळ्यांत ज्या ठिकाणीं ११६°, १२०° उष्णतामान असतें त्या ठिकाणचीं झाडें कशाच्या जिवावर जगतात? रात्रीं त्यांना शीतल चंद्र-किरणांपासून अमृत मिळतें म्हणून तीं जगतात. पण आता रेशनिंग आहे, खायला अन्न नाहीं, दुष्काळांत प्यायला पाणी नसतें, अशा वेळेला जर कोणी मनुष्य रात्रीं तोंड पसरून चंद्रामृत प्राशन करावयास बसला तर त्याला तें मिळून पोट भरेल काय?

पण नाथमहाराज म्हणतात, एक वेळ हें शक्य आहे. तसेंच हातांनीं समुद्र तरून जाणें शक्य आहे. सूर्याच्या गतीला हात वरती करून थांबविणें अशक्य आहे. नाथमहाराज म्हणतात, एक वेळ हें सर्व शक्य आहे; पण खऱ्या साधूची गांठ पडणें कठिण आहे.

मुळांत आपल्याला त्याला ओळखणेंच कठिण आहे. कारण हीं मुख्य लक्षणें 'अंतर' लक्षणें आहेत. बाहेर जगव्यवहारांत साधु इतर लोकां-सारखाच वागतो. त्यालाही घरदार, बायकामुलें असूं शकतात. नाथमहाराज, तुकोबा यांचा प्रपंच होताच. ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे—

जैसा जनामाजीं खेचरू। असतुचि जना नोहे गोचरू।
तैसा शरीरीं परि संसारु। नोळखे तयातें ॥

ज्ञानेश्वरी अ. ५-९९

तुकारामबोवा म्हणतात, साधु ओळखतां येतो; पण केव्हां? आपण साधु झालों म्हणजे.

तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण।
तरीच महिमान येईल कळों ॥

पण मग उपयोग काय?

तेव्हां दुर्मिळ जी संतभेट, त्यांची सेवा करण्याचें भाग्य याहीपेक्षां दुर्मिळ, ती व्हावी याला सोपा व सरळ एकच उपाय, 'त्यांची भेट करून दे' अशी देवाची प्रार्थना करणें. तो त्यांना खास ओळखतो म्हणूनच ज्ञानोबा, तुकारामबोवादि संत म्हणतात—

संत ते कवण संत ते कवण। जाणवी खूण केशवराज ॥

ज्ञा. अ.

तुकारामबोवाही संत दुर्मिळ आहेत, देवांनीं गांठ घालून दिल्याशिवाय त्यांची गांठ पडणार नाहीं हें जाणत होते. म्हणून ते म्हणतात—

वर्म तें न पडे ठायीं। पांडुरंगावीण कांहीं ॥

× × ×

बहु अवघड आहे संतभेटी ।
तरी या जगजेठी करुणा केली ॥

म्हणून प्रस्तुतच्या कीर्तनाच्या अभंगांत मागणें मागतात--

मागणें तें एक तुजप्रति आहे ।
देशी तरी पाहे पांडुरंगा ॥ १ ॥
या संतासी निरवी हेंचि मज देईं ।
आणिक दुजें कांहीं न मागे देवा ॥ २ ॥

आतांपर्यंत संतांची गांठ पडणें किती दुर्मिळ याचा विचार सांगितला. आतां दुसऱ्या प्रश्नाचा म्हणजे सत्समागमाचा लाभ काय तें पाहूं.

तुकाराममहाराजांना संतांच्या पायाजवळ रहाणें यांत फार लाभ वाटत होता. ते म्हणतात, मला जर संतदर्शन झालें तर--

पडोनि राहीन तये ठायीं । उगाच संताचिये पायीं ।
न मागे न करी कांहीं । तुझी आण गा विठोबा ॥

मी नुसता पडून राहीन. असा संतांच्या पायीं पडून राहण्यांत तुकोबा लाभ समजतात असा लाभ तरी कोणता ? तेच सांगतात—

तेथ रामनाम होईल श्रवण । घडेल भोजन उच्छिष्टाचें ॥

तुकाराममहाराज म्हणतात, भगवंताचें नांव कानावर पडेल. दिसायला हें क्षुद्र फळ दिसतें, पण विचार करून पाहिलें तर फार महत्त्वाचें व दुर्लभ असेंच वाटेल. आपले तासच्या तास, नव्हे दिवसच्या दिवस, नव्हे वर्षानुवर्षे कशीं चाललीं आहेत, काय बोलण्यांत व काय ऐकण्यांत चाललीं आहेत याचा मनुष्यानें विचार करावा म्हणजे त्यास वाटेल कीं, रामनामाचें श्रवण दुर्लभ आहे. ज्ञानेश्वरमहाराज हरिपाठांत म्हणतात—

ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ ।
सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥

पण या संतांच्याजवळ राहिलें कीं 'जें जन्मसहस्रीं बोलगिजे एकवेळ सुखासी यावया' तें कानावर सहज पडेल.

कारण—

सहज तया जना छंद । वाचें गोविंद गोविंद ।।

एकनाथ अभंग

ज्ञानोबारायही म्हणतात—

कृष्णविष्णुहरिगोविंद । या नामाचे निखळ प्रबंध ।
माजीं आत्मचर्चा विशद । उदंड गाती ।।

हा मोठा लाभ आहे. भगवंताच्या नामाइतकें मनाला समाधान देणारें सोपें साधन नाहीं.

तुकारामबोवा आपला अनुभव सांगतात—

नाम घेतां मन निवे । जिव्हे अमृतचि स्रवे ।
होताती बरवे । ऐसे शकून लाभाचे ।।१।।

हा संपूर्ण अभंग पहाण्यासारखा आहे.

दुसरा लाभ—

घडेल भोजन उच्छिष्टाचें ।।

त्यांचें उष्टें म्हणजे त्यांच्या मुखांतून येणारी भगवद्विषयक चर्चा मला सेवन करावयास मिळेल. हीही ऐकण्यास दुर्मिळ व परिणामीं अमोघ व सद्यःफलदायी अशी आहे.

संतमहात्मे हे जरी पूर्ण झालेले असले तरी एकमेकांस भेटले कीं भगवद्विषयक वादविवाद चर्चा करतातच.

‘ मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् । ’

गी. अ. १०–९

असें देवच म्हणतात, तुकोबाही म्हणतात—

स्वयें सुखाचे झाले अनुभव ।
एक एकीपाशीं सांगतील भाव ।
अवघ्यां अवघा हा कैसा नवलाव ।।
सर्वसाक्षी तेथेंचि त्यांचा जीव वो ।।१।।

आपआपणांशीं करिती नवल !
परि वादावाद न संडिती बोल । ........

त्यांच्या मुखांतून वाहणारी ही ज्ञानगंगा याचा एक तुषार जरी अंगावर पडला तरी मनुष्याचें कार्य होईल. इतकी पवित्र ही ज्ञानगंगा आहे...

नाथमहाराज म्हणतात--

त्याचें गाणें ऐकतां । सुखरूप होय सज्ञान श्रोता ।
मुमुक्षु होय परमावस्था । जरी तो अवचिता गावो लागे ।

प्रपंचाचें मिथ्यत्व पटवून भगवंतावर निष्ठा व प्रेम उत्पन्न करण्यास याच्यासारखा अमोघ उपाय नाहीं. नारदांनीं आपल्या भक्तिसूत्रांत म्हटलें आहे--

महत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥

तुकारामबोवा आपले अनुभव सांगतात--

बैसतां संतचि संगतीं । कळों आले कमळापती ।
आपुलीं कोणीच नव्हती । निश्चय चित्तीं दृढ झाला ॥१॥

× × ×

संतदर्शनीं हा लाभ । पद्मनाभ जोडला ॥१॥

तात्पर्य, जीवनाच्या मार्गेच आयुष्य घालवून त्यास इष्ट भगवत्प्राप्ति करून देणारा संतांचा सहवास आहे हें तुकोबा जाणत होते, पण तो दुर्मिळ आहे व देवाच्या कृपेविना तो प्राप्त होणारा नव्हे हेंही ते जाणत होते. म्हणून देवाची प्रार्थना करतात--

तुका म्हणे आतां उदार तूं होईं ।
मज ठेवीं पायीं संतांचिया ॥६॥

मी तेथें त्यांच्या पायांतला जोडा होऊन राहण्यास तयार आहे.

तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस ।
लोळोनियां त्यास करीन तेथें ॥

[illegible]
[illegible] ७३८२२ दि: [illegible]
[illegible] २२९ [illegible] दि: २५।३।६७

REFBK-0014838

REFBK-0014838

१४८३८

# सुबोध ज्ञानेश्वरी

ले.—य. गो. जोशी

संस्कृति व सदभिरुचि यांची जोपासना करूं इच्छिणाऱ्या अखिल महाराष्ट्रानें व महाराष्ट्राबाहेरीलहि तशाच मराठी वाचकवर्गानें मुक्तकंठानें स्तुति करून अपूर्व उत्साहानें स्वागत केलेली ही

**'सुबोध ज्ञानेश्वरी'**

सचित्र व सरळ मराठी गद्यांत लिहिलेली आहे.

अध्याय १ ते १८ किंमत रुपये २० फक्त.

पृष्ठें सुमारें ७००

प्रसाद प्रकाशन पुणें २.